# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०२/०५/२०१८**
**(दि. १८/०४/२०१८ रोजीची तहकुब सभा)**

मा. महासभा बुधवार दि. १८/०४/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ०२ ते १७ व पुरक घोषणा क्र. १८ ते २० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दिनांक ०२/०५/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महापालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १३) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १४) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १५) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १६) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १७) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १८) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १९) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २०) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २१) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २२) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २३) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २४) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २५) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २६) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २७) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| २८) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| २९) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३०) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३१) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३२) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३३) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३४) | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | सदस्या |
| ३५) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३६) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३७) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३९) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४०) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४१) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४२) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४३) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४४) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४५) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४६) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४७) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४८) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४९) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५०) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५१) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५२) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५३) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५४) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५५) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५६) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५७) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६०) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६१) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६३) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६४) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६५) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६६) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६७) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| **७३)** | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| **७४)** | **जैन दिनेश तेजराज** | **सदस्य** |
| **७५)** | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |
| **७६)** | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| **७७)** | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| **७८)** | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| **७९)** | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| **८०)** | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| **८१)** | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| **८२)** | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| **८३)** | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| **८४)** | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **८५)** | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| **८६)** | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| **८७)** | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| **८८)** | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| **८९)** | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य** -

| | | |
|---|---|---|
| **१)** | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| **२)** | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| **३)** | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| **४)** | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| **५)** | **शेट्टी अरविंद आनंद** | **सदस्य** |
| **६)** | **यादव मिरादेवी रामलाल** | **सदस्या** |

**रजेचा अर्ज - निरंक**

**नगरसचिव :-**

मा. महासभा बुधवार दि. १८/०४/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ०२ ते १७ व पुरक घोषणा क्र. १८ ते २० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **बुधवार, दिनांक ०२/०५/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रकरण क्र. ०२, **महानगरपालिका शहरात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.**

**रिटा शाह :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पावर लि. या कंपनी मार्फत विज पूरवठा केला जातो. तत्पूर्वी ग्रामपंचायती अस्तित्वात असताना १९७९ च्या दरम्यान सर्व ग्रामपंयतीनी ठराव करुन मे. बी.एस.ई.एस लि. यांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर क्षेत्रात वीज पूरवठा करण्याबाबत विनंती केल्यानूसार वीज पूरवठा सुरु आहे. तत्कालिन बी.एस.ई.एस. लि. व सध्याची मे. रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीच्या धोरणानुसार मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पथदीवे देखिल सदर कंपनी मार्फत स्वखर्चाने बसविण्यात येतात. महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्षात होणारे वीज बील व निश्चित केलेले देखभाल व दुरुस्तीची रक्कम दर महिन्यास देण्यात येते. अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वीज वापर दर, देखभाल दुरुस्तीचे दर व All in hire scheme नुसार या शहरास मागील ३५ वर्षापासून वीज पूरवठा व पथदीवे बसविणे कार्यवाही करण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. सदर पथदीव्यांच्या देयकाच्या बदल्यात

शहरातील त्यांच्या सर्व वाहीन्या स्थलांतरणाची कामे मोफत करते सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने तातडीने दिवे लावून देते.

सद्यस्थितीत केंद्र शासन व राज्य शासनामार्फत उर्जा बचतीचे धोरण असल्याने सद्यास्थितीत वापरत असलेल्या सोडीयम व्हेपर व मर्क्युरी व्हेपर चे दिवे एल.ई.डी. ने बदल्यास सुमारे ४०% उर्जेची बचत होऊ शकणार आहे. या साठी सदर दिवे बदलण्याची आवश्यकता आहे. तथापी सर्व पथदिवे यांची मालकी मे. रिलायन्स एनर्जी लि. यांची असल्याने याबाबत त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करुन एल.ई.डी. दिवे करण्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर प्रस्ताव सादर केला आहे.

**ALL IN HIRE Charges for LED Lanterns w.e.f.01/04/2017 up to 31/03/2020**

| Sr. No. | E x is | LED W a | Qty. Nos. (Nov. Bill) | HPSV AIH charges Rs. Each | LED AIH Charges Rs. Each | Effect on load (kw) | Increase in AIH (Rs. Lacs) p.a. | Reduction Energy Charges Rs. Lacs p.a. | Net Effect (Rs. Lacs)p.a |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 70 | 50 | 6958 | 835 | 1070.00 | -244 | 16 | -77 | -60 |
| 2 | 150 | 105 | 4919 | 910 | 1185.00 | -334 | 14 | -105 | -92 |
| 3 | 250 | 170 | 1194 | 860 | 1175.00 | -134 | 4 | -42 | -38 |
| 4 | 400 | 445 | 303 | 840 | 840 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | 13374 | | | -712 | 34 | -224 | -190 |

वरील प्रमाणे मे. रिलायन्स एनर्जी लि. यांनी एल.ई.डी. दिवे बदलल्यास आकारण्यात येणारे सुधारीत दर दिले असून त्यानूसार वार्षिक रु.१.९० कोटी एवढा जास्त खर्च येणार असून त्याबदल्यास वार्षिक रु.२.२४ कोटी एवढी वीज वापराच्या खर्चात बचत होणार आहे. मुंबई महानगरपालिकेने मे. रिलायन्स एनर्जी लि., बी.ई.एस.टी व मे.महावितरण यांचा प्रस्ताव करुन मान्य करुन अंमलबजावणीची तयारी केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्ताव मान्य केल्यास मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत टप्प्याटप्प्याने दिवे बदलून एल.ई.डी. चे करण्यात येतील.

शासन नगरविकास विभाग यांच्या दि. १२ जानेवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार सर्व नागरी स्वराज्य संस्थाना पथदिव्यांसाठी फक्त एल.ई.डी दिवे बसविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सर्व नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थे करीता (पथदिवे) एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन उर्जा संवर्धन करण्यासाठी ई.ई.एस.एल (EESL) या केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमाशी करारनामा (MOU) करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पथदीवे एल.ई.डी. करण्याबाबत विविध खाजगी संस्थानी संपर्क करुन सादरीकरण केलेले आहे. त्या नूसार सदर संस्थामार्फत सर्व पथदीवे ताब्यात घेऊन स्वखर्चाने दिवे बदलणे व वीज वापरात बचत होणाऱ्या रकमेतून महानगरपालिकेस उत्पन्न देणेची तयारी दर्शविलेली आहे. काही संस्थानी त्यांना एल ई डी करण्यासाठी रक्कम देण्याची मागणी केली आहे. तत्पूर्वी मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना त्यांच्या पथदिव्यांचे मुल्यांकन करुन रक्कम अदा करावी लागेल. सदर रक्कम देखिल अदा करण्यास काही संस्थांनी तयारी दर्शविलेली आहे. या सर्व प्रस्तावाबाबत जाहीर निविदा काढून प्रस्ताव मागवून मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्या कडील सध्याची योजना व होणारे फायदे व देखभाल दुरुस्तीचे स्वरुप पाहता तसेच महानगरपालिकेस अतिरिक्त कोणताही खर्च, दायित्व व पथदिव्यांच्या सोयी सुविधात कमतरता न येता महानगरपालिकेच्या फायदयाचा प्रस्ताव स्विकारणे योग्य होणार आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. रिलायन्स एनर्जी लि. यांचे १३३४७ पथदीवे व महानगरपालिकेने स्वतः बसविलेले २३६३ पथदीवे वापरात आहेत.

**ठराव क्र.         :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या प्रस्तावानुसार संबंधीत विषयाची आवश्यक ती माहीती घेवून स्ट्रीट लाईट पोल एल.ई.डी. करण्याबाबत खाजगी संस्थाकडुन प्रस्ताव मागविण्यात यावेत व सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करावेत असा मी ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, आज सर्वांचा आम्हाला आर्शिवाद आहे. हे बघून चांगल वाटतं. असाच आर्शिवाद तुमचा रहावा. महापौर मॅडम, मला अस वाटते सार्वजनिक बांधकाम विभागाला ह्या विषयावर निवेदन करायला बोलवा. आपल्याला करायचे आहे. मी ठरावाच्या बाजूने राहणार विषय कसा आहे. तो समजून सांगणे गरजेचे आहे. दुसरे कोणीही आपल्याकडे एल.ई.डी. दिवे लावले तर त्याला आपल्याला काय मोबदला द्यायचे आहे. तसे गोषवऱ्यामध्ये तसे काही स्पष्ट नाही. गर गर करुन ठराव वाचला ते काय आमच्या लक्षात येत नाही. खर तर भूमिका काय घेतली.

**रिटा शाह :-**

स्पष्ट लिहिले आहे की रिलायन्सवाले मोफतमध्ये लावून देणार आहेत. ते आपल्याकडून काहीच खर्च घेणार नाहीत. आपल्याकडे आपण त्याच्यावर निविदा काढणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

असे रिलायन्सने आपल्याला लेखी दिलेले आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, जुबेरजी ठरावामध्ये उपरोक्त प्रस्तावित केलेल्या प्रस्तावानुसार संबंधित विषयाची आवश्यक ती माहिती घेवून स्ट्रीट लाईट पोल एल.ई.डी. करण्याबाबत खाजगी संस्थांकडून राज्यशासनाकडून प्रस्ताव मागवण्यात यावे. आणि तद्नंतर सदर प्रस्ताव स्थायी समितीपूढे सादर करावे. म्हणजे आपण फक्त प्रस्ताव मागवणार आहोत. आपल्या शहरामध्ये जेवढे पण छोटे जे दिवे आहेत ह्या दिव्यांचे जे बील आहे हे जास्त येत असल्यामुळे आपण ती एल.ई.डी. लाईट लावून हे बील कमी करण्याचे प्रयत्न करतो. कोणत्याही ठेकेदाराला किंवा कोणत्याही कंपनीला आपण देणार नाही. आपण त्यांच्याकडून प्रस्ताव मागवणार आहोत. मागच्या वर्षी जवळ जवळ चार ते पाच कंपन्याकडून प्रस्ताव आपल्या महापालिकेस सादर झाले आहेत. बांधकाम विभागामार्फत आणि हे धोरण ठरवायचे आहे. म्हणून हा विषय महासभेपूढे आणला होता. आपण फक्त धोरणाला मंजुरी द्यायची आहे. बांधकाम विभाग, प्रशासन त्याच्यावरती प्रस्ताव मागवतील आणि मागविल्यानंतर छाननी करतील आणि छाननी केल्यानंतर स्थायी समितीपूढे सादर करतील.

**जुबेर इनामदार :-**

सभापती महोदय हा धोरणात्मक निर्णय आहे. हरकत नाही. स्थायी समितीला अधिकार वैधानिक विषय असतात. तिथे फायनान्स जिथे असेल तिथे आपल्याला त्याच्यावर स्थायी समितीला प्राप्त करुन घेता येतो. मात्र कुठलीही संस्था आपल्याकडे जे दिवे लावणार आहेत त्यांना काय मोबदला देणार त्याची मागणी काय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्हाला ते स्पष्ट करावे. गोषवाऱ्यामध्ये काहीच नमुद केलेले नाही आणि तसे तुम्ही थातुरमातुर ठराव झालेले आहेत ह्या विषयावरती.

**नरेश पाटील :-**

लोकांची इतकी हालत खराब आहे. तुम्ही विचार पण करु शकत नाहीत. तुम्ही उच्च जागेवर बसले आहेत. त्यांचे खालचे लोकांचे पण विचार करा.

**जुबेर इनामदार :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाला बोलवा. कार्यकारी अभियंता, शहर अभियंता यांना बोलवा त्यांना स्पष्टीकरण देवू द्या. आमची तयारी आहे. करायचे आहे चांगला विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, बांधकाम विभागाने सविस्तर जवळ जवळ दीड पानांचा गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये त्यांनी सर्व परिस्थितीचा आढावा घेवून त्यांनी सांगितले आहे आणि वेगवेगळ्या कंपन्या पण आल्या होत्या ते पण नमुद केले आहे. त्याच्यानंतर रिलायन्स कंपनीने पण एक प्रस्ताव सादर केला आहे. ते पण त्यांनी नमुद केले आहे. त्यांनी हे सांगितले की आणखी आपण कंपनीकडून प्रस्ताव मागवणार आहेत आणि प्रस्ताव मागवल्यानंतर डिस्कशन होणार आहे. त्याच्यानंतर ते सभेपूढे येणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

गोषवाऱ्यामध्ये संस्था आलेल्या आहेत. विविध संस्था आपल्याकडे येत आहेत. आपल्याकडे एल.ई.डी. दिवे लावून देतील असे आपल्याला सांगितले आहे. मात्र त्याच्याबद्दल त्यांना मोबदला काही तरी निःशुल्क लावून देत आहेत का? निःशुल्क लावून देत असतील तर आम्हाला काही हरकत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम की लोकांनी समोरुन पालिकेमध्ये ॲडरेस केलेले आहेत की आमच्याकडे ह्या स्कीम्स आहेत आणि पालिका डायरेक्ट ती स्कीम ॲप्रोच घेवू शकत नाही. त्याच्यावरती महापालिकेला टेंडर काढावा लागेल. निविदा प्रसिध्द करावी लागेल. लोकांसमोर पेपरवरती प्रसिध्दी द्यावी लागेल. ऑनलाईन प्रसिध्दी द्यावी लागेल की मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सगळ्या स्ट्रीट लाईट आपल्याला बदलून एल.ई.डी. लावायच्या आहेत. तरी आपल्या कंपनीमार्फत आपण जे काही आपल्या योजना असतील त्या योजना महापालिकेत तुम्ही सादर करा. त्याच्यानंतर त्याच्यामधून आपण डिसीजन घेणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

गोषवाऱ्यामध्ये जसे आता हे बोलले की गोषवाऱ्यामध्ये दिले मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पध्दतीने एल.ई.डी करण्याबाबत विविध खाजगी संस्थांनी संपर्क करुन सादरीकरण केलेले आहे. त्यानुसार संस्थेमार्फत सर्व पथदिवे ताब्यात घेवून स्वःखर्चान दिवे बदलणे व वीज वापरात बचत होण्याच्या रक्कमेतून महानगरपालिकेच्या ओपन देण्याची तयारी दर्शविलेली आहे. काही संस्थांनी त्यांच्या एल.ई.डी. कार्यासाठी रक्कम देण्याची मागणी केली आहे. त्यापूर्वी मा. मेसर्स संस्था एनर्जी लिमीटेड यांनी त्यांच्या पध्दतीने दिव्यांची मुल्यांकन करुन रक्कम अदा करावी लागेल हे असे आमची साहेब महापौरांना अशी मागणी आहे की त्यांनी रितसर त्या विभागाच्या लोकांना बोलवा ना. मंचावर त्यांच्याकडून घ्या ना निवेदन काय आहे ते तुम्ही त्याची माहिती देत आहेत. त्यांना देवू द्या. प्रशासकीय कामकाज आहे. तुम्ही प्रशासनाचा हिस्सा नाही. तुम्ही धोरणात्मक निर्णय करणार आहेत. हो किंवा नाही. ह्याच्यावर अधिकार आहे तुमच्याकडे.

**धृवकिशोर पाटील :-**

धोरणासाठीच हा प्रस्ताव होता. मिरा भाईंदर महानगरपालिकेत एल.ई.डी. दिवे बसवणे करिता धोरण निश्चित करणे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला प्रशासनाने सांगावे.

**धृवकिशोर पाटील :-**

क्लिअर कट दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमच बोललेले आम्हाला समजत नाही. प्रशासनाने सांगावे प्रशासनाने उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

लेकिन गोषवारे में सब स्पष्ट दिया हूआ है।

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम माझे ही तेच मत आहे. गोषवारा में जे काही दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

वही वो बोलेंगे।

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी काय सांगितल लावून देण्याचा विषय केलेला आहे. त्याच्याबद्दल ते मोबदला काय घेणार आहेत. प्रशासनाची काय भूमिका आहे त्याच्यामध्ये काय मत आहे.

**मा. महापौर :-**

गोषवाऱ्यामध्ये जे दिलेले आहे तेच भूमिका असणार.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला ठराव करावा लागेल. माझी इच्छा नाही ठराव करायची.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव करायचे आहे का?

**जुबेर इनामदार :-**

नाही. म्हणजे तुम्हाला विरोधक ठराव पाहिजे का?

**मा. महापौर :-**

नाही पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब हा शहराचा विषय आहे. एक गोष्ट पक्की समजून घ्या की एल.ई.डी. दिवे लावल्यामुळे विजेच्या बीलामध्ये निश्चित बदल होणार आहे. आणि आपण काय ठरवतो की ह्या संदर्भात वीस संस्था आपल्याकडे अप्रोच झालेल्या आहेत आणि आपल्याला फक्त ह्या विषयामध्ये आज धोरण ठरवतोय मग आपल्याला अनेक लोकांचे प्रस्ताव मागवता येईल आणि आपण स्थायी समितीत हा त्याच्यामध्ये निश्चित धोरण होईल. हा ठराव केला म्हणजे आपण कोणाला देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

उपमहापौर साहेब, ठराव केला म्हणजे आपण देत नाही हे बरोबर आहे. हे धोरण आहे. धोरण ठरवण्यासाठी पॉलिसी मॅटर ठरवण्यासाठी महासभेसमोर विषय आलेला आहे. ह्याच्यात तो स्थायी समिती समोरच गेला असता.

**धृवकिशोर पाटील :-**

सर हे धोरण आहे.

**जुबेर इनामदार :-**

काय म्हणतात ती संस्थेची लोक.

**धृवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने दिले आहे ह्या सर्व प्रस्तावाबाबत जाहिर निविदा काढून प्रस्ताव मागुन मे. रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांच्याकडून सध्याची योजना व होणारे फायदे व देखभाल दुरुस्ती सर्व पाहता तसेच महानगरपालिकेत अतिरिक्त कोणताही खर्च दायित्व व पथदिव्यांची सोयीसुविधा कमतरता न येता महापालिकेच्या फायद्याचा प्रस्ताव स्विकारणे योग्य होणार आहे. म्हणजे प्रशासनाने क्लिअर दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

परत तुम्ही महासभेसमोर हा विषय आणणार की स्थायी समितीसमोर नेणार, येणारा त्यांचे काय म्हणणे आहे ते महत्वाचे आहे. ते आपल्याकडून काय परत घेणार आहेत ते मोबदल्याच्या स्वरुपात उद्या ॲडव्हटाईजमेंट मागतात बाकी त्यांना दुसरं काही हवं आहे ते तुम्ही स्पष्ट कुठे दिले आहे याच्यामध्ये हा तर माझ्या प्रशासनाला प्रश्न आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

कोणत्याही कंपनीला किंवा संस्थेला आपण दिलेले नाही. कोणत्याही कंपनीची योजना स्विकारलेली नाही. हे फक्त आपल्याला धोरण ठरवण्याकरिता आणि निविदा काढण्याकरिता आपल्याला हा प्रस्ताव.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम आजचा हा प्रस्ताव खरोखर चांगला आहे. गेल्या कित्येक वर्षापासून ह्या एल.ई.डी. ची आम्ही मागणी करत होतो. आज तुम्ही प्रस्ताव आणला चांगली गोष्ट आहे. मागच्या वेळेलाही अनेक संस्था, अनेक कंपन्या आपल्या महापालिकेला जॉईंट झाल्या होत्या. त्यांनी ही अनेक प्रस्ताव सादर केले होते. त्याच्यामध्ये एक प्रस्ताव असा होता की एल.ई.डी. चे दिवे लावतो. त्याच्यावरती कॅमेरे लावणार होते. त्याच्यामध्ये तसे एक पॅनेलला असतं तसेही प्रस्ताव काही कंपन्यातर्फे आले होते. कारण मुंबई महापालिकेने जे कॅमेरे लावले त्याच प्रकारचे ह्या मिरा भाईंदरमध्ये ही कॅमेरे लावण्यात यावे. त्या एल.ई.डी. त्याचे ही तुम्ही विचार करावा आणि दुसरी गोष्ट म्हणजे जुबेर इनामदारजीने जे सांगितले तर महानगरपालिकेने येणारे आजचे बील आणि रिलायन्स बील आणि एल.ई.डी.चे बील याच्यात किती तफावत आहे. याच्याबद्दल जर खुलासा केला तर बर झाल असतं.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम एल.ई.डी. दिवे आणि त्याच्यामध्ये विद्युत बिलात फरक हा नक्कीच आहे. एल.ई.डी. दिवेसाठी आम्ही देखील वेळोवेळी मागणी केलेली आहे. परंतु त्यापूर्वी आता जेव्हा ठराव वाचला गेला त्यामध्ये वेळोवेळी मेन्शन केले होते की मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार त्याच काही तरी धोरण ठरल असेल किंवा त्यांची माहिती तुमच्याकडे असणारच आहे. मागवली का आपण ती.

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यात माहिती आहे मॅडम.

**निलम ढवण :-**

त्याच्यात माहिती आहे मग त्या धोरणानुसार आपण हा राबवण्याचा म्हणतो खाजगी संस्थांकडून आपण हे मागवले.

**धृवकिशोर पाटील :-**

खाजगी संस्था ती कंपनी आहेत. टाटा असू शकेल, रिलायन्स असू शकेल, बी.एस.एन.एल. कंपनी असू शकेल. कोणतीही कंपनी असू शकेल. खाजगी संस्था पण खाजगी माणूस नाही. खाजगी संस्था म्हणजे खाजगीकरण नाही.

**निलम ढवण :-**

खाजगी संस्थांकडून मागितले बरोबर आहे. आम्ही एल.ई.डी. दिवे न लावावे ह्या मताचे नाहीत. लावलेच पाहिजेत परंतु थोडीशी पारदर्शकता दाखवा ना सगळेच जर हे सन्मा. सदस्य जर मागत असतील की प्रशासनातर्फे खुलासा व्हावा तर ती पारदर्शकता ठेवायला काय प्रॉब्लेम आहे. त्यांना बोलवा ना कशाला वेळ वाया घालवता. आपण विषय समजण्यापेक्षा पाच मिनिट प्रशासन देतील ना विश्लेषण. पारदर्शकता का नको इथे.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम हा आरोप चुकीचा आहे. पारदर्शकता ठेवली.

**निलम ढवण :-**

मग बोलवा ना मग तुम्ही चालू करा कशाला म्हणतात प्रशासनाला बोलवा ना.

**धृवकिशोर पाटील :-**

एवढा मोठा गोषवारा दिलेला आहे. प्रशासनाने त्याच्यात क्लिअर कट म्हटले आहे.

**निलम ढवण :-**

तरी ही जर सदस्यांचे समाधान होत नसेल तर प्रशासनाने त्यांचा खुलासा करावा ना.

**मा. उपमहापौर :-**

समाधान होत नाही की समाधान करुन घेत नाही.

**निलम ढवण :-**

होत नाही आपण एवढे आगळे वेगळे घेण्याचे कारण काय ते तर सांगा?

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाची भुमिका प्रशासनानीच पूर्ण करावी.

**मा. उपमहापौर :-**

महासभेने फक्त धोरण निश्चित केले आणि हे घेतल्यानंतर प्रशासन त्याच्यामध्ये विधीवत सगळ्या गोष्टी करणारच आहे. आणि प्रशासनाचीच टिप्पणी आलेली आहे.

**निलम ढवण :-**

पुन्हा महासभेसमोर आणणार का?

**मा. उपमहापौर :-**

गेल्या दोन वर्षापासून सातत्याने ह्या विषयामध्ये अनेक लोकांच्या मागण्या आहेत.

**निलम ढवण :-**

ठिक आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या रिलायन्सचे १३ हजार पोल आहेत. त्यांची मालकी रिलायन्सची आहे. आणि आपले पोल आहे २३६३ हे आपले स्वतःचे खर्चाने बसवलेले आहेत. आता जसे शासनाचे धोरणानुसार जे काही स्ट्रीट लाईटचे दिवे बसवायचे ते ह्याच्यापुढे एल.ई.डी. च बसवायचे आहेत. तर ह्यासाठी आपल्याकडे बरेच खाजगी कंपन्या अप्रोच केलेल्या आहेत. त्यांचे म्हणणे आहे की तुमचे रिलायन्सचे पोल आहेत ते सुध्दा विकत घेतो. त्याचे पैसे सुध्दा आम्ही देवू. मालकी महानगरपालिकेची होईल. एल.ई.डी. बसवून जे काही विजेमध्ये बचत होईल त्याच्यामध्ये आपण पार्टनरशिप करुया शेअर बेसीसमध्ये एल.ई.डी.मुळे आपला जो बील आता ५० लाखाचा आहे. त्यामध्ये जवळ जवळ ४० टक्के बचत होणार आहे. तर त्यांचे म्हणणे आहे की आपण त्याच्यामध्ये शेअरींग करु या.

**जुबेर इनामदार :-**

५० होते तिथे ६० रुपये केले.

**दिपक खांबित :-**

त्याच्यात जी पैशांची बचत होईल त्याच्यामध्ये शेअरींग करायचे आपण. प्रॉफीटमध्ये शेअरींग करायची आहे. प्रॉफीटमधून नाही बचतीमधून शेअरींग करायची आहे. आपल्याला याच्यामध्ये काहीही आपले जे बील आहे त्याच्यावरती काहीच आपले पैसे एक्स्ट्रा द्यायचे नाहीत. पोलची मालकी आपली होईल. त्यावर आपण ॲडव्हटाईज सुध्दा करु शकतो. याच्यापुढे आणि ह्यासाठी साहेब एक ओपनली टेंडर मागवणार आहेत. आपले असे स्ट्रीट लाईट पोल आहेत एवढे बील येते. आणि याच्यामध्ये जी शेअरींग बेसवरती आपण टेंडर मागवणार आहोत आणि जे फायदेशीर असेल तो आपण स्विकारणार आहोत. महानगरपालिकेचे कुठलेही नुकसान नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासकीय विचार गोषवाऱ्यामध्ये नाही ना. बचतीमधून आपल्याला पैसे अर्धे ४० टक्के आपले बचत होईल त्यातून आपल्याला २० टक्के राहतील २० टक्के त्याला आपल्याला द्यायचे आहे असे कुठेच उल्लेख तुम्ही केलेला नाही. किंवा पोल आपल्या मालकीचे होतील ह्याच्यावर तुम्ही कुठे उल्लेख केलेला त्याच्यावरती जाहिरातीचा अधिकार फक्त महापालिकेचा आहे असा उल्लेख तुम्ही कुठे केलेला नाही गोषवारा सदोष.

**दिपक खांबित :-**

सदोष नाही. स्पष्ट आहे गोषवारा.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम खाजगी संस्थांमध्ये कोणकोणते येणार नाव सांगा ना.

**मा. महापौर :-**

त्यांनी सांगितले मगाशी.

**अनिल सावंत :-**

त्या खाजगी नाहीत. त्यांनी ज्या सांगितल्या त्या पब्लीक लिमिटेड कंपन्या आहेत. खाजगी म्हणजे कोण?

**दिपक खांबित :-**

एल.ई.डी. चे उत्पादन आहे त्या संस्था ही काम करतात.

**अनिल सावंत :-**

एल.ई.डी. मॅनिफॅक्चरींग टाटा स्कॅम म्हणजे सभापतीने सांगितले ते चुकीचे आहे

**दिपक खांबित :-**

कुठली.

**अनिल सावंत :-**

टाटा वगैरे कंपन्या येत नाही त्या ठिकाणी.

**दिपक खांबित :-**

कुठलेही येऊ शकता. विद्युत पुरवठा करणाऱ्या आणि उत्पादन करणाऱ्या पण येऊ शकता.

**अनिल सावंत :-**

म्हणजे एल.ई.डी. मॅनिफॅक्चर करणाऱ्या आहेत आणि ती आपल्याला फुकट मिळणार आहेत.

**दिपक खांबित :-**

हो.

**अनिल सावंत :-**

आता तुम्ही मगाशी म्हणालात की ते रिलायन्सचे मालकीचे स्ट्रीट लाईट आहेत ते कस काय त्यांच्या मालकीचे झाले. जागा तर महानगरपालिकेची आहे.

**दिपक खांबित :-**

रिलायन्स त्यांच्या खर्चाने बनवते.

**अनिल सावंत :-**

त्यांच्या खर्चाने आहे पण जागा महानगरपालिकेची आहे.

**दिपक खांबित :-**

ती जागा आपण मागे काढले होते पण ते एन.ओ.सी. च्या रुलनुसार ती जागा ती फ्रीमध्ये द्यायची असते. त्याचेही बील आम्ही त्यांना १०, १५ रोजी काढलं होत आम्ही.

**अनिल सावंत :-**

तुमच्याकडे आलेल्या कंपनीचे नाव तर सांगा?

**दिपक खांबित :-**

एक आहे ए.पी.............

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदरची आहे का?

**दिपक खांबित :-**

मुंबईची आहे. स्वतः रिलायन्सने सुध्दा प्रप्रोजल दिल आपल्याकडे.

**अनिल सावंत :-**

रिलायन्सचे तर आपण पावर कट करतो. रिलायन्सला आपण नोटिस काढल्या. मोबाईल टॉवर पावर कट करण्यासंदर्भात रिलायन्सला परत कसे काय देऊ शकतो आपण.

**दिपक खांबित :-**

एक ऑल इन म्हणून कंपनी आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे टाटा नाही आली.

**दिपक खांबित :-**

टाटा नाही आली. टेंडर काढू तेव्हा भरपूर येतील आपल्याकडे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय खर तर गोषवाऱ्यावरती तुम्ही सही केली आहे. तर ह्या अस स्पष्टीकरण बाबत ह्या गोषवाऱ्यामध्ये आलं पाहिजे. ते आलेले नाही. कुठेतरी काय असे प्रशासनाचा विषय लपवायचा का प्रयत्न करतो. आहे ते द्यायचे असा आहे किंवा नाही असे तुम्ही धोरणात्मक निर्णय घ्या. आम्हाला विरोधात ठराव करायची गरज पडणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

नाही पण तुम्ही ठराव कराच त्याशिवाय सभा नाही चालणार. जे-जे मुद्दे तुम्हाला चुकीचे वाटतात ते टाका त्याच्यात.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आम्हाला तर गोषवाराच सदोष वाटतो. तुम्हाला आठवण करुन देतो.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला काय सगळे दोष जेवढे आहेत तेवढे सगळे आपल्याला लावता येतील. ते अधिकार आपले आहेत. आपण ठराव मांडलात तर ते काम लवकर होईल आणि ह्या विषयावरती आपण धोरण निश्चित करतो. ह्याच्यामध्ये विविध कंपनीचे आपण प्रस्ताव घेणार आहोत. आणि वेळोवेळी सगळी चर्चा झाली आणि नंतर महापालिकेने धोरण ठरवलं.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ठरावामध्ये एवढे नमूद करा की परत हा विषय महासभेसमोर अंतिम मंजुरीसाठी आणा. आमची तयारी आहे आम्ही ठराव करत नाही.

**मा. उपमहापौर :-**

नाही तुम्ही ठराव करा. आपल्याला फिगर पण समजेल ना ह्या सभागृहाची.

**धृवकिशोर पाटील :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम त्याच्यामध्ये १६ सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत आणि प्रत्येक पक्षाचा प्रतिनिधी दिलेला आहे. स्थायी समितीमध्ये तुम्ही पण आहात ना.

**जुबेर इनामदार :-**

धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीला नाही. धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार महासभेला आहे. मा. महासभेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम की हे जाणूनबुजून लांबवतात. हा धोरण निश्चित केल्यानंतर निविदा निघते आणि निविदा मंजुरीचा अधिकार स्थायी समितीला आहे. महापौर मॅडम ठराव केलेला आहे आणि प्रशासनाने आपले मत व्यक्त केले आहे आणि गोषवारा पण क्लिअर कट आहे. जे खांबित साहेब बोललेत ते ह्याच्यामध्ये आहे. एवढे दिवे लावलेत एवढे रिलायन्सचे आहेत. एवढे आपले आहेत.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव वाचा.

**वंदना पाटील :-**

जे दिवे खांब्यावरचे एक एक महिन्यापासून बंद आहेत त्यांचे काय करायचे. आणि आम्ही कोणाकडे कम्पलेन्ट करायची.

**मा. महापौर :-**

जे बंद लाईट आहेत ते प्रशासनाने ताबडतोब चालू करावे.

**वंदना पाटील :-**

आम्ही कोणाकडे कम्पलेन्ट करायची. कारण आम्ही कितीही फोन केले तरी एक एक महिना दोन-दोन खांब्यावर लाईट नसते.

**मा. महापौर :-**

ठीक आहे ते चालु करावे. प्रशासनाने लवकरात लवकर.

**वंदना पाटील :-**

मी विचारते की आम्ही कोणाकडे कम्पलेन्ट करायची. कोणत्या अधिकाऱ्याकडे करायची त्याचे आम्हाला नाव द्या.

**मा. महापौर :-**

विद्युत विभागाकडे कम्पलेन्ट करायची.

**वंदना पाटील :-**

जानकरला फोन केले तर तो फोन उचलत नाही. कितीवेळा फोन करायचे. दोन महिने झाले एका खांब्यावरती लाईट नाही.

**मा. महापौर :-**

विद्युत विभागांना आदेश देते.

**वंदना पाटील :-**

मॅडम तुम्ही आमच्या वॉर्डमध्ये एक माणूस ठेवा खांब्यावर लाईट चालू आहे की नाही आणि त्याच्यावर रिपोर्टींग ह्या एक महिन्यात म्हणजे तुम्हाला समजेल की कुठल्या खांब्यावर लाईट नाही. म्हणजे २-२ महिने पब्लीकला अंधारात ठेवायची गरज नाही राहणार.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मैं हमारे साथ कमिशनर आए थे। उसके बाद वापीस आए थे मेरा विश्वास नही है रिलायन्स के उपर की जो रिलायन्स का हमारा चार्ज लगता है कर्मशियल लगता है उसी फ्लॅट का स्ट्रीट लाईट का चार्ज कर्मशियल क्यों लगता है। उसके उपर मैंने सफाई मांगी थी। उसने मुझे बोला की हम इसे पूछके बताऐंगे। आज २ साल हो गए जवाब नही है की पुरे भारत में ऐसा ही होता है की कर्मशियल चार्ज लगता है। क्योंकी यह प्रोडक्शन है उसमें कर्मशियल या रजिस्ट्रेशन रेट लगाना क्या चुक है की हमारे पास क्या पावर है। महासभा के पास में इसे रजिस्ट्रेशन ले सके। हमारा बहुत नुकसान हुआ इसके अंदर इस विषय पे विचार होना चाहिए की हम कॅपिसिटी में है। रिलायन्स, टाटा उन्होंने की हमारा चार्ज उसी टाईप का हो यह रजिस्ट्रेशन रेट लगना चाहिए की कमर्शियल नही लगना चाहिए।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम याची पूर्वी सुध्दा बरेचसे ठराव या शहराच्या हिताच्या दृष्टीने ह्या महापालिकेत झालेले आहेत. साहेब ऑक्ट्रॉय बंद झाल्यानंतर सेस लागला, सेस झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था कर लागला, स्थानिक संस्था कर लागल्यानंतर आयुक्त साहेब अकरा करोड रुपये आऊट स्टॅन्डिंग होते. ह्या शहरामध्ये जे स्टील व्यापारी होते त्यांचे त्यावेळी महासभेमध्ये निर्णय झाला की ह्या शहरात पूर्ण शहर स्टील सिटी करुन टाकायचं आणि ते वातावरण करायचे आणि त्याला ते सेस त्यांच्याकडून वसुल करुन घेतलेला नाही. अशा प्रकारचे निर्णय आता स्टील सिटी कुठे दिसते. अकरा करोड कुठे गेले. हा संशोधनाचा विषय आहे. अशा प्रकारचे ठराव महासभेमध्ये झालेले आहेत. गोषवाऱ्याप्रमाणे महापालिकेचा फायद्याचा प्रस्ताव स्विकारणे योग्य होणार आहे. सदर विषयामध्ये पूर्ण माहिती देण्यात आलेली नाही तरी संपूर्ण माहितीसह सदरचा विषय पुढील महासभेमध्ये मान्यतेसाठी प्रस्तावित करावा असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल सावंत :-**

सदर गोषवाऱ्यामध्ये पूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. तरी संपूर्ण माहितीसह सदरचा विषय महासभेमध्ये मान्यतेसाठी प्रस्तावित करावे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०२ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. रिटा शाह, अनुमोदन श्रीम. वर्षा भानुशाली, दुसरा ठराव आहे सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. रिटा शाह ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. रिटा शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५३, विरोधात ३३, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. रिटा शाह यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २ :-**

**महानगरपालिका शहरात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.**

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पावर लि. या कंपनी मार्फत विज पूरवठा केला जातो. तत्पूर्वी ग्रामपंचायती अस्तित्वात असताना १९७९ च्या दरम्यान सर्व ग्रामपंयतीनी ठराव करुन मे. बी.एस.ई.एस लि. यांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर क्षेत्रात वीज पूरवठा करण्याबाबत विनंती केल्यानूसार वीज पूरवठा सुरु आहे. तत्कालिन बी.एस.ई.एस. लि. व सध्याची मे. रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीच्या धोरणानुसार मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पथदीवे देखिल सदर कंपनी मार्फत स्वखर्चाने बसविण्यात येतात. महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्षात होणारे वीज बील व निश्चित केलेले देखभाल व दुरुस्तीची रक्कम दर महिन्यास देण्यात येते. अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वीज वापर दर, देखभाल दुरुस्तीचे दर व All in hire scheme नुसार या शहरास मागील ३५ वर्षापासून वीज पूरवठा व पथदीवे बसविणे कार्यवाही करण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. सदर पथदीव्यांच्या देयकाच्या बदल्यात शहरातील त्यांच्या सर्व वाहीन्या स्थलांतरणाची कामे मोफत करते सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने तातडीने दिवे लावून देते.

सद्यस्थितीत केंद्र शासन व राज्य शासनामार्फत उर्जा बचतीचे धोरण असल्याने सद्यास्थितीत वापरत असलेल्या सोडीयम व्हेपर व मर्क्युरी व्हेपर चे दिवे एल.ई.डी. ने बदल्यास सुमारे ४०% उर्जेची बचत होऊ शकणार आहे. या साठी सदर दिवे बदलण्याची आवश्यकता आहे. तथापी सर्व पथदिवे यांची मालकी मे. रिलायन्स एनर्जी लि. यांची असल्याने याबाबत त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करुन एल.ई.डी. दिवे करण्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर प्रस्ताव सादर केला आहे.

**ALL IN HIRE Charges for LED Lanterns w.e.f.01/04/2017 up to 31/03/2020**

| Sr. No. | E x i | LED W a | Qty. Nos. (Nov. Bill) | HPSV AIH charges Rs. Each | LED AIH Charges Rs. Each | Effect on load (kw) | Increase in AIH (Rs. Lacs) p.a. | Reduction Energy Charges Rs. Lacs p.a. | Net Effect (Rs. Lacs)p.a |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 70 | 50 | 6958 | 835 | 1070.00 | -244 | 16 | -77 | -60 |
| 2 | 150 | 105 | 4919 | 910 | 1185.00 | -334 | 14 | -105 | -92 |
| 3 | 250 | 170 | 1194 | 860 | 1175.00 | -134 | 4 | -42 | -38 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 400 | 445 | 303 | 840 | 840 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | 13374 | | | -712 | 34 | -224 | -190 |

वरील प्रमाणे मे. रिलायन्स एनर्जी लि. यांनी एल.ई.डी. दिवे बदलल्यास आकारण्यात येणारे सुधारीत दर दिले असून त्यानूसार वार्षिक रु.१.९० कोटी एवढा जास्त खर्च येणार असून त्याबदल्यास वार्षिक रु.२.२४ कोटी एवढी वीज वापराच्या खर्चात बचत होणार आहे. मुंबई महानगरपालिकेने मे. रिलायन्स एनर्जी लि., बी.ई.एस.टी व मे.महावितरण यांचा प्रस्ताव करुन मान्य करुन अंमलबजावणीची तयारी केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्ताव मान्य केल्यास मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत टप्प्याटप्प्याने दिवे बदलून एल.ई.डी. चे करण्यात येतील.

शासन नगरविकास विभाग यांच्या दि. १२ जानेवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थाना पथदिव्यांसाठी फक्त एल.ई.डी दिवे बसविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सर्व नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थे करीता (पथदिवे) एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन उर्जा संवर्धन करण्यासाठी ई.ई.एस.एल (EESL) या केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमाशी करारनामा (MOU) करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पथदीवे एल.ई.डी. करण्याबाबत विविध खाजगी संस्थानी संपर्क करुन सादरीकरण केलेले आहे. त्या नूसार सदर संस्थामार्फत सर्व पथदीवे ताब्यात घेऊन स्वखर्चाने दिवे बदलणे व वीज वापरात बचत होणाऱ्या रकमेतून महानगरपालिकेस उत्पन्न देणेची तयारी दर्शविलेली आहे. काही संस्थानी त्यांना एल ई डी करण्यासाठी रक्कम देण्याची मागणी केली आहे. तत्पूर्वी मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना त्यांच्या पथदिव्यांचे मुल्यांकन करुन रक्कम अदा करावी लागेल. सदर रक्कम देखिल अदा करण्यास काही संस्थांनी तयारी दर्शविलेली आहे. या सर्व प्रस्तावाबाबत जाहीर निविदा काढून प्रस्ताव मागवून मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्या कडील सध्याची योजना व होणारे फायदे व देखभाल दुरुस्तीचे स्वरुप पाहता तसेच महानगरपालिकेस अतिरिक्त कोणताही खर्च, दायित्व व पथदिव्यांच्या सोयी सुविधात कमतरता न येता महानगरपालिकेच्या फायदयाचा प्रस्ताव स्विकारणे योग्य होणार आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. रिलायन्स एनर्जी लि. यांचे १३३४७ पथदीवे व महानगरपालिकेने स्वतः बसविलेले २३६३ पथदीवे वापरात आहेत.

**ठराव क्र.  :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या प्रस्तावानुसार संबंधीत विषयाची आवश्यक ती माहीती घेवून स्ट्रीट लाईट पोल एल.ई.डी. करण्याबाबत खाजगी संस्थाकडुन प्रस्ताव मागविण्यात यावेत व सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करावेत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम रिटा शाह  अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | निरंक |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | नलावडे दिनेश दगडु | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शिर्के अनंत गेणू | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ९ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ९ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | सावंत अनिल दिवाकर | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | घरत तारा विनायक | |
| १४ | सोंस नीला बर्नाड | १४ | कदम अर्चना अरुण | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | रावल मेघना दिपक | १५ | पाटील अनिता जयवंत | |
| १६ | मोकाशी दिपाली आनंदराव | १६ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १८ | अरोरा दीपिका पंकज | १८ | भट दीप्ती शेखर | |
| १९ | नाईक विविता विवेक | १९ | गुप्ता कुसुम संतोष | |
| २० | भावसार वंदना संजय | २० | भोईर भावना राजू | |
| २१ | बेलानी हेमा राजेश | २१ | पाटील धनेश परशुराम | |
| २२ | भोईर विणा सुर्यकांत | २२ | शेख रुबीना फिरोझ | |
| २३ | सोनार सुरेखा प्रकाश | २३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २४ | मुखर्जी अनिता बबलू | २४ | सपार उमा विश्वनाथ | |
| २५ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २५ | परदेशी गिता हरीश | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २६ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २७ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २७ | पाटील नरेश तुकाराम | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाळ | २८ | पाटील वंदना विकास | |
| २९ | तिवारी अशोक सूर्यदेव | २९ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| ३० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | ३० | भोईर कमलेश यशवंत | |
| ३१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | ३१ | अहमद साराह अकरम | |
| ३२ | शाह सीमाबेन कमलेश | ३२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| ३३ | रकवी वैशाली गजेंद्र | ३३ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३४ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३५ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३८ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३९ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४० | थेराडे संजय अनंत | | | |
| ४१ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४२ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४३ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४४ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४६ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४७ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४८ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४९ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५० | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५१ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५२ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५३ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३० अन्वये विशेष समित्या गठीत करणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

**सदरचा विषय प्रलंबित ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

त्यांनी ठराव केलेला आहे प्रलंबित ठेवावा म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

प्रलंबित कसा हा विषय घेण्यासाठी तुम्हाला ऑथोरिटी पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रलंबित ठेवण्यासाठी ठराव केलेला आहे. तो ठराव त्यांनी केलेला आहे. त्याला सभागृहाची मान्यता असेल त्याप्रमाणे कारवाई होईल.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही ठराव मांडला तर मतदान कस होईल.

**नगरसचिव :-**

मतदान होणार ना.

**मा. उपमहापौर :-**

विषयात अजून माहिती घेतली पाहिजे काही तयाऱ्या करायच्या आहेत आणि त्याच्यात अजून थोड काम करावे लागेल. तो विषय पुढे ठकलला त्याच्यावरती मतदान तुम्ही कस करणार.

**नगरसचिव :-**

विषय पास करण्यासाठी फक्त दोन तृतियांश लागणार आहे. समित्या गठीत करण्यासाठी.

**जुबेर इनामदार :-**

समित्या गठीत करण्याचा विषय असला तर त्याला मंजुरीसाठी तुम्हाला किती लोक पाहिजे. आम्ही ठराव केला तर तुम्ही मतदान कसे घेणार.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब आम्ही ठराव मांडलेला आहे. साहेब त्यांना हा विषय घ्यायचा असेल तर त्यांनी ठराव मांडावा आणि मग आमच मतदान होईल.

**जुबेर इनामदार :-**

विषय घेण्यासाठी सुध्दा ते पाहिजे ना.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही विषय आल्यानंतर हा विषय प्रलंबित ठेवला आहे. हा विषय प्रलंबित ठेऊ शकतो.

**नगरसचिव :-**

प्रलंबित ठेवण्याचा ठराव केलेला आहे नुसत धोरण बोलले नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा गोषवारा तर नाहीच आहे. त्याला ॲथोरीटी पाहिजे. मला हा विषय फेटाळायचा आहे.

**नगरसचिव :-**

तुम्ही ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

गणपुर्तीमध्ये काय करणार.

**नगरसचिव :-**

जी बहुमताची असेल ती गणपूर्ती असणार त्याच्यामध्ये.

**जुबेर इनामदार :-**

विषय कसा झाला. मेजोरिटी विषय घेण्यासाठी आला पाहिजे होता.

**नगरसचिव :-**

विषय समिती गठीत करणे आणि त्यांना अधिकार क्षेत्र देणे हे करण्यासाठीच असतो.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय हा विषय घेताना प्रशासनाने भुमिका स्पष्ट ठेवायला पाहिजे. ही गणपूर्ती नाही. गणपूर्ती निर्णय घेईल. तर त्याच्यावरती निर्णय घेईल विषय घ्यायचे की नाही. विषय प्रलंबित ठेवण्याचा घेता येत नाही.

**नगरसचिव :-**

घेण्यासाठी नाही लागत. विशेष समिती तुम्हाला गठीत करायची असेल त्यांचा अधिकार क्षेत्र निश्चित करायचे असेल तर तुम्हाला दोन तृतियांश मतदानाची आवश्यकता आहे.

**जुबेर इनामदार :-**

सदर विषय प्रलंबित ठेवायचा.

**प्रकरण क्र. ३ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३० अन्वये विशेष समित्या गठीत करणे.**

**ठराव क्र. ०४ :-**

**सदरचा विषय प्रलंबित ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४, **मा. महासभा दि. ०८/१२/२०१७ ठराव क्र. ४४ बाबत फेर विचार करणे.**

प्रशांत दळवी :

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना शासनाने 1997 मध्ये मंजूर केलेली असून सदर मंजूर योजनेतील आरक्षणाच्या बऱ्याचशा जागा मालकांनी अजून पर्यंत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या नाहीत. सदर आरक्षणाच्या जागांच्या जागा मालक लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम तसेच वाणिज्य वापर करीत असून भाड्याने देखिल दिल्या आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या जागा ताब्यात देण्यात येत नाहीत. सदर जागेवरील कार्यक्रमांसाठी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात येत नसल्याने कार्यक्रमा दरम्यान सदर ठिकाणी कचरा व घाण निर्माण होऊन दुर्गंधी पसरते व परीसर अस्वच्छ होतो. तसेच कार्यक्रमा दरम्यान मोठी गर्दी होत असल्याने वाहतूकीस व रहदारीस अडथळा निर्माण होऊन पोलिस व वाहतूक विभागास देखिल कार्यक्रमांची माहिती नसल्याने काही अपघात अथवा दुर्घटना घडल्यास गंभीर परीस्थिती निर्माण होऊ शकते.**

**वरील विषयाचा प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याचे अवलोकन करता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.**

1) **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षणाच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे हटविणे व जागा ताब्यात घेणे, भूसंपादनाची कार्यवाही व विहीत प्रक्रीया त्वरीत सुरू करावी.**
2) **आरक्षणाच्या जागेचा नियमितपणे वाणिज्य वापर होत असल्यास सदर जागेवर कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यांत येऊ नये. अतिक्रमण विभागाने त्यावर नियमानुसार कारवाई करण्यांत यावी. तथापि अशा जागेचा बेकायदेशीर वाणिज्य वापर होत असल्यास 0 ते 2000 चौ.फुटा पर्यंतच्या जागेसाठी रु.22.50 पै चौरस फुट दराने व तदनंतर त्यापुढील जागेसाठी प्रती चौरस**

फुटास रु.1.50 पै दर प्रति माह दंड आकारण्यांत यावा त्यानुसार वार्षिक दंडाची रक्कम कायम करुन वसुली करण्यांत यावी.

3) ज्या मोकळ्या जागेचा वापर आरक्षण व्यतिरिक्त मार्बल, नर्सरी, गॅरेज व अन्य व्यावसायिक कामासाठी होत असेल अशा जागेसाठी 0 ते 2000 चौ. फुटापर्यंत मा. महासभा दि.20/02/2018 ठराव क्र.60 नूसार रु.7.50/- प्रति चौ. फुट दराने कर आकारणी करावी. व तदनंतर त्यापुढील जागेसाठी मा. महासभा दि.08/12/2017 ठराव क्र.43 नूसार रु.0.50 चौ. फुट दराने कर आकारणी करण्यात यावी. ज्या जागेवर नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे अशा मोकळ्या जागांवर कर आकारणी करण्यात येवू नये.

4) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण किंवा इतर मोकळ्या जागेचा वापर लग्न कार्य, व्यवसायिक वापर खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादीत कालावधी करीता होत असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक राहील. सदर कार्यक्रमासाठी प्रति दिन रु.10,000/- या प्रमाणे परवानगी शुल्क घेण्यात यावे. वरील दर एका दिवसासाठी एका कार्यक्रमासाठी राहतील व सदर कार्यक्रमासाठी एका दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी हवी असल्यास पुढील प्रत्येक दिवसासाठी रु.2500/- प्रती दिन प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रति दिन रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात यावे. सदर कार्यवाही प्रभाग अधिकारी यांनी करावी.

5) सदर मोकळ्या जागेवर अनधिकृत शेड अथवा इतर बांधकामे असल्यास शास्तीसह महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने कर आकारणी करण्यात यावी.

6) सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.

7) आरक्षित जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.

8) ज्या मोकळ्या जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची परवाना शुल्क रक्कम न भरल्यास त्यांची माहिती सर्व्हे क्रमांकासह नगररचना विभागास देण्यात यावी. तसेच आरक्षणाच्या जागेवर देखिल आकारण्यात आलेल्या दंडात्मक शुल्काचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. नगररचना विभागास अशा मालमत्ताने सर्व्हे क्रमांक कळविण्यात यावे. नगररचना विभागाने अशा सर्व्हे क्रमांकावर परवानगी देण्यापुर्वी सर्व रक्कम कर विभागाच्या प्रचलित नियमानुसार व्याजासह वसुल करावी.

9) नगररचना विभागाने मोकळया व आरक्षित जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.

10) एखाद्या जागेचा वापर क्रिडा, खेळासाठी होत असल्यास कोणतेही शुल्क, कर आकारणी करण्यांत येऊ नये तसेच मैदानांचा व्यवसायिक वापर, कोचिंग किंवा सरावासाठी नियमितपणे शुल्क आकारुन वापर होत असल्यास वरील धोरणानुसार रक्कम वसुल करावी.

**वरील धोरणांची अमंलबजावणी 01 एप्रिल 2018 पासुन करण्यांत यावी.**

दिपिका अरोरा :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम ठराव क्र. ४४ याचा फेरविचार करण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे. प्रशासनाने आता जो ठराव प्रशांत दळवी यांनी वाचला आणि त्या ठरावामध्ये काय फरक आहे. दहा हजार आणि ३०

हजार आपण शुल्क आकारणार होतो ती आकारता येऊ शकत नाही. अस प्रशासनाचे म्हणणे आहे का? प्रशासनाने गोषवारा दिला आहे फेरविचार करण्यासाठी म्हणजे ते आकारता येऊ शकत नाही की काय. मा. आयुक्त साहेब त्या गोषवाऱ्यामध्ये क्लिअर होत नाही. आता जो ठराव मांडला आणि तो आपला ४४ नंबरचा ठराव त्याच्यामध्ये काय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ८/१२ ला आपण ठराव केला होता. त्याच्यानंतर आपण बजेटची मिटींग होती. बजेटच्या मिटींगच्या वेळेला रेट सादर केले होते ना तर त्या रेट व्यावसायिक व्यापार मोकळ्या जागा ह्याच्यामध्ये साडे सात रुपये होता आणि त्याच्यामध्ये पन्नास पैसे होता आणि कन्फ्युजन होत म्हणून प्रशासनाने ठराव परत आणला होता. म्हणून ह्याप्रमाणे कायम केला कारण ऑलरेडी आपण दिले होते म्हणून तो आपण ह्याप्रमाणे आपण केला आहे. साडे सात प्रमाणे.

**अनिल सावंत :-**

सभापती महोदय गंमत अशी आहे ह्या ठरावाच फेरविचार करावा. प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे २ एप्रिल २०१८ त्याच्यावरती तारीख आहे. प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे मा. आयुक्तांची सही आहे. २ एप्रिलला आयुक्तांनी दिलेला सचिव कार्यालयाला दिलेला आहे. सचिव कार्यालयाने आपल्याला एक १७ एप्रिलला अनुपालन अहवाल दिलेला आहे. प्रत्येक ठरावाची आम्ही कशी वाट लावतो त्याचा. त्याच्यामध्ये ४४ नंबरचा जो ठराव आहे. ८/१२ चा ठराव प्राप्त झालेला नाही अस प्रशासन १८ तारखेला म्हणते. मग २ तारखेला तुम्ही गोषवारा दिला तो कुठल्या आधारावर दिला कारण तुमच्याकडे ठरावच नाही. दोन्ही कागदपत्र तुमचेच आहेत साहेब आणि त्या ८/१२ च्या मिटींगमध्ये म्हसाळ साहेब तुम्ही होतात ऑफीसर त्यावेळी तुम्ही ठासून सांगितल होतं. कलम १२७ च्या अंडर आपण टॅक्स लावू शकतो. आता हे काय गौडबंगाल आहे. १८ तारखेला तुम्ही म्हणता ठराव आलेलाच नाही. आम्हाला प्राप्तच झालेला नाही आणि २ तारखेला तुम्ही प्रशासनाला सचिव कार्यालयाला गोषवारा देत आहेत. ह्या ठरावाचा फेरविचार करा. नक्की खोट कोण बोलते कसं होत आहे महापौर मॅडम ह्या सभागृहामध्ये महिन्याला एक मिटींग आपण घेतो. विषय आपण मान्य करता सर्व त्याच्यानंतर प्रशासन गोषवारा देते. प्रशासनाच्या विषयामध्ये काही वेळा ठराव केले जातात. गेल्या ऑगस्ट पासून काय डिसेंबर पासून काय मिटींगमध्ये काही बजेटचे ठराव आयुक्तांनी विखंडीत करायला पाठवले आहेत. काही ठरावाची ही परिस्थिती आपल्याला फेरविचार करावा लागतो. मग प्रशासनाजवळ मिस गाईड किती दिवस करत राहणार.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो हा जो ८/१२/२०१७ चा जो ठराव आहे हा बांधकाम विभागाकडून फेरविचारासाठी सादर करण्यांत आलेला आहे. कर विभागाकडून हे आलेले होते. कर विभागाकडे ठराव प्राप्त होता परंतु फेर सादर हा बांधकाम विभागाकडून झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

मग ती माहिती अनुपालन विभागामध्ये आली पाहिजे ना. अनुपालन अहवाल काय म्हणतो की आम्हाला ठरावच आलेला नाही. ठराव प्राप्त नाही असे स्पष्ट म्हणता राईटींगमध्ये. ४४ नंबर ह्याचा अर्थ ८ डिसेंबर ते १८ एप्रिलपर्यंत महापौर मॅडम हा ठरावच तुम्हाला दिलेला नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

याची प्रस्तावना बांधकाम विभागाकडून गेलेली आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब कोणाकडून ही प्रस्तावना असो आम्हाला काही घेणे देणे नाही. तुम्ही आम्हाला हा दिला याच्यामध्ये माहिती का नाही दिली कर विभागाने ठराव केलेला आहे. कारवाई प्रलंबित आहे. उद्या म्हणतात ठराव प्राप्त नाही. ठराव प्राप्त म्हणजे बांधकाम विभागच येत नाही त्याच्यामध्ये सर्व डिपार्टमेन्ट येतात. प्रशासन आणि १८ तारखेला तुम्ही गोषवारा देत आहेत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मोकळ्या जागेवरच कराच जो आपल्याकडे............

**अनिल सावंत :-**

मग ठराव कुठून आणला ते तर कळायला पाहिजे. तुम्ही धडधडीत महापौरांवर आरोप करतात. अनुपालन अहवालामध्ये की ठराव प्राप्त नाही. चार महिने ठराव दिलेला नाही. अनुपालन अहवाल म्हणजे काय? महापौर मॅडम साधारण अपेक्षा अशी असते एकदा ठराव झाल्यानंतर त्याच्यावर पुढच्या डिपार्टमेन्टने काय कारवाई केली एवढीच माहिती आम्हाला हवी असते तो अनुपालन अहवाल मागच्या २-३ मिटींगच्या अगोदर सन्मा. सदस्या माजी महापौर गीता मॅडमने सांगितले की आम्हाला अनुपालन अहवाल द्या.

त्यानुसार हा १८ तारखेच्या मिटींगमध्ये देण्यात आला. मग सर्व ठरावाची वस्तुस्थिती दिलेली आहे. मग ह्या ठरावाच्या बाबतीत ठराव प्राप्त झालेला नाही असे लिहीले त्यांनी १८ एप्रिलला.

**दिपक खांबित :-**

ह्या विषयी बोलतो मी हा जो ठराव आहे हा बांधकाम विभागाकडून त्याची अंमलबजावणी झालेली आहे. आपले ४३ अणि ४४ नंबरचे दोन ठराव झाले होते. एक होता मोकळ्या जागेवरचा आणि एक होता आरक्षण जागेवरचा. ह्याच्यामध्ये कस आहे की आरक्षणाच्या जागेवर जर तुम्ही जे काही इललिगल बांधकाम आहे जे काही बिझनेस करतात त्याला तुम्ही परवानग्या दिल्या आणि त्यांच्याकडून तुम्ही कर आकारणी वगैरे केली तर मग ते आरक्षण कधीच रिकामी होणार नाही आणि ते आपल्याला देणार की नाही त्यामुळे हे फेरविचाराला विषय आणला किंवा हे आरक्षणाची जागा आहेत ते भाड्याने वगैरे देऊ नये त्याच्याकडून दंड वसुल करावा.

**अनिल सावंत :-**

साहेब सर्व मान्य आहे आम्हाला मी जास्त डिस्कशन करत नाही. ह्या ठिकाणी जे यांनी लिहीले आहे अहवाल ठराव प्राप्त झालेला नाही ते चुकून झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

जो काही अहवाल द्यायचा होता ह्याच्यामध्ये हा बांधकाम विभागाने द्यायला पाहिजे होता परंतु बांधकाम विभागाकडून ते दिले नाही.

**अनिल सावंत :-**

पुढच्या वेळी जर ठराव महासभेचे येतात तेव्हा सर्व डिपार्टमेन्ट एच.ओ.डी. प्रत्येक वेळी बसतात. एच.ओ.डी. ने जरा डिस्कस करा की हा कुठल्या डिपार्टमेन्टचा ठराव आहे काय आहे.

**दिपक खांबित :-**

आम्ही दक्षता घेऊ याच्यापुढे.

**तारा घरत :-**

महापौर मॅडम मी काय सांगते जे आरक्षणाचे आहेत. त्याच्यामध्ये भाड्याचे सांगता मग ज्या आरक्षणामध्ये ज्यांनी मंडप बांधलेले आहेत. डेकोरेटरने पूर्ण आरक्षण ताब्यात घेतलेले आहे किंवा तबेले आहेत त्यांना काय लावणार आहेत तुम्ही.

**मा. उपमहापौर :-**

विषय त्यासाठी आहे. रिझर्व्हेशनचा व्यवसायिक वापर करतात. लग्नासाठी भाडे घेतात आणि ते समारंभ झाल्यानंतर जो कचरा होतो आपल्याला ते आरक्षण हस्तांतरीत करत नाही. त्याचा व्यवसायिक वापर करतात. त्यासाठीच विषय आहे.

**तारा घरत :-**

पण त्याच्यावर काही तरी कारवाई झाली पाहिजे ना.

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यावर कर लावणार आपण्.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय गोषवारा दिला महापौरांनी तुमच्याकडे पाठवला नाही, आला नाही, झाला नाही खरोखर महापौरांच्या सह्यांचा झालेला ठराव त्याला महापौरांची सही पाहिजे अस कुठे असते की महापौरांनीच दिली पाहिजे. सभागृहामध्ये ठराव वाचला गेला की तो कायम झाला असा कुठे उल्लेख नाही. आपल्या ग्रंथामध्ये की महापौरांनी सही करुनच तुमच्याकडे पाठवला पाहिजे. महापौरांनी सभागृह चालवायचा तेवढाच अधिकार आहे महापौरचा ठराव झाला त्यावर निर्णय झाला, मतदान झाले तर तो ठराव कायम झाला. प्रशासनाने ह्या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली आरक्षणाची जागा पालिकेचे जे मैदान उद्याने ह्याच्यावर आम्ही शुल्क आकारतो त्याच्याकडून आपल्याला जो काही पैसा येतो वापरासाठी तो हा एक भाग वेगळा आहे. आरक्षणाच्या जागेवरती मा. आयुक्त महोदय तुम्ही कुठलाही शुल्क कसा आकारू शकता. प्रोव्हीजन कुठे आहे. आपल्या महाराष्ट्र महानगरपालिका ह्याच्यामध्ये सुध्दा नाही किंवा आपला जो लॅन्ड रॅन्युमी एम.आर.टी.पी. ॲक्ट आहे त्याच्यामध्ये ही नाही व अशा प्रकारे आम्ही करू कसे शकतो त्यावर तुम्ही कारवाई करू शकता नाही म्हणून तुम्ही तुमचा अभिप्राय खरं तर परत तुम्ही पाठवला सभागृहासमोर मा. आयुक्त महोदय की अशा प्रकारे असतांना आम्ही करु शकत नाही फक्त तुम्ही थोडसं नियमाचा कलमाचा आधार दिला असता तर परत इथे हा विषय मांडलाच नसता.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम सगळ्या सदस्यांनी सुचना केल्या सगळ्यांनी सांगितल पण यांना माहिती आहे. ऑक्ट्रॉय कोणी आणला ऑक्ट्रॉयचा ठेकेदार कोणी आणला सर इतिहास काढला. जे आज विरोध करत आहेत महापौर मॅडम ऑक्ट्रॉयचा कॉन्ट्रॅक्टर कोणी आणला. ऑक्ट्रॉयचा ठेकेदार कोणी आणला त्याने काय केलं हे सगळ्यांना माहित आहे. ह्या सगळ्याला साक्षी मी पण होतो आणि हे पण होते. दोन्ही होते. आज त्यांना कळल याच्यावरती पण त्यावेळी ते कुठे होते? आणि हा जो परवाना शुल्क आहे महासभा ठराव क्र. ९७ दि. ३०/१२/२०११ ह्या दिवशी हा परवाना शुल्क लावलेला आहे. ह्या दिवशी महापौर कोण होते. ह्या दिवशी सन्मा. महापौर आपले तुळशीदास म्हात्रे साहेब होते आणि त्यावेळी आम्ही पण मतदान केलं होतं. परवाना शुल्क लावला होता. त्यावेळी हे पण होते यांनी मुद्दाम केलं होत त्यावेळी यांनी विरोध केला नाही. मग त्यांनी विरोध करायला पाहिजे होता आणि हा ठेकेदार आज अपॉईंट केलेला नाही हा ठेकेदार पहिल्यापासून अपॉईंट केलेला आहे. आणि फक्त हा ठेकेदार जो अपॉईंट केलेला आहे याची फक्त आणखीन आपण थोडसं इम्प्लीमेंटेशन करतो. व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही. ह्या मताशी आम्ही पण सहमत आहोत. आजपर्यंत परवाना शुल्कामध्ये कोणत्याही कॉन्ट्रॅक्टरने अजुनपर्यंत कोणत्याही दुकानदाराला त्रास दिला नाही त्याच्यावरती आमचे वचक आहे आणि यापुढे पण त्यांना नाही याचा पूर्ण वसा आम्ही ठेवू. महापौर मॅडम जो साठा परवाना आहे. तो महापालिका अधिनियम प्रकरण १८ याच्यामध्ये दिलेले आहे. ज्या वस्तु ठेवण्यासाठी आणि जे धंदे व व्यवसाय करण्यासाठी लाईसन्सची आवश्यकता आहे. अशा वस्तु धंदे व व्यवसाय भाग १ कम्पलीटली याची यादी जोडलेली आहे. ह्या महापालिका ॲक्टमध्ये ह्याचप्रमाणे प्रशासनाने हा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याच्यामध्ये नविन नाही ह्या ॲक्टची अंमलबजावणी आपण करतो. तुम्ही बोलता ॲक्टप्रमाणे काम करत नाहीत आणि आता जर आम्ही ॲक्टप्रमाणे काम करायला लागलो तर तुम्ही ओरड करता की तुम्ही ॲक्टप्रमाणे कस काय करता ही तुमची दुटप्पी भुमिका आहे. याच्यामध्ये क्लीअर कट म्हटलेले आहे. प्रत्येक याच्यामध्ये त्यांनी हे केलं पाहिजे. लायसन्स शिवाय कोणत्याही एका वेळी कोणत्याही जागेवर कोणत्याही वस्तु त्याच्यासमोर अनुक्रमेत दर्शविलेल्या कमाल त्यापेक्षा अधिक प्रमाणात ठेवता येणार नाही. अशा वस्तु म्हणजे क्लीअर यादी दिलेली आहे. आणि याप्रमाणे प्रशासनाने गोषवारा सादर केलेला आहे. आणि तोच आपण इम्प्लीमेन्टेशन करतो. याच्यामध्ये कोणत्याही व्यापाऱ्यांना त्रास द्यायचा आमचा अजिबात इन्टेशन नाही आहे. त्याच्यामुळे मा. महापौर मॅडम आपण ठराव ॲज पर ॲक्टप्रमाणे केलेला आहे. कृपया तो मंजूर करावा अशी विनंती करतो.

**नरेश पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो धृवकिशोर पाटील साहेब आमचा ठरावाला बिलकुल विरोध नाही. आम्हाला फक्त ठेकेदार नको तुमच्याशी आम्ही सहमत आहोत. फक्त आम्हाला ठेकेदार नको.

**धृवकिशोर पाटील :-**

सर ठेकेदार ऑलरेडी अपॉईंट आहे.

**मा. उपमहापौर :-**

नविन ठेकेदार नेमलेला नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण ह्या ठरावामध्ये सांगितलेले आहे की ६० लाखाचे इन्कम तो कॉन्ट्रॅक्टर वसुल करुन देत असेल तर त्याला अजिबात एक रुपया देणार नाहीत. त्याच्यावरती जर त्याने वसुल केलं तर आपण त्याला पैसे देऊ. अशी शिफारस केलेली आहे.

**नरेश पाटील :-**

पाटील साहेब ठेकेदार का हवा आहे? त्याचा अर्थ काय? पालिकेकडे स्टाफ नाही का? लोकं नाही का पालिकेकडे?

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते स्थायी समिती सभापतीने सांगितल आमची चर्चा स्थायी समितीमध्ये पण झाली होती की आता जे वसुल करत आहेत ते पूर्ण लॉसमध्ये आहेत. ठेकेदार आणि त्यांनी पूर्ण माहिती पण आपल्याला परवाना विभागाने दिलेली नाही. आणि परवाना विभाग पूर्ण वसुल करु शकत नाही. भले ठेकेदार त्यांनी नेमलेला आहे तर एकदा चुक झाली ठेकेदार नेमलेला आहे. परत ती चुक आपण का करावी. कारण की ते लोक जाऊन वसुली करतात जसे ठेवीवाले त्याच्यासाठी पण २० रुपये, ५० रुपये ५० ते १०० रुपये घेतात तसे हे पण दुकानदारांना धमकी देऊन आम्ही पूर्ण म्हणून ते पालिकेला देत नाही. म्हणून एकदा जर ठेकेदाराला पहिला नेमलं कोणी पण नेमलं त्याच्यामध्ये आम्ही पण सहभागी होतो. धृवकिशोरजी पण होते सगळे होते. पण ती चुक झालेली आहे परत ती चुक नाही करावी. व्यापाऱ्यांचे धंदे एकदम लॉस झालेले आहेत. लोक सुसाईड आणि दुकाने बंद करुन इथुन गावाकडे निघाले आहेत. तर आपणाला विनंती आहे की ठेकेदारांना न देता चांगल्या पध्दतीने जे काम करत असतील आणि महापालिकेला इन्कम करुन देत असतील तर तसल्या माणसांना नेमण्यांत यावे. आणि परवान्याला सांगावे की त्यांनी कराव त्याच्यावर जातीने लक्ष द्यावे. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रभात पाटील :-**

दोन विषय सारखे सारखे येतात आणि लक्षात घ्यायला हवे की दोन्ही विषय प्रशासनाकडून आलेले आहेत. जेव्हा महापौर बोलल्या मागच्या महापौर बोलल्या मगाशी अनिल सावंत सुध्दा बोलले की आपण हा ओपन जागेवरती जी खाजगी जागा आहे त्याच्यावर काही कार्यक्रम होतात आणि तो टॅक्स आपण घेऊ शकतो का? अस तुमच्या अधिनियमामुळे नाही पण अस जर नसेल तर माझा पहिला प्रश्न आयुक्तांना आहे की तो त्याचा गोषवारा आहे. गोषवारा मागचा विषय बघा तो त्याचाच गोषवारा आहे मग त्यांनी तो गोषवारा दिला कसा? दुसरा जो आता सध्या विषय चालु आहे त्या विषयामध्ये आपण म्हणतो की हे मला मान्य आहे की मिरारोड शहराची ओळख मुळात हे छोट आर्थिक राजधानी म्हणा ह्या शहराची अशी ओळख आहे की पहिल्यांदा इथे उद्योगाला आणि मग ह्या गावची ह्या शहराची लोकसंख्या वाढली आणि आज ते एक उच्च प्रतीचे शहर गणले जाते. उद्योग आहेत उद्योग राहायला हवे त्या शहराची ओळखही ती व्हायला हवी. दोन विषय मला याच्यात नमुद करावेसे वाटतात. मागचा जो विषय होता तो त्यांच्याकडे त्या ओपन जागेच्या माध्यमातून पैसे कसे येतील जी आपली ओळख आहे की आपला बजेट दिवसेंदिवस खालावतोय. आपल्याकडे पैसा कमी आहे म्हणून आपण टॅक्स वाढवतो किंवा ज्या काही गोष्टी आहेत. दोन्ही विषय हे पैशाशी निगडीत आहेत. काही वेळेला जर आपण ह्या गोष्टी केल्या नाहीत तर आपल्याकडे जे इन्कम सोर्स आहेत ते येणार नाहीत. कारण की हे दोन्ही विषय प्रशासनाकडून आलेले आहेत. आता ह्या दुसऱ्या विषयामध्ये मुळ मुद्दा असा आहे की आपण परवाना विभागाकडून तो करु शकतो अस आपलं म्हणणे आहे. आणि मला सुध्दा तेच वाटते की प्रत्येक ठिकाणी आपण ठेका का आणायचा. परवाना विभाग म्हणा किंवा इतर विभाग म्हणा मला असे वाटते प्रविण पाटलांपासून अनिल सावंत, जुबेर इनामदार आपण सगळे जण जुने सदस्य आहेत. आणि आपले विभाग किती कार्यरत आहेत आणि किती कार्यक्षम आहेत याची आपल्याला नोंद आहे आणि तशा जर असतात तर मला असे वाटते आयुक्तांना हा विषय घ्यायची गरज नव्हती. आयुक्तांना हे पटत आहे की माझे विभाग, माझे डिपार्टमेंट, माझी माणसे हे काम करु शकत नाही. आणि म्हणून त्यांनी हा गोषवारा दिलेला आहे. त्यांनी हा जो विषय इथे सादर केलेला आहे जेव्हा ते सक्षम नाहीत. मग प्रत्येक वेळेला असं नको व्हायला की आता धृवकिशोर पाटील साहेबांनी सांगितल की जेव्हा पहिला जकातीचा ठेकेदार आला तेव्हा महापौर कोण होते. मग पुन्हा ४ वर्षांनी असे म्हणणार की हे दर वाढवले तेव्हा महापौर कोण होते. डिम्पल मेहता होत्या अस होत नाही. असं चुकीचे आहे की प्रत्येक वेळेला त्या-त्या वेळेच्या परिस्थितीनुसार, त्या-त्या विषयाच्या परिस्थितीनुसार हे विषय येत राहतात. त्यांच्यावरती कारवाई होत राहते. यांनी काढलेल्या मुद्दयात त्यांनी अधिनियम

दाखवला की साठा बऱ्याचदा आपण टी.व्ही. ला बातम्या बघतो की बऱ्याचदा असे अवैध साठे पकडले जातात. काही ठिकाणी स्फोट होतात आणि तेव्हा कळत की ह्या साठ्याची महापालिकेकडे नोंद नाही. हे सगळे मुद्दे जर आपण विचारात घेतले तर आपण व्यापाऱ्यांचे हित जितक्या पध्दतीने जपले पाहिजे त्याच्यामध्ये ह्या शहराचे हित सुध्दा जपले पाहिजे. आणि म्हणून अशा वेळी ह्या विषयांची गरज आहे असे विषय राहायला पाहिजे. व्यापाऱ्यांच्या मानगुटीवर बसुन त्यांना कापण्याचा किंवा त्यांना लुटण्याचा महापालिकेचा मानस नाही. मात्र एवढे निश्चित आहे जर हे धोरण आपण राबवतो असे जर आपण ठराव करतो तर त्याची संपूर्ण जबाबदारी जर प्रशासन झटकत असेल आता परवाना विभागाकडून त्यांनी जर काढून टाकून त्या एजन्सीला देत असतील. परंतु नियंत्रण कम्पलीटली ह्यांचे राहिले पाहिजे आणि त्यांनी ते सुरळीतपणे चालवले पाहिजे. नसेल चालवत तर आपण जितक्या वेगाने इथे बोलत आहोत तितक्या वेगाने आपण त्यांच्या समोर जाऊन बोलले पाहिजे.

**अनिल सावंत :-**

प्रभात ताई आपण जे बोललात ते बरोबर बोललात. मागच्या महापौरांनी काय केलं हे खर म्हणजे जे सदस्य ह्या सभागृहात हजर नाहीत त्यांच्या बाबतीत काही बोलू नये हा साधा नियम आहे. आणि पाच टर्म नगरसेवक राहिलेले धृवकिशोर साहेब त्यांना ते चांगलच माहित आहे असे मला वाटते साहेब. महापौर मॅडम आयुक्तांनी जो गोषवारा दिलेला आहे त्याच्यामध्ये कुठेही उल्लेख नाही की ठेकेदार नेमावा. हा एक मुद्दा.

**मा. उपमहापौर :-**

ठेकेदार नेमण्याचा विषय नाही हा नेमलेला आहे.

**अनिल सावंत :-**

मगाशी सन्मा. सदस्य धृवकिशोर साहेबांना उल्लेख केला की २०११ मध्ये ठराव झाला आणि त्यावेळी ठेकेदार नेमला त्यावेळी ठेकेदार नेमलेला नव्हता. त्यावेळी फक्त दर निश्चित केलेले होते. ते ह्या गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहेत. चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल नाही करायची. ठेकेदार कधी नेमला जरा मला सांगा? प्रशासनाने उत्तर द्यावे ठेकेदार कधी नेमला? परवाना शुल्कासाठी ठेकेदार कधी नेमला आणि महासभेमध्ये कधी ठराव झाला. प्रशासनाने उत्तर द्यावे साहेब आपण त्यावेळी सदस्य होते आपण ठेकेदार नाही नेमला. आपण फक्त २०१८ ला दर निश्चित केले साहेब ठेकेदार कधी नेमला ते फक्त सांगा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आपल्याकडे मागच्या वेळी सभागृहामध्ये विषय होता की आपल्याकडे ५० हजार............

**अनिल सावंत :-**

साहेब ते झाले ठेकेदार कधी नेमला ते सांगा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

त्यावेळी आपले असे ठरलेले होते की याच्यामध्ये आपल्याकडे मॅन पावर कमी आहे. २०१७ मध्ये आपण ठेकेदार नेमलेला आहे.

**अनिल सावंत :-**

२०११ ला नाही म्हणजे सन्मा. सभापतीने सभागृहाची दिशाभूल केली. आता मी याच्यात जात नाही २०१७ मध्ये कोण महापौर होते साहेब माझी महापौर मॅडम आपल्याला हात जोडून विनंती आहे. आज तुम्ही एक चांगला उपक्रम घेत आहेत. दारोदारी महापौर इंडस्ट्रीजमध्ये सुध्दा जायची तुम्हाला वेळ येईल. ठेकेदार कृपया नेमु नका. अजिबात नेमू नका.

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम मैं दो विषय पे बात करना चाहूँगा एक राज्य सरकार के तरफ से ऐसा निर्देश रहता है की किसी महापालिका का कितना उत्पन्न है उसको कितना प्रशासकीय खर्चा होना चाहिए। अभी साहबने बोला हमारे पास मॅन पावर कम है क्योंकी हम जितना खर्चा करते है उससे ज्यादा मॅन पावर रखे हुए है। वह कम है उसपे जरा फैसला करे। हम ऑलरेडी जो लिमिटेड निर्देश गाईड लाईन्स है उसे जादा प्रशासन सॅलरीसे कर रहे है या कम कर रहे है। दुसरी बात एल.बी.टी का रेजिस्ट्रेशन हुआ था सारे डेटा हमारे पास में थे परवाना कन्स्ट्रक्शन हमारे पास सारे डेटा हमारे पास में थे यह दो डिपार्टमेंट के उपर का समिकरण करके मिला नही कर पाए। वह कारवाई क्यों नही कर पाए ऐसे अधिकारीयोंके उपर दंडात्मक कारवाई नही करेंगे तो वह ऐसी छूटत्मक चलती रहेगी। उन्हें आगे लेना चाहिए। ऐसी

लोगो पे कारवाई होनी चाहिए की नही काम करने से हमे ठेके के बारे में सोचना पडता है क्योंकी वह सरकार लेते किस बात की है। या तो उन्हें दंड दो। पनिशमेंट दो नही तो उन्ही से काम कराईए।

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम मी कोणत्याही सदस्याचा अपमान केलेला नाही. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे त्यावेळी बोलत होते आणि मी असं सांगितल माझे रेकॉर्ड परत तुम्ही ऐका मी असं सांगितल की २०११ साली हा परवाना शुल्क लावला होता. त्यावेळी तुम्ही सदस्य होते. त्यावेळी तत्कालीन महापौर तुळशीदास म्हात्रे साहेब होते. मी फक्त असे म्हटले मी त्यांचा अपमान केलेला नाही. नंबर १, नंबर २ त्यावेळी हा ठेकेदार नेमण्यात आला असे मी अजीबात म्हटलेले नाही. तुम्ही कॅसेट ऐका मी दिशाभूल अजिबात केलेली नाही आणि कधी करत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ती फक्त मी निदर्शनास आणली ती पण निर्देशनास का आणली कारण की ह्यांनी आपल्यावरती आरोप केले त्या आरोपाचे मला खुलासा करणे गरजेचे होते. म्हणून मी त्यांना इतिहासात घेऊन गेलो आणि संपूर्ण इतिहास त्यांना सांगितला बाकी काही नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम सभागृहाच्या भावना खरतर तुम्ही लक्षात घेतल्या पाहिजे. सभागृहाच्या भावना फक्त विरोधी पक्षाकडूनच येत नाही सत्ताधारीही तेच बोलत आहेत. पण त्याची भुमिका तीच आहे. त्यांची भुमिका अशी आहे की थोड गोपनिय पध्दतीने बोलत आहे त्यांनी शब्दाचा वापर कमी केला. ताई आमच्या अनुभवी आहेत कुठला शब्द कुठे वापरायचा आम्ही त्यांच्याकडून शिकलो. आणि त्या शिक्षिका आहेत. अभिमान आहे त्यांचा. ५ टाईम नगरसेविका आहेत. ६ टाईमला मला वाटत त्यांचे आहे. प्रत्येकाची साहेब आयुक्त महोदय ह्या सभागृहाची भुमिका तीच आहे. ठेकेदार नको आहे आर्थिक परिस्थिती देशाची काय आहे. डोळ्याच्या समोर आहे. नोटबंदीच्या नंतरची परिस्थिती आज ह्या पूर्ण देशाची काय झालेली आहे. दुर्मिळ परिस्थिती अशा डोळ्याच्या समोर अशी उघडपणे आलेली आहे. व्यवसाय धंदा काही राहिलेला नाही आणि त्या व्यवसाय करणाऱ्या छोटे मोठे धंदे करणारे लोकं व्यवसायिक म्हणून वाढलेले आहेत. कामधंदे होते म्हणून तुम्ही इथे आलात. तुम्ही इथले स्थानिक नव्हते. आम्ही स्थानिक नव्हतो. आम्ही कुठेतरी एक व्यवसाय सुरु केला. आमचे कुटुंब इथे शिफ्ट केले नाहीतर हे शहर खरतर आगरी कोळी बांधवांचे आहे. तर अशा गावांमध्ये ३ हजार शुल्क वाढवणे हे बरोबर नाही. खरतर कुठेतरी हा ठेकेदार ही नको साहेब ५५ हजार वाणिज्य आपल्याकडे आस्थापना असताना सुध्दा अडीच ते ३ हजार फक्त आपण आकारणी करु शकलो याचा अर्थ ६ ते ७ टक्के फक्त याचा अर्थ प्रशासन कुठेतरी कमी पडते. सक्षम अधिकारी नेमा आणि प्रशासनाच्या माध्यमातून साहेब हे काम करुन घ्या ही आमची आपल्या सर्वांना विनंती आहे. प्रकरण क्र. ५ च्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सध्या सुरु असलेल्या परवाना शुल्कात वाढ करण्यात येऊ नये. संपूर्ण शहरात आधी परवाना शुल्क वाणिज्य मालमत्तांना महापालिकेनेच आकारावे. तद्नंतर सदरचा विषय मा. महासभेमध्ये विषय मंजूरीसाठी प्रस्तावित करावे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

रिटा शहा आपको कुछ बोलना था बोलीए।

**रिटा शहा :-**

महानगरपालिका में कोई भी काम करने के लिए उसके उपर में टिप्पणी करना चाहूँगी मॅडम पवार साहब आपको याद होगा की मैं आपके पास आई थी। आप नए नए थे की हमारे यहाँ ठेका पध्दती से हमने संगणक चालक को हमने लिया और अचानक उस सब डिपार्टमेंट से संगणक चालक को हमने कम कर दिया। मैं आपके पास आई तो आपने बताया था की काट कसर करने के लिए उपर से ही ऑर्डर है। तब मैंने आपको बोला था की हमने बहुत सारे लोग हमारी जरुरत नही है तो हमने डॉक्युमेंन्टेशन उनको बताया तो उनको कम करो की संगणक हर डिपार्टमेंट को लगता है। तो आप उनको कन्टीन्यू करे तो आपने बोला की नही वह मेरे हाथ में नही है। आप महासभा में बोलना ऐसी बाते हुई थी। तो हमारे यहाँ ठेका पध्दती से हम लोगो को भर रहे है, ले रहे है। महानगरपालिका का काम अच्छी तरह होने उसके लिए इन लोगो को ठेका दे रहे है। सबसे बडी बात यह है की इनको ठेका पध्दती से हम से रहे है तो यह जो वर्कर है उनको पेमेन्ट ठेकेदार करेगा। कल उनका अगर पेमेन्ट नही मिलती है तो उसकी जबाबदारी किसकी प्रशासनकी की कॉन्ट्रॅक्टर की? क्योंकी संगणक चालक जो भी आज यहाँ वहाँ कार्यरत है उनमें से कही संगणक चालको को ६-६ महिने का सॅलरी नही मिला है। और वह आपसे कईबार फॉलो अप हो चुका है। तो ऐसी फसवणुक न हो की ठेकेदार ठेका ले। उसका हक्क

का पैसा वह यहाँ से लेकर जाए और जो कर्मचारी उन्होंने रखा है उनका पगार नही चुकाए टाईम पे हमारा काम फिर से रखडनेवाला है। उसके लिए भी अपने को सोचना है और उसके लिए धारा धोरण नियम आपको ठेकेदार के लिए स्ट्रीक्ट कायदा बनाना होगा की आपका चेक उनको मिला तो उनको कब चेक मिला वर्कर को पेमेन्ट दिया यह आपको देखना बहुत जरुरी है। तभी हमारा ठेका पध्दती का जो हमारा काम है वह सक्सेस होगा वरना हम जहाँ थे वहाँ पर झिरो पर आके बैठ जाऐंगे।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. हसमुख गेहलोत, दुसरा ठराव आहे सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. प्रभात पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५२, विरोधात २७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. प्रभात पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

**उद्योगधंदा परवाना शुल्क वाढ करणे व साठा परवाना शुल्क आकारण्याबाबत.**

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात, कारखाने, दुकाने व स्टॉलधारकांना शासन आदेश व मा. महासभा ठरावानुसार, अर्जदार यांनी विहीत कागदपत्रांची पुर्तता केल्यावरच परवाना फी आकारुन परवाना (व्यवसाय परवाना) दिला जातो. मा. महासभा ठराव क्र.९७, दि.३०/१२/२०११ नुसार शुल्क दर निश्चित करण्यात आले होते. त्याप्रमाणे फी वसुली करण्यात येत आहे. सदर शुल्क दरामुळे फी वसुली फार कमी प्रमाणात वसुल होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात ज्याप्रमाणे भर पडणे आवश्यक होते त्याप्रमाणे ह्या फी मुळे फरक पडत नाही. तसेच सन २०११ नंतर परवाना फी मध्ये वाढ न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते.

काही उद्योगधंद्यांना दिलेल्या परवान्याची मुदत संपून ही परवाना नुतनीकरण करत नसल्याचे दिसून आल्याने त्यांना खालीलप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे.

| अनु. क्र. | अवधी | शुल्क (टक्के) |
|---|---|---|
| 6. | १ ते ३ महिने | २५% |
| 7. | ४ ते ६ महिने | ५०% |
| 8. | ७ ते ९ महिने | ७५% |
| 9. | १० ते १२ महिने | १००% |
| 10. | पुढील प्रत्येक तीन महिन्यानंतर | २५% |

तरी वरील प्रमाणे दर आकारण्यात यावे, अन्यथा तद्नंतर परवाना रद्द करण्यात यावा. उद्योगधंदा ज्या ठिकाणी व ज्या वास्तूमध्ये स्थित आहेत, कार्यरत आहेत त्या वास्तूकरीता नियमानुसार परवाना देण्यात येतो. परंतु जर कोणत्याही आस्थापनेच्या उद्योगधंदा व्यवसायाच्या जागेत अपरिहार्य कारणास्तव बदल किंवा स्थलांतर झाल्यास सदरचा परवाना रद्द करावा व नविन जागेत नव्याने अर्ज करुन आवश्यक त्या कागदपात्रांची पुर्तता करुन नियमानुसार नविन परवाना प्राप्त करणे बंधनकारक राहील व त्यानुसार अर्ज स्विकारुन पुढील कार्यवाही करावी.

मा. महासभा ठराव क्र.९७, दि.३०/१२/२०११ नुसार शुल्क दर निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे.

| अनु. क्र. | चौ. फुट | रुपये |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 9. | १ ते २५० चौ. फुट | रु. २५०/- |
| 10. | २५१ ते ५०० चौ. फुट | रु. ५००/- |
| 11. | ५०१ ते १००० चौ. फुट | रु. १०००/- |
| 12. | १००१ ते २५०० चौ. फुट | रु. २०००/- |
| 13. | २५०१ ते ५००० चौ. फुट | रु. ४०००/- |
| 14. | ५००१ ते १०,००० चौ. फुट | रु. ६०००/- |
| 15. | १०,००१ पासून पुढे चौ. फुट | रु. ८०००/- |
| 16. | मोकळी जागा | रु. १०००/- |

परंतु सदर शुल्क दरामुळे महापालिकेचे उत्पन्न फार कमी होत असल्यामुळे नविन सुधारीत दर खालीलप्रमाणे असावेत, असे उचित वाटते.

| अनु. क्र. | चौ. फुट | रुपये |
|---|---|---|
| 9. | १ ते २५० चौ. फुट | रु. ५००/- |
| 10. | २५१ ते ५०० चौ. फुट | रु. १०००/- |
| 11. | ५०१ ते १००० चौ. फुट | रु. २०००/- |
| 12. | १००१ ते २५०० चौ. फुट | रु. ४०००/- |
| 13. | २५०१ ते ५००० चौ. फुट | रु. ६०००/- |
| 14. | ५००१ ते १०,००० चौ. फुट | रु. ८०००/- |
| 15. | १०,००१ पासून पुढे चौ. फुट | रु. १०,०००/- |
| 16. | मोकळी जागा | रु. २०००/- |

उद्योधंदा व्यवसायधारक अथवा भागीदार किंवा परवानाधारकापैकी अन्य कोणत्याही व्यकतीचे निधन झाल्यास सदर बाबतची माहिती आवश्यक कागदपत्रे व परवाना मूळ प्रतीसह करण्यात येऊन आवश्यक दुरुस्ती करुन घेण्यासाठी एक वर्षाच्या परवाना शुल्कासह ९० दिवसांच्या मुदतीच्या आत परवाना विभागास अवगत करणे बंधनकारक आहे. अन्यथा परवाना रद्द करणेत यावा.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दुकाने, कारखाने व स्टॉलधारक व्यवसाय परवाना घेत असून याच्या व्यतिरिक्त शहरामध्ये गोडावून, लाकडाची वखार, दुचाकी / चार चाकी गोडावून, केमिकल कंपनीसाठी लागणारा कच्चा माल, सिलेंडर्स इत्यादीकरीता व्यवसायधारक फक्त दुकानाचा परवाना घेत असून गोडावूनकरीता लागणारा साठा परवाना घेत नसल्याचे दिसून आले. जर वरील बाबींना मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम, प्रकरण १८, भाग १ व २ नुसार जर परवाना शुल्क आकारले तर महानगरपालिका उत्पन्नात फार मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वस्तुंसाठी लागणारे दर खालीलप्रमाणेआकारण्यात यावे.

<u>प्रकरण १८, भाग १ मधील वस्तूंसाठी साठा परवान्याचे आकारण्यात येणारे वार्षिक दर खालीलप्रमाणे</u>

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्रमाण | दर |
|---|---|---|---|
| 1. | डायनामाईड | १५ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |
| | | | |
| 2. | फॅल्मीनेट ऑफ मर्क्युरी | १६ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |
| | | | |
| 3. | ब्लास्टींग | १६ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |
| | | | |
| 4. | गन कॉटन | १५ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |
| | | | |
| 5. | नायट्रो ग्लिस रीन | १५ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |
| | | | |
| 6. | फॉस्फरस | १५ किलो ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १६ ते २५ किलोग्रॅम पर्यंत | १००० |
| | | २६ ते ५० किलोग्रॅम पर्यंत | २००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५१ ते १०० किलोग्रॅम पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | २००० |

<u>प्रकरण १८ भाग २ मधील वस्तूसांठी दर वार्षिक</u>

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्रमाण | २०१७-१८ नवीन दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 1. | वीडीची पाने | १०० कि. ग्रॅम पर्यंत | --- |
| | | १०१ ते ५५० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ५५१ ते ११०० कि. ग्रॅम पर्यंत | ३३०० |
| | | ११०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | ६६०० |
| | | २८०१ ते ५००० कि. ग्रॅम पर्यंत | १६८०० |
| | | ५००० पेक्षा जास्त प्रत्येक ११०० कि. ग्रॅमसाठी | ३०००० |
| | | २८०१ ते ५००० कि. ग्रॅम पर्यंत | ६६०० |
| | | ५००० पेक्षा जास्त प्रत्येक ११०० कि. ग्रॅमसाठी | ६००० |
| | | | |
| 2. | कापुर | १ ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १ ते ५ कि. ग्रॅम पर्यंत | ५०० |
| | | ६ ते १० कि. ग्रॅम पर्यंत | १००० |
| | | ११ ते २० कि. ग्रॅम पर्यंत | २००० |
| | | २१ ते ५० कि. ग्रॅम पर्यंत | ५००० |
| | | ५१ ते १०० कि. ग्रॅम पर्यंत | १०००० |
| | | १०१ ते २०० कि. ग्रॅम पर्यंत | २०००० |
| | | २०० पेक्षा जास्त प्रत्येक ३० कि. ग्रॅमसाठी | ३००० |
| | | | |
| 3. | सेल्युलॉईड व सेल्युलॉईड माल | ५ किलो पर्यंत | -- |
| | | ६ ते २७५ कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | २७६ ते ८५० कि. ग्रॅम पर्यंत | १८५४ |
| | | ८५१ ते २५०० कि. ग्रॅम पर्यंत | ५४५४ |
| | | २५०१ ते ४१०० कि. ग्रॅम पर्यंत | ८६१० |
| | | ४१०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ११५०० |
| | | ५५०० पेक्षा जास्त प्रत्येक ३५० कि. ग्रॅमसाठी | ७७५ |
| | | | |
| 4. | चल चित्रपट | जाग वापर | -- |
| | | ५० चौ. मि. पर्यंत | १६०० |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ३२०० |
| | | १०१ ते १५० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | १५१ ते २०० चौ. मि. पर्यंत | ६४०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २०० पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | ३२०० |
| | | | |
| 5. | खराब कापूर व गाळ कापूर | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १० चौ. मि. पर्यंत | ६०० |
| | | ११ ते २५ चौ. मि. पर्यंत | १५०० |
| | | २६ ते ५० चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | ५१ ते ७५ चौ. मि. पर्यंत | ६००० |
| | | ७६ ते १०० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक १० चौ. मि. साठी | ६०० |
| | | | |
| 6. | खोबरे | १०० किलो पर्यंत | -- |
| | | १०१ ते ८५० कि. ग्रॅम पर्यंत | ६००० |
| | | ८५१ ते १७०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |
| | | १७०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | १९७६ |
| | | २८०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ३८५० |
| | | ५५०१ ते ११००० कि. ग्रॅम पर्यंत | ७७०० |
| | | ११००० पेक्षा जास्त प्रत्येक १७०० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 7. | सरकी | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १० चौ. मि. पर्यंत | ९०० |
| | | ११ ते २५ चौ. मि. पर्यंत | २२५० |
| | | २६ ते ५० चौ. मि. पर्यंत | ४५०० |
| | | ५१ ते ७५ चौ. मि. पर्यंत | ६७५० |
| | | ७६ ते १०० चौ. मि. पर्यंत | ९००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक १० चौ. मि. साठी | ९०० |
| | | | |
| 8. | वाळलेली पाने | १०० किलो पर्यंत | -- |
| | | १०१ ते ५५० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ५५१ ते ११०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |
| | | ११०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | ३०५२ |
| | | २८०१ ते ५००० कि. ग्रॅम पर्यंत | ५४५० |
| | | ५००० पेक्षा जास्त प्रत्येक ११०० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 9. | बंदुकीची दारु | १५ कि. ग्राम पर्यंत | -- |
| | | १६ ते ४० कि. ग्राम पर्यंत | ६०० |
| | | ४१ ते ७५ कि. ग्राम पर्यंत | ११२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७६ ते १२५ कि. ग्राम पर्यंत | १८२५ |
| | | १२६ ते २५० कि. ग्राम पर्यंत | ३७५० |
| | | २५१ ते ३७५ कि. ग्राम पर्यंत | ५६२५ |
| | | ३७६ ते ५०० कि. ग्राम पर्यंत | ७५०० |
| | | ५०० पेक्षा जास्त प्रत्येक १०० कि. ग्रामसाठी | १५०० |
| | | | |
| 10. | आगपेट्या | ५० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ६००० |
| | | ५० ते १०० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | १०० चौ. मि. पेक्षा जास्त | १२००० |
| | | | |
| 11. | अपेय स्पिरिट व विड्रकृत स्पिरिट | २० लिटर पर्यंत | -- |
| | | २१ ते २५० लिटर पर्यंत | ९०० |
| | | २५१ ते ५०० लिटर पर्यंत | १८०० |
| | | ५०१ ते २५०० लिटर पर्यंत | ९००० |
| | | २५०१ ते ५००० लिटर पर्यंत | १८००० |
| | | ५००१ ते ७५०० लिटर पर्यंत | ३६००० |
| | | ७५०० पेक्षा जास्त प्रत्येक ५०० लिटर साठी | १८०० |
| | | | |
| 12. | रंग पेन्ट | २५० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | २५१ ते १५०० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | १५०१ ते ३००० कि. ग्रॅम पर्यंत | १२००० |
| | | ३००० पेक्षा जास्त प्रत्येक २००० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 13. | कागद व रद्दी कागद इत्यादी | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १०१ ते ८५० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ८५१ ते १७०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |
| | | १७०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | १९६० |
| | | २८०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ३८५० |
| | | ५५०१ ते ११०० कि. ग्रॅम पर्यंत | ७७०० |
| | | ११०० पेक्षा जास्त प्रत्येक १७०० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 14. | पेट्रोलियम प्रोडक्ट, केरोसीन सिड डिझेल | २० लिटर पर्यंत | -- |
| | | २१ ते २५० लिटर पर्यंत | ९०० |
| | | २५१ ते ५०० लिटर पर्यंत | १८०० |
| | | ५०१ ते २५०० लिटर पर्यंत | ९००० |
| | | २५०१ ते ५००० लिटर पर्यंत | १८००० |
| | | ५००१ ते ७५०० लिटर पर्यंत | २७००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७५०० पेक्षा जास्त प्रत्येक ५०० लिटर साठी | १८०० |
| | | | |
| 15. | तेल अन्य प्रकारचे | २० लिटर पर्यंत | -- |
| | | २१ ते २५० लिटर पर्यंत | ९०० |
| | | २५१ ते ५०० लिटर पर्यंत | १८०० |
| | | ५०१ ते २५०० लिटर पर्यंत | ९००० |
| | | २५०१ ते ५००० लिटर पर्यंत | १८००० |
| | | ५००१ ते ७५०० लिटर पर्यंत | २७००० |
| | | ७५०० पेक्षा जास्त प्रत्येक ५०० लिटर साठी | १८००० |
| | | | |
| 16. | गळीताचा धान्ये सरकी वगळून | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | २८०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ११५५ |
| | | ५५०१ ते ११००० कि. ग्रॅम पर्यंत | २३१० |
| | | ११००१ ते २२००० कि. ग्रॅम पर्यंत | ४६२० |
| | | २२००१ ते ४४००० कि. ग्रॅम पर्यंत | ९२४० |
| | | ४४००१ ते ५५००० कि. ग्रॅम पर्यंत | ११५५० |
| | | ५५००० पेक्षा जास्त प्रत्येक ११००० कि. ग्रॅमसाठी | २३१० |
| | | | |
| 17. | गंधक | २ किलो पर्यंत | -- |
| | | २ ते २७५ कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | २७६ ते ८५० कि. ग्रॅम पर्यंत | १८५४ |
| | | ८५१ ते २५०० कि. ग्रॅम पर्यंत | ५४५० |
| | | २५०१ ते ४१०० कि. ग्रॅम पर्यंत | ८९३८ |
| | | ४१०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ११९९० |
| | | ५५०० पेक्षा जास्त प्रत्येक ३५० कि. ग्रॅमसाठी | ७७३ |
| | | | |
| 18. | टार पिच डांबर किंवा बिट्युमेन | २५० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | २६ ते २७५ कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | २७६ ते ११०० कि. ग्रॅम पर्यंत | २४०० |
| | | ११०१ ते २२०० कि. ग्रॅम पर्यंत | ४७९६ |
| | | २२०१ ते ३३०० कि. ग्रॅम पर्यंत | ७१९४ |
| | | ३३०१ ते ४४०० कि. ग्रॅम पर्यंत | ९५९२ |
| | | ४४०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ११९०० |
| | | ५५०० पेक्षा जास्त प्रत्येक २२०० कि. ग्रॅमसाठी | ४७९६ |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 19. | टर्पेटाइल फ्रेंच पॉलिश | २० लिटर पर्यंत | -- |
| | | २१ ते २५० लिटर पर्यंत | ९०० |
| | | २५१ ते ५०० लिटर पर्यंत | १८०० |
| | | ५०१ ते २५०० लिटर पर्यंत | ९००० |
| | | २५०१ ते ५००० लिटर पर्यंत | १८००० |
| | | ५००१ ते ७५०० लिटर पर्यंत | २७००० |
| | | ७५०० पेक्षा जास्त प्रत्येक ५०० लिटर साठी | १८०० |
| | | | |
| 20. | व्हर्निश | ५० चौ मि. पर्यंत जागा वापर | ६००० |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | १०० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | ६००० |

प्रकरण १८ भाग ३ मधील वस्तूंसाठी दर वार्षिक

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्रमाण | २०१७-१८ नविन दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 1. | बांबू | ५ चौ. मि. पर्यंत जागा | -- |
| | | ६ ते १० चौ. मि. पर्यंत | ४०० |
| | | ११ ते ३० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | ३१ ते ५० चौ. मि. पर्यंत | २००० |
| | | ५१ ते ७५ चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | ७६ ते १०० चौ. मि. पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | २०० |
| | | | |
| 2. | हाडे | १०० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ६०० |
| | | १०१ ते २०० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | २०१ ते ५०० चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | ५०० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक २०० चौ. मि. साठी | १२०० |
| | | | |
| 3. | काथ्या | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १०१ ते ९०० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ९०१ ते १८०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |
| | | १८०१ ते ३६०० कि. ग्रॅम पर्यंत | २४०० |
| | | ३६०० पेक्षा जास्त प्रत्येक १८०० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 4. | कोळसा | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १०१ ते ९०० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ९०१ ते १८०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १८०१ ते ३६०० कि. ग्रॅम पर्यंत | २४०० |
| | | ३६०० पेक्षा जास्त प्रत्येक १८०० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 5. | दगडी कोळसा | १०० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १०१ ते ८५० कि. ग्रॅम पर्यंत | ६०० |
| | | ८५१ ते १७०० कि. ग्रॅम पर्यंत | १२०० |
| | | १७०१ ते २८०० कि. ग्रॅम पर्यंत | १९६० |
| | | २८०१ ते ५५०० कि. ग्रॅम पर्यंत | ३८५० |
| | | ५५०१ ते ११००० कि. ग्रॅम पर्यंत | ७७०० |
| | | ११००० पेक्षा जास्त प्रत्येक ५० कि. ग्रॅमसाठी | १२०० |
| | | | |
| 6. | जाळाऊ लाकूड | ५ चौ. मि. पर्यंत जागा | -- |
| | | ५ ते ५० चौ. मि. पर्यंत | ६०० |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | १०१ ते २५० चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | २५१ ते ४०० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | ४०१ ते ६०० चौ. मि. पर्यंत | ७२०० |
| | | ६०१ ते ८०० चौ. मि. पर्यंत | ९६०० |
| | | ८०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | १००० पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | १२०० |
| | | | |
| 7. | चरबी | १० चौ. मि. पर्यंत जागा | ६०० |
| | | ११ ते ३० चौ. मि. पर्यंत | १८०० |
| | | ३१ ते ६० चौ. मि. पर्यंत | ३६०० |
| | | ६१ ते ९० चौ. मि. पर्यंत | ५४०० |
| | | ९१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ६००० |
| | | १०१ ते २५० चौ. मि. पर्यंत | १५००० |
| | | २५१ ते ३७५ चौ. मि. पर्यंत | २२५०० |
| | | ३७६ ते ५०० चौ. मि. पर्यंत | ३०००० |
| | | ५०० पेक्षा जास्त प्रत्येक ६० चौ. मि साठी | ३६०० |
| | | | |
| 8. | दारुकाम शोभेची दारु साठा | १५ कि. ग्रॅम पर्यंत | १००० |
| | | १६ ते ४० कि. ग्रॅम पर्यंत | २६६६ |
| | | ४१ ते ७५ कि. ग्रॅम पर्यंत | ४९९५ |
| | | ७६ ते १२५ कि. ग्रॅम पर्यंत | ८३२५ |
| | | १२६ ते २५० कि. ग्रॅम पर्यंत | १६६५० |
| | | २५१ ते ३७५ कि. ग्रॅम पर्यंत | २४९७५ |
| | | ३७५ ते ५०० कि. ग्रॅम पर्यंत | ३३३०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५०० पेक्षा जास्त प्रत्येक १०० कि. ग्रॅमसाठी | ६६०० |
| | | | |
| 9. | गोणताट पोती | ५० कि. ग्रॅम पर्यंत | -- |
| | | १० चौ. मि. पर्यंत | ४०० |
| | | ७६ ते १२५ चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | १२६ ते २०० चौ. मि. पर्यंत | ५००० |
| | | २०१ ते ३०० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | ३०१ ते ५०० चौ. मि. पर्यंत | २०००० |
| | | ५०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | ४०००० |
| | | १००१ ते २००० चौ. मि. पर्यंत | ८०००० |
| | | २००१ ते ३००० चौ. मि. पर्यंत | १२०००० |
| | | ३००० चौ. मि. पेक्षा जास्त | -- |
| | | | |
| 10. | कातडी वाळलेली / ओली / खूर / शिंगे चामडी | १५० चौ. मि. पर्यंत जागा वापर | २४०० |
| | | १५१ ते ४०० चौ. मि. पर्यंत | ६४०० |
| | | ४०१ ते ६०० चौ. मि. पर्यंत | ९६०० |
| | | ६०१ ते ८०० चौ. मि. पर्यंत | १२८०० |
| | | ८०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | १६००० |
| | | १००० पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | १६०० |
| | | | |
| 11. | खोका लाकडी पेट्या पिंपे तयार करणे व साठवणे, पुठ्ठे, कार्डबोड, कारुगेट बॉक्स बनवणे व साठवणे | २५ चौ. मि. पर्यंत जागा वापर | ६०० |
| | | २६ ते ७५ चौ. मि. पर्यंत | १८०० |
| | | ७६ ते १२५ चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | १२६ ते १७५ चौ. मि. पर्यंत | ४२०० |
| | | १७६ ते २०० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | २०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | २४००० |
| | | १००१ ते २००० चौ. मि. पर्यंत | ४८००० |
| | | २००० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक २०० चौ. मि. साठी | ४८०० |
| | | | |
| 12. | चिंध्या | ५ चौ. मि. पर्यंत जागा | -- |
| | | ६ ते १० चौ. मि. पर्यंत | ४०० |
| | | ११ ते २५ चौ. मो पर्यंत | १००० |
| | | २६ ते ६० चौ. मि. पर्यंत | २४०० |
| | | ६१ ते १२० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | १२१ ते २०० चौ. मि. पर्यंत | ८००० |
| | | २०१ ते ४०० चौ. मि. पर्यंत | १६००० |
| | | ४०१ ते ६०० चौ. मि. पर्यंत | २४००० |
| | | ६०१ ते ८०० चौ. मि. पर्यंत | ३२००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ८०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | ४०००० |
| | | १००० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | ४००० |
| | | | |
| 13. | इमारती लाकूड व प्लायवूड | ५ चौ. मि. पर्यंत जागा | -- |
| | | ६ ते १० चौ. मि. पर्यंत | ४०० |
| | | ११ ते २५ चौ. मो पर्यंत | १००० |
| | | २६ ते ६० चौ. मि. पर्यंत | २४०० |
| | | ६१ ते १२० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | १२१ ते २०० चौ. मि. पर्यंत | ८००० |
| | | २०१ ते ४०० चौ. मि. पर्यंत | १६००० |
| | | ४०१ ते ६०० चौ. मि. पर्यंत | २४००० |
| | | ६०१ ते ८०० चौ. मि. पर्यंत | ३२००० |
| | | ८०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | ४०००० |
| | | १००० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | ४००० |
| | | | |
| 14. | लोकर | ५ चौ. मि. पर्यंत | ६०० |
| | | ६ ते ३० चौ. मि. पर्यंत | १८०० |
| | | १००० पेक्षा जास्त प्रत्येक १०० चौ. मि. साठी | ६०० |

<u>प्रकरण १८ भाग ४ मधील वस्तूंसाठी दर वार्षिक</u>

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्रमाण | २०१७-१८ नविन दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 1. | धातूचे ओत काम करणे | १ भट्टीसाठी | ६०० |
| | | २ भट्टीसाठी | १२०० |
| | | ३ भट्टीसाठी | १८०० |
| | | ४ भट्टीसाठी | २४०० |
| | | ५ भट्टीसाठी | ३००० |
| | | ६ भट्टीसाठी | ३६०० |
| | | ७ भट्टीसाठी | ४२०० |
| | | ८ भट्टीसाठी | ४८०० |
| | | ९ ते १५ भट्टीसाठी | ९००० |
| | | | |
| 2. | निळीत किंवा अन्य रंगात सुत किंवा कापड रंगविणे | १० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ४०० |
| | | ११ ते ३० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | ३१ ते ५० चौ. मि. पर्यंत | २००० |
| | | ५१ ते ८० चौ. मि. पर्यंत | ३२०० |
| | | ८१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | २००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 3. | विद्युत विलेपन | १० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ४०० |
| | | ११ ते २५ चौ. मि. पर्यंत | १००० |
| | | २६ ते ७५ चौ. मि. पर्यंत | ३००० |
| | | ७६ ते १२५ चौ. मि. पर्यंत | ५००० |
| | | १२६ ते १७५ चौ. मि. पर्यंत | ७००० |
| | | १७६ ते २०० चौ. मि. पर्यंत | ८००० |
| | | २०१ ते ३०० चौ. मि. पर्यंत | १२००० |
| | | ३०० पेक्षा जास्त प्रत्येक ७५ चौ. मि. साठी | ३००० |
| | | | |
| 4. | ओली किंवा वाळलेली कातडी किंवा चामडी कमावणे दाबने किंवा आवेष्टित करणे | १५ चौ. मि. पर्यंत जागा वापर | १६०० |
| | | २६ ते ५० चौ. मि. पर्यंत | ५३३३ |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | १०६६० |
| | | १०१ ते २०० चौ. मि. पर्यंत | २१३२० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | ५३३० |
| | | | |
| 5. | वायु मिश्रीत पेय ठेवणे बनवणे व पॅकिंग करणे | २० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ६०० |
| | | २१ ते ४० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | ४१ ते ८० चौ. मि. पर्यंत | २४०० |
| | | ८० ते १२० चौ. मि. पर्यंत | ३६०० |
| | | १२१ ते १६० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | १६१ ते २०० चौ. मि. पर्यंत | ६००० |
| | | ३०० चौ. मि. पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | १५०० |
| | | | |
| 6. | विटा, कौले, टाईल्स साठा | २०० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ९०० |
| | | २०० ते ५०० चौ. मि. पर्यंत | २२५० |
| | | ५०१ ते १००० चौ. मि. पर्यंत | ४५०० |
| | | १००० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | २२५ |
| | | | |
| 7. | साबण तयार करणेकरीता लागणारी सामग्री | १० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ९०० |
| | | ११ ते ३० चौ. मि. पर्यंत | २७०० |
| | | ३१ ते ५० चौ. मि. पर्यंत | ४५०० |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ९००० |
| | | १०१ ते २०० चौ. मि. पर्यंत | १८००० |
| | | २०१ ते ३०० चौ. मि. पर्यंत | २७००० |
| | | ३०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. | ४५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | साठी | |
| | | | |
| 8. | कापसाच्या गाद्या लोड तयार करणेकरीता साठा करणे | १० चौ. मि. पर्यंत जागा वापर | ४०० |
| | | ११ ते ३० चौ. मि. पर्यंत | १२०० |
| | | ३१ ते ५० चौ. मि. पर्यंत | २००० |
| | | ५१ ते ८० चौ. मि. पर्यंत | ३२०० |
| | | ८१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ४००० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | २००० |
| | | | |
| 9. | वेअरहाऊस | २५ चौ. मि. पर्यंत जागा वापर | २४०० |
| | | २५ ते ५० चौ. मि. पर्यंत | ४८०० |
| | | ५१ ते १०० चौ. मि. पर्यंत | ९६०० |
| | | १०० पेक्षा जास्त प्रत्येक ५० चौ. मि. साठी | ४८०० |
| | | | |
| 10. | तबेला, परवाना बैल, म्हैस, गाय घोडा | १० जनावरापर्यंत | ६०० |
| | | ११ ते ३० जनावरांपर्यंत | १८०० |
| | | ३१ ते ५० जनावरांपर्यंत | ३००० |
| | | ५१ ते ७५ जनावरांपर्यंत | ४५०० |
| | | ७६ ते १०० जनावरांपर्यंत | ६००० |
| | | १०१ ते २०० जनावरांपर्यंत | १२००० |
| | | २०१ ते ३०० जनावरांपर्यंत | १८००० |
| | | ३०१ ते ४०० जनावरांपर्यंत | २४००० |
| | | ४०१ ते ५०० जनावरांपर्यंत | ३०००० |
| | | ५०१ ते ६०० जनावरांपर्यंत | ३६००० |
| | | ६०१ ते ७०० जनावरांपर्यंत | ४२००० |
| | | ७०१ ते ८०० जनावरांपर्यंत | ४८००० |
| | | ८०० पेक्षा जास्त प्रत्येकी दहा | ६०० |
| | | सर्कस जनावरे | ६००० |

तरी नविन साठा परवानास धोरणात्मक निर्णय घेणे कामी, सबब बाब मा. महासभेत धोरण निश्चित होणे शिफारस असे.

**ठराव क्र :-**

**उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे, परवाना दर फी, विलंब शुल्क फी व** नविन साठा परवानास ही मा.महासभा मंजुरी देत आहे**, तसेच मिरा भाईंदर महापालिका स्थानिक संस्था कर विभागात अंदाजे 30,000 आस्थापना नोंदणीकृत आहेत परंतु अद्याप 2500 ते 3000 आस्थापनांनी परवाना घेतला आहे. तरी मा.आयुक्त यांनी मिरा भाईंदर क्षेत्रातील आस्थापनांचे सर्व्हेक्षण करुन त्यांचे परवाना घेणेकामी एजंन्सी नियुक्त करावी. सदर एजंन्सीने कमीतकमी रु .60 लाख परवाना फीची विना मोबदला हमी घ्यावी व रु .25 लाख सुरक्षा अनामत रक्कम ठेवावी. हमी रक्कमेच्या पुढील , परवाना फी वसुलीच्या 25% याप्रमाणे संबधित एजंन्सीला मोबदला देण्यांत यावा. हमी रक्कमे एवढी परवाना फी वसुली न झाल्यास ती रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेमधुन जप्त करण्यांत यावी. तरी जी एजंन्सी जास्तीजास्त विना मोबदला परवाना फी रक्कमेची हमी देईल अशा एजंन्सीला प्राधान्य देण्यांत यावे . तसेच महापालिकेने संबधित एजंन्सीवर नियंत्रण ठेवणे व जास्तीतजास्त परवाना फी वसुलीसाठी तज्ञ व अनुभवी व्यक्तीची मानधनावर नियुक्ती करावी** असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील                    अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | निरंक |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | ११ | कदम अर्चना अरुण | |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | भट दीप्ती शेखर | |
| १५ | सॉंस नीला बर्नाड | १५ | भोईर भावना राजू | |
| १६ | रावल मेघना दिपक | १६ | पाटील धनेश परशुराम | |
| १७ | मोकाशी दिपाली आनंदराव | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अरोरा दीपिका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | शेख अमजद गफार | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | अहमद साराह अकरम | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २७ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २८ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४० | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४२ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३ | **जैन राजेंद्र भवरलाल** | | | |
| ४४ | **विराणी अनिल रावजीभाई** | | | |
| ४५ | **गजरे दौलत तुकाराम** | | | |
| ४६ | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| ४७ | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| ४८ | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| ४९ | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| ५० | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| ५१ | **भोईर गणेश गजानन** | | | |
| ५२ | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, **मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक क र्मचारी सहकारी पत संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**दिपीका अरोरा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी पतसंस्थेकरीता मनपा मुख्य कार्यालय इमारतीचे तळ मजल्यावर जागा उपलब्ध करून मिळणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. सद्यस्थितीत मनपाच्या तळ मजल्यावर मिरा भाईंदर कर्मचारी सहकार पतसंस्था अस्तित्वात असून समोरील बाजूस दोन रुम आहेत. त्यातील एका रुममध्ये आरोग्य विभागाचे साहित्य आहे व एक रुम सुरक्षा रक्षक यांना गणवेश बदलणेस देण्यात आलेला आहे. मनपाच्या आवारातील वाहन चालक करीता देण्यात आलेल्या रुमच्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन मिळण्याची मागणी श्रमिक कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी केली आहे. मनपा वाहन चालक यांची व्यवस्था सुरक्षा रक्षक यांना देणेत आलेल्या रुम मध्ये केल्यास सदर जागा श्रमिक कर्मचारी पतसंस्थेकरीता देणेस उपलब्ध होईल व श्रमिक कर्मचारी पतसंस्थेस भाडे तत्वावर वाहनचालक रुमची जागा उपलब्ध करुन देता येईल. सदर भाडयाने दयावयाचे जागेचे क्षेत्रफळ 37.00 **चौ.मीटर** एवढे **आहे. तथापी सदर संस्था ही शैक्षणिक कार्यात असून सदर जागेत शैक्षणिक कार्य देखिल पार पाडण्यात येणार असल्याने सदर जागा बांधकाम करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 79 (ग) नुसार सवलतीच्या दरात रु.1/- प्रति महिना या दराने 11 वर्ष मुदतीसाठी भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम माझ्या जवळ एक पत्र आहे. पालिकेचे आयुक्त साहेब पालिकेचे एक पत्र आहे ते पत्र मी वाचत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका हे नाव कॉपी राईट्स ॲक्ट आणि ट्रेडमार्क ॲक्टप्रमाणे निर्लेखित नाही. त्यामुळे सदर नावाची परवानगी न घेता वापर केल्यास वापर करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करता येणार नाही. म्हणजे उद्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एखाद्याने मिरा भाईंदर महानगरपालिका देशी दारुचे दुकान किंवा मिरा भाईंदर महानगरपालिका लॉजिंग बोडिंग याचा जर परवाना मागितला तर आपण द्यायला बांधील आहोत. ह्या पत्राप्रमाणे आयुक्त साहेब बरोबर म्हणजे महापालिकेचे हे नाव ही आपली महानगरपालिकेची प्रॉपर्टी नाही असा याचा अर्थ समजायचा का?

**मा. उपमहापौर :-**

अनिल सावंत साहेब भावनेच्या भरात तुम्ही महापालिकेची बदनामी लॉजिंग बोर्डिंग सारखे शब्द वापरु नका. ह्या सभागृहाचे सन्मा. सदस्य आहात. किती वर्ष तुम्ही करता तुम्ही त्याच्यात कधी आजपर्यंत काही केलं का विषयाला धरुन काही तरी सांगता हे चुकीचे आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब मुळ लक्षवेधी मांडली होती २३ परवाने कॅन्सल झाले. महापालिकेने लॉजिंग बोर्डिंगचे २३ परवाने कॅन्सल केले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ह्या शहराबद्दल स्वाभिमान ठेवा तुम्ही काही पण बोलु नका.

**अनिल सावंत :-**

स्वाभिमान आहे म्हणून बोलतो. कस काय वापरु शकता ही संस्था महानगरपालिकेची. ही संस्था नाव कशी वापरु शकते. महानगरपालिकेचे त्याचे उत्तर मला हवं.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. ह्या शहराच्या बाबतीत बदनामीकारक बोलल्याचा अधिकार तुम्हाला नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब ॲप्लीकेशन आलेत परवाने घ्यायला.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम विषयपत्रिकेचा हा विषय नाही. महापौर मॅडम माझी तुम्हाला विनंती आहे त्यांना बोलायला दिले तर खुप बोलतात.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

आम्ही अभ्यास करुन बोलतो तुमच्या सारखा गोंधळ घालत नाही. आम्हाला गरज पण नाही.

**प्रशांत दळवी :-**

अभ्यास करुन कोण येतो आणि ठेका कोणाचा आहे हे आता बाहेर गेलेला मतदानाच्या वेळेला सगळ कळल सभागृहाने बघितलं.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही आमच्या नैसर्गिक क्रियासाठी गेलो होतो तुम्हाला बरोबर आलं पाहिजे होतं.

**प्रशांत दळवी :-**

आम्हाला त्याची गरज नाही. इथे शहराचे नागरिक बसलेले आहेत. पत्रकार बंधु यांनी बघितलं ठराव कोणी मांडला आणि कोणाला नैसर्गिक विधी झाली हे सर्व जनतेने बघितलं आणि पत्रकाराने बघितलं त्यामुळे मला बघायची गरज नाही.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम विषय बाजुला राहतोय जरा प्रशासनाला उत्तर देऊ द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब ह्याच नावाची संस्था आणखीन एक आहे मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी म्हणजे ही ऑलरेडी जुनी आहे. मग यांना जर ऑब्जेक्शन ह्याच संस्थेवरती घ्यायचे होते मग त्यांनी त्या संस्थेवरती घ्यायला पाहिजे होते. ती संस्था जवळ जवळ १०-१५ वर्षापासुनची आहे. आणि ह्या संस्थेला परमिशन कोणी दिली? गर्व्हमेंटने महानगरपालिकेशी काय संबंध आणि जर महापालिकेने ऑब्जेक्शन उचलले पाहिजे होते आणि त्या संस्थेला ऑलरेडी महापालिकेने आपल्या खाली जागा दिलेली आहे. ती पण नाममात्र दराने एक रुपयाने.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब महानगरपालिका दोन्ही युनियनमध्ये त्यांच्या विरोधी ते काम करत आहेत. त्याच्यामुळे तो बाहेर जाण्याचा प्रश्न येत नाही.

**अनिल सावंत :-**

तोच विषय आहे मला प्रशासनाने जे उत्तर दिलेले आहे त्याच्यावर ऑब्जेक्शन आहे की महानगरपालिका हे रजिस्टर नाही. कोणीही वापरु शकतो. प्रशासनाने उत्तर द्यावे कोणीही वापरु शकतो का? राईटिंगमध्ये पत्र आहे साहेब म्हणून मी बोलतो अदरव्हाईज मी बोलत नाही. उत्तर द्या.

**विधी अधिकारी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते मिरा भाईंदर महानगरपालिका हे जे नाव आहे हे आपण नोंदणीकृत करण्यासाठी अर्ज केलेला नाही. अदर कुठल्याही महापालिकेने कॉपीराईट किंवा ट्रेडमार्क ॲक्ट खाली असे नाव रजिस्ट्रेशन करण्यासाठी अर्ज केलेला नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे कोणीही वापरु शकतो खरतर आयुक्त महोदय ह्या शहराची नगरपरिषद झाली. त्यानंतर महानगरपालिका झाली त्यावेळी शासनाचा एक जी.आर निघाला. मिरा भाईंदर महानगरपालिकेची आणि त्या शासनाच्या जी.आरला विशिष्ट अर्थ ज्याचा विशेष सन्मा. सदस्यांनी दिला ते १४ व्या साली मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी पतसंस्था स्थापन झाली. एक वेळ नाव वापरु शकते कुठली ही संस्था ज्या संपूर्ण राज्यामध्ये, देशामध्ये, स्टेटमध्ये, राज्य शासनामध्ये अशी एक संस्था नाव वापरु शकते. सचिव हा अलिखित नियम आहे. दुसऱ्या संस्थेला नाव वापरायचा असेल तर मा. आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते. त्या ठिकाणी त्या संस्थेला आपण एक रुपया भाडे देतो. त्याला आपण म्हणतो की उत्पन्न वाढवूया, ३२ लाख रुपये भाड्याचे तुम्ही गोषवारा दिला. महापालिकेला ते उत्पन्न झाले असते आणि ठराव काय होता की एक रुपया नाममात्र अशी पतसंस्था जिला मा. आयुक्तांची परवानगी नाही. नियमामध्ये तरतुद केल्याप्रमाणे सर्व्हिस टाईमची जर पतसंस्था तुम्हाला दुसरी पतसंस्था काढायची असेल तर ती मुळ पतसंस्था आहे तिचे इलेक्शन झाले पाहिजे. मात्र होत काय जी जुनी संस्था आहे तिथे सदस्य आहेत. त्यांनी कर्ज घेतलेले आहेत. तो कर्ज फेडण्या करिता नविन सदस्य होऊ शकते कमिटीमध्ये. आज सर्व्हिस संस्थेला आमचे ऑब्जेक्शन अजिबात नाही. त्यांनी वापरलेले मिरा भाईंदर महानगरपालिका नावाला आहे. उद्या तो ही वापरु शकतो. एक पतसंस्था चालवू शकते. त्या पतसंस्थेने हे नाव वापरण्याचे त्यांना अधिकार नाही आणि अशी पतसंस्था मुळ नविन पतसंस्थेला परवानगी दिल्यानंतर मुळ पतसंस्था जी आहे ती आर्थिक डबघाईला येऊ शकते. त्यामुळे आर्थिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. हा राज्य शासनाचा नियम आहे. पतसंस्थांच्या बाबतीत सोसायटी रजिस्ट्रेशन आहे. १८६० चे कलम (३) अ अशी पतसंस्था काढली. दुसरी काढली तर जुन्या पतसंस्थेवर आर्थिक नुकसान होऊन ती पतसंस्था डबघाईला येऊ शकते. कोणाचा तरी व्यक्तीगत उद्दीष्ट आहे म्हणून ही पतसंस्था दुसरी काढायला आमचा अजिबात ऑब्जेक्शन नाही त्या महानगरपालिकेचे नाव त्यांनी कस वापरलं आणि आज त्याला कोणत्या कायद्याच्या आधारे आपण महानगरपालिकेमध्ये जागा देत आहोत. शैक्षणिक संस्थेकडून काय काम करावं लागत ही तर पतसंस्था आहे. याचा खुलासा होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि आज आमचा ठाम विरोध आहे. अशा प्रकारे नाव वापरायला आणि त्या संस्थेला ह्या ठिकाणी नाव द्यायला आणि जर ती संस्था बेकायदेशीर असेल आणि बेकायदेशीर काम करत असेल तर माझी आपल्याला महापौर मॅडम माझी रिक्वेस्ट आहे की ह्या पतसंस्थेच्या विरोधात मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत ह्या कर्मचाऱ्यांनी मिळून एक पतसंस्था काढली. तिच नाव आहे मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादीत त्याच्यानंतर इतर कर्मचारी मिळून दुसरी पतसंस्था काढली त्याचे नाव आहे मिरा भाईंदर महापालिका श्रमिक कर्मचारी सरकारी पतसंस्था हे दोन्ही कर्मचारी आपले महापालिकेचे आहेत आणि दोन्ही पतपेढ्यांची परवानगी डी.डी.आर ऑफिसरने गर्व्हमेंटने दिलेली आहे. त्याप्रमाणे ते नियममान्य आहेत आणि तसे एका संस्थेला आपण ऑलरेडी एक रुपया नाममात्रने दिलेली आहे आणि दुसऱ्या संस्थेला आपण ३,२४,८६६/- एवढे चलन देणे चुकीचे आहे. म्हणजे पालिका एका ठिकाणी एक रुपयाने देणार आणि दुसऱ्याला ३ लाख ३.२५ रुपयाने देणार हे चुकीचे आहे. हे कोणाला कळत नाही आणि म्हणून सगळ्यांना सेम न्याय देण्याकरिता आपण त्यांना एक रुपया दराने देण्याकरीता आमचा ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये काही गैर नाही आहे.

**शर्मिला बगाजी :-**

मा. आयुक्त सोा. मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी पतसंस्था स्थापन करणेस संस्थेस ना हरकत दाखला दिलेला नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित यांनी सदर संस्थेच्या स्थापनेस आक्षेप घेतला असून सदर प्रकरणावर प्रशासनामार्फत कारवाई सुरु आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेस २२ वर्षे पूर्ण झालेली असून सदर संस्था यशस्वीपणे कार्यरत आहे. त्याच नावाशी सार्धम्य असणारी दुसरी संस्था काढून सदर संस्थेने सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० चे कलम ३ (अ) चा भंग केला आहे. मनपात एक पतसंस्था कार्यरत असताना दुसरी पतसंस्था उघडल्यास कार्यरत संस्था आर्थिकदृष्ट्या दुबळी होवून मनपा कर्मचाऱ्यांचे अहित होण्याची दाट शक्यता असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम-४ अन्वये सदर संस्थेस परवानगी देणे चुकीचे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादीत या संस्थेस महानगरपालिकेने रितसर ना हरकत दाखला दिलेला आहे. तसेच जागा उपलब्ध करुन दिलेली असल्याने तसेच मनपा कर्मचाऱ्यांच्या हिताचा

विचार करता मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी पतसंस्थेस जागा देणे योग्य होणार नाही. तरी सदर संस्थेस भाड्याने जागा देता येणार नाही असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत. सचिव साहेब मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. दिपीका अरोरा, अनुमोदन श्री. मनोज दुबे, दुसरा ठराव आहे सुचक श्रीम. शर्मिला बगाजी, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. दिपीका अरोरा ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. दिपीका अरोरा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५३, विरोधात २९, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. दिपीका अरोरा यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी सहकारी पत संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका श्रमिक कर्मचारी पतसंस्थेकरीता मनपा मुख्य कार्यालय इमारतीचे तळ मजल्यावर जागा उपलब्ध करून मिळणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. सद्यस्थितीत मनपाच्या तळ मजल्यावर मिरा भाईंदर कर्मचारी सहकार पतसंस्था अस्तित्वात असून समोरील बाजूस दोन रुम आहेत. त्यातील एका रुममध्ये आरोग्य विभागाचे साहित्य आहे व एक रुम सुरक्षा रक्षक यांना गणवेश बदलणेस देण्यात आलेला आहे. मनपाच्या आवारातील वाहन चालक करीता देण्यात आलेल्या रुमच्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन मिळण्याची मागणी श्रमिक कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी केली आहे. मनपा वाहन चालक यांची व्यवस्था सुरक्षा रक्षक यांना देणेत आलेल्या रुम मध्ये केल्यास सदर जागा श्रमिक कर्मचारी पतसंस्थेकरीता देणेस उपलब्ध होईल व श्रमिक कर्मचारी पतसंस्थेस भाडे तत्वावर वाहनचालक रुमची जागा उपलब्ध करुन देता येईल. सदर भाडयाने दयावयाचे जागेचे क्षेत्रफळ 37.00 **चौ.मीटर** एवढे **आहे. तथापी सदर संस्था ही शैक्षणिक कार्यात असून सदर जागेत शैक्षणिक कार्य देखिल पार पाडण्यात येणार असल्याने सदर जागा बांधकाम करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 79 (ग) नुसार सवलतीच्या दरात रु.1/- प्रति महिना या दराने 11 वर्ष मुदतीसाठी भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. दिपीका अरोरा** **अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण दुबे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | सावंत अनिल दिवाकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | पाटील वंदना मंगेश | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | सोंस नीला बर्नाड | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | रावल मेघना दिपक | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | मोकाशी दिपाली आनंदराव | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | अरोरा दीपिका पंकज | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | सपार उमा विश्वनाथ | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | परदेशी गिता हरीश | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील नरेश तुकाराम | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | शेख अमजद गफार | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | पाटील वंदना विकास | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | भोईर कमलेश यशवंत | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २७ | अहमद साराह अकरम | |
| २८ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २८ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | २९ | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३० | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४० | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४२ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४३ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४४ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४६ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४७ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४८ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४९ | व्यास रवि वासुदेव | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५० | पांडेय पंकज सूर्यमणि | | | | |
| ५१ | भोईर गणेश गजानन | | | | |
| ५२ | पारधी सुजाता यशवंत | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७, **भाईंदर (पूर्व) नवघर येथील विकास योजनेतील आरक्षण क्र . १२२ड या दफनभूमी आरक्षणातील जागा सुन्नी या मुस्लिम समाजास देण्याबाबत.**

शानु गोहिल :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पूर्व नवघर येथे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. 122 ड दफनभूमीसाठी राखीव आहे. सदर आरक्षणाच्या जागेचे क्षेत्र 44616.00 चौ.मीटर एवढे आहे. त्यापैकी 33229.00 चौ.मीटर क्षेत्रावर कांदळवन आहे . उर्वरीत 11395 चौ.मीटर क्षेत्र असून त्यापैकी 3420 चौ.मीटर क्षेत्रावर झोपड्या आहेत . सन 2003 मध्ये बंदरवाडी येथील रेल्वेच्या जागेवरील झोपड्या तोडल्या असून सदर झोपड्या धारक 2003 पासून आरक्षण के. 122 ड या दफन भूमीच्या जागेवर आहेत . दफनभूमीची जागा यापूर्वी शासनाची होती , त्यामुळे सदर झोपड्या काढून जागा रिकामी करुन देण्यासाठी मा .जिल्हाधिकारी ठाणे यांना सातत्याने पत्रव्यवहार करण्यात येत होता. दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर आरक्षण क्र .122 ड दफनभूमीच्या एकूण जागेपैकी 3 हेक्टर जागा आरक्षणाच्या वि कास करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग केलेली आहे . आरक्षणाच्या जागेवरील झोपड्या महानगरपालिकेस हटवाव्या लागणार आहेत.**

**आरक्षण क्र .122 ड या ठिकाणी सद्यस्थितीत 7975 चौ.मीटर जागा मोकळी असून मा . महासभा दि .08/12/2017 ठराव क्र .40 अन्वये सदर जागेपैकी काही भाग बोहरा समाजाच्या दफनभूमीसाठी देण्यास मंजुरी दिलेली आहे.**

**मा. महापौर यांनी दि .08/03/2018 रोजी पत्र देऊन सदर आरक्षणाच्या जागेतील काही भाग मुस्लीम सुन्नी समाजाला देण्यासाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव देण्यासाठी कळविलेले आहे. मा. महापौर यांच्याकडे सदर जागेसाठी महाराष्ट्र मिल्लते इस्लामिया अरबी स्कूल या संस्थेने मागणी केलेली आहे. सदर जागा ही सीआरझेड ने बाधित होत असून सदर प्राधिकरणाने कांदळवनापासून 50 मीटरच्या अंतरापर्यंत कोणतेही काम करण्यास मज्जाव केला आहे . तसेच पक्के काँक्रिटचे कुंपण घालण्यास देखील मनाई केलेली आहे वरील वस्तुस्थिती मा. महासभेपूढे सादर करण्यात येत आहे.**

**ठराव क्र. :-**

**आरक्षण क्र .122ड दफन भुमीची जागा सर्व समाजासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार ठरवून देण्यासाठी मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहे. प्रस्तावात नमुद सुन्नी समाजास दफनासाठी जागा देण्यास मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

अश्विन कासोदरीया :-

माझे अनुमोदन आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो सदरचा विषय हा मागच्या वेळेला पण आला होता. त्यावेळेला ठराव झाला त्या ठरावामध्ये आपण सांगितलं की सदरच्या जागेची पाहणी केली जाईल. आम्ही असा ठराव मांडला होता त्याचप्रमाणे सदरची जागा ही आपल्याला ही माहिती आहे प्रत्येक ठिकाणी कांदळवन होते. गेल्या कित्येक वर्षापासून त्या ठिकाणी कांदळवन नव्हते. पाणथळ क्षेत्र होते अस असताना

देखील मान्य करतो की ते जे आरक्षण टाकलेले आहे परंतु जे आरक्षण टाकलेले आहे त्यावेळेला तिथे पाणथळ आणि मँग्रोज असताना देखील आजच्या तारखेला तिथे आपण दफनभुमीचा प्रस्ताव आणता. मागच्या वेळेला आणला आपण बहुमतांनी मंजुर करुन घेतला तर आजच्या वेळेला सुन्नी समाजाने मागणी केलेली आहे. आता आपण मंजुर करुन घेतोय बहुमतांनी ठराव मंजूर करतो परंतु ह्या जागेची सविस्तर माहिती प्रशासनाकडून आम्हाला द्यावी. तिथे मँग्रोज होते की नाही. आणि ते मँग्रोज कशाप्रकारे काढले गेले दफनभुमीची जागा आरक्षण क्र. १२२ (ड) त्या जागेविषयी साहेब थोडे सांगा.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो १२२ (ड) हे आरक्षण आपल्या विकास योजनेत दफनभुमीसाठी आहे आणि हे संपूर्ण आरक्षण सी.आर.झेड मध्ये आहे.

**प्रविण पाटील :-**

तुमच्या गोषवाऱ्यामध्ये आहे की सदर जागेवरती कोणत्याही प्रकारची भिंत बांधता येणार नाही. जर भिंत बांधता येणार नाही. कांदळवनाचे बाधित क्षेत्र आहे सी.आर.झेड ने बाधित क्षेत्र आहे. अशा ठिकाणी तुम्ही कुठल्या प्रकारे ठराव करता. खाली फुकट सुन्नी समाज मुस्लीम समाजाबद्दल प्रेम दाखवायचे आम्हाला दफनभुमी करायची आहे. हे सांगुन बहुमताच्या जोरावर ठराव करायचा आणि त्या समाजाची दिशाभुल करायची.

**दिपक खांबित :-**

३ हेक्टर जागा आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब स्पष्ट सांगा तिथे बांधकाम होऊ शकत की नाही?

**दिपक खांबित :-**

एम.सी.झेड प्राधिकरणाच्या मान्यतेने करता येते.

**प्रविण पाटील :-**

कोणाच्या? कशाला परवानगी दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

एम.सी.झेड यांनी सी.आर.झेड प्राधिकरणाच्या मान्यतेने.

**प्रविण पाटील :-**

त्यांना परवानगी तुम्ही मागणी केलेली आहे. आम्ही त्याही पुढे जाऊन सांगतो साहेब त्याठिकाणी तुम्ही दुरुस्तीची परवानगी करुन आणि जिथे दफनभुमी अस्तित्वात नसताना तुम्ही दुरुस्तीची परवानगी घेतलेली आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

त्या ठिकाणी दफनभुमी नसताना खांबित साहेब एक सांगा जर तिथे दफनभुमी नव्हती तर तुम्ही कशाला दुरुस्तीची परवानगी दिली. काय हिशोबाने दिली? दफनभुमी द्यायची इच्छा असेल तर अशा ठिकाणी द्या तिथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी द्या. कशाला लोकांची दिशाभूल करता.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब ज्यावेळेला समुद्र किनारी ज्यावेळेला काकांनी मागणी केलेली होती की जेसल पार्कला चौपाटीच्या बाजुला आम्हाला विधी शेड उपलब्ध करुन द्यायच्या त्यावेळेला एम.सी.झेड कडे परवानगी मागण्यात आली. त्याच्यामध्ये ह्या विभागामध्ये दफनभुमी आहे. असे एम.सी.डी. कडील मागणी केलेली त्या विभागची दुरुस्तीची परवानगी त्यावेळेला त्या नगरसेवकांनी २०१२ साली केलेली आहे. मग ज्या ठिकाणी दफनभूमी अस्तित्वात नाही ते बाधित क्षेत्र सी.आर.झेड ने मँग्रोज त्या विभागाने महापालिकाने एम.सी.झेड कडून अशी परवागनी घेतलेली आहे.

**दिपक खांबित :-**

त्या परवानगीचा कुठेही उपयोग केलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

साहेब उपयोग केला नाही तर एम.सी.झेडची दिशाभूल महापालिकेने केलेली आहे की नाही.

**दिपक खांबित :-**

ते आम्ही बघुन घेऊ काय आहे.

**प्रविण पाटील :-**

बघुन नाही साहेब ह्याला परवानगी दिलेली आहे. विशेष म्हणजे त्या विभागाने परवानगी पण त्याची दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

आता जे ३ हेक्टर रिकामे झाले नाही तर काहीतरी करायचे असेल त्याला एम.सी.झेड ची परमिशन घ्यावी लागेल.

**प्रविण पाटील :-**

तुम्हाला परवानगी दिलेली आहे. जिथे अस्तित्वात नसताना परवानगी दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

ती फक्त कम्पाऊंड घालण्याकरिता परवानगी आहे.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही कशाला कम्पाऊंड बांधता.

**दिपक खांबित :-**

तारेची फ्रेसींग.

**प्रविण पाटील :-**

फ्रेसींग कशासाठी?

**दिपक खांबित :-**

दफनभुमीसाठी.

**प्रविण पाटील :-**

दफनभुमी?

**दिपक खांबित :-**

त्याच्यामध्ये परमनन्ट कॉंक्रीट प्रोसेसिंग झाल्यावर दफनभुमी होणार. त्यामुळे आपण तिकड जी जागा आपल्या ताब्यात होती कलेक्टरने आपल्याला दिली होती त्यावरती आपण तारेची फ्रेसींग घेतली.

**प्रविण पाटील :-**

जागा होती म्हणजे जागा आरक्षण होतं. जागा आहे. जागा सी.आर.झेड ने बाधीत आहे जागेमध्ये मॅंग्रोज आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या प्रेझेंट डी.पी. नुसार तिथे दफनभुमीचे आरक्षण आहे. त्याला कम्पाऊंड करण्यासाठी ती परवानगी आहे. पण पुढच्या तिथे सगळ्या गोष्टी करत असताना एम.सी.झेड ने आणि इतर काही प्राधिकरण आहेत त्या सगळ्यांची परवानगी घेऊनच पुढची कारवाई करता येईल.

**प्रविण पाटील :-**

साहेब विषय तो नाही विषय असा आहे आपण परवानगी कोणाला देतो दुरुस्तीची?

**मा. आयुक्त :-**

बघा दुरुस्तीची परवानगी जी अस्तित्वात असते त्यांना मिळते. जे अस्तित्वात आहे त्याला परमनन्ट कुंपण घालण्यासाठीची ती परवानगी आहे.

**प्रविण पाटील :-**

कुंपण बांधण्यासाठी तिथे परवानगी नाही. तुम्ही तिथे बघा. दफनभुमी दुरुस्तीची परवानगी आहे. दुरुस्तीची परवानगी साहेब विषय असा आहे जे बांधकाम अस्तित्वात नाही त्याची दुरुस्तीची परवानगी आपण मागितलेली आहे. ते तर त्या लोकांनी केलेलच आहे.

**मा. आयुक्त :-**

ते चेक केलं जाईल. परंतु डी.पी. प्लाननुसार जो शहराचा विकास कसा व्हावा तो ठरलेला आहे. हा भाग वेगळा आहे की काही लोकांना तिथे नको आहे ते शिफ्ट करा वगैरे हा नंतरचा भाग आहे. पण हा डी.पी. नुसार तिथे आरक्षण आहे त्याच्यामध्ये काही लोकांची मागणी तेवढ्या पुरता तो विषय आहे म्हणून मी खुलासा करतो.

**प्रविण पाटील :-**

ठिक आहे तो भाग वेगळा आहे. परंतु त्याच्याही पुढे जाऊन सांगतो वसई विरार महापालिका ज्या वेळेला एव्हरशाईन सीटीच्या इथे दफनभुमी बांधण्यात आली ह्याच प्रकारचा भाग आहे. तंतोतंत अशा प्रकारचं त्या वेळेला अशाच महापालिकेने बहुमतांनी ठराव केला तिथे कम्पाऊंड बांधली तिथे भरणी करण्यात आली. आज तिकडच्या स्थानिक लोकांनी तिथे तिकडचे हरित लवादाकडे मागणी करुन तिथे ती केस हरित लवादाकडे केली. आज त्याचा निर्णय झाला महापालिकेचे ११ कोटीचे नुकसान झाले. सन्मा. आयुक्त सतिश लोखंडे ह्यांना ते हरित लवादाकडे अटक केससाठी जावे लागते साहेब. आयुक्तांना जावं लागते तिच परिस्थिती इथे उद्‌भवणार आहे. सेम तसाच भाग आज मिरा भाईंदर मध्ये २९९ आरक्षण १२२

(ड) मध्ये करण्याचा प्रयत्न करत आहात. आयुक्त साहेब खरोखर आम्हाला सुन्नी समाज, सीया समाज, मुस्लिम समाजाबद्दल खरोखर कुठल्याही प्रकारचा वाद करायचा नाही किंवा त्यांना द्यायच्या बद्दल आम्हाला तीळमात्र शंका नाही. त्याच्याबद्दल परंतु आपण जे देतो बहुमताच्या जोरावर आपण ठराव करतो ते काय देतो त्याचा थोडा तरी अभ्यास करा.

**जुबेर इनामदार :-**

एका समाजाला पूर्ण देशामध्ये त्रास देतात आणि त्या समाजासाठी दफनभुमीची व्यवस्था करुन देतात अशाचप्रकारे हा देखावा आहे याच्या पलिकडे काही नाही तुम्हाला कुणाला काही द्यायचे नाही. खरोखर द्यायच असेल तर चांगली जागा द्या. तुमच्या आमदाराच्या शाळेच्या बाजुला द्या. तुमची इच्छा असेल तर द्या एका समाजाची दिशाभुल करायला घेतली आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम मैं २००७ में पहिली बार नगरसेविका थी। जबसे यह कब्रस्तान का विषय का मैंने फॉलो अप किया है। मुस्लीम समाज के लिए भाईंदर ईस्ट में कही भी कब्रस्तान नही है। जो मुस्लीम समाज के लिए बहुत ही गरज का विषय है। क्योंकी भाईंदर वेस्ट में जो कब्रस्तान है वहाँ जगह पुरी नही पडती है। मिरारोड बहुत दूर पडता है इसलिए मुस्लीम समाज के लिए भाईंदर ईस्ट में कब्रस्तान मिलना ही चाहिए। ऐसी मेरी भी भुमिका है और हमारे पक्ष की भी भुमिका है। लेकिन कुछ लोग ऐसी अफवा फैलाते है की शिवसेना पार्टी कब्रस्तान के खिलाफ है। हम इसके बिलकुल भी खिलाफ में नही है। मेरा खुद ११ साल का फॉलो अप है। मिरा भाईंदर में मेरे पास सारे पत्र है। मुझे २०१० में ऐसा जवाब मिला था की मॅडम होने वाला है। कुंपण भिंत का टेंडर निकलने वाला है। लेकिन २०१० से २०१८ चल रहा है। ऐसा कोई भी काम नही हुआ है। इसका मतलब यह है की वहॉ कोई ना कोई टेक्नीकल प्रॉब्लेम है। मँग्रोज है, सी.आर.झेड है। इसमें काम नही हो सकता। आपके गोषवारा में खुद लिखा हुआ है ऐसा ५० मीटर के अंदर पॉसिबल नही है तो जब यह काम हो ही नही सकता तो ऐसे विषय पे बारबार महासभा में विषय लाके किसी समाज का दिशाभुल करना या उनके भावनाओं का खिलवाड करना यह अच्छी बात नही है। अगर आप देना ही चाहते हो मुस्लिम समाज के लिए कब्रस्तान देना ही चाहते हो तो कोई ऐसी आर.जी. जगह हो जो महापालिका के कब्जे में हो। यह दे सकते है ऐसी जगह पर ठराव किजीए ऐसे विषय सी.आर.झेड में लाके कोई मतलब नही है।

**जयंतीलाल पाटील :-**

२४६ द्या ना.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे की सदरची जागा ही खरोखर टेक्नीकली अडचणीची आहे. सी.आर.झेड आहे आम्ही त्याच्याही पुढे जाऊन सांगतो त्या जागेवर महापालिकेने मँग्रोजचा ऱ्हास केला. तिथे पाणथळ क्षेत्र होते. तुम्हाला कल्पना असेल २००७ साली तिथे महापालिकेने कुठे कचऱ्याचे डम्पींग बनवले होते त्यावेळी सगळ्या गाड्या तिकडे न्यायचे त्या मँग्रोजवर सगळी भरणी करुन टाकली. आणि त्याच्यावर महापालिकेचे अधिकाऱ्यांवर व उपायुक्तांवर गुन्हे दाखल झाले आणि ती केस आजच्या तारखेला महापालिका लढत आहे. ती केस आहे मँग्रोजचा भाग आहे. अशी कुठली तरी वादग्रस्त जागा द्यायची आणि काही तरी दिशाभुल करायची. महापौर मॅडम आपण सक्षम आहात. आयुक्त साहेब ह्या गोष्टीवर तुम्ही विचार करा आणि जाणूनबुजून आम्ही विरोध करतोय. शिवसेना विरोध करत आहेत. आम्ही तुमच्या बाजूने आहोत. दफनभुमीचा असा भास करण्याचे तुम्ही सोडून द्या आणि आपणाला विनंती आहे खरोखर मुस्लीम समाजाला खरोखर दफनभुमीला जागा पाहिजे. आम्हीही त्यामताचे आहोत. तुम्ही चांगली जागा आणा कुठल्याही प्रकारची वाद नसलेली जेणेकरुन लगेच त्या जागेमध्ये दफनभुमी स्थापन करण्यांत येईल.

**जयंतीलाल पाटील :-**

खांबित साहेब सी.आर.झेड किती नंबर आहे. सी.आर.झेड एक का दोन आहेत.

**दिपक खांबित :-**

सी.आर.झेड वन आहे. सी.आर.झेड वन टू पण आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

एक आणि दोन होऊ शकत का? अटीशर्ती आहे का?

**दिपक खांबित :-**

प्राधिकरणाच्या परमिशनमध्ये होऊ शकते.

**जयंतीलाल पाटील :-**

याच्यामध्ये लोकांची दिशाभूल होणार नाही ना.

**दिपक खांबित :-**

परमिशन आहे सी.आर.झेड चे प्राधिकरण.

**जयंतीलाल पाटील :-**

मग जे आपल्या अधिका-यांवर केस चालू आहेत ते अजूनपर्यंत क्लिअर होत नाही.

**दिपक खांबित :-**

प्राधिकरणाच्या परमिशनने होऊ शकतं.

**प्रविण पाटील :-**

साहेब प्राधिकरणाने परवानगी फेटाळलेली आहे ना. मज्जाव केलेला आहे असे तुम्ही गोषवा-यात दिलेले आहे आणि तुम्ही सांगत आहात होऊ शकते. नेमक काय आहे. गोषवा-यामध्ये तुम्ही वाचा काय लिहीलेले आहे.

**दिपक खांबित :-**

कांदळवण ५० मीटरपर्यंत नाही करु शकत.

**प्रविण पाटील :-**

मग ते २० मीटर पण नाही. ते कांदळवनातच आहे साहेब पासुन तर सोडा कांदळवनातच आहे. खांबित साहेब सांगतात की आम्ही तिथे परवानगी मागु.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो खांबित साहेब तुम्ही गोषवा-यामध्ये म्हणत आहात त्याठिकाणी होऊ शकत नाही. एकदा माईक वर सांगा तिथे होऊ शकत नाही. त्यांना ठराव करु द्या जो करायचा आहे. तुम्ही सांगा होऊ शकत का तुम्ही गोषवारा दिलेला आहे तिथे होऊ शकत नाही.

**दिपक खांबित :-**

कांदळवनामध्ये होऊ शकत नाही ना.

**अनिल सावंत :-**

होऊ शकत नाही मग त्यांना सांगा होऊ शकत नाही.

**स्नेहा पांडे :-**

खांबित साहब आपने गोषवारा में लिखा है की हो नही सकता। आप बोल रहे है की प्राधिकरण के परमिशन के बाद हो सकता है तो प्राधिकरण का परमिशन लेके आने के बाद विषय लाईए ना की यह परमिशन मिल चुका है। हम लोग दे सकते है।

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाची भुमिका स्पष्ट आहे होऊ शकत नाही. कशाला लोकांची दिशाभुल करता काय खरी परिस्थिती आहे ते सांगा साहेब. नविन डी.पी. तयार होतो आराखडा परत तयार करायला शासनाने तुम्हाला आदेश दिलेले आहेत. नविन आराखड्यामध्ये तशी प्रोव्हिजन तुम्ही करा. आणि त्यांना करुन द्या त्यांना करायची असेल तर ती ठोस भुमिका घ्या आणि ती खरी भुमिका आहे फक्त दिशाभुल करणारी भुमिका कशाला घेत आहेत.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम आपल्या त्या विभागातील म्हणजे विशेषतः नवघर परिसरातील आपले सुन्नी समाज, बोहरी समाज असु देत, मुस्लिम समाज असु देत त्यांचे देहावसान झाल्यानंतर त्यांची एवढी बिकट परिस्थिती असते आम्ही देखील स्वतः पाहिलेले आहे. कारण त्यांना जवळपास दफनभुमी कुठे उपलब्ध नाही. त्यासाठी वेस्ट किंवा मिरारोडला त्यांना विनंती करुन तिथे जागा मिळवावी लागते. त्यावेळी दोन दोन दिवस देखील त्यांच्या बॉडीज तिथे पडून राहिलेल्या आहेत. त्यांनी स्वतः देखील पाहिलेल्या आहेत आणि त्याच्यासाठी दफनभुमी होण फार गरजेचे आहे आणि हा गंभीर विषय आहे. परंतु वेळोवेळी कुठेतरी त्या समाजाची किंवा ह्या दफनभुमीच्या विषयासंदर्भात चेष्टा न होता गंभीरपणे आपण ह्या विषयावर ज्या ह्या प्रोसेस आहेत गोषवा-यामध्ये जी सगळी माहिती दिलेली आहे की त्या जागेची एवढी बिकट परिस्थिती आहे. सगळ्या गोष्टी म्हणजे नेगेटीव्ह सगळ असताना आपण त्याच जागेवर वारंवार चर्चा करणे फार चुकीचे आहे. आणि त्यामुळे मी मागच्या ही वेळी त्याच्यावर पर्याय सांगितला होता की ज्या परिसरात नवघर पट्याला आर.एम.पी. पार्क एरियामध्ये जास्तीत जास्त आपले मुस्लीम बांधव राहत असल्या कारणाने त्याच्या समोरच्या भागामध्ये बराच मोठा परिसर महानगरपालिकेची जागा बरीच मोठी तिथे आहे. आपण जर अशा ह्या वादग्रस्त याच्यात गुरफटून पडण्यापेक्षा जास्तीत जास्त लवकर त्यांना आपण जर सोय करुन द्यायची असेल मनापासून खरोखर त्या समाजाच्या पाठीशी उभे राहायचे असेल तर कृपया आपण तिथे असलेला भुखंड जो आहे आयुक्त साहेब आपल्या अधिकाराखाली आपण त्या संदर्भात विचार

करावा. आणि जास्तीत जास्त लवकर त्यांना दफनभुमीसाठी त्या एरियामध्ये जागा देण्यात यावी. कारण जे होणारच नाही त्याच्यावर फक्त चर्चा करणार. वेळोवेळी महासभेत विषय आणायचे आम्ही विषय आणला आणि तो शिवसेनेचे फेटाळला हे सगळे मॅसेज त्यांच्यापर्यंत जातात. आणि हे चुकीचे मॅसेज जाण्यापेक्षा आपणा सर्वांचा एकच उद्देश असला पाहिजे की त्या नागरिकांचे जे हाल होत आहेत. त्या बांधवांचे जे हाल होत आहेत त्याच्यावर एकच चांगला पर्याय काढून त्यांना लवकरात लवकर दफनभुमी देणे जस आपल्यासाठी हिंदु स्मशान भुमी आहेत बाकी ख्रिश्चनसाठी आहेत मला वाटतं काही माहिती आहे इथे आपले माजी महापौर देखील बसलेले आहेत. ह्याच परिसरात जे १२२ (ड) मध्ये त्या परिसरामध्ये ख्रिश्चन बांधवांनी देखील जागा मागितली होती. परंतु पालिकेने ती नाकारली होती. त्यावेळी नाकारली होती मागचा इतिहास सी.आर.झेड. बोलून अस जर असेल तर ह्या आपल्या मुस्लीम बांधवांना देखील झुलवत ठेवणे फार चुकीचे आहे. आणि कुठेतरी आम्ही तुमच्याकडे स्पॉट करणार आहे आम्ही तुमच्यासाठी काही तरी करतो हे दाखविण्यापेक्षा खरोखर त्यांना जे पाहिजे ते आपण करावे ही मी आपणाला विनंती करते. त्यांना लवकरात लवकर दफनभुमी त्यांच्या परिसरात उपलब्ध करुन द्यावी अशी मी आपणा सर्वांना विनंती करते.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मुस्लिम समाजाला दफनभुमी किती आवश्यक आहे याचा अर्थ सर्वानी सांगितला निलम ढवण मॅडमने सांगितले की २-२ दिवस प्रेत पडून असतं आणि त्यांना जागा मिळत नाही. आणि दरवर्षी हा मुद्दा निघतो. मागे जयंत पाटील साहेब उपमहापौर होते त्यावेळी पण हा मुद्दा निघाला होता. जर ही कळकळ त्यावेळी असती त्यावेळी आपली सत्ता होती. त्यावेळी आपण हे ३७ (ए) कडून ते शासनाकडून रिझर्व्हेशन चेंज करु शकलो असतो. परंतु रिझर्व्हेशन चेंज केले नाही. हे रिझर्व्हेशन १९९७ ला पडलं आणि रिझर्व्हेशन हे डेव्हलप करणे महापालिकेचे काम आहे. आणि ते आपण करतो. आपला प्रयत्न आहे आम्ही समाजाची दिशाभुल करत नाही. लोकांची दिशाभुल आम्ही अजिबात केलेली नाही. आमचे सरकार आल्यानंतर आमच्या मुख्यमंत्री साहेबांनी ही जागा महापालिकेला विना मोबदला हॅन्ड ओव्हर केली. एवढ मोठ काम केलं. मुख्यमंत्री साहेबांकडून आमदारांनी एवढी मोठी जागा विना मोबदला महापालिकेला मिळून दिली. आपण आरक्षण डेव्हलप करत आहोत. आम्ही कोणत्याही चुकीचा ठराव केलेला नाही. महापालिकेने रितसर व्यवस्थित गोषवारा दिलेला आहे. आम्ही आमच्या ठरावामध्ये आम्ही काय म्हटलेले आहे सगळे अधिकार आम्ही आयुक्तांना दिलेले आहेत आणि ॲड महापौर ॲड सत्ताधारी पक्ष प्रत्येक समाज आमच्या महापौरांकडे येतो. प्रत्येक समाज आमच्या आमदारांकडे येतो आणि सांगतो की आम्हाला ह्या-ह्या समस्यांचे निराकरण करा. आमचे काम आहे समस्यांचे निराकरण करणे हे आमचे काम आहे. सुन्नी मुस्लिम समाज आमच्याकडे आले आणि त्यांनी आमच्याकडे डिमांड केली आणि त्या डिमांडच उपयोग करणे हे काम आमचे आहे आणि हा प्रस्ताव महासभेपुढे आम्ही आणलेला आहे. आम्ही कोणत्याही सी.आर.झेड चे उल्लंघन करत नाही आणि कोणतेही कांदळवन काढत नाही. आम्ही मुस्लिम समाजाची दिशाभुल पण करत नाही. ज्यांना जो प्रॉब्लेम होतो तो प्रॉब्लेम सॉल्व्ह करण्याकरिता प्रयत्न करतो आणि म्हणून ह्या ठरावामध्ये आम्ही क्लिअर म्हटलेले आहे की जे-जे समाज आपल्याकडे दफनभुमीची मागणी करतात. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्यांना तिथे जागा उपलब्ध करुन द्या. जे आरक्षण आहे तेच करतो आणि तुम्हाला एवढी कळकळ आहे तर एन.एच. हायस्कूलच्या बाजूला पण ग्राऊंड आहे तिथे पण आपण दफनभुमी करु शकतो असे आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा की जे रियल आहे ते मांडलेले आहे आणि आम्ही आमच्या ठरावामध्ये एकमताने सर्व समाजासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार ठरवून देण्यासाठी मा. आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहे.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही बोललात आम्ही कुठल्याही प्रकारचे उल्लंघन केलेले नाही. साहेब तिथे सी.आर.झेड नाही का? तिथे मॅंग्रोज नाही का? आज तिथे मॅंग्रोज काढले गेले हे खोट आहे का? किती प्रकारे मॅंग्रोज होते. आमचे तिथे आयुष्य गेले.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम हा प्रश्न उत्तराचा तास नाही.

**प्रविण पाटील :-**

प्रश्नोत्तर नाही तुम्ही खोट बोलत आहात. मी बोलत नव्हतो तुम्ही बोलले म्हणून मी बोललो असतो. महापौर मॅडम तिथे मोठ्या प्रमाणात मॅंग्रोज होते तुम्ही गुगल सर्च करा. गेल्या १० वर्षापूर्वीचे १५ वर्षापूर्वीचे मॅंग्रोज होते की नाही तिथे बघा. कुठल्या प्रकारचे मॅंग्रोज नाही काढले तिकडे. काही तरी बोलायचं दिशाभूल करायची यांच्याकडे जशी मुस्लिम समाजाचे लोक येत होती आमच्याकडेही येत होती.

आम्ही त्यांना सांगितल पण जी गोष्ट होणार नाही ती आम्ही अशी त्यांना दिली. आमच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितल नाही त्याला खोट पत्र द्या.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने हा सी.आर.झेड एरिया आहे. पाणथळ एरिया आहे तिथे झाडांची कांदळवनाची कापणी होणार नाही का हे कम्पाऊंड वॉल करण्यासाठी मग पर्यावरणाचा समतोल काय होणार. तिकडे त्रास किती होणार आणि हे सी.आर.झेड एरियामध्ये कांदळवन कापणे वगैरे हे नाही करु शकत.

**प्रविण पाटील :-**

तिथे कांदळवन कापलेले आहे आणि महापालिकेच्या अधिका-यांवर गुन्हे दाखल आहेत.

**मर्लिन डिसा :-**

ही कांदळवन आपल्या शहराची लाईफ लाईन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सुरुवातीला हा विषय याच्यासाठी सभागृहामध्ये आला होता आणि तो बोहरी समाजाला सदरची जागा बोहरी समाजाला बोलवून घेतलं नंतर सुन्नी समाजाला आमच्यामध्ये छोटे छोटे पंथ समाज आहेत. सुन्नी समाजाला बोलवून घेतलं बोहरा, शिया, खोजा, इस्माईल त्यांनाही बोलावून घ्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मी ठरावामध्ये काय म्हटलं होत बघा सर्व समाजासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार ठरवून देण्यासाठी मा. आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहेत. सुन्नी आला, बोहरी आले सगळे आलें.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ठराव केला चांगली गोष्ट आहे. तुम्ही चांगला ठराव करता कदाचित तुमची नितीमत्ता चांगली नाही. तुम्हाला ते द्यायचे नाही आहे आणि हा तुम्ही ठराव असा केला असता की नविन आरक्षणाची दुसरी जागा ह्या समाजासाठी भाईंदर ईस्टमध्ये पुर्वमध्ये तुम्ही दुसरी जागा दफनभुमीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी अशाप्रकारे तुम्ही ठराव केला असता शासनाकडे पाठवला असता तर आम्हाला खरोखर मनापासून आनंद झाला असता. तुमचे अभिनंदन केले असते. महापौर मॅडम प्रशासन एका बाजूला आपली भुमिका स्पष्ट ठेवते की हे आपल्याला करता येत नाही आणि करता येत नाही ही स्पष्ट भुमिका प्रशासनाची आहे. प्रशासनाच्या वरती तुम्ही नाही. तुम्ही फक्त भुमिका मांडू शकता म्हणून तुम्हाला मांडायची असेल तर योग्य भुमिका मांडा की आम्हाला द्यायची आमची किती आमची नियत आहे देण्याची. तुम्हाला देण्याची किती आहे म्हणून हे आरक्षण दुस-या बाजूने आम्ही स्थलांतरीत करतो. शासनाकडे त्यांची मांग करु शकता. फक्त आणि फक्त एका समाजाची दिशाभुल करण्यासाठी आणि अशा विषयासाठी ते दफनभुमी म्हणजे याचा अर्थ माणूस मेल्यानंतर त्याची विल्हेवाट लावायची आहे. त्याला एक तास त्या लोकांच्या मध्ये ज्या विषयावर त्याची भावना काय असेल त्याच्या भावनांशी खेळ करण्याचा विषय आहे. हा खेळ नाही तर काय आहे. आणि ही राजकीय खेळी खेळत आहात तुम्ही. म्हणून महापौर मॅडम आमची आपल्याला विनंती आहे हा विषय खेराखरच करायचा असेल तर ही पध्दत बदला. आरक्षणाची मांग करा आरक्षण बदलण्याची मांग करा.

**प्रविण पाटील :-**

ठराव आहे पण प्रशासनाच्या भुमिकेच्या विरोधात ठराव झालेला आहे. मगाशी आयुक्त ह्या विषयावर बोलले की ह्या ठिकाणी तस करता येते का ते मला सांगा. आणि उच्च न्यायालयाचे आदेश आहेत ती जागा रिस्टोअर करुन द्या म्हणून.........

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव मांडा ना.

**प्रविण पाटील :-**

आमचा ठराव आहे पण आम्हाला प्रशासनाची भुमिका तर समजू दे. प्रशासनाच्या भुमिकेचा विरोधात ठराव झालेला आहे.

**मा. महापौर :-**

आयुक्तांनी सांगितलं.

**प्रविण पाटील :-**

नाही सांगितलं. प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) नवघर येथे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. १२२ ड दफनभूमीसाठी राखीव क्षेत्र ४४१६१.०० चौ.मी. एवढे आहे. ह्या पूर्ण क्षेत्रावर गेल्या कित्येक वर्षापासून कांदळवन आहे. तसेच दि.

११/११/२००५ रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १५४ अन्वये पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये एम.एम.आर.नं.II ११०/०५ प्रमाणे तात्कालीन मंडळ अधिकारी श्री. परशुराम भोईर यांनी सदर जमिनीच्या क्षेत्रावर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कचरा महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे १) गणेश डेव्हलपर्स प्रोपायटर २) राजश्री इंटरप्रायजेस-नवाव शेख ३) गुडलक इंटरप्रायजेस प्रो. नवाब शेख ४) साई गणेश कन्स्ट्रक्शन प्रो. नसु मेंडेली ५) ॲपेक्स प्रो. सायमन अल्मेडा ६) संकल्प ट्रेडींग प्रो. रामपाल ७) आशापुरा कन्स्ट्रक्शन प्रो. नारायण सिंग यांच्यामार्फत वरील जागेवर कचरा टाकण्यात आला होता.

सदर जागेवर मँग्रोज (तिवरांच्या) झाडांचा ऱ्हास झाला व पर्यावरणास धोका निर्माण झाला आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका तत्कालीन आरोग्य विभागाचे प्रमुख (अजीज शेख) (उपायुक्त), आरोग्य विभाग प्रमुख राजकुमार कांबळे, निरीक्षक संदेश शिंदे, निळकंठ उदावंत, नितीन खैरे, प्रकाश पवार, अरविंद चाळके, अभय सोनावणे, कांतीलाल बांगर, गोविंद भोये व त्यांनी नेमलेले सात ठेकेदार यांच्यावर तलाठी सजा नवघर ता. ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील जुना सर्व्हे नं. २०९ नवीन सर्व्हे नं. १५ सरकारी जागेवर कचरा टाकला व कांदळवनाचा ऱ्हास केला म्हणून गुन्हा नोंद आहे.

त्याचप्रमाणे सदर जागेवर दफनभूमी मंजूरीचा प्रस्ताव आज महासभेत येत असताना तसेच आजतागायत कोणत्याही प्रकारची दफनभूमी अस्तित्वात नसताना देखील दि. २५ फेब्रुवारी २०१३ रोजी मनपाने महाराष्ट्र कोस्टल झोन मेनेजमेंट मंचरेटीकडे सदर दफनभूमीची रिपेरिंगची परवानगी घेतली आहे. तरी महानगरपालिका अधिकाऱ्याने त्यावेळी खोटी माहिती दिलेली असल्याने व MCZA ची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील बाबीचा विचार केला असता सदर जागेवर दफनभूमी मंजूर करणे बेकायदेशीर होणार असून मा. आयुक्तांच्या मार्फत ह्या प्रकरणाची चौकशी करुन बोहरा समाज व सुन्नी समाजास कोणत्याही प्रकारचा वाद नसलेली जागा उपलब्ध करुन देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

ह्या ठरावाला माझी सुचना आहे की वेळोवेळी प्रशासन किंवा शासन यांची मान्यता नसताना देखील तिथला सी.आर.झेड आणि कांदळवनाचा ऱ्हास झालेला असताना त्याच्या विरोधात जो ठराव केलेला आहे त्या ठरावामध्ये कांदळवनाचा ऱ्हास आणि उच्च न्यायालयाच्या ओदश आहेत की त्यामध्ये पुर्नरिस्टोअर करावे तर अशा विरोधात ते सत्ताधारी ठराव करत आहेत. तर त्याच्यावर देखील पूर्ण विचार करुन तो कांदळवनाचा ऱ्हास न करता ती पूर्ण रिस्टोअर जे आहे मँग्रोज वगैरे आहेत ते रिस्टोअर करण्यांत यावे आणि त्यानंतर न्यायालयाचा आणि शासनाचा मान आपण राखण्यात यावा आणि नविन चांगली जागा आपण लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी अशी मी सुचना मांडत आहे.

**वंदना पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०७ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. शानु गोहिल, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया, दुसरा ठराव आहे सुचक श्री. प्रविण पाटील, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. ह्या ठरावात सुचना श्रीम. निलम ढवण. अनुमोदन श्रीम. वंदना पाटील. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. प्रविण पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. शानु गोहिल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. शानु गोहिल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५१, विरोधात १८, तटस्थ १० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. शानु गोहिल यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ०७ :-

भाईंदर (पूर्व) नवघर येथील विकास योजनेतील आरक्षण क्र . १२२ड या दफनभूमी आरक्षणातील जागा सुन्नी या मुस्लिम समाजास देण्याबाबत.

ठराव क्र. :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पूर्व नवघर येथे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. 122 ड दफनभूमीसाठी राखीव आहे . सदर आरक्षणाच्या जागेचे क्षेत्र 44616.00 चौ.मीटर एवढे आहे. त्यापैकी 33229.00 चौ.मीटर क्षेत्रावर कांदळवन आहे . उर्वरीत 11395 चौ.मीटर क्षेत्र असून त्यापैकी 3420 चौ.मीटर क्षेत्रावर झोपड्या आहेत . सन 2003 मध्ये बंदरवाडी येथील रेल्वेच्या जागेवरील झोपड्या तोडल्या असून सदर झोपड्या धारक 2003 पासून आरक्षण के. 122 ड या दफन भूमीच्या जागेवर आहेत . दफनभूमीची जागा यापूर्वी शासनाची होती , त्यामुळे सदर झोपड्या काढून जागा रिकामी करुन देण्यासाठी मा .जिल्हाधिकारी ठाणे यांना सातत्याने पत्रव्यवहार करण्यात येत होता. दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशाने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर आरक्षण क्र .122 ड दफनभूमीच्या एकूण जागेपैकी 3 हेक्टर जागा आरक्षणाच्या विकास करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग केलेली आहे . आरक्षणाच्या जागेवरील झोपड्या महानगरपालिकेस हटवाव्या लागणार आहेत.

आरक्षण क्र .122 ड या ठिकाणी सद्यस्थितीत 7975 चौ.मीटर जागा मोकळी असून मा . महासभा दि .08/12/2017 ठराव क्र .40 अन्वये सदर जागेपैकी काही भाग बोहरा समाजाच्या दफनभूमीसाठी देण्यास मंजुरी दिलेली आहे.

मा. महापौर यांनी दि .08/03/2018 रोजी पत्र देऊन सदर आरक्षणाच्या जागेतील काही भाग मुस्लीम सुन्नी समाजाला देण्यासाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव देण्यासाठी कळविलेले आहे. मा. महापौर यांच्याकडे सदर जागेसाठी महाराष्ट्र मिल्लते इस्लामिया अरबी स्कूल या संस्थेने मागणी केलेली आहे. सदर जागा ही सीआरझेड ने बाधित होत असून सदर प्राधिकरणाने कांदळवनापा सून 50 मीटरच्या अंतरापर्यंत कोणतेही काम करण्यास मज्जाव केला आहे . तसेच पक्के काँक्रिटचे कुंपण घालण्यास देखील मनाई केलेली आहे वरील वस्तुस्थिती मा. महासभेपूढे सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र. :-

आरक्षण क्र .122ड दफन भुमीची जागा सर्व समाजासाठी त्यांच्या लो कसंख्येनुसार ठरवून देण्यासाठी मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहे. प्रस्तावात नमुद सुन्नी समाजास दफनासाठी जागा देण्यास मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | १) शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | २) मेहरा राजीव ओमप्रकाश |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३) सावंत अनिल दिवाकर |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीशचंद्र | ४) इनामदार जुबेर अब्दुल्ला |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | ५) शेख रुबीना फिरोझ |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | ६) डिसा मर्लिन मर्विन |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | ७) सपार उमा विश्वनाथ |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | कदम अर्चना अरुण | ८) परदेशी गिता हरीश |
| ९ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ९ | पांडे स्नेहा शैलेश | ९) पाटील नरेश तुकाराम |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | गोविंद हेलन जॉर्जी | १०) अहमद साराह अकरम |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | भट दीप्ती शेखर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | भोईर भावना राजू | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | पाटील धनेश परशुराम | |
| १४ | सोंस नीला बर्नाड | १४ | पाटील वंदना विकास | |
| १५ | रावल मेघना दिपक | १५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १६ | मोकाशी दिपाली आनंदराव | १६ | भोईर कमलेश यशवंत | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १८ | अरोरा दीपिका पंकज | १८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १९ | नाईक विविता विवेक | | | |
| २० | भावसार वंदना संजय | | | |
| २१ | बेलानी हेमा राजेश | | | |
| २२ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| २३ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २४ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २५ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २७ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २९ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३२ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३३ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३४ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३५ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३८ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३९ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४० | थेराडे संजय अनंत | | | |
| ४१ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४२ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४३ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४५ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४६ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४७ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४८ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४९ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५० | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, **मिरारोड येथील आरक्षण क्र. २१२ ए हॉली क्रॉस शाळेला भाड्याने दिलेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

**मिरा भाईंदर महापालिकेच्या मौजे मिरारोड येथील ताब्यात असलेल्या आरक्षण क्र. 212 ए हा भुखंड खाजगी संस्थेच्या हॉलीक्रॉस शाळेला दिल्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे . हॉलीक्रॉस शाळेला भुखंड देताना संबधित अधिका -याने आपल्या पदाचा गैरवापर करुन सदर खाजगी संस्थेला लाभ पोहोचवण्याच्या दृष्टीने विषय केलेला आहे . म्हणून सदर बाबत सर्व पदाधिकारी यांची मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत येत असून सदर समितीला नगररचना विभागाने सविस्तर माहिती द्यायची आहे . व सदर समितीने निर्णय घेऊन महासभेपुढे सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम मला एक विचारायचे आहे की हा आता विषय आणलेला आहे हा विषय १० वर्षानंतर आलेला आहे. तर तेव्हा केलेला निर्णय म्हणजे त्या अधिका-याने बरोबर केल नाही होत का हे डिस्कस झालेले नव्हते. महाराष्ट्र शासनाने ही जागा दिलेली होती तर मग हा विषय कशासाठी आणलेला आहे?

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम मिरारोड येथील जे आरक्षण आहे हे आरक्षण शाळा समुचीत विकास आरक्षणामध्ये ते होते आणि त्यावेळी जे दिलं त्यावेळी तत्कालीन आयुक्त यांनी स्वतःहून हा विषय केला. स्वतःहून हा विषय घेतला होता. महासभेला याची काय मंजुरी घेतली नव्हती आणि याच्यापुढे आणल पण नव्हते आणि अशा अनेक संस्था आहेत त्यांचे आरक्षण आहेत जस आता जे.एच. पोद्दार हायस्कुल भाईंदर वेस्टला आहे. त्याच्या बाजूला पण जी जागा आहे ती पण त्या स्कुल अटॅच आहे. वेलंकनी हायस्कूल पण एक शाळा आहे. त्याच्या बाजूला पण ते संकुलीत आरक्षण रिझर्व्ह केलेले आहे. अशा संस्थेला अजुन दिलेले नाही आणि ह्या संस्थेला दिलेले आहे याच्यामध्ये काहीतरी थोडासा घोळ झाला असे आढळून आलेले आहे. म्हणून महासभेपूढे आमची मागणी होती. सगळ्या पदाधिका-यांची एक बैठक घेऊन सविस्तर नगररचनाकार विभागाने माहिती सादर करावी हा प्लान कसा मंजुर झाला आणि याची काय कागदपत्र होती आणि त्यांची काय डिमांड होती. त्याच्याकडून आपण कशाप्रकारे पैसे घेतले आणि जी अमाऊंट ठरवलेली आहे ती कशी ठरवलेली आहे. ह्या सगळ्यांसाठी आपण त्याच्यांकडून डिमांड केलेली होती. त्यांनी दिल नाही म्हणून आपण ठराव केला की नगररचना विभागाने कंम्प्लीट याची फाईल आहे ती सगळ्या पदाधिका-यांसमोर सांगावी आणि पदाधिका-यांनी निर्णय घ्यावा. आणि त्यानुसार पुन्हा हे महासभेपुढे येणार आहे.

**मर्लिन डिसा :-**

पण हा तेव्हा घेतलेला निर्णय चुकीचा होता का? हे २१२ (ए) रिझर्व्हेशन डी.पी. प्लानमध्ये आहे. मला अधिका-यांकडून एक्सप्लेनेशन पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

मॅडम मी तुम्हाला सांगतो ह्या प्रकरणात टी.डी.आर विकत घेतला त्यांनी टी.डी.आर घेतला महापालिकेकडून आणि जागा महापालिकेला हस्तांतरीत केली त्यानंतर अवघ्या ३० लाख रुपयांमध्ये एक फ्लॅट तेव्हा ३० लाखात पण येत नव्हता. त्यावेळेला एवढा मोठा प्लॉट महापालिकेच्या ताब्यातला संबंधीत अधिका-याने त्यांना परस्पर दिला. आणि अशा अनियमितता ह्या शहरामध्ये इतर लोक करुन घेणार आहेत. ह्या विषयामध्ये सविस्तर पण आता जो ठराव केला तुम्ही तो ऐकला असेल. त्याच्यात गटनेत्यांची आणि महापालिकेचे जे सर्व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आहेत त्यांच्याबरोबर ह्या विषयात समितीची चर्चा होणार आहे आणि ह्या अनियमिततेचा फायदा इतर लोकांनी घेऊ नये किंवा इतर ठिकाणी सेम पोझिशन आहे.

**मर्लिन डिसा :-**

पण हे जे दिलेले आहे हे शासनामार्फत दिलेले आहे. पत्रव्यवहार शासनाकडून झालेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा विषय महासभेपुढे पण आला नाही.

**मर्लिन डिसा :-**

पण याला गरज आहे का महासभेसमोर यायची? जेव्हा महाराष्ट्र शासनाने लिहीलेले आहे ही जागा प्ले ग्राऊंड २१२ (ए) होली क्रॉस प्ले ग्राऊंड रिर्झव्हेशन असे आहे. आपल्या डी.पी. प्लॅनमध्ये मग हे जनरल बॉडी समोर आणणे जरुरी आहे का?

**मा. उपमहापौर :-**

महासभेसमोर आणणे गरजेचे होतं ही ह्या शहरातली अनियमितता आहे.

**मर्लिन डिसा :-**

मला जरा अधिकाऱ्याने खुलासा करावा. ह्या प्रकरणाचा जरा खुलासा करु द्या ना.

**मा. महापौर :-**

मी बोलवते.

**जुबेर इनामदार :-**

आरक्षणाचा जो विषय आहे शाळा जी अस्तित्वात आली ती १९९२ साली आणि आपले जे आरक्षण टाकले ते १९९७ साली १९९७ साली आपले आरक्षण आपला आराखडा मंजुर झाला. आपण तो मंजुरीसाठी पाठवला. तो आला २००० साली मंजुर होऊन तो १९९७ साली पूर्ण केला. आपला आराखडा त्याच्या आधी पाच वर्षासाठी ही शाळा देण्यात आली होती.

**मा. उपमहापौर :-**

ती शाळेविषयी टाकलेला नव्हता. त्यांना जागा दुसऱ्या विषयात दिली.

**जुबेर इनामदार :-**

जो क्षेत्र होता तेव्हा तो त्यांनी दिला होता. ३ हजार २५ चौ. मीटरचा आहे. खरोखर अशाप्रमाणे निर्णय चौकशी किंवा चर्चा गरजेची होती. तर महासभेसमोर तो गोषवारा त्या पध्दतीने आला पाहिजे होता. ठिक आहे समिती गठीत करायची असेल तर ठरावामध्ये तस नमुद करा. पदाधिकारी व गटनेता ठरावामध्ये तस नमुद नाही सर्व पक्षीय गटनेत्यांच्या समोर हा विषय येईल किंवा पदाधिकाऱ्यांच्या त्याच्यामध्ये उल्लेख करण्यांत आलेला आहे त्या ठरावामध्ये.

**मर्लिन डिसा :-**

शाळेला २७-२८ वर्ष होत आहेत आणि आता तुम्ही हा विषय आणलेला आहे. हा कशामुळे आणलेला आहे. मॅडम अधिकाऱ्याला एक्सप्लेन करायला सांगा.

**जुबेर इनामदार :-**

नगररचनेच्या अधिकाऱ्याला बोलवा.

**मर्लिन डिसा :-**

ज्या शाळांनी चुकीच्या रिझर्व्हेशनवर शाळा बांधलेली आहे मग त्यांच्यावर पण अस काही तरी प्रकरण तुम्ही महासभेमध्ये आणायला पाहिजे. दुसऱ्या शाळा पण आहेत. सेव्हन स्क्वेअर ॲकेडमी आहे, टेक्नीकल कॉलेजच्या रिझर्व्हेशनवर शाळा बांधलेली आहे.

**नगररचनाकार :-**

मा. महापौरांच्या अनुमतीने बोलतो, मिरा भाईंदरच्या डेव्हलपमेंट प्लानमध्ये २१२ (अ) हा एक्सटेन्शन टू स्कुल अस हे आरक्षण होतं आणि त्याची अप्रोप्रिएट ऑथोरिटी सुमुचित प्राधिकरण ही होली क्रॉस शाळा होती. सदरचे आरक्षण हे ३०२५ चौरस मीटरचे होते. हे आरक्षण महापालिकेने टी.डी.आर मार्फत अक्वायर केलेले होते आणि त्यावेळीच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी मा. उपसंचालक यांच्या सल्याने १०/१०/२००२ च्या पत्रान्वये त्याच्या किंमतीनुसार ते शाळेला शाळेच्या वापरासाठी दिल्याचे उपलब्ध कागदपत्र आहेत. त्यावरुन ते दिसुन येते. आपल्या टी.डी.आर. च्या रुल्समध्ये सेक्शन १८ जो आहे. त्यामध्ये त्याबाबत नमुद केलेले आहे. आज जी माझ्याकडे उपलब्ध माहिती आहे ती उपसंचालक यांच्या मान्यतेने दिल्याचे पत्र ह्यामध्ये आढळून आलेले आहे आणि त्यामध्ये ३.२५ लक्ष किंमत भरण्याचे शाळेला कळविल्याचेही पत्र मला आढळून येत आहे. आणि हे सर्व प्रकरण या पत्रावरुन उपसंचालकाच्या मान्यतेने झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

काही अनियमितता झालेली आहे का याच्यामध्ये.

**नगररचनाकार :-**

माझ्याकडे त्या पत्राचा नमुना आणि पत्र हे मिळालेले आहे. ह्या टी.डी.आर चा क्लास पत्र पाहिल्यानंतर सकृतदर्शनी मला त्या पत्राप्रमाणे कारवाई झाल्याचे दिसुन येते.

**जुबेर इनामदार :-**

आता ह्या सभागृहामध्ये आरोप झाले. अनियमितता अधिकाऱ्यांनी चुकीच्या पध्दतीने दिले असं काही तरी केले म्हणून विचारत आहे.

**नगररचनाकार :-**

टी.डी.आर आपण विकत घेतो आणि टी.डी.आर चे पैसे भरुन घेऊन आपण अप्रोप्रिएट प्रकरण देण्यात काही............

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही जितकी माहिती आता दिली. त्याच्यामध्ये अनियमितता कुठे काही दिसुन येत नाही.

**नगररचनाकार :-**

प्रथमदर्शनी तरी काही दिसुन येत नाही आणि किंमती बाबतचा प्रश्न असेल तर अजुन ही तो संचालक यांचे मार्गदर्शन.

**मर्लिन डिसा :-**

उपसंचालकाने त्यांच्या पत्राद्वारे दिलेले आहे.

**नगररचनाकार :-**

उपसंचालकाच्या पत्राचा उल्लेख त्यामध्ये आहे.

**मर्लिन डिसा :-**

ते मी पण वाचलेले आहे. हे मी २००७ पासून फॉलो अप करत होती. मला तेव्हा काही चुकीच दिसत नाही. पण आता कसा एकदम २७-२८ वर्षानंतर चुकीच झालं म्हणून विषय निघाला. सर याच्यात काही चुकीचं आहे का?

**नगररचनाकार :-**

त्यावेळी त्या नियमाप्रमाणे झालेले आहे. सर्व कागदपत्रे आहेत.

**मर्लिन डिसा :-**

सर्व नियमाप्रमाणे झालेले आहे ना..................

**नगररचनाकार :-**

किंमतीच्या बाबत असेल तर...............

**जुबेर इनामदार :-**

साहेब थोडक्यात १९९२ साली ही शाळा अस्तित्वात आली. आरक्षण आपले १९९७ साली पडली ही जागा लॅन्ड इन यूज हा एक मोठा त्याच्यातला भाग आहे. आराखडा तयार करतात तेव्हा ही लॅन्डींग यूज च्या आधारावर याला शाळेचे आरक्षण टाकण्यात आले. शाळा प्लस त्याची असलेली जागा मोकळी जागा मग हा विषय परत का आला. तो लॅन्ड इन यूजच्या आधारावर झाला असेल.

**नगररचनाकार :-**

तो विषय परत का आला याच्यावर मी..................

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला सांगणे कठिण आहे तुम्ही का आणले नाही.

**नगररचनाकार :-**

२००२ ला ते पत्र आलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मागणी महापौरांनी केलेली आहे त्याचे विश्लेषण.

**नगररचनाकार :-**

२००८ ला आम्ही ती हॅन्ड ओव्हर केलेली आहे. २०११ ला नकाशा मंजुरी झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

खरतर सत्ताधाऱ्यांना काय त्यातुन करायचे आहे ते तरी स्पष्ट झाले पाहिजे.

**मर्लिन डिसा :-**

हा जो विषय आणलेला आहे याच्यामागे हेतु काय आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आपल्या शहरामध्ये बरेच काही असे भुखंड आहेत.

**मर्लिन डिसा :-**

धृवजी याच्यामागे काही हेतु आहे का? का ती शाळा आहे म्हणून त्यांना त्रास द्यायचा असे काही प्रकरण आहे का?

**नगररचनाकार :-**

किंमतीबाबत म्हणत असाल तर त्याला परत.........

**मर्लिन डिसा :-**

जातीवाद करायचा आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

तुमचं प्रथम दर्शनी जो अहवाल तुम्ही मांडला नंतर तुम्ही पुन्हा बोललात त्या दोघांमध्ये तुमची विपरीत भावना आहे.

**मर्लिन डिसा :-**

धृवकिशोरजी ऐसे तो कितने स्कुल है मिरा भाईंदर में। सी.आर.झेड का भी उल्लंघन करके यह लोग बांध रहे है।

**धृवकिशोर पाटील :-**

यह जो विषय है वह होली क्रॉस स्कुल का है। उसके बारे में बात करेंगे अभी देशमुख साहबने जो बोला पहिले बोला की मुझे ऐसा लगा की, जो लेटर है उस लेटर से बराबर है। फिर वापस से बोला की मुझे पुरा फाईल चेक करना पडेगा। चेक करने के बाद में बोलता हूँ। मग साहेब हे तुम्ही चुकीचे डिसीजन देऊ नका. तुम्ही स्वतः तुमच्याकडे दोन महापालिकेचा चार्ज आहे. मिरा भाईंदरमध्ये तुम्ही कमी असतात आणि ठाण्याला जास्त असतात. तुम्हाला ठाण्याला प्रभारी चार्ज दिलेला आहे तुम्ही ठाण्याला जास्त असतात. मिरा भाईंदरला कमी असतात साहेब. विषय असा आहे की हा जो गोषवारा आहे आणि हा जो विषय आहे. हा गेल्या जवळ-जवळ १०-१५ दिवसांपूर्वी प्रशासनाने आम्हाला दिलेला आहे. तुम्ही याची संपूर्ण माहिती घेतली पाहिजे होती. तुम्ही संपूर्ण रितसर ह्या गोषवाऱ्यामध्ये नमुद केलं पाहिजे होते की याच्यामध्ये किती अनियमितता आहे. किती नियमितता आहे. तुम्ही तस काही केलेले नाही. तुम्ही फक्त आम्हाला सांगितले की सुधारित नकाशा मंजुरीसह सुधारीत बांधकाम परवानगी निर्गमित केलेली आहे. सदरचे रिमार्क शाळेचा वापर सुरु आहे. त्यांनी बांधकाम पूर्ण केल की नाही त्यांनी ओ.सी. घेतली की नाही, त्याने किती इललिगल बांधलेले आहे. त्याचा काही तुम्ही खुलासा केला नाही आणि ही संपूर्ण फाईल सुध्दा तुम्ही चेक करायला पाहिजे होती. तुम्ही संपूर्ण याचा अभ्यास करायला पाहिजे होता. पण तुम्ही तसा अभ्यास केल्याचे दिसुन येत नाही. म्हणून आम्ही तो ठराव मांडला आहे की आम्हाला अस कळतच की याच्यामध्ये काही तरी अनियमितता झालेली आहे. म्हणून ही फाईल पुन्हा तपासा आणि पुन्हा सर्व पदाधिकाऱ्यांना समोर आणा. ते जे निर्णय घेतील ते महासभेत आम्ही आणतो आणि पुन्हा चर्चा होईल की असं नाही आहे पदाधिकारी तो डिसीजन घेणार तो डिसीजन फाईनल आहे. तो पुन्हा महासभेला चर्चेला येणार आहे. तर देशमुख साहेब माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही तुमचे वाक्य बदलुन टाका. जे एकदम बोलत आहेत ते एकदम फॉर्मला आणि त्याला लास्टपर्यंत ठेवा की ह्या फाईलच अजुन तुम्हाला संपूर्ण अभ्यास तुम्ही केलेला नाही. अजुन तुम्हाला सगळे कागदपत्र बघायचे बाकी आहेत. त्याच्यामुळे थोडस जल्दबाजीने हा डिसीजन घेतला जाऊ नये आणि परत अगोदर डिसीजन घेणार आणि परत................

**मर्लिन डिसा :-**

डिसिजन त्यांनी नाही घेतला ते नविन आलेले आहेत. ते कसे डिसीजन घेणार. माझी तुमच्याकडे रिक्वेस्ट आहे की मिरा भाईंदरच्या जेवढ्या शाळा आहेत जेवढ्या पण एलिगेशन इन्स्टीट्युट आहेत ह्या सगळ्याची तुम्ही महासभेत आणा. सगळ्या कॉलेज व सगळ्या शाळांचे आणा.

**धृवकिशोर पाटील :-**

हे होली क्रॉस शाळेचे आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलतो अशा किती फाईल शहरातल्या ओपन करणार आहोत. शाळा आहेत, हॉटेल्स आहेत, इमारती आहेत, हॉस्पीटल आहेत. बरोबर बोलले साहेब किती फाईल ओपन करणार आहात. आज जवळ जवळ ३० वर्ष क्लब आहेत. नविन क्लब बनत आहेत.

**मर्लिन डिसा :-**

सी.आर.झेड मध्ये बांधत आहेत.

**मा. महापौर :-**

तुम्ही होली क्रॉसवरच बोला.

**अनिल सावंत :-**

३० वर्ष आज ही होली क्रॉस कॉन्हवेन्ट स्कुल ३० वर्ष मिरारोडमध्ये ही शाळा आहे. एक चांगली संस्था मिशनरी संस्था ही चालवत आहे. १०० टक्के रिझर्ल्ट असतो. इतर शाळांच्या बाबतीत जर कम्पॅरिजन केलं तर यांची फी ५० टक्के आहे. त्यापेक्षा कमी आहे. मग आज ह्या शाळेला पहिल्यांदा मी हा विषय असा ऐकला की आरक्षणाच्या बदल्यात पालिकेला काहीतरी पैसे मिळालेत. २००२ साली ३० लाख रुपये पालिकेला मिळाले आहेत. ह्या आरक्षणाच्या बदल्यात.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही जी माहिती सादर करत आहेत किंवा ज्या माहितीच्या आधारे बोलत आहात ते मुळात चुकीचे आहे. २००२ चा इफेक्ट देऊन २०१० साली पेमेन्ट केलेले आहे. ताबा पावती आहे.

**मर्लिन डिसा :-**

सर २००८ साली सर्व कागदपत्रे मी फॉलो अप केलेले आहेत.

**मा. उपमहापौर :-**

२००२ साली नाही केलं. २००२ च्या आत कायद्याचा आधार घेतला आहे. ते निट वाचा.

**अनिल सावंत :-**

साहेब गोषवारा चुकीचा आहे असे म्हणायचे आहे का?

**मा. उपमहापौर :-**

२००२ च्या कायद्याचा आधार घेतला आहे. २००२ साली पेमेन्ट नाही केल.

**मर्लिन डिसा :-**

२००२ पासून शासनाकडे पत्रव्यवहार चालु होता आणि पालिकेकडे तेव्हा मेयर मायरा मॅडम पण होत्या.

**अनिल सावंत :-**

२००२ साली मार्केट रेट ठरला गेला. त्यानंतर शासनाच्या परवानगीने त्यांच्या जवळून मोबदला घेऊन त्यांना ती शाळा दिलेली आहे. आज ३० वर्ष त्या ठिकाणी ग्राऊंड आहे.

**मा. उपमहापौर :-**

सातबाऱ्यात २० वर्ष पूर्ण झालेले आहेत. २०११ ला परवानगी दिलेली आहे. त्या गोष्टीला आता फक्त ८ वर्ष पूर्ण झालेली आहेत.

**अनिल सावंत :-**

पण त्याचा वापर सुरु आहे.

**मर्लिन डिसा :-**

सर १० वर्ष झालेली आहेत.

**मा. उपमहापौर :-**

शाळेचे आम्ही बोलत नाही. शाळेचा जो प्लॉट दिलेला आहे त्याचे बोलत आहे.

**मर्लिन डिसा :-**

शाळेसाठी प्ले ग्राऊंड दिलेले आहे. २००८ मध्ये दिलेले आहे. सर मी तुम्हाला पूर्ण हिस्ट्री सांगते. १९९० मध्ये मी गेली होती. प्रत्येक सर्व्हे करायला कॅथलिक फॅमिली किती आहे म्हणून आमचे आर्च बिशप परमिशन पाहिजे होती. कॅथलिक शाळा सुरु करण्यासाठी मिरारोडमध्ये कॅथलिक फॅमिलीचे मी सर्व केलेले होते आणि नाझरेथ चर्च ती पूर्ण शाळेसाठी प्लॉट दिलेला आहे. विकत घेतलेले आहे. एक बाजू चर्च बांधलेला आहे एका बाजुला शाळा बांधलेली आहे. आणि तो चर्च १९९२ मध्ये विदाऊट फंड सिस्टर जोहन्ना ब्रॅन्ड स्टाटर होत्या. शाळा बांधण्यासाठी त्यांच्या परिवाराने मदत केलेली आहे. इकडचे स्थानिकांनी मदत केली नव्हती. फाईनान्शीयल होप कोणी दिले नव्हते आणि ती एवढी मोठी शाळा बांधलेली आहे. गेल्या २० वर्षापासून ३००-४०० झोपडपट्टींची मुलं ओपन स्कुलसाठी येतात तुम्ही एकदा तरी जाऊन बघा एक पैसा नाही घेत त्यांच्याकडून. फ्री शिक्षण घेत आहेत. ह्या तुम्ही शाळेचे कधी कौतुक केलेले आहे का? तुम्ही तिकडे जाऊन पाहिलेले आहे का आज फक्त तुम्ही पैशाचे बोलतात शासनाने एक रुपया त्यांना प्लॉट देऊ द्या. हे काही कमर्शियलसाठी नाही. मुलांना खेळण्यासाठी प्ले ग्राऊंड आहे. तिकडे काही कन्स्ट्रक्शन केलेले नाही. ख्रिश्चन कम्युनिटीच्या विरोधात तुम्ही काही मोर्चा काढलेला आहे का?

**मा. महापौर :-**

मॅडम ऐसा कुछ भी नही है।

**मर्लिन डिसा :-**

लेकिन बुरा लग रहा है। जो संस्था एकदम लोगो को मदत कर रही है वहाँ पे जो बच्चे अनाथ है, रेग्युलर स्कुल में जो पढ रहे है। उनको भी फिज माफ की जाती है। अच्छे काम हो रहे है। वह भी जरा देखो ना।

**मा. महापौर :-**

उधर किसी नगरसेवक का भी ॲडमिशन नही लेते है।

**मा. उपमहापौर :-**

अनाथ मुले तिथे नाहीत हा काही धार्मिक विषय तुम्ही करु नका.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

महानगरपालिकेची जागा वाचवा. टेक्नीकल स्कूलमध्ये प्रायमरी स्कूल चालू आहेत. ते बंद करणार का?

**मा. उपमहापौर :-**

कायदेशीर जे काही आहे तसेच होणार आहे.

**अनिल सावंत :-**

मग इथे कायदेशीर मग महासभेमध्ये विषय आणतात आणि म्हणता आम्ही समाजाच्या विरोधात नाही. मग हे काय आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा. नाही तर आमचा ठराव पास होऊ द्या.

**अनिल सावंत :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा नाही तर आम्ही ब्लॅकमेल करायला मोकळे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम हा शाळेचा विषय आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये हा इतिहास आहे. अनेक शाळा कायदेशीर की बेकायदेशीर अनेक शाळा बेकायदेशीरच होत्या. त्याच्यातून हे मिरा भाईंदर शहर किंवा विद्यार्थी घडलेले आहेत. वेळोवेळी त्या शाळेला वेळोवेळी लोकांनी प्रोटेक्शन दिले. अनेकांची मुल शिकली हा विषय खरा आहे. त्यात कोणाचे दुमत असता कामा नये. आणि ह्या सभागृहामध्ये हा जो विषय आलेला आहे आतापर्यंत समिती महापौरांच्या समोर समिती नेऊन रिपोर्ट बनवायचा आहे. माझे सभागृहाच्या सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे मा. आयुक्तांनाही विनंती आहे. संबंधित अधिकारी असतील खरी भुमिका जी आहे ती तुम्ही मांडा. नाही तर एकेवेळी एकेकांनी व्यक्तिगत ते घेतलं. ते उगाच आपण कबरी खोदत राहू हा शाळेचा विषय आहे. सगळ्याच शाळांना ह्या सभागृहाची अशी भुमिका असली पाहिजे की कदाचित एखादी बाजू कमी जास्त असेल तर त्यातून समजून घेऊन त्या शाळेला आपण सहकार्य करुया अशी सभागृहाची भुमिका असली पाहिजे. पण याचा अर्थ कोण ते नियमबाह्य आहे त्याचा पण पुरस्कार करतो. अशातला नाही जो विषय असेल ज्या दिवशी समिती होईल त्या समितीची बैठक लावा. समितीच्या समोर मा. आयुक्त साहेब आपण संबंधीतांना निट निर्देश द्या किंवा एक कागद परिपूर्ण असावे. त्याचवेळी आपले संस्थांनाही संधी देता येईल. तुमच्याकडे कसले कागद असतील ते करा आणि समन्वयाने याच्यातून तोडगा काढू या. हा जागतिक समाजाचा एक विभागाचा विषय बोलू नये ही माझी नम्र विनंती आहे.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम फक्त होली क्रॉस शाळा नाही, मिरा भाईंदरच्या जेवढ्या शाळा कॉलेजेस आहेत सगळयांसाठी करा आणि शाळा जर येत असतील तर मग हे लॉजिंग बोर्डिंग, हॉटेल, हॉस्पीटल जे पण कमर्शियल सेंटर आहेत. सगळ्यांचे घ्या तुम्ही अशी माझी सुचना आहे ठरावामध्ये.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब मेरी भी एक सुचना है की जब यह समिती बनेगी तो मिरा भाईंदर शहर में जितने स्कूल कॉलेज जो भी संस्था चल रही है। जिस तरह के सक्षम संस्था वो कितने लिगल है, कितने इललिगल है पुरी जानकारी के साथ अपने नगररचना विभाग से लेके फिर समिती में डिस्कस किया जाए और सभी स्कूल कॉलेज के लिए सेम रुल बनाए जाए।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आणखी काही दिवसांनी अस होईल मगाशी पतसंस्थेला प्रशासनाने सांगितले ३ लाख रुपये भाडे घ्या. तुम्ही ठराव केला आहे एक रुपयाला घ्या म्हणून आणखी दोन तीन वर्षांनी पुढच्या

टर्ममध्ये अस होईल की १५ मध्ये काहीतरी चुकीचे झाले आणि प्रशासनाने सांगितलं असेल की द्या की तीन लाख रुपये मोबदला एक रुपया भाड्यावरती संस्था दिली. इथे हा उपस्थित पैशाचाच प्रश्न. अशा गोष्टी घडणार आहेत. पुढे एकच उदाहरण कशाला. सर्व शाळा घ्या, सर्व आस्थापना घ्या. काकांनी सांगितली तशी वस्तुस्थिती आहे. ह्या शहरामध्ये अगोदर कोणी येत नव्हते. शाळा सुरु करायला कधी इथल्या काही भुमीपुत्रांनी, काही संस्थांनी शाळा सुरु केल्या त्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांना चांगल शिक्षण मिळालं आणि आज ह्या जुन्या कबरी खोदून काढतो आहोत. तिथे चुकीचं झालं. एका पर्टीक्युलर शाळेच्या बाबतीत संशय येतोच आहे. एकच शाळा कशाला सर्वच घ्या ना आणि अनधिकृत काय कमी आहेत. ह्या शहरामध्ये ह्या शहराचा इतिहास आहे. बिल्डींगा अनधिकृत आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण जो ठराव मांडला होता ना आपले सन्मा. सदस्य माझे मित्र प्रमोद सामंत आणि बर्नड डिमेलो यांनी पण त्यावेळी त्या कर्मचारी पतपेढीला एक रुपया दराने मंजुर केला होता. मग आता तुम्ही करा ना सव्वा तीन लाख रुपये तुम्ही काय महापालिकेचे नुकसान करत आहेत. हा ठराव तुमचाच आहे ना.

**अनिल सावंत :-**

मी मगाशी पण तेच बोललं.

**धृवकिशोर पाटील :-**

म्हणजे जे झाले ते बरोबर झालं आणि आता जे करत आहेत ते चुकीचे करत आहेत.

**अनिल सावंत :-**

तुम्ही जे कबर खोदत आहेत त्याच्यावर बोलतो मी की ती एक रजिस्टर संस्था आहे आणि पालिकेच्या मान्यतेने आहेत. तुमच्या संस्थेला पालिकेची मान्यता नाही. कशाला करत आहेत बरेच रेकॉर्ड आहेत. माझ्या जवळ बोलायला लावू नका. मा. आयुक्तांची पण मान्यता नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही प्रुफ करुन दाखवला का नाही. तुम्हीच ठराव केला होता एक रुपया दराने.

**अनिल सावंत :-**

असे काही तरी इंन्टेस्टरी कोणाच्या तरी मागे लागायचे वगैरे हे प्रकरण चुकीचे आहे मॅडम. त्यासाठी सभागृहाचा उपयोग करु नका. इथे कोणाला कम्पलेंट पाठवा तुम्ही कोर्टात जा तिथे सांगा हे चुकीचे आहे म्हणून.

**अश्विन कासोदरिया :-**

महापौर मॅडम अनिल सावंतजी समय प्रमाणे सब बदलना रहता है। जब पहले आप के अधी हूआ है।

**अनिल सावंत :-**

समय समय में कुछ नही बदलता है।

**अश्विन कासोदरिया :-**

अभी जो हो रहा है अच्छे के लिए हो रहा है।

**जुबेर इनामदार :-**

एक संस्था आपली शिफारस पत्र पाठवलेले ते स्विकारत नाही. म्हणून अशाप्रकारे हा विषय सभागृहामध्ये आणून खरं तर ह्या भाषेत बोलल पाहिजे ह्याला ब्लॅकमेल करायची पध्दत आहे. काय भूमिका आहे ती स्पष्ट नाही. साहेब कुठल्या संस्थांकडून तो सन्मान घ्यावा लागत नाही तो मिळवावा लागतो आणि तो मिळवला पाहिजे. त्याच्यासाठी चारित्र्य संपूर्ण पाहिजे इथे अडचण तीच आहे. काय करायचे तेच स्पष्ट नाही म्हणून अशाप्रकारे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आमचे सन्मा. आमच्यावरती ॲलीगेशन करता परंतु मी सभागृहाला सांगु इच्छितो ती जागा पहिले महापालिकेच्या ताब्यात द्या आणि कॉलेज महापालिका शाळा देणार की नाही. पहिले महापालिकेच्या ताब्यात ती जागा येईल आणि मगच महापालिका त्यांना देईल ना. साहेब झालं असं की सन्मा. सदर आरक्षण बाधीत होणाऱ्या क्षेत्रासाठी विकासक अधिकार पत्रशीर रामचंद्र वैष्णव यांनी दस्तावेज २००८ रोजी नोंदणीकृत करारनामा जोडून महापालिकेला हस्तांतरीत केले आणि उपसंचालक कोकण विभागाने ०७/१०/२००२ च्या पत्राप्रमाणे सदर आवश्यक जागा दरानुसार एवढ्या पैशांनी दिली. साहेब कसे काय ठरु शकते की जागाच आपल्या ताब्यात आलेली नाही. तर आपण हा दर कसे काय ठरवू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य धृवकिशोरजी ती जागा शाळेच्या ताब्यात होती. ती आरक्षणामध्ये आली. कारण ती शाळा होती म्हणून तिथे आरक्षण ताब्यात होते.

**धृवकिशोर पाटील :-**

मला तो थर्ड पर्सनल तो कसे देऊ शकता. २००२ ला साहेब हे चुकीच आहे गोषवाऱ्यामध्ये क्लिअर कट लिहीलेले आहे. तुम्ही हे काय बघत नाही. हे बघा २००२ ला साहेब मुलगा जन्माला आला नाही मुलाचे नाव कसे ठेवु शकता. सर बर्थ सर्टिफिकेट तेव्हाच मिळू शकते ज्यावेळी मुलगा जन्मतो. मग जर तुमच्याकडे शाळा ताब्यातच नाही तुम्ही जागेचे मालकच नाही तर उपसंचालक नगररचना हा कसे काय करु शकतो. सर ॲम आय राईट ऑर रॉंग.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम २००८ साली झाले ते एकदम चुकीचं झालं त्यावेळी जे महापौर बसले होते त्याला ह्याच्यातली काही कल्पना नव्हती आणि त्यांनी हे चुकीचे निर्णय घेतले.

**मा. उपमहापौर :-**

हे आरक्षण महानगरपालिकेने दिलेच नाही.

**अनिल सावंत :-**

मग कोणी दिले. महापालिकेचे पैसे आहेत. ३० लाख रुपये घेतले कसे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

एम.एम.आर.डी.ए. ने आपल्या महानगरपालिकेला पत्र दिलं ती पत्राची कॉपी बांधकाम विभागामध्ये ती पाहिजे तर बघून घ्या. शाळेचा ताबा २००८ साली आला आणि आपण देतो २००२ साली हे कसे शक्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय खर तर हा संभ्रम संपला असता तुम्ही निवेदन केले पाहिजे की तुम्हाला विषय दिला कसा म्हणजे काय म्हणून महापौरांच्या माध्यमातून हा विषय आलेला आहे. विषय शाळेचा हितामधले धोरणात्मक निर्णय घेण्याचे विषय, प्रशासन देते. काही विषय महापौरांनी सुचित केल्याप्रमाणे ते विषय विषयपटलावर येतात. तुम्ही त्याची टिप्पणी दिली आहे. तुम्हाला काय घ्यायला सांगितले ते तरी सांगा की काय म्हणून टिप्पणी दिली.

**मा. आयुक्त :-**

विषय जो आला त्याप्रमाणे आम्ही माहिती सदोष केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही टिप्पणी दिलेली आहे. खर तर हा टिप्पणीचा विषय तुम्हाला हा विषय आणण्याचा कारण प्रशासनाची त्याच्यावरती तुमची सही आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर काय होणार त्याचे भाष्य मी करु शकत नाही. जो विषय आला विषयावरती जी वस्तुस्थिती आहे ती मी समोर ठेवली. नॉव्हेलटी टू द हाऊस.

**जुबेर इनामदार :-**

हाऊसचा प्रश्नच येत नाही. चर्चा झाली तीच हाऊस. प्रकरण क्र. ८ च्या ठरावाचे वाचन करतो. आरक्षण क्र. २१२ए हॉलीक्रॉस शाळेला दिलेबाबतचा गोषवाऱ्यावरुन महानगरपालिका प्रशासनाची भुमिका स्पष्ट होत नाही. सदरचा गोषवारा सदोष असल्यामुळे तो फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**राजु भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०८ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. वर्षा भानुशाली, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया, दुसरा ठराव आहे सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. राजु भोईर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. वर्षा भानुशाली ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर

करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. वर्षा भानुशाली यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४७, विरोधात २४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. वर्षा भानुशाली यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

**मिरारोड येथील आरक्षण क्र. २१२ ए हॉली क्रॉस शाळेला भाड्याने दिलेबाबत.**

ठराव क्र. ०९ :-

**मिरा भाईंदर महापालिकेच्या मौजे मिरारोड येथील ताब्यात असलेल्या आरक्षण क्र. 212 ए हा भुखंड खाजगी संस्थेच्या हॉलीक्रॉस शाळेला दिल्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे . हॉलीक्रॉस शाळेला भुखंड देताना संबधित अधिका -याने आपल्या पदाचा गैरवापर करुन सदर खाजगी संस्थेला लाभ पोहोचवण्याच्या दृष्टीने विषय केलेला आहे . म्हणून सदर बाबत सर्व पदाधिकारी यांची मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत येत असून सदर समितीला नगररचना विभागाने सविस्तर माहिती द्या यची आहे. व सदर समितीने निर्णय घेऊन महासभेपुढे सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम वर्षा भानुशाली अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | निरंक |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | अरोरा दीपिका पंकज | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | पाटील नरेश तुकाराम | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | भोईर कमलेश यशवंत | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | अहमद साराह अकरम | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | बांड्या एलायस दुमिंग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २७ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २८ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३० | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३१ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३२ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३३ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३४ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३५ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३७ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३९ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४० | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४३ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४४ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४५ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४६ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४७ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९, **विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात कॉंक्रीट रस्ते तयार करुन घेण्याच्या प्रस्तावातील उर्वरीत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

निला सोन्स :-

**मिरा-भाईंदर शहरासाठी असलेल्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील काम 9(IV) A व विनिमय क्र. 33 परिशिष्ठ (IV) 6 नुसार जागा मालकाने सुविधा क्षेत्र विकसित करुन महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतरण केल्यास विकसित केलेल्या संपूर्ण क्षेत्राचा विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे. सदर तरतूदीनुसार मे. रवि डेव्हलपमेंट्स यांना सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावली व शासन अधिसुचनेनुसार विकासकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेतील रस्ते विकसित केल्यास विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद नाही, तथापी रस्त्याची सलगता व रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला राहणेसाठी रस्त्याचा सलगपणे विकास करुन घेण्याचा प्रस्ताव असून सदर प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.**

**मे. रवि डेव्हलपमेंट यांना विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात कॉक्रीट रस्ते तयार करुन घेण्यासाठी परवानगी दिलेल्या 69346 चौ. मीटर जागेपैकी 49832.58 चौ.मीटर क्षेत्रावर काम पुर्ण झालेले आहे. मे. रवि**

**डेव्हलपमेंट्स यांची मालकी नसलेल्या जागेवरील कॉक्रीट रस्त्याचा मोबदला सद्यस्थितीत देता येत नसल्याने सदर कामे बंद आहेत. याबाबत शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. सद्यस्थितीत खालील कॉक्रीट रस्त्याची कामे अर्धवट अवस्थेत असून नागरीकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील आर .बी.के. शाळेसमोरील अर्धवट रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 1,57,49,300/- |
| 2. | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील सदगुरु कॉम्प्लेक्स ते मेरी गोल्ड येथे जाणाऱ्या रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 1,11,19,750/- |
| 3. | मिरारोड (पूर्व) मंगल नगर येथील रतन वतन ते गौरव रेसीडेन्सी येथील अर्धवट रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 64,38,950/- |
| 4. | मिरारोड (पूर्व) मंगल नगर येथील हब टाऊन येथील अर्धवट रस्त्याचे काम करणे. | रु. 64,85,750/- |
| | एकूण खर्च | रु. 3,97,93,750/- |

**वरील उर्वरीत कामे महानगरपालिकेस निविदा प्रक्रीया करुन तदनंतर संबधित कंत्राटदाराकडून करुन घ्यावी लागणार आहेत. दरम्यानच्या काळात शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यास सदर कामे विकासकाकडून करुन घेता येतील. सद्यस्थितीत सदर ठिकाणी उर्वरीत कामे करण्यासाठी रु.3,97,93,750/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफारस आहे.**

**ठराव क्र.:-**

**उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे करण्यासाठी रक्कम रु.3,97,93,750/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे**

**विजयकुमार रॉय :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आले आहेत. हा खर्च जो करणारा आहे त्याची तरतुद काय. कुठल्या तरतुदी मधून करणार साहेब मुलभूत सुविधा ह्या लेखाशिर्षकाखाली १०० कोटी रुपयेची काम प्रस्तावित केली. ३३ कोटी रुपये महापालिकेचा हिस्सा असणार होता. ३३ कोटी रुपये राज्य शासनाचा आणि ३३ कोटी रुपये आपण कर्ज स्वरुपात घेणार. शासनाचा काही पैसा आपल्याकडे आलेला नाही म्हणून आम्ही कर्ज घेतले नाही की पैसा आल्यानंतरच पुढची कामे करायची होती म्हणजे ३३ कोटी रुपयांची महापालिकेचा जो हिस्सा होता अजूनपर्यंत मुलभूत सुविधांचे पैसे काही आलेले नाहीत. मग ३३ कोटी रुपये खर्च केले का? कुठलेही धोरण ठरल्यानंतर तो संपूर्ण झाल्यानंतरच केले पाहिजे असा अर्धवट करता येत नाही. म्हणजे आपल्याला ती पालिकेने ती हजामत करायची आणि अर्थव्यवस्थेवर त्याचा भुर्दंड. ते आले असते अनुदान आलं असतं तर हे कसे योग्य होतं. आज अनुदान आलेले नाही. ह्या ज्या पालिकेकडे जाऊन बोलतो सुका कचरा आणि ओला कचरा हा एक नविन आलेला विषय तुमच्याकडे तो जुनच्या ३० तारखेपर्यंत तुम्ही ह्या शहरामधल्या सुका आणि ओला कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याची विल्हेवाट खत पध्दतीने नाही लावली तर तुम्हाला कुठल्याच अनुदानाचा पैसा येणार नाही हे स्पष्ट आहे. शासनाची भुमिका आता ती ही आर्थिक परिस्थिती अशी असताना दुर्बल असताना झाला नाही का अर्धवट केलं नाही का रवि ग्रुपनी परत त्या विषयावर याव लागेल साहेब आज सुध्दा आपल्याला ते करता येत नाही. म्हणजे नियमबाह्य टी.डी.आर देऊन झाले आहेत. टी.डी.आर रद्द करायला घेतले पाहिजे आपल्याला साहेब भुमिका तशी स्पष्ट करा तुम्ही. तुम्ही घेतली पाहिजे ती भुमिका.

**मा. उपमहापौर :-**

आपण रस्ता बनवल्यानंतर त्या विषयी कारवाई करावीच लागणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

आता ते अर्धवट राहिलेली त्याला तुम्ही डांबरीकरण करु शकत होता. त्याला परत कॉंक्रीटचेच का करता खर्च वाचवा ना. ते एका कोटीमध्ये संपेल. तुमची आर्थिक परिस्थिती आहे का? करायची ३३ कोटी रुपये अजून तुमच्याकडे आलेले नाही. जे करायला घेतले ते ही तशीच परिस्थिती आहे ना. ते ही पैसा तुम्हाला उभाच करावा लागणार आहे. स्त्रोतचा इन्कम आपल्याकडे रेन्यु काहीच नाही. उत्पन्नाची बाजू

कमी, खर्चाची बाजू जास्त माझी इच्छा आहे की माझ्या घराच्या वाटेचे रस्ते कॉंक्रीटचे झाले पाहिजे. करु शकतो का? तुम्ही उद्या हात वरती करता होऊ शकत नाही. पैसे नाहीत. जेव्हा अशी परिस्थिती आपल्या डोळ्यासमोर असताना मग कशाला असे उद्योग करायचे. प्रशासन उद्या परत बोलेल की आमच्याकडे पैसे नाहीत. ४४० कोटी रुपयाचा बुकलेट दिला गिते साहेबांनी. ११७ कोटी रुपये २०१८ मध्ये पेमेन्ट करायचे होते. ते झालं की नाही परमेश्वराला माहिती आणि खांबित साहेबांना माहिती पैसे कुठून नेणार तुम्ही येथे तरतुद दाखवलेली नाही.

**दिपक खांबित :-**

हा गोषवारा जो आहे हा १८/१२/२०१७ ला प्रशासनामार्फत देण्यात आलेला आहे. विषय पटलावर तो ह्या वेळेला आलेला आहे. ह्या ३ कोटी ९७ लाखाचा खर्च हे रस्ते जे आहेत. चार पाच रस्ते अर्धवट आहेत. ते पूर्ण करण्यासाठी आणि त्यासाठी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते नविन बांधकाम आणि डी.पी. रोड ह्याच्यामध्ये पुरेशी तरतुद आहे. त्यामधून ही काम करायची आहेत. दरम्यानच्या काळामध्ये जर शासनाकडून टी.डी.आर बद्दल जो प्रस्ताव पेंडींग आहे तो झाला की ही कामे आपण त्यामधून घेणार आहोत. जर नाही आला तोपर्यंत आपण टेंडर प्रोसेस करणार.

**जुबेर इनामदार :-**

कधीपर्यंत थांबणार.

**दिपक खांबित :-**

आम्हाला टेंडर प्रोसेस दोन महिने करायला लागतात तोपर्यंत थांबणार.

**जुबेर इनामदार :-**

तरतुद कितीची आहे तुमच्याकडे उपलब्ध.

**दिपक खांबित :-**

२० कोटीची आहे.

**जुबेर इनामदार :-**

२० कोटीमधून एका क्षेत्रामध्ये ४ कोटी रुपये तुम्ही संपवणार. मग साहेब आम्हाला रस्ते करायचे असले तर आम्ही काय करायचे. कारण ह्याच्यानंतर सुध्दा स्पील ओव्हर बाकी आहे. एवढेच नाही २०१७-१८ चे स्पील ओव्हर बाकी आहे. देयक बाकी आहे. द्यायचे म्हणजे तुमच्याकडे सुरुवातीलाच काही नाही करायचे नाही पुढे जे काम अर्धवट बाकी आहेत तेच करा ना. डांबरीकरण करा कमी खर्चात होतील. बाकी आहेत ते रस्ते तुम्ही करा. कारण आम्हालाही लागणार आहेत. ९५ नगरसेवक आहेत तुमच्याकडे ९५ नगरसेवकांचे क्षेत्रामधले झाले पाहिजे.

**निला सोन्स :-**

महापौर मॅडम मैं इसी बात पर जानकारी देना चाहूँगी की आपने कहाँ है की डांबरीकरण करे वह रस्ता अधुरा है क्योंकी आधा सिमेंटेड हो चुका है इसलिए वह विकल्प पॉसिबल नही है। तो वो विकल्प पे भी चिंतन किया जा सकता था। वह अनेबल हो जाएगा ऑलरेडी बहुत ॲक्सीडेन्ट हो रहे है और एक साल से पब्लीक सफर कर रही है। तो मैं यह जानकारी दे रही हूँ। वो विंकल्प पॉसिबल नही है नही तो जरुर चिंतन होता।

**जुबेर इनामदार :-**

साहेब आमची काम करा हे सगळे पैसे तुम्ही इथे संपवल्यानंतर आमच्याकडे काय राहणार. गोषवारा तुम्ही दिलेला म्हणून सन्मा. नरेश गिते साहेबांचा आहे. आम्ही त्यांचा आदर आजही करतो चांगले अधिकारी होते ते. तुम्ही ही चांगले अधिकारी आहेत. तुम्ही ही इथेच रहा. आमची शुभेच्छा आहे. तुम्हाला ही परिस्थिती समजून आलेली आहे. विकासाच्या कामामध्ये विरोध करत नाही पण आमचीही अडचण होणार आहे. तुम्ही ही भुमिका घेताना मा. आयुक्त महोदय काय केलं पाहिजे, किती गरजेचे आहे ते आधी बघा. येऊ द्या शासनाकडे जो प्रस्ताव दिलेला आहे तो मंजूर होऊन आला तर अतिउत्तम.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब ह्या विषयात मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब एक्झिक्युटिव्ह इंजिनियर आम्ही स्वतः ह्या विषयासाठी संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो, नितीन खैरे साहेबांना भेटलो. त्यांच्याकडै हा विषय काढला ते पत्र त्यांच्याकडे होते. मा. गिते साहेबांनी ह्या प्रकरणाला थांबवलं होतं. त्या गिते साहेबांनी नंतर त्या प्रकरणाची गांर्भियता लक्षात घेतली. आर.बी.के स्कूलच्या समोरचा रस्ता अर्धवट आहे आणि तो तीन प्रभागामध्ये हा रस्ता आहे आणि अगदी थोडासा रस्ता राहिलेला आहे. पण प्रत्येक ठिकाणी सातत्याने अपघात होत असतात. अक्षरशः तिथे तीन कॅझीएटी पण झालेल्या आहेत. छोटे मोठे अपघात, मोटार सायकल वरुन हात पाय मोडणं सतत होत असते. पावसाळ्यामध्ये एक भाग ऊंच आणि एक भाग

खाली आहे. त्याच्यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होत असते. दरम्यान ही चर्चा आयुक्त साहेबांबरोबर आम्ही केली होती. ते स्वतः देखील ह्याचा फॉलो अप घेत होते. जर आपल्याला तेथुन हा प्रश्न सुरत असेल शासन दरबारातून तर आपण करु. परंतु दरम्यानच्या काळामध्ये असे मत पडलं गेलं की ते टेंडर आणि इतर प्रोसेस करताना दोन महिन्यांचा अवधी जाईल. मग आपण हा विषय महासभेची मान्यता घेतो आणि दरम्यान त्याही गोष्टीला फॉलो अप करतो.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते खांबित साहेबांना एक विचारायचं होते. हे जे रस्ता ज्यांनी घेतलेला आहे. सहा महिन्यापासून प्रॉब्लेम आहे त्या रवि बिल्डरने ऑलरेडी आणखीन पण फ्रॉड केलेले आहेत. आपल्याला माहित आहे. आताच स्मशानभूमीच चालू होतं. त्याच्यावरती पण प्रॉब्लेम केला. ते बंद करायचीच पाळी आली आहे. मिरारोडचे तर असल्या लोकांना तुम्ही वारंवार का देता आणि जेव्हा त्यांनी अर्धा रोड त्यांनी कनकिया शाळेच्या समोर बनवला तेवढाच अर्धा रोड पाटच्या ह्याच्यावरती बनवला आहे. मग जेव्हा बनवत होता तेव्हा माहित नव्हतं की एकच रस्ता पूर्ण करायचा तर तो रस्ता पूर्ण झाला असता. आणि आता तुम्ही बोलत आहेत की शासनाकडून पैसे येणार. पहिलेच शंभर कोटीचा जो हिशोब आहे अमृत योजनाचे सर्व काम बाकी आहे. ओपनींग केले सेम स्टेशनचे नाले उघडे आहेत. आमच्या वॉर्डमध्ये जे नाले करायचे आहेत ते आम्हाला असे उत्तर दिलेत की ते पैसे नाहीत. जेव्हा पैसे येणार तेव्हा तुम्हाला देऊ. आता पावसाळा एक महिन्याने येणार आहे. पालिकेने नाले बंद केलेले आहेत. ते बंद करायला तुम्हाला पैसे नाहीत आणि तुम्ही सिमेंटचे रोड बनवायला जात आहेत. तर तुम्ही त्या रवि बिल्डरला तेव्हा बोलू नाही शकत होता की एकच रोड बनव. पूर्ण जे बनवतो तो अर्धा इथे आणि अर्धा तिथे. दोन्ही पण सेम रोड म्हणजे प्लानिंग होत की आपण असा रोड अर्धा बनवायचा अर्धा असा लोकांना त्रास द्यायचा, बोंबाबोंब करायची आणि शासनाकडून बनवून घ्यायचा. मग असं वारंवार त्याला फॉलो अप का आपण देतो मला ह्याचे उत्तर पाहिजे. आमच्या तिथे पाण्याच्या टाकीवर येवढं मोठ प्रकरण झालं. ते टाकीच्या तिथे नाला बुजून टाकला आहे. पूर्ण दोन नंबरमध्ये पाणी भरणार आहे. मी चार पाच वेळा एक महिन्यापासून धक्के खात आहे आणि मी वारंवार सांगते की तिथे गटर बनवा कोणाला बनवायला होत नाही. ओपनिंग करायला सर्व बरोबर येतात तिथे आणि गटाराचे बनवण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत आणि अर्धे असेच प्लानिंग करुन तुम्ही सहा महिने लोकांना त्रास दिला. आता तुम्ही प्लानिंग करुन ह्याच्यामध्ये टाकत आहेत. मग आमच्या लोकांना त्याचे काय करायचं त्यांनी असेच बसून राहायचे. ते स्टेशन त्या मोठे रोड बनवले त्यांचे संचलक तोडून टाकले. त्या लोकांनी कुठे जायचे. म्हणजे सगळे प्रॉब्लेम तुम्ही क्रिएट करत आहेत. लोकांना आम्हाला जबाब द्यावा लागतो ना. खांबित साहेबांनी उत्तर देण्यांत यावं तुम्ही कसे काय स्टेशनचा नाला जो खुला आहे दोन वर्षापसून तो अमृत योजनांमध्ये कधी बनवणार आहे. ११ नंबर पासून स्टेशन तो कधी बनवणार आहे ते सांगा आणि दोन नंबरचा नाला, ५ नंबरचा नाला, ४ नंबरच्या नाल्याचे कधी बनवणार. ते सांगा मी वारंवार पत्रव्यवहार केले तिथे पाणी खूप भरणार आहे. मी आता पासुन सांगते शांती नगरमध्ये.

**दिपक खांबित :-**

शांती शॉपिंग सेंटरचा जो नाला आहे तो अमृत योजने अंतर्गत मंजूर झालेला आहे. त्याची डिझाईन सुध्दा तयार झालेली आहे. डिझाईन आता मंजुर करण्यांत आली. तो अमृत मधून होत आहे. तो लवकर सुरु होईल.

**दिप्ती भट :-**

साहेब कधी दोन वर्षापासून लवकर लवकर बोलता कधी, हे लोकांना तुम्हाला त्रास दिसतो रोडचा, मुलांचा आणि हा त्रास नाही दिसत नाल्याचा.....

**दिपक खांबित :-**

डिझाईन झालेली आहे.

**दिप्ती भट :-**

डिझाईन करायला एक एक वर्ष लागते का?

**दिपक खांबित :-**

एक वर्ष नाही. आता एका महिन्यात काम सुरु होणार आहे.

**दिप्ती भट :-**

तुमच्याकडे पैसेच नाही आले. पहिले जे शंभर कोटीचे होते त्याच्यात होऊ शकते ना. तुम्हाला किती पैसे आले त्याचेमधून किती लोकांचे बील पे केले ते सांगा.

**मा. महापौर :-**

दिप्तीजी आपका विषय है। आप उनसे पर्सनल जाके आप बात किजीए। आपका नाले का विषय है। ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ०९ :-**

**विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात कॉंक्रीट रस्ते तयार करुन घेण्याच्या प्रस्तावातील उर्वरीत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. १० :-**

**मिरा-भाईंदर शहरासाठी असलेल्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील काम 9(IV) A व विनिमय क्र. 33 परिशिष्ठ (IV) 6 नुसार जागा मालकाने सुविधा क्षेत्र विकसित करुन महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतरण केल्यास विकसित केलेल्या संपूर्ण क्षेत्राचा विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद आहे. सदर तरतूदीनुसार मे. रवि डेव्हलपमेंट्स यांना सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावली व शासन अधिसुचनेनुसार विकासकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेतील रस्ते विकसित केल्यास विकासकास विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद नाही, तथापी रस्त्याची सलगता व रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला राहणेसाठी रस्त्याचा सलगपणे विकास करुन घेण्याचा प्रस्ताव असून सदर प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.**

**मे. रवि डेव्हलपमेंट यांना विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात कॉक्रीट रस्ते तयार करुन घेण्यासाठी परवानगी दिलेल्या 69346 चौ. मीटर जागेपैकी 49832.58 चौ.मीटर क्षेत्रावर काम पुर्ण झालेले आहे. मे. रवि डेव्हलपमेंट्स यांची मालकी नसलेल्या जागेवरील कॉक्रीट रस्त्याचा मोबदला सद्यस्थितीत देता येत नसल्याने सदर कामे बंद आहेत. याबाबत शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. सद्यस्थितीत खालील कॉक्रीट रस्त्याची कामे अर्धवट अवस्थेत असून नागरीकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील आर .बी.के. शाळेसमोरील अर्धवट रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 1,57,49,300/- |
| 2. | मिरारोड (पूर्व) कनकिया येथील सदगुरु कॉम्प्लेक्स ते मेरी गोल्ड येथे जाणाऱ्या रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 1,11,19,750/- |
| 3. | मिरारोड (पूर्व) मंगल नगर येथील रतन वतन ते गौरव रेसीडेन्सी येथील अर्धवट रस्त्याचे व गटाराचे काम करणे. | रु. 64,38,950/- |
| 4. | मिरारोड (पूर्व) मंगल नगर येथील हब टाऊन येथील अर्धवट रस्त्याचे काम करणे. | रु. 64,85,750/- |
| | एकूण खर्च | रु. 3,97,93,750/- |

**वरील उर्वरीत कामे महानगरपालिकेस निविदा प्रक्रीया करुन तदनंतर संबधित कंत्राटदाराकडून करुन घ्यावी लागणार आहेत. दरम्यानच्या काळात शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यास सदर कामे विकासकाकडून करुन घेता येतील. सद्यस्थितीत सदर ठिकाणी उर्वरीत कामे करण्यासाठी रु.3,97,93,750/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफारस आहे.**

**ठराव क्र. :-**

**उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे करण्या साठी रक्कम रु.3,97,93,750/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे**

**सुचक :- श्रीम. निला सोन्स अनुमोदक :- श्री. विजयकुमार राय**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**स्नेहा पांडे :-**

प्रशासन से प्रश्न पुछा जाता है, जवाब मिलता नही।

**अर्चना कदम :-**

प्रश्न विचारत आहेत त्यांना उत्तर देण्यात यावे. पण बाकी सदस्यांनी त्याच्यामध्ये लुडबुड करु नये ही माझी विनंती आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, **वेदर शेड करीता भाडे आकारणीबाबत.**

**प्रिती पाटील :-**

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबधित अर्जदारास मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पुरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यांत येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम २२७/१ (ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वैगेरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८ इ मध्ये तात्पुरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगरपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करीत असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरपालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अशा प्रकारे वापर करणा-यांचे वेगळे सर्वेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पनात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेडसाठी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी १० चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रु.२५००/- आकारणी कायम ठेऊन १० चौ.मी च्यावर ५० चौ.मी क्षेत्रापर्यं रु.३००/- प्रति चौ.मी तसेच ५० चौ.मी क्षेत्राच्यावर रु.४००/- प्रति चौ.मी प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजुरी देणेबाबत मा.महासभा ठराव क्र.८३ प्रकरण क्र.९० दि.१६/१/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा,मोकळ्या जागा, व अन्य व्यावसायिक वापराच्या जागासाठी रु.५/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.३१/१०/२०११ रोजी मा.महासभेने प्रकरण क्र.६७, ठराव क्र.७१ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा.महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्हाचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्या अनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडसाठी मंजुरी देताना रु.१००/- प्रती चौ.मी प्रती माह साठी दर आकारणी करणेसाठी दि.०८/१२/२०१७ रोजीच्या मा. महासभेसाठी गोषवारा सादर केला असता सदर प्रकरणी मा.महासभेने ठराव क्र. २२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या वेदरशेडसाठी ४ महिन्याऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यांत यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्यावर अनधिकृतपणे वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहे. त्यांना शास्तीसह कर आकारणी

करण्यांत यावी. शास्ती लावताना ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारले आहे त्यावरच शास्ती लावावी तसेच ज्या मालकांनी अनधिकृतपणे वेदरशेड उभारले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमधील वास्तुवर सदनिका/गाळ्यांवर शास्ती लावावी त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर / गाळ्यांवर शास्ती लावू नये.

प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिय व्यवसायिकांबाबतचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे. आयुक्तांनी याबाबत इतर महानगरपालिकांकडून माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेरसादर करावा.

उपरोक्त ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे हॉटेल व सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालयाच्या लगतच्या लॉन्स किंवा मोकळ्या जागेमध्ये वेदरशेड उभारणेसाठी परवानगी देणेबाबतच्या धोरणासह त्यासाठी आकारणेत येणा-या शुल्का बाबतची माहिती मिळणेसाठी ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली,उल्हासनगर,वसई-विरार, नवी मुंबई महानगरपालिका यांना पत्र देण्यात आलेले आहे. उक्त प्रकरणी ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेकडे दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता इमारतीच्या मोकळ्या जागेत अथवा दुकानासमोर शेड उभारणेस परवानगी देणेबाबत त्यांच्या महानगरपालिकेने धोरण ठरविलेले नसल्याचे सांगण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिहम १९४९ व महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हॉटेल, सार्वजनिक हॉल व मंगल कार्यालयालगतच्या मोकळ्या जागेमध्ये वाणिज्य वापरासाठी वेदरशेडसाठी परवानगी देण्याची तरतूद नसल्यामुळे याप्रमाणे मंजूरी देणे उचीत होणार नाही असे प्रशासनाचे मत आहे.

सबब वरील प्रमाणेच अहवाल मा. महासभेत सादर

**ठराव क्र. :-**

**रहिवास वापरा च्या इमारतीच्या टेरेसवर 11 महिन्याकरीता वेदरशेड टाकण्यास परवानगी देण्यात यावी व प्रत्येक 11 महिन्यांनी 3 वर्षापर्यंत त्याचे नुतनीकरण करण्यात यावे . नुतनीकरण करणेकरीता मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच 3 वर्षानंतर पुन्हा सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करुन वेदरशेड करीता परवानगी घेणे बंधनकारक राहिल असा मी ठराव मांडत आहे.**

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेश पाटील :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलत आहे माझ्या वॉर्डमध्ये पैयाडे हॉटेल ते निलम पार्क पर्यंत जवळ जवळ अर्धा किलो मीटर रस्ता खोदलेला आहे. भुयारी गटारसाठी दोन्ही बाजूने गटारे बंद आहेत आणि पावसाळा आलेला आहे. मा. आयुक्त महोदय मी वाकोडे साहेबांकडे अनेक वेळा गेलो. त्यांनी कुठलीही दखल घेतलेली नाही. आणि आता पाऊस येणार आहे. पाऊस येण्याच्या आधी दोन्ही साईडची गटारे बंद आहेत आणि भुयारी गटाराचा अर्धा किलो मीटर रस्ता बंद आहे. तो रस्ता कधी होईल. पावसाळ्या आधी झालं पाहिजे. आणि पुढे रमजान येणार आहे. साहेब रमजानमध्ये प्रॉब्लेम होईल. मला मॅडम उत्तर हवं ते कधी होईल.

**मर्लिन डिसा :-**

खाली तीन पॉईंट बाकी है। वो कम्पलीट करके देने के लिए बोलो ना। जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत जो नाले का काम चालु है अंदर ग्राऊंड स्वीच का उस स्कूल के पास एक मेन पॉईंट है। और बाकी के तीन स्वीच पॉईंट है। उतना करके दे तो काफी एरिया में सुविधा हो जाएगी। बारीश के टाईम उनको रीलीफ मिल जाएगा।

**मा. महापौर :-**

खांबित साहब जल्द से जल्द करे।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो मगाशी विषय राहिला होता. या आयुक्त साहेब टि.डी. आरच्या बदल्यात कॉंक्रीटचे रस्ते तो विषय झाला. महापालिकेच्या फंडातून कॉंक्रीटचा रस्ता असा बनला आहे सृष्टी रोडला जो रस्ता सहा महिन्यांपूर्वी बनवलेला आहे. डांबरीकरण झालेले आहे. तो खोदून आता सिमेंटचा रस्ता बनवला जात आहे. महापालिकेच्या माध्यमातून आणि आज त्या ठिकाणी परिस्थिती अशी आहे शांती नगरमधले त्या बाजूच्या ज्या बिल्डींग आहेत त्याचे फर्स्ट फ्लोअर पूर्ण बुडणार आहे. रस्त्याची

हाईट एवढी झालेली आहे. म्हणजे पैशाचा दुरुपयोग कसा इतर रस्ते असेच पडलेले आहेत. आणि हा गरज नसताना तिथे कॉंक्रीटचा रस्ता बनवून आज ती बिल्डींग पूर्ण पाण्याखाली जाणार आहे शांतीनगरला.

**मा. महापौर :-**

सृष्टीला आमदार निधीतून चालू आहे.

**अनिल सावंत :-**

आमदार निधीतून आहे. पण गरज आहे की नाही पण आता ते ग्राऊंड फ्लोअरवाल्याने करायचे काय?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, हा विषय आणलेला आहे ह्याच्यामध्ये इमारतीच्या खाली असलेली जागा म्हणजे तो सामाईक अंतर झाला. त्या जागेवर असलेली दुकान, हॉटेल किंवा दुसरे व्यवसाय त्यांनी आपल्या दुकानाच्या बाहेर दहा दहा फुट लांब छप्पर घालून त्याच्या खालची जी जागा तिथे वाणिज्य वापर करतात आणि विशेषतः हॉटेलवाले जास्त करतात. खरी परिस्थिती अशी आहे की ती जागा त्यांनी अतिक्रमण मुक्त ठेवायला पाहिजे. हायकोर्टाचे पण आदेश आहेत. मार्जिन लाईन टू बी कॅप्ट ओपन फॉर द पब्लीक. त्या धरतीवर साहेब शिवमुर्ती नाईक तत्कालीन मा. आयुक्त असताना त्यांनी पूर्ण शहरामध्ये एक मोहिम राबवली होती. असे जितके काही छप-या आहेत. छप-याच्या खालची वापरात ठेवण्यात आलेली वस्तु किंवा केलेला वापर ते सगळे केलेले अतिक्रमण फक्त अतिक्रमण पध्दतीने त्यांनी ते निष्काषित करायला घेतलं होतं साहेब. एवढेच नाही आपलं डि.सी. रुल्स सुध्दा हा स्पष्ट बोलतो. आपली नियमावली जी आहे विकास नियंत्रण नियमावली पान क्र. २८ ओपन स्पेस रिक्वायरमेंट साईड ॲन्ड रियल ओपन स्पेस इन द रिलेशन इन द हाईट ऑफ द बिल्डींग ऑल लाईन ऑफ व्हेन्टीलेशन विकास नियंत्रण नियमावलीमध्ये स्पष्ट उल्लेख आहे की आजुबाजुची जागा जी असते ती अतिक्रमण मुक्त ठेवायची आहे. ती जागा रहदारीसाठी आहे. वापरासाठी आहे, चालण्यासाठी आहे. ती अतिक्रमण करण्यासाठी नाही. म्हणून कुठल्याही प्रकारचे अशाप्रकारे सेफचा वापर किवां त्याच्यावरती कुठल्याही प्रकारचा टॅक्स किंवा शुल्क लावू नये हा दिलेल्या गोषवा-याप्रमाणे हा अयोग्य आहे, नियमबाह्य आहे. दुसर त्याचबरोबर साहेब इमारतीवरच्या वेदर शेड ह्या वेदर शेडवर चर्चा सातत्याने २००९ पासून सुरु आहे. आता इमारतीच्या गच्चीवरती वेदर शेड उभारायचे कारण एकदम स्पष्ट आहे. जुनी व जिर्ण झालेली इमारती ताळेपीठ व्हॉलमधून पाणी जातो त्याचे नुकसान अजून जास्त होते. लिकेज सहाव्या माळ्यावरती लोक राहतात. त्यांना भरपूर पाण्याचा त्रास होतो. पावसाळा, पावसाच्या पाण्यामुळे अजून जास्त अख्खी इमारतीची दुरावस्था होते. ह्या कारणास्तव त्याला वरती एक छपरा घालण्याची परमिशन आहे. पावसाळ्याचे पाणी थांबण्यासाठी ह्या संदर्भात २००९ ते २०१७ पर्यंत वेगवेगळे बरेच काही ठराव झालेले आहेत. ज चे प्रस्ताव होते प्रशासनाने विषयपटलावर विषय आणून ह्या विषयावर बरेच काही निर्णय दिले. मात्र मा. आयुक्त महोदय मुद्दाम तुम्हाला हा विषय समजावून सांगायचा प्रयत्न करतो मात्र नगरविकास विभागाने परवानग्या देणे गेल्या दोन बंद करुन ठेवलेले आहेत आणि त्याला काय कारण आहे ते स्पष्ट होत नाही. मा. माजी महापौर श्रीम. गिता जैन यांना शुभेच्छा. माजी महापौर श्रीम. गिता जैन यांनी सुध्दा हा विषय नोव्हेंबर महिन्यामध्ये होता त्याच्यावर भरपूर चर्चा झाली होती. त्यांनी ज चा प्रस्ताव ही आणला होता. साहेब विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नगरविकास विभागाने काही सुधारणा केली होती. २००९ साली ही सुधारणा आलेली आहे आणि त्या सुधारणामध्ये पान ५८ ई परमिशन कन्स्ट्रक्शन ऑफ टेम्पररी युजेस ह्याच्यामध्ये साहेब ह्यामध्ये मा. आयुक्तांना अधिकार देण्यात आलेले आहेत. वेगवेगळ्या पध्दतीने अधिकार आहेत. त्याच्यामध्ये कन्स्ट्रक्शन साईटमध्ये लागणारी जागा, त्याला लागणारा शेड, ती सहा महिन्यांपासून ३ वर्षापर्यंत साहेब ॲक्शन करता येते. परमिशन अशाप्रकारे अधिकार असताना त्याच्यामध्ये स्पेसिफिकली ॲक्ट ॲनेलाईज पान क्र. ५८ मध्ये दोन नंबरचा कलम आहे. जाणुनबुजून त्याचा समावेश करण्यांत आलेला हा विषय चर्चेमध्ये होता. प्रत्येक महानगरपालिकेमध्ये म्युनिसिपल कमिशन शेअर ॲन्ड कमिशर परमिशन फॉर युजिंग द टेम्पररी ए.सी.सी. रुल्स ऑल द आर.सी.सी. स्लम ॲन्ड बिल्डींग ऑल पेमेन्ट ऑफ फीज दि स्लॅप बॉन द कमिशनर प्रोव्हायडेट फस्ट फायनल आर.सी.सी. स्लॅप ॲट गो टॅक्स एन.एस. फॉर्म वॉटर लिकेजेस ए.सी.सी. रुल वीच द परमिटेड ऑल हाईट ऑफ ५ फीट इट द ॲट द पेन्टर लाईजेशन वन ॲन हाफ फीट लेरेस अबव्ह द फाईव्ह फीट होल ॲप्लीकेशन ऑफ द परमिशन ऑफ द टेम्पररी युजर्स ॲन्ड इलेव्हन कन्स्ट्रक्शन इट नॉट बी टर्मीनेट प्रुफ टेक्नीकल पर्सन. म्हणजे साध्या माणसांनी एक संस्थेने जाऊन सुध्दा परमिशन तुमच्याकडे मागितली तर तुम्हाला साहेब ती दिली पाहिजे. स्पष्ट २००९ साली आदेश आहेत आपल्याकडे तरी ही विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी का करण्यात येत नाही. नगररचना विभाग जो आहे अशा वस्तुना सुध्दा तुमच्या समक्ष का

आणून देत नाही हे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आपल्याकडे त्याची तरतुद असताना कुठल्याही प्रकारच्या ठरावाची गरजच नाही. ही स्पष्ट नियमावलीमध्ये आपल्याकडे तरतुद असताना आपण ह्या पालिका ह्याच्यावरती अंमलबजावणी करत नाही माझी आपल्याला विनंती आहे पुढे पाऊस येणार आहे. पावसाळ्याच्या आधी लोक आपल्या गच्चीवरती अशाप्रकारे वेदर शेड उभारतात दुसरे असे आहे की ह्याच्यामध्ये कमर्शिअल किंवा रेसिडेन्शीयल असा कुठेही उल्लेख करण्यांत आलेला नाही. कदाचित व्यवसायिक वाणिज्य वापर करणाऱ्यांनाही त्यांच्या इमारतीवर ह्याची गरज लागू शकते. त्यांनी ह्याचा वाणिज्य वापर केला नाही पाहिजे. मात्र पावसाळ्याच्या संरक्षणासाठी त्यांनी अशाप्रकारे तुमच्याकडे परवानग्या मागितल्या तुम्ही त्यांच्या गच्चीवरती परवानगी दिली पाहिजे. खरा तर नियमावलीचा भाग आहे तुम्ही ती नाकारु शकत नाही. आम्हाला सभागृहाला कुठल्याही प्रकारचं ठराव करुन देण्याची ह्या विषयावर गरज नाही. एक साधा अर्ज कुणी संस्थाने कुणी केला, गरजदाराने केला तर तुम्हाला ती नियमावलीप्रमाणे परमिशन ती दिली पाहिजे. तरी मी ह्या विषयावर आमचा ठराव आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळमजला किंवा दुकानासमोर पत्र्याचे शेड टाकून, हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर केला जातो व त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेतली जात नसल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. महानगरपालिकेची जागा वगळून अशाप्रकारच्या वेदरशेडसाठी दि. १६/०१/२००९, प्रकरण क्र. ९०, ठराव क्र. ८३ अन्वये विविध शुल्क आकारुन परवानगी देण्याचे सुचित करण्यात आले. तद्नंतर आकारलेले शुल्क जास्तीचे असल्याने दि. ०८/१२/२०१७, ठराव क्र. २२ अन्वये शुल्क कमी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी इमारतींवर तात्पुरत्या वेदरशेडसाठी ०४ महिन्यांऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवागनी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यात यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिाक क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्याला अनधिकृत वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहेत. त्यांना शास्तीसह कर आकारणी करण्यात यावी. ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारलेले आहेत त्यावरच शास्ती लावावी. तसेच ज्या मालकाने अनधिकृतपणे वेदरशेड उभारलेले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमध्ये वस्तुंवर सदनिका/गाळ्यांना शास्ती लावावी. त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर शास्ती लावू नये. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिज्य व्यावसायिकांबाबतच्या विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहेत. आयुक्तांनी याबाबत इतर महापालिकांकडून माहिती घेवून सदर प्रस्ताव फेरसादर करावा.

उपरोक्त दोन्ही दि. १६/०१/२००९, ठराव क्र. ८२ व दि. १८/१२/२०१७, ठराव क्र. २२ संभ्रम निर्माण करणारे व दोन्ही ठराव विसंगत असल्यामुळे प्रशासनाने कदाचित त्यावर कार्यवाही केलेली नसावी.

ज्याअर्थी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दुकानाच्या बाहेरची जागा, इमारतीच्या तळमजल्याची जागा व हॉटेलच्या समोरील जागा ही त्या अर्थी इमारतीच्या सामासिक अंतर तरतुदीची जागा आहे आणि ती अतिक्रमण मुक्त ठेवणे नियमात आहे. तरी, उपरोक्त प्रकारची कुठलीही नियमबाही परवानगी पालिका प्रशासन देऊ शकत नाही, असे धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम ३७ अन्वये प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे गरजेचे आहे. तसेच इमारतीच्या गच्चीवर तात्पुरत्या स्वरुपाचे ए.सी.सी. छप्पर टाकायचे असल्यास विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ३७ (२) अन्वये मंजूर फेरबदल शासन निर्णय क्र. पी.टी.एस.-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि. २९/०८/२००९ कलम ५८ ई (२) अन्वये मा. आयुक्तांनी विविध नमुन्यातील अर्ज स्विकारुन १ विंग (१ जीना इमारतीला) ३०००/- रु. ३ वर्षासाठी शुक्क आकारुन परवानगी द्यावी. तद्नंतर फेर तांत्रिक बाबींची पुर्तता करुन नुतनीकरण करावे असा मी ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

वेदर शेड की परवानगी देते समय हमें क्या क्या सबमिट करना पडता है। वह एक सिर्फ माहिती चाहिए।

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम भाईंदर ईस्ट या मिरारोड वेस्ट जो भी है लोग बिल्डींग के उपर छपरा इसलिए डाल रहे है की लीकेज की प्रॉब्लेम होती है। टॉप फ्लोअरवालो को और सोसायटी के लोग बिल्डींग की रिपेअरींग नही कर पा रहे है। छत की रिपेअरींग नही कर पा रहे है। इसलिए टेम्परररी शेड लगा के

बिचारे लिकेज से बचने के लिए शेड लगा रहे है। तो उनके उपर हर साल रिन्युअल का जो यह अपना बोजा डाल रहे है। यह मेरे ख्याल से एक टाईम शुल्क लेके उनको रेग्युलराइज कर दिया जाए। जो भी है क्योंकी उसमें कोई भी किसी भी तरह का कमर्शियल युज तो हो नही रहा है। सिर्फ लिकेज के बचने के लिए छपरा डाल रहे तो उनको वन टाईम शुल्क जो भी रहेगा एक बार शुल्क लेके परमिशन दिया जाए ऐसा में निवेदन करती हूँ।

**गिता जैन :-**

मला जवाबच भेटला नाही. वेदर शेडसाठी काय काय पाहिजे तुम्हाला परवानगीसाठी.

**जुबेर इनामदार :-**

खाली अर्ज केला तरी द्यावं लागेल.

**गिता जैन :-**

आपण एवढी लांब लिस्ट का मागतो. तुमचा सातबारा पाहिजे. तुमचा हे पाहिजे, तुमचं ते पाहिजे. मला तेच विचारायचं आहे. जर काहीच लागत नाही मग आपण कशाला विचारता प्रश्न आणि सगळ्यांना नाकारता एक ही परमिशन दिली असेल तर सांगा. ज्या ज्या बिल्डींगला वेदरशेड लागलेला आहे त्या एक ही बिल्डींगला परमिशन दिली असेल तर सांगा आम्हाला. तुमच्या रेकॉर्डमध्ये असेल तर.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम आजपर्यंत हॉटेल आहेत, हॉस्पीटल आहेत अशा किती लोकांना आजपर्यंत परमिशन दिली त्याची माहिती द्या. कोणत्या आधारे दिली आहेत ते.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम वेदरशेडचा जो विषय आहे हा ह्या शहरातला सर्वसामान्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक अशा इमारती आहेत त्या जिर्ण झाल्या, कोसळल्या त्याला कारण फक्त एकच होतं की त्यांनी वेदर शेड बनवलं नाही. पावसाळ्याचे पाणी चौथ्या माळ्यावरुन तिसऱ्या माळ्यावर, तिसऱ्या माळ्यावरुन दुसऱ्या माळ्यावर, दुसऱ्या माळ्यावरुन पहिल्या माळ्यावर, तळमजल्यावर माझ्याच प्रभागापुरता बोलायचं असेल तर अशा तेरा इमारती कोसळल्या. ह्या कोसळल्यानंतर जेव्हा महापालिका आग्रह करायला लागली की स्ट्रक्चर ऑडीटच्या स्ट्रक्चर ऑडीट द्यायचा जेव्हा विषय आला नोटिसा काढल्या तेव्हा सोसायटी सगळी जागी झाली. तोपर्यंत सोसायटीतली लोक आपसातच भांडत होती. कोणी कोणाला एकमेकांकडे बघत नव्हतं. त्यावेळी आम्ही लोकांनी म्हणजे माझ्यासारखे अनेक नगरसेवकांना आग्रह केला असेल कार्यकर्त्यांनी आग्रह केला असेल की तुम्ही काहीही म्हणत असाल ती तुमची चर्चा नंतर करा. परंतु तुम्ही वेदर शेड लावा. सोसायटीच्या चेअरमनला आग्रह केला, सोसायटीच्या मेंबरला आग्रह केला काही कलेक्शन असेल ते कलेक्शन करा आणि त्या पध्दतीने त्यांनी ती शेड लावली. लावल्यानंतर इमारतीला सुरक्षितता झाली हे खरं आहे. आपले धोरण इतके वर्ष जाऊन नक्की न ठरल्यामुळे फुकटच दलाल तयार झाले. त्यांना नोटिसा निघायला लागल्या, नोटिस निघाली की नंतर मग नोटीस मी वायफोट करतो पण बंद करुन ठेवतो तुम्ही काळजी करुन घ्यायचे नाही. आज का सबकुछ मैं देख लुंगा अशी एक दलाली तयार झाली. ज्याच्यामुळे कारण नसताना लोकप्रतिनिधी बदनाम व्हायला लागले सत्यस्थिती ही आहे पुन्हा पुन्हा सांगतो वेदरशेडचा विषय कमर्शियल वेगळा आहे. कमर्शियल विषयी बोलत नाही. तुमच्या नियमानुसार जे टॅक्स असेल ते टॅक्स घ्या पण वेदर शेड ज्या पध्दतीने ज्या सोसायटीने विना संकोच शांती गंगा ए,बी,सी. स्टेशन समोरची त्यांनी तिन्ही बिल्डींगना वेदरशेड लावले ते त्यांच्या स्वेच्छेने लावलेली नाही, आम्ही आग्रह केला म्हणून त्यांनी लावलेली आहेत. आणि ते लावले त्यांना आमची अशी विनंती मिरा भाईंदर मधील जे कोणी ज्या लोकांनी जे कमर्शियल युज करत नाही ज्यांनी वेदरशेड लावला असेल साधातल्या साधा अर्ज द्या. आमची सोसायटी शांती गंगा, आमच्या सोसायटीच क्षेत्रफळ एवढ आहे, आम्ही शेड बांधलेली आहे. आम्हाला तुमच्या लोकांना नॉमिनी करा आणि नॉमिनल त्याला म्हटलं दोनशे पाचशे रुपये घ्यायचे आहेत. अशी रक्कम घ्या आणि ते द्या. नाहीतर पुन्हा पुन्हा आपली सभा होते. विषय येतो त्याच्या आधी पेपरवर येते. पेपरला आले की सगळी लोकं घाबरतात की आता बिल्डींग तुटणार आहे. वेदर शेड तुटणार आहे. एवढा खर्च चेअरमनने केलाच कसा हा सगळा विषय चालतो. अत्यंत सभागृहाचे एकमत व्हायला पाहिजे. सभागृहातल्या सगळ्या सदस्यांना मी विनंती करतो की एक वेदरशेडसाठी संपूर्ण सभागृह एकमत व्हावं आणि मिरा भाईंदरमध्ये ह्या तमाम इमारतींना आपण संरक्षण द्यावं ही माझी मागणी आहे.

**गिता जैन :-**

साहेब वेदर शेड एखादी बिल्डींगने आपल्या टॅरेसवर लावला तर आपली मागणी काय काय पेपरची असते.

**श्रीकांत देशमुख :-**

आपण त्याला स्ट्रक्चरल स्टॅबिलीटीसाठी सर्टिफिकेट मागतो. तो काय करणार आहे टेम्पररी वेदरशेडमध्ये त्याची ऊंची काय, त्याला स्कोप काय त्याच्याबद्दल त्या संस्थेचा ॲफिडेव्हिट घेतो. हे कमीत कागदपत्र आपण घेतो.

**गिता जैन :-**

साहेब त्या बिल्डींगने सातबारा पण द्यायचा असे आपल्या ह्याच्यामध्ये आहे.

**श्रीकांत देशमुख :-**

अधिकृत आणि त्याची बिल्डींग आहे हे कळण्यासाठी ते तर लागलेच. हे मिनिमम रिक्वायरमेंट आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब ह्याच्यामध्ये तुम्ही वाद घालूच नका. तुमच्यात जे काही डि.सी.रुल्स आहेत. हे एका बाजूला तुम्हाला ठेवायलाच लागतील. हे सभागृह तुम्हाला विनंती करते रोजच कोणी एक विनंती करत नाही. मॅडम एकट्या करत नाही. ह्या मिरा भाईंदरमध्ये ही स्थिती आहे की बिल्डींग वाचवण्यासाठीच आणि त्यामुळे त्यांनी नक्की सांगतो की दोन पाच वर्षापासून काही इमारती वाचल्या. त्यांची कोणतीही ऐपत नसताना जबदरस्तीने आपण शेड बांधायला लावली. शेड बांधली आणि त्या इमारती वाचल्या आणखी २०-२५ इमारती खाली आल्या असल्या त्यावेळी सोप्यात सोपा ज्याच्यामुळे तुम्हाला त्रास होणार नाही. नियमानुसार हाऊसवाल्यांना ही त्रास होणार नाही. येणाऱ्या कोणत्याही गरजुला त्रास होणार नाही. आमची विनंती अशी आहे की त्यांचा एरिया पाहिजे असेल तर माहिती घ्या. किंवा २ वर्षापूर्वी लावले, ४ वर्षापूर्वी लावले मी जे म्हणतो ते तुम्हाला विनंती करतो. ज्याचं बनले त्याच आणि ज्यांना बनवायचं आहे त्यांना तुम्ही कमीत कमी मिळवा पण ज्याच बनलय त्यांच्याकडे तुम्ही साहेब कोणतेही कागद मागू नका. तुम्हाला रेकॉर्ड पाहिजे असेल तर तुम्ही रेकॉर्ड घ्या. तुम्हाला इनकम पाहिजे असेल तर ५०० रुपये घ्या आणि तुमची मेहनत ५०० रुपयाचीच आहे. कशासाठी तर नागरिकांसाठी, सर्वसामान्यांसाठी अशी भुमिका घ्यावी अस आमचे मत आहे.

**गिता जैन :-**

साहेब माझा प्रश्न असा आहे की आता आपल्याला वेदर शेड परमिशन द्यायला जसे की इनामदार साहेबांनी सांगितलं जे ही आले त्यांना द्यावच लागेल की परत सांगितलं की सगळी कागदपत्र पाहिजे ते पहिले क्लिअर करा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब नियमावलीमध्ये स्पष्ट आहे की तुम्हाला सॉल ग्रँड म्युनिसिपल कमिशनर सॉल ग्रॅन्ड परमिशन तर दिली टेम्पररी. ए.सी.सी. रुल्स आर.सी.सी. स्लॅप ए.सी.सी. ॲनी बिल्डींग ऑल पेमेन्ट ऑफ द फीज रिस्कॅबल कमिशनर प्रोव्हायडेड सब फायनल आर.सी.सी. सब झिरो टॅक्स अन फॉर्म वॉटर लिकेजेस ह्या धरतीवरती तुम्हाला दिलं पाहिजे.

**गिता जैन :-**

साहेब जे काही असो आता मला फक्त जर तुमच्या रेकॉर्डमध्ये असेल तर मला वाटते भाईंदरमध्ये जेवढी बिल्डींगला वेदर शेड लागले आहेत. त्यामधून ९८ टक्के बिल्डींग विदाऊट एनी परमिशन वेदरशेड बांधलेले आहेत. कारण तुमच्याकडून वेदरशेडची परमिशन दिली जात नाही. एक किंवा दुसरं काढण्याचं ते वेदरशेडची परमिशन दिली जात नाही कारण आपले जे लिस्ट आहे ती एवढी मोठी लांबलचक आहे त्याची कोणीच पुर्तता करु शकत नाही. आता माझी तीच रिक्वेस्ट आहे. जी काकांनी केली की ज्या जुन्या बिल्डींग आहेत तुम्हाला पाहिजे तर तुम्ही नविन बिल्डींगसाठी रुल काढू शकता पण ज्या जुन्या बिल्डींग आहेत त्यांना जास्त काही न विचारता एकतर वेदरशेड उभारण्याची परवानगी द्यावी. जर जे परवानगी मागायला येत आहेत तर त्यांना विना कारण हैराण न करता म्हणजे आता पावसाळा येणार आहे आणि मला वाटते की दोन तीन दिवसांचा तुम्ही नियम घेऊन किंवा लगेच पोहोच येते तशी त्यांना द्या. दुसरे कमर्शियल आहेत ते बाकी सगळ होतं. वर वेदर शेड बांधून बरीच हॉटेल आहेत अशी वर वेदर शेड बांधून त्यांची कमर्शियल वापर करतात त्याचा काय तुम्ही करत आहेत.

**श्रीकांत देशमुख :-**

आम्ही असे कुठल्याही कमर्शियल वापरला परवानगी देत नाही. टेरेसवरच्या वापराला परवानगी दिली जात नाही.

**मा. उपमहापौर :-**

सगळ्यांचे प्रश्न सुटतील हा ठराव व्यवस्थित ऐकला ना. हा ठराव जो केलेला आहे व्यवस्थित ऐकून घ्या. सगळे प्रश्न सुटतील त्याच्यात.

**गिता जैन :-**

वैती साहेब परवानगी तर पहिले पण नव्हती. ह्या ठरावाच्या आधी पण परवानगी हॉटेलला नाही आहे. तरी आपण ते करतो म्हणजे हा नियम केल्यानंतर होणार नाही त्याची गॅरंटी आहे का?

**मा. उपमहापौर :-**

कर्मशियलसाठी जे जे कर लावायचे त्याला इथे कोणाचा विरोध नाही. फक्त रेसिडेन्शीअयला जो प्रश्न आहे की आपल्याकडचे काही माहिती अधिकार किंवा अन्य लोक जाऊन त्या संस्थेचे वगैरे विचारतात की तुमच्या सोसायटीचे परमिशन घेतलं आहे का? टॅक्स लावणारा आपला अधिकाऱ्यांनी काही चुका केलेल्या आहेत पण हा ठराव एकदा वाचुन दाखवतो.

**प्रभात पाटील :-**

हा विषय काकांनी मांडला. खरोखर काका योग्य बोलले की त्यांच्या वॉर्डामध्ये वेदर शेड नव्हती. म्हणून त्यांच्या वॉर्डात इतक्या बिल्डींग पडल्या आपण ज्या वेदरशेडला परवानग्या मागतो किंवा लोक मागत आहोत आपल्याकडे. त्याच्यासाठी ते आवश्यक कागदपत्र देतात. नाही देतात सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे की हा संपूर्ण शहरावर पावसाळ्यामध्ये किंवा कधी पण वर्षाच्या बारा महिन्याला जर बिल्डींग कोसळण्याचा अनुष्पण येऊ नये असे वाटत असेल तर तुम्हाला तर पहिल्यांदा पुन्हा करा नाही तर काकांच्या वॉर्डासारखी परिस्थिती होईल. सगळीकडे संपूर्ण भाईंदर क्षेत्राचा पट्टा जो आहे तो सगळा जुन्या बिल्डींगचा पट्टा आहे आणि तुम्ही त्यांना परवानग्या दिल्या नाहीत. पावसाळ्याचा पाणी झिरपून झिरपून इमारती दुबळ्या झाल्यात. आणि दुसरी गोष्ट की तुम्ही जी कागद पत्राची पुर्तता सांगत आहेत मला असे वाटते की इथे नगररचनाचे इथे आहे की नाही मला माहित नाही. नगररचनाकडे ढिगभर अर्ज आहेत का साहेबांची सोसायटीची काही पत्र आमच्याकडे नाही. पेपर नाही. पेपर तुमच्याकडे असतील तर आम्हाला द्या. मी सगळ्या नगरसेवकांना विचारते सोसायटीचे लोक आपल्या नगररचना विभागाला विचारत आहेत. कुठून आणणार लोक पेपर सगळ्या अनधिकृत बिल्डींग झालेल्या आहेत. बिल्डरने काही त्यांना दिलेले नाही अशा वेळेला ते लोक आणतील कुठून दुसरी गोष्ट अक्रमणाने काय निदर्शन करायचे त्यांचे. मला सांगा किती असे आहेत त्यांच्यावर छपरा नव्हते ती बिल्डींग पडायची असते. आपण त्यांना भय देण्याचे वाटते त्यांना आपल्याला वेळ द्यावे असे वाटते हे केवढे मोठे काम आहे. तीन वर्षाने ठेवा.

**मा. उपमहापौर :-**

परवानगी देण्याचं प्रयोजन असे आहे की कोणी काही वापर, गैरवापर करु नये आणि प्रत्येक सोसायटीत राहणारे लोकात त्यांची अपेक्षा असते की आम्हाला परवानगी पाहिजे आणि आपले परवानगीचे शुल्क ही जास्त नाही ते ही प्रमाणात आहे. त्याच्यामुळे आपल्याकडे नोंद राहील सगळ्या गोष्टीची.

**प्रभात पाटील :-**

त्यांनी परवानग्या घेऊन मागितल्या. त्यांचे मी सांगते ज्यांनी नाही मागितल्या त्यांच्याकडे जरुर मागा. आपला हक्क आहे तो पालिकेला महसूली बरोबरीचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

मुळ मुद्दा काय होता की त्याच्यावरती ते टॅक्सेशन होणार होते किंवा त्याच्यामुळे जी शास्ती लागणार होती ती शास्ती लागू नये हा आपला प्रयोजन होतं आणि दुसरं त्याच्यावरती टॅक्स लागू नये ही तुमच्या आमच्या सगळ्यांची भावना आहे. त्याच्यामध्ये कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम आपल्या ज्या परवानगी त्या आपण प्रत्येक सोसायटीचे वेदर शेड बांधण्याच्या आधी परवानगी मागितली आहे. पण नगररचनाने आजपर्यंत कोणती परवानगीच दिलेली नाही. म्हणजे ते पैसे भरायला तयार आहेत. आज पण माझ्या वॉर्डमधल्या कमसे कम १० फाईली पडल्या असतील तिथे. सोसायटीवाले पैसे भरायला तयार आहेत. परमिशनच नाही आणि तुम्ही साहेब बोलले की हॉटेलला आणि ह्यांना जे परमिशन देता येत नाही आजपर्यंत किती हॉटेलला परमिशन दिल्या ते पहिले सांगा. आणि दिलेले आहेत.

**मा. उपमहापौर :-**

तो प्रशासनाचाच अहवाल आहे. पण त्याच्यावरती आता महापालिकेचे धोरण आहे. आपण सर्व महापालिकेला पाठवला आहे दोन पालिका असे देतच नाही.

**स्नेहा पांडे :-**

परमिशन देने के पहले मालकी हक्क कागदपत्र रहेगा तो हम लोग परमिशन देते है। लेकिन मिरा भाईंदर में ८० टक्के बिल्डींग ऐसे है जो पुराने है। उनके पास सातबारा नही है या स्ट्रक्चर रिपोर्ट जो है वो नही है। तो ऐसे लोगो को बिल्डींग तो वही युज कर रहे है। वहाँ के रहिवासी है। साहब ऐसा सुनिए अगर उनके पास पेपर नही है फिर उसमे महानगरपालिका जा के हम लोग उसका कोई वापर या पालिका की तरफ से तो कोई युज हो नही रहा। वहाँ के रहिवासी उस बिल्डींग का युज कर रहे है। चाहे बिल्डींग इललिगल हो, चाहे लिगल हो तो जैसे उनको हम लोग नविन सुविधा साफसफाई, पानी बिजली हर चिज के लिए व्यवस्था कर रहे है। वैसे उनको वेदर शेड का भी परमिशन दिया जाए। अगर उनके पास पेपर नही है तो भी क्योंकी यह लिकेज की वजह से बहुत बिल्डींग गिरने की तगार पे है। इस जिस का ध्यान रखिए। और पेपर कम भी है फिर भी परमिशन दिजीए।

**गिता जैन :-**

महापौर मॅडम आता माझा जो दुसरा प्रश्न होता तुम्ही हॉटेलच्या टेरेसवर किंवा कुठल्याही कमर्शियल वापरासाठी वेदर शेड बांधता आपल्यामध्ये का आपण त्याच शास्ती लावून त्यांना कर आकारणी करायची किंवा शास्ती लावायची नाही किंवा जे काही असेल ते पण तसे जरी केलं तरी ते इललिगल ते आहे ना. मग त्यांनी तिथे कमर्शियल वापर का करावा आपण शास्ती लावली की कमर्शियल वापर करु शकता का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम, एकीकडे हे बोलता की देता येत नाही आणि ऑलरेडी परमिशन दिलेली आहे. त्या कशा दिलेल्या आहेत. हॉटेलची वगैरे यांना जी परमिशन आता ठरावामध्ये सांगतात देता येत नाही मग त्या दिल्या कशा. कशा दिलेल्या आहेत. अशा हॉटेल आहेत आपल्याकडे परमिशन दिलेल्या हॉटेल आहेत.

**गिता जैन :-**

किती परमिशन आहेत ते तरी सांगा. तुम्ही ॲक्शन काय घेतले ते सांगा. दुसरी एक सुचना आहे साहेब मी बिल्डींगच्या रहिवासीसाठी सांगणार की जे वेदरशेड आपण लावतो त्यात तुम्ही काहीच पेपर विचारु नये असे जुबेर इनामदार साहेबांनी सांगितलेच आहे. तुम्ही विचारायचे हक्कदार नाहीत. पण त्यासाठी तुम्ही केवढे पेपर मागवले आणि आपण किती परमिशन दिले हे बघा मी अजून सांगते ९८ टक्के बिल्डींग विदाऊट परमिशन वेदर शेड बांधलेले आहेत. आता तुम्ही जी दुसरी अट टाकतात तीन वर्षांची. पहिले तर मला हे सांगा नगररचना विभागाने की तीन वर्षांसाठी आपण रिन्यु देवू शकतो का?

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब ते वाक्य कस आहे तुम्हाला समजून सांगतो. तीन वर्षाचीच परवानगी देतो आपण पण ती अकरा महिने रिन्यू केला की पुन्हा तीन वर्ष.

**जुबेर इनामदार :-**

अकरा महिन्याचा कुठेच उल्लेख नाही. म्युनिसिपल कमिशनर में ग्रॅन्ट परमिशन फोअर कन्स्ट्रक्शन ऑफ टेम्पररी नेचर ॲन्ड लुज फॉर पिरेड नॉट ॲक्सेंडींग सिक्स मन्थ ॲट अ टाईम. बट इन ॲग्रीकेटेड नॉट ॲक्सेप्टींग थ्री इयर्स. सच टेम्पररी परमिशन मे बी ग्रॅन्टेड फॉर कन्स्ट्रक्शन ऑफ द फॉलोव्हिंग युजेस त्याच्यामध्ये वेदर शेड सुध्दा आहे. म्हणजे तुम्ही तीन वर्षापर्यंत देवू शकता. इथे विषय कसा चालला कमीत कमी लोकांना त्रास तुम्ही फक्त कागदाची पुर्तता करताना साहेब आर.सी.सी. चे कन्सलटन्ट सर्टिफिकेट मागतात. ते योग्य आहे, बिल्डींगला ती क्षमता पाहिजे. ती ताकद पाहिजे. त्या कॉलम बीमध्ये ताकत शिल्लक राहिली असल्यामूळे कमीत कमी पाच टनाचे वजन वरती ते पेलेल ह्याप्रकारे तुम्ही तेवढा घेतला तरी भरपूर आहे. साधे सरळ कागद घ्या. लोकांना अशा प्रकारे साध्या पध्दतीने त्याना वरती परमिशन द्या. नाहीतर इमारती जुन्या झाल्या आहेत त्या खरोखरच पडतील अजून खराब होणार कारण आपल्याकडे रि-डेव्हलपमेन्ट हा विषय नाहीच आहे.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम सुचना माझी तीच होती की आज जे सेक्रेटरी आहेत त्यांना माहिती आहे की आम्ही आमच्याकडे वेदरशेडला परवानगी घेतली आहे. तीन वर्षानी दूसर कोणी येणार मग तेच ब्लॅकमेलींग परत तेच तेच प्रकार चालू होणार परत आर.टी.आय. चालू होणार म्हणून माझा असा मत होता की नाही तर आपल्याकडेच असा एक ठेवा की ज्यांना ज्यांना आपण परवानगी दिली आहे तीन वर्षानी त्यांना परत एक नोटीस द्या. की परत रिन्यू करा कारण नाही तर तोच प्रकार चालू होणार तर तशी एक सुचना घ्या की तुम्ही जेव्हा देतात तो हा फक्त स्टॅबिलीटी सर्टिफिकेट मांगा आपला करार आहे त्यात बरेच पेपर मागतोय थोडस सुचना घेऊन हे करा की फक्त स्टॅबिलीटी रिपोर्टवर तुम्ही वेदर शेडची परवानगी घ्या.

**मा. उपमहापौर :-**

तीन वर्षाची अधिकची आपल्याला देत येत नाही तीनच वर्षाची देता येते.

**गिता जैन :-**

मी तीन वर्षाच सांगत नाही. परमिशन देताना तुम्ही जे कागदपत्र मागता त्यात फक्त स्टॅबिलीटी सर्टीफिकेट मागा कारण आपला जो लास्ट ठराव आहे त्यात आपण ८ किंवा ९ कागदपत्र मागतो ते कोणीच पुर्तता करू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

अकरा महिण्याचा तुमच्या आणि आमच्या ठरावामध्ये मी तीन वर्षाचा केलेला आहे. तीन वर्षाचा मी शुल्क ३ हजार रूपये ठेवलेला आहे. मी माझ्या ठरावामध्ये दूकान बिल्डींगच्या खाली असलेल्या कुठल्याही वाणिज्य वापरासाठी परमिशन देता येत नाही. नियमावलीमध्ये नाही देता येत असा तुम्ही उल्लेख केलेला आहे. तुमच्या ठरावामध्ये म्हणजे त्याच्यावरती त्या विषयावरती वाद संपलेला आहे. विषय आता फक्त गच्चीवरती जे वेदर शेड लावायचे आहेत. रहिवासी क्षेत्रामध्ये त्याच्यासाठी महापौर मॅडम आपण अकरा महिन्यांची जी पहिली अट ती काढा. तीन वर्षाची सलग्न एकत्र द्या. तीन वर्षासाठी पहिल्या टप्यामध्ये द्या नंतर ते नुतीनीकरण करा.

**प्रभात पाटील :-**

एक मुद्दा असा पण राहिला आहे कोणी बोललं की नाही आठवल नाही सभागृहामध्ये मुद्दा असा आहे की आपण एक ठराविक काळामध्येच त्यांना देतो म्हणजे अमुक तारखेपर्यंत तुमच ॲप्लीकेशन चालू राहिल त्याच्यानंतर तुम्हाला दिले जाणार नाही. वर्षभरासाठी कारण जे जेव्हा मागाल त्याला दिले पाहिजे. एखाद्याची परिस्थिती नसते त्यांच्याकडे फंड नसतो म्हणून तेव्हा ते ठराविक मुदतीत मागितले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

असा कुठे ठराविक महिना इथे काही नमुद केलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

आपल्याकडे आहे. आपण तसेच म्हणतो आपल्या पालिकेत म्हटले जाते असं वेळ पण संपली.

**जुबेर इनामदार :-**

म्युनिसिपल कमिशनर सॉल ग्रॅन्ट म्हणजे देवू करील ते दिलेच पाहिजे. माझा मुलभूत अधिकार आहे. ती परमिशन दिलीच पाहिजे. तुमच्या ते नियमात आहे. तरतुदीत आहे म्हणून म्हणतो.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम आपकी परवानगी से बोलती हूँ, की जो हमने वेदर शेड शब्द यूज किया है उसकी जगह पे खाली शेड युज करिए। वेदर लिखेंगे तो सिर्फ वो चार महिने प्रक्रिया शुरु होगा। खाली बारीश में वो शेड लगा सकते है। बाद में उसे निकालने पडेंगे।

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम हा विषय थोडक्यात आटपून आता मा. आयुक्त महोदयांना सांगाव लागेल की महापालिकेचा पायगुण चांगला आहे. इथून त्यांची आता बदली ही झालेली आहे. आम्हाला जे समजल ते मोठ्या जागेवर वरच्या पातळीवर झालेली आहे. जिल्हाधिकारी जालना अशी आम्हाला माहिती मिळाली आहे की साहेबांची बदली जिल्हाधिकारी जालनावर झालेली आहे. म्हणजे हा खरोखर ह्या आमच्या शहरासाठी एक चांगली बाब आहे. आमच्याकडून जाणारे अधिकारी जिल्हाधिकारी झाले. किरकोळ विषय आहे ह्या शहराच्या हितामध्ये आहेत. लोकांच्या हितामध्ये आहेत.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्या आमच्या म्हणण्यात जास्त फरक नाही. आम्ही २५०० रुपये बेसीक पहिले ठरवले आहे आणि नंतर ज्याचा जस वाढ होईल त्याच्यामध्ये थोडी थोडी वाढ केलेली आपण ५० रुपये दिवसाचा आपण घेणार ५००.

**जुबेर इनामदार :-**

वैती साहेब वर्षाला हजार रुपये भरपूर झाले.

**मा. उपमहापौर :-**

गोषवारा जो आहे गोषवाऱ्यात जे शब्दप्रयोग आहेत त्याच्यातलाच तो उल्लेख आहे की दहा चौ.मी. क्षेत्राच्या मर्यादित असलेल्या क्षेत्रासाठी २५०० रुपये.

**जुबेर इनामदार :-**

आपण एक ठराविक रक्कम फिक्स केली होती. अडीच हजार पर रुपये पर बीग म्हणजे एक जिन्यासाठी अडीच हजार रुपये घेत होते. आम्ही एका जिन्याचे तीन हजार रुपये. तीन वर्षांनी केले. हजार

रुपये अजून कमी केले कारण त्यांना सोयीचं असते ठीक आहे ह्याच्यातून काही वाणिज्य वापर करणार नाही ते लोक आणि जुन्या जिर्ण झालेल्या इमारती आमच्या सूचना तुम्ही स्विकारल्या त्याच्याबद्दल पूर्ण सभागृहाच्या वतीने मी तुमचे आभार मानतो.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १० :-**

**वेदर शेड करीता भाडे आकारणीबाबत.**

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबधित अर्जदारास मालकांस रु.२,५००/- इतके शुल्क आकारुन तात्पुरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास ६ महिन्याकरिता परवानगी देण्यांत येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम २२७/१ (ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वैगेरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. ५८ इ मध्ये तात्पुरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगरपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करीत असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरपालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अशा प्रकारे वापर करणा-यांचे वेगळे सर्वेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पनात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेडसाठी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी १० चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रु.२५००/- आकारणी कायम ठेऊन १० चौ.मी च्यावर ५० चौ.मी क्षेत्रापर्यं रु.३००/- प्रति चौ.मी तसेच ५० चौ.मी क्षेत्राच्यावर रु.४००/- प्रति चौ.मी प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजुरी देणेबाबत मा.महासभा ठराव क्र.८३ प्रकरण क्र.९० दि.१६/१/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा,मोकळ्या जागा, व अन्य व्यावसायिक वापराच्या जागासाठी रु.५/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.३१/१०/२०११ रोजी मा.महासभेने प्रकरण क्र.६७, ठराव क्र.७१ अन्वये मंजुरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा.महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्हाचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्या अनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे वरीलप्रमाणच्या वेदरशेडसाठी मंजुरी देताना रु.१००/- प्रती चौ.मी प्रती माह साठी दर आकारणी करणेसाठी दि.०८/१२/२०१७ रोजीच्या मा. महासभेसाठी गोषवारा सादर केला असता सदर प्रकरणी मा.महासभेने ठराव क्र. २२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव मंजूर केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या वेदरशेडसाठी ४ महिन्याऐवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्यात यावी व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यांत यावे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठ्या प्रमाणात टेरेसवर व तळमजल्यावर अनधिकृतपणे वेदरशेड उभारुन वाणिज्य वापर करीत आहे. त्यांना शास्तीसह कर आकारणी करण्यांत यावी. शास्ती लावताना ज्या जागेवर अनधिकृत वेदरशेड उभारले आहे त्यावरच शास्ती लावावी

तसेच ज्या मालकांनी अनधिकृतपणे वेदरशेड उभारले आहे त्याच मालकाच्या सदर इमारतीमधील वास्तुवर सदनिका/गाळ्यांवर शास्ती लावावी त्या इमारतीमधील इतर सदनिका धारकांच्या जागेवर / गाळ्यांवर शास्ती लावू नये.

प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेले हॉटेल व इतर वाणिय व्यवसायिकांबाबतचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे. आयुक्तांनी याबाबत इतर महानगरपालिकांकडून माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेरसादर करावा.

उपरोक्त ठरावामध्ये नमुद केल्याप्रमाणे हॉटेल व सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालयाच्या लगतच्या लॉन्स किंवा मोकळ्या जागेमध्ये वेदरशेड उभारणेसाठी परवानगी देणेबाबतच्या धोरणासह त्यासाठी आकारणेत येणा-या शुल्का बाबतची माहिती मिळणेसाठी ठाणे, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली,उल्हासनगर,वसई-विरार, नवी मुंबई महानगरपालिका यांना पत्र देण्यात आलेले आहे. उक्त प्रकरणी ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकेकडे दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता इमारतीच्या मोकळ्या जागेत अथवा दुकानासमोर शेड उभारणेस परवानगी देणेबाबत त्यांच्या महानगरपालिकेने धोरण ठरविलेले नसल्याचे सांगण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिहम १९४९ व महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हॉटेल, सार्वजनिक हॉल व मंगल कार्यालयालगतच्या मोकळ्या जागेमध्ये वाणिज्य वापरासाठी वेदरशेडसाठी परवानगी देण्याची तरतूद नसल्यामुळे याप्रमाणे मंजूरी देणे उचीत होणार नाही असे प्रशासनाचे मत आहे.

सबब वरील प्रमाणेच अहवाल मा. महासभेत सादर

**ठराव क्र. :-**

**रहिवास वापराच्या इमारतीच्या टेरेसवर 11 महिन्याकरीता वेदरशेड टाकण्यास परवानगी देण्यात यावी व प्रत्येक 11 महिन्यांनी 3 वर्षापर्यंत त्याचे नुतनीकरण करण्यात यावे . नुतनीकरण करणेकरीता मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच 3 वर्षानंतर पुन्हा सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करुन वेदरशेड करीता परवानगी घेणे बंधनकारक राहिल असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- डॉ. प्रिती पाटील अनुमोदक :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम प्रकरण क्र. ११ मध्ये सगळ्या सदस्य पदाधिकारी आणि गटनेत्यांची मिटींग झाली होती आणि त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे हा दिलेला आहे तरी आपलं मत असेल तर हा ठराव मंजुर करुया. तुमचं काय मत आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग समिती गठीत झाली तेव्हा विकास आराखडयाचं काम होत आलं होत नंतरचा विकास आराखडा रद्द करण्यात आला. नविन विकास आराखडा तयार करण्याचे शासनाने निर्देश दिलेले आहेत. नविन नगररचना अधिकारी नेमून येणार आहेत. म्हणून हा विषय आता एवढ्या घाई गर्दीने करायची गरज नाही. माझे मत अजून आहे ह्या विषयावर की धोरण चांगले आहे. मात्र आपल्याकडे अजून आरक्षण किती ताब्यात आहे किंवा येणार आहे कारण लॅनीन्युचा विषय परत होणार आहे. नविन सर्व्हेक्षण करावं लागणार आहे तरी हा विषय सर्व काही झाल्यानंतर फेरसादर करावा प्रशासनाने.

**धृवकिशोर पाटील :-**

नविन डी.पी. तरी आला. महापौर मॅडम तर त्याच्यामध्ये एज्युकेशनसाठी प्लॉट उपलब्ध असणार आहेत. शैक्षणिक कामासाठी जागा आरक्षण केलेल्या आहेत. विशेष काही फरक पडणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

सुधारीतच होणार आहे. आहे ते असणारच आहे. अजून आपल्या समोर चित्र स्पष्ट नाही. तो अजून लखोट्यात बंद आहे. तो लिफाफा मी उघडू शकत नाही. बरोबर आहे शासनाने त्या लखोट्याला बंद ठेवायला सांगितल आहे तो आपल्याला नविन पध्दतीने करायचं आहे. हा विषय फेरसादर होवू जाऊ द्या. येऊ द्या काही हरकत नाही. फेरसादर झाला की चर्चा करु. नविन आराखडा तयार झाला की फेरसादर करु परत चर्चेला बसू.

**धृवकिशोर पाटील :-**

सर एवढी मेहनत करुन सगळ्यांनी मिटींग घेतल्या. त्याच्यावरती प्रशासनाने पण खूप मेहनत घेतली आणि जवळ जवळ बरेच पानांचा हे केलेलं आहे.

**मा. उपमहापौर :-**

आणि पूर्ण आरक्षण थोडी पुढच्या वर्षी बदलणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

संधी प्राप्त झाली आपल्याला की नविन विकास आराखडा तयार होणार आहे. रितसर चर्चा त्याप्रमाणे होऊ द्या.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम की हा विषय ठीक आहे. चांगला आहे पण माझे एक मत आहे की जी आपण आपल्या पालिकेची प्राथमिक शाळा आहेत त्यांना अपग्रेड करुन सेकंडरी सेक्शन दहावीपर्यंत करा आणि जे किती शाळा आहेत प्रायव्हेट स्कूल इज इट निड ऑर वॉन्ट हे आम्हाला गरजेचं आहे की नाही किती कॉलेजचे सर्व्हे केलेले आहेत. आम्हाला जरुरत आहे का याची गरज आहे का एवढे नविन शाळा बांधायच्या हायस्ट स्टॅन्ड हायस्ट युनिवर्सिटी काही तरी डिग्री कॉलेजेस जे गरज आहे ते करा ना. शाळा भरपूर आहेत. किती तरी शाळामध्ये विद्यार्थी कमी आहेत. आपल्या पालिकेतच बघा ना. १०,११,१२ असे प्रत्येक वर्गात आहेत हे ते अपग्रेड करा टिचर्स नाहीत. माशाचा पाडा तिकडे स्टॅन्डर्ड वन टू फाईव्ह फक्त तीन टिचर आणि ज्या दिवशी मी तिकडे गेली फक्त दोन टिचर दोन वर्गात. सगळी मुलं धावपळ करत आहेत. दोन टिचर दुसरे तीन वर्ग सांभाळत आहेत तर टिचर ग्रेशर नाही. हे सगळे तुम्ही लक्ष द्या ना. बेसिक एज्युकेशन जिथे द्यायचे आहे ते पहा.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम २६ एप्रिल २००७ में भी महासभा में ठराव क्र. ६० अ ऐसा हुआ था और समिती गठीत हूई थी। सेम विषय पे की उनका अहवाल लेके फिर किया जाएगा तो उस समिती कुछ अहवाल है क्या? क्या हुआ, उन्होने कैसा रिपोर्ट दिया उसके बारे में कई कुछ गोषवारा में नमुद नही है। तो पिछली समिती हम लोग जब महासभा में कोई भी ठराव करते है तो वो जब तक ठराव रद्द नही होता तब तक उसी पे अंमल होता है। तो वो जो समिती बनाई गयी थी। २६ एप्रिल २००७ को उस समिती ने क्या अहवाल दिया है। उस का उल्लेख किजीए या तो प्रशासन बताइए नही तो फिर उस समिती को रद्द करके यह ठराव लाया है। ऐसा कुछ गोषवारा में है नही तो हम लोग क्या समझेंगे दोनो समिती कायम है की उनका अहवाल क्या है, कैसे पता चलेगा। कमिशनर साहब मेरी जानकारी के अनुसार २६ एप्रिल २००७ में भी ऐसे ही ठराव हुआ है। और उसमें भी एक समिती बनाई गयी थी। उस समिती की अहवाल के आधार पे सब इस यह देने का काम होगा आर.जी. स्कूल को उनका अहवाल कहॉ है। उस समिती का क्या हुआ है। उस समिती को रद्द कर के यह समिती नई बनाई जा रही क्या कैसे कर रहे है उसके बारे में प्रशासन खुलासा करेगा तो अच्छा रहेगा।

**मा. आयुक्त :-**

कोई समिती रद्द करने का प्रस्ताव नही है। यह धोरण के लिए हमने रखा है। २००७ में समिती थी तो उस वक्त का कार्यकाल कम्पलीट करके रिपोर्ट लिया होगा उस पर अंमलबजावणी हुई होगी। लेकिन २००७ की समिती आज तक अस्तित्व ऐसा नही होगा।

**स्नेहा पांडे :-**

उनके रिपोर्ट का कही फिकर नही है। फिर ऐसे हम लोग अभी समिती बनेंगी उसपे विचारिविनिमय होगा। समय बरबाद होगा फिर यह टर्म बितने के बाद आप बोलेगे की यह समिती का मायने नही है। ठराव एक बार महासभा में हो गया। उस ठराव पे अंमल होना चाहिए। ऐसे ही कोई समिती यह अगर उसने कोई निर्णय लिया है तो उसमें भी कारवाई होनी चाहिए। उनका अहवाल होना चाहिए की पुरानी समिती में ऐसा ऐसा अहवाल दिया था। अभी उसके आगे नई समिती बनाऐंगे और उसमें विचार करके आगे काम होगा।

**निलम ढवण :-**

मा. आयुक्त साहेब त्यावेळी सन्मा. महापौर त्यांनी देखील अशी शिफारस ठराविक शाळांचे हे अलॉटमेन्ट केलं होतं. शाळेसाठी ती त्यावेळीच एवढ सगळ हे झालेलं असताना त्या समितीमधून त्यांचे म्हणणे हे बरोबर आहे. ते कॅन्सल न करता डायरेक्ट आपण पुन्हा तोच प्रस्ताव घेतो दुसरी गोष्ट आपण महानगरपालिका झिरो व्हॅल्यूमध्ये असे शैक्षणिक संस्थांना आपण जागा देवू शकतो का? मग त्याच्यावर पुढचा प्रश्न आहे. शैक्षणिक खाजगी संस्थांना महानगरपालिका आपली आरक्षित जी जागा आहे ती झिरो व्हॅल्यूमध्ये अलाऊट करु शकते का?

**मा. आयुक्त :-**

नाममात्र दराने देण्याची प्रोव्हिजन आहे. परंतु शासनाचं त्याला ॲप्रूव्हल लागेल.

**स्नेहा पांडे :-**

गोषवाऱ्यामध्ये आहे की महानगरपालिका पार्टनरशिपमध्ये करणार आणि खर्च शाळा करणार.

**रोहिदास पाटील :-**

शासनाच्या नियमानुसार जी रेडी रेकनरची व्हॅल्यु होईल त्यात शैक्षणिक संस्था जी असेल तर त्यांना २५ टक्के, ५० टक्के अशी नाममात्र आपण ठरवले की एक रुपये द्या तर एक रुपया द्या अशी तरतुद नाही.

**मा. आयुक्त :-**

शासन ठरवील त्या दराने.

**रोहिदास पाटील :-**

ज्या शैक्षणिक संस्था आहेत त्याची सगळी छाननी होते कधीपासूनची आहे, किती विद्यार्थी आहेत काय कार्यक्रम आहे. त्याच्यानंतर त्याला तशी सवलत दिली जाते.

**मा. आयुक्त :-**

शासनाच्या मान्यतेने ते दर देतील त्या दराने.

**निलम ढवण :-**

शासनाच्या दरानुसार मला वाटते इथे २५० गरीब, बी.पी.एल. खाली असणाऱ्या मुलांना फ्री शिक्षण पण २५० च्या २५० मुलांना तिथे शिक्षणासाठी जागा नाही मिळाली आणि तेवढी बी.पी.एल. च्या खालची मुले अडीचशे नाही मिळाली. जर तेवढी नसेल तर मग ती मोफत दिल्या सारखी नाही का? त्याचा फायदा काय.

**जुबेर इनामदार :-**

झालेल्या चर्चेनुसार तुम्ही ही होता. २५ टक्के नाही अपल्याला तशी मिळाली तर आपण पुढच्या टप्प्यावर जावू. त्याचा उल्लेख गोषवाऱ्यामध्ये झालेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

त्याला इलाज नाही बाहेरुन कुठून आणू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

बाहेरुन आणू शकत नाही. शहरातील घेऊ शकतो. ह्याच्यामध्ये त्याचा उल्लेख नाही झालेला आहे.

**निलम ढवण :-**

गोषवाऱ्यामध्ये आला असता तर आम्हाला देखील ती माहिती मिळाली असती. ह्याचे धोरण ठरवायचे आहे तर ह्या संदर्भातील व्यवस्थित सगळे मुद्दे टाकून आपण आता जे ठरले आहे त्याच्यात चर्चा झाली. तुमची परंतु गोषवाऱ्यामध्ये आलेले नाही आणि तुमच्या कमिटीमध्ये ती चर्चा झालेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

जेव्हा निर्णय घेतो तेव्हा आजच्या महासभेने जे काही विषय पारित केले तरी पण ह्या विषयाला महाराष्ट्र सरकारची परवानगी घेणे आवश्यक आहे आणि त्याच्यासाठी आपण जो आज निर्णय घेतो, ठराव करतो आता जो आम्ही ठराव करतो त्या ठरावाला आपण पाठिंबा दिला तर गोष्ट वेगळी पण आपण देत नाही स्पष्ट झाला. आमचा ठराव पास झाल्यानंतर पण हा आम्हाला शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावच लागेल आणि तिथून जे दिशा निर्देश येईल त्याप्रमाणे आपल्याला पुढे कारवाई करावी लागेल.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम ठराव होते वेळी आपल्या अधिकाऱ्याना नक्कीच याची जाणीव असायला पाहिजे. आपली असलेली आरक्षणातल्या जागा त्याचे क्षेत्रफळ ते कोणत आहे. प्राथमिक आहे, माध्यमिक आहे, हायर एज्युकेशन आहे. कारण चेंज ऑफ क्वीजमध्ये त्यानंतर बदली होणार नाही. जर प्राथमिक शाळेचा आरक्षण असेल आणि आता आपण मोघम आपण बोलतो ते चालु शकते. ते बांधु शकतात. असे होणार

नाही. जिथे प्राथमिक असेल तिथे प्राथमिकच तो चेंज होणार नाही. त्यामुळे आपण नविन विकास आराखडा ही बनवायचा शहराची गरज लक्षात घेऊन मग त्या पध्दतीची आरक्षण ठवेणे गरजेचे आहे हा ही मुद्दा लक्षात घ्या की प्राथमिक शाळा किती असाव्या, माध्यमिक किती असाव्या, उच्च माध्यमिक किती असाव्या आणि नी.धी. कोर्सेससाठी कशी आरक्षण ठेवणं गरजेचे राहिल. अदरवाईज आता आरक्षण बदलण सोप नाही. भावनात्मक विषय आपण मांडू किंवा ही शाळा आम्ही देतो २५ टक्के देणारी पण भेटतील पण नंतर त्या अडचणीत येतील.

**निलम ढवण :-**

आणि त्याचप्रमाणे हे जे शैक्षणिक ह्याच्यामध्ये अलॉटमेन्ट करणार. त्यावेळी एखादे शैक्षणिक क्षेत्रामध्ये असेल त्यांनाच पुन्हा रिपीट करु नये. इतर देखील सगळ्यांना संधी देण्यात यावी. आणि त्यामध्ये संधी तेव्हा द्याल की जे त्याच्यात काही नियम असतात. टेंडरमध्ये काही नियमावली असेल त्यामधील कडक जर असली तर त्यानुसारच ज्यांना पाहिजे असेल त्यांनाच मिळू शकेल तर त्या नियमावलीत देखील आपण काही तरी कमी हे करुन जास्त कठीण न ठेवता त्यानुसार त्याची विभागणी करण्यांत यावी अशी मी आपणाला विनंती करते.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम विना भाडे तत्वावर द्यायचा विषय मुळात महासभेसमोर हा विषय चुकीच्या पध्दतीने आलेला आहे. आपले २६ फेब्रुवारीला ठराव झाला होता. पदाधिकारी आणि आयुक्त यांची कमिटी बनणार आणि इतर जे आहेत ते सगळ सहाय्य करणार. गोषवारा आलेला आहे. त्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेब नाहीत. त्या मिटींगला जे लोक त्या कमिटीमध्ये नाहीत त्यांचा सुध्दा उल्लेख ह्या कमिटीमध्ये आलेला आहे. हे

**अनिल सावंत :-**

हे अधिनियम ३१ प्रमाणे आलेले आहे. मग ३१ प्रमाणे कमिटी अस्तित्वात आल्यानंतर त्याचे जे इतिवृत्त आहे ते स्टॅन्डिंग कमिटीला गेले पाहिजे. आणि स्टॅन्डिंग कमिटीकडून इथे यायला पाहिजे. बघा तरतुद काय आहे. ३१ वाचा. सचिव साहेब अधिनियम काय म्हणत आहे?

**नगरसचिव :-**

कलम ३१ मध्ये तदर्थ समित्यांची नेमणुक मध्ये दिलेले आहे. १. महानगरपालिकेस वेळोवेळी पालिका सदस्यांमधुन तिला योग्य वाटतील इतके पालिका सदस्य समाविष्ठ असलेल्या तदर्थ समित्या नेमता येतील. आणि तिला योग्य वाटतील असे ह्या अधिनियमांच्या प्रयोजनासंबंधी खास विषय त्यासंबंधी चौकशी करुन त्यावर प्रतिवृत्त सादर करण्याकरिता किंवा त्यावर अभिप्राय देण्याकरिता अशा समित्यांकडे पाठवता येतील. आणि अशा समित्या अशा कोणत्याही समितीचे प्रतिवृत्त स्थायी समितीमार्फत किंवा कलम ३० अन्वये रचना करण्यात आलेल्या विशेष समिती मार्फत सादर करण्यांत आले पाहिजे असा निर्देश देता येईल. असा निर्देश देता येईल असे म्हटलेले आहे. तसा निर्देश दिलेला नाही.

**अनिल सावंत :-**

कोण देणार?

**मा. उपमहापौर :-**

तदर्थ समितीच्या याच्यात पण नाही.

**अनिल सावंत :-**

तदर्थ तर आपली येत नाही ना. अस्तित्वात नाही.

**मा. उपमहापौर :-**

आणि दिलेच पाहिजे असे नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब गोष्ट अधिनियमामध्ये करायलाच पाहिजे असं नसत त्यामध्ये नियम असतात त्या नियमाप्रमाणे ते व्हायला पाहिजे. त्यानंतर विना भाडेतत्वावर मगाशी जो ताईने विषय काढला विनाभाडे तत्वावर जॉईंट वेन्चर हा नविन शब्द आलेला आहे. पालिका आता जॉईंट वेंचर होणार आहे. प्रायव्हेट लिमिटेड कंपनी जॉईंट वेंचर तुम्ही केला आणि एखादी शैक्षणिक संस्था दिवाळखोरीत गेली त्याला जबाबदार कोण? त्यांचे दायित्व पालिका भरणार आहे का? २५ टक्के प्रवेश दारिद्र रेषेखालील मुलांना ह्या शाळांनी द्यायचे आहे. आज जी शाळांची आरक्षण आहेत त्या ठिकाणी १० टक्के आणि ज्या शाळा मालमत्ता करामध्ये ५० टक्के आपण सवलत देतो. आणि मालमत्ता मुल्य सुध्दा आपण रेसिडेन्शीअल प्रमाणे लावतो. कमर्शियलप्रमाणे लावत नाही. आणि आता तर गेल्या बजेटच्या दरामध्ये अशी तरतुद करण्यांत आलेली आहे की सरसकट सर्व शाळांना ५० टक्के मालमत्ता करात सवलत द्यावी आणि त्यांना ज्या ठिकाणी १०

टक्के रिझर्व्हेशन पालिकेसाठी म्हणजे बी.पी.एल साठी पालिकेने रिकमेन्ड केलेल्या विद्यार्थ्यांसाठी, नगरसेवकांनी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे कम्पलसरी आहे म्हणजे रिझर्व्हेशन किती झालं २० टक्के ऑलरेडी आहे. या २० टक्के मधून आजपर्यंत किती शाळांमध्ये प्रवेश मिळाला आहे याची मी माहिती गेल्या दोन महिन्यांपासून मागत आहे. डिपार्टमेंट जवळ माहिती नाही आणि ते २० टक्के परत हे ॲडिशनल २५ टक्के याला जबाबदार कोण? आज आपण म्हणत आहेत की भुखंड देऊन टाकायचा आणि त्याच्यावर त्यांनी शाळा बांधायच्या त्याच्यामध्ये २५ टक्के प्रवेश बी.पी.एल खाली मुलांना मिरा भाईंदर शहरामध्ये बी.पी.एल. कुटुंब किती आहेत. साधारण ३५०० किंवा ३६०० कुटुंब त्यांचा काही अभ्यास नाही. ह्या शहरामध्ये खरोखरच शाळांची कुठे गरज आहे. कुठच्या शाळांची गरज आहे. पदवीधर अभ्यासक्रम ह्या शहरासाठी पाहिजे की नाही आज मुलांची परिस्थिती बघा. १० वी झाल्यानंतर, १२ वी झाल्यानंतर शहरामध्ये जावे लागते. प्रवास करणे मुलांना कठीण झाले आहे. का तर हायर एज्युकेशनच्या शाळा आपल्या शहरामध्ये महाविद्यालय कमी आहेत. आज ही शहराची परिस्थिती आहे. आज शाळा किती आहेत. आर.टी.ई. खाली तुम्ही ९४ शाळांची लिस्ट दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त एवढ्या शाळा आहेत गेल्या आठवड्यामध्ये एक शाळा मुलं नाहीत म्हणून बंद झाली. मिरारोडमध्ये एक शाळेची परिस्थिती मोठे कॉलेज आहेत, प्रायमरी पासून कॉलेजपर्यंत आहे. आज त्यांच्याजवळ नर्सरी, ज्युनिअर, सिनिअर केजीसाठी मुले नाहीत.

**मर्लिन डिसा :-**

रिना मेहता स्कूल बंद झाली आहे.

**अनिल सावंत :-**

अशी गरिब मुलांसाठी आपण काय ठरवणार आहोत. २५ टक्के समजा मिळाले नाही. मग आपण गरिब विद्यार्थ्यांना देणार आहोत मग तोपर्यंत त्यांचे ॲडमीशन प्रोसेस कम्पलीट झालेले असेल. मग ती मुले वाट बघत राहणार आहेत का? मगाशी त्या शाळेचा विषय निघाला कित्येक अशा शाळा आहेत त्या आपल्याला ॲडमिशन देत आहेत असे किती भुखंड आहेत? मिरारोडला रॉयल कॉलेज तिथे मुलं नाहीत. दुसरी परिस्थिती अशी आहे विकास आराखडा आपला बनतोय त्याच्यामध्ये आपल्याला व्यवस्थित प्रोव्हिजन करता येईल की कुठच्या ठिकाणी आपल्याला हायर एज्युकेशनच्या इन्स्टीट्युट पाहिजे आहेत. आज मिरारोडमध्ये भुखंड आहे. प्लेझेंट पार्कला मोठा भुखंड आहे. मला वाटतं पालिकेच्या ताब्यात आलेला आहे. शैक्षणिक भुखंड आयुक्त साहेब प्राथमिक शाळेसाठी तो भुखंड आहे त्याच्या आजुबाजुला १२ शाळा आहेत. मग त्या ठिकाणी भुखंड परत आपण प्राथमिक शाळेसाठी देणार आहोत का? आणि ह्याच्यामध्ये म्हटलं आहे की ५० टक्के ताब्यात आलेली भुखंड विकास आराखडा नियमावलीमध्ये ही तरतुद आहे का? ५० टक्के भुखंड ताब्यात आला असेल तर ते आरक्षण आपण देऊ शकतो, साहेब ह्यापूर्वी असे घडलेलं आहे गार्डन डेव्हलपमेंट करण्यासाठी आपण ठराव केलेला आहे. ५० टक्के, ३० टक्के आपल्याला ताब्यात असेल तर ते गार्डन मेनटनन्स करायला द्यायचे. टेंडर निघाले, संस्था पुढे आल्या, संस्थेने पैसे भरले, डी.डी. दिले आणि महापालिकेने ते डिमांड ड्राफ्ट रिटर्न केले कारण शंभर टक्के आरक्षण ताब्यात आले नाही हे कारण देण्यांत आले. मग आज आपण ५० टक्के आरक्षण असलेला भुखंड ताब्यात देणार आहोत. ताब्यात आलेल्या कुठल्या आधारावर पुढील दहा वर्षात आता नविन आराखडा बनतोय. त्यांनी एक रिपोर्ट बनवला आहे. आरोग्य खात्याने त्यानुसार पुढील दहा वर्षात ह्या शहराची लोकसंख्या जवळ-जवळ २५ ते ३० लाखापर्यंत पोहोचणार आहे. येत्या १० वर्षामध्ये मग त्यावेळी ह्या शहराला नक्की कशाची गरज आहे. तांत्रिक शाळा, प्राथमिक शाळा, विद्यालये, इंजिनिअर कॉलेज, मेडीकल कॉलेज, आय.आय.टी. कॉलेज ह्या शहरामध्ये होऊ द्या ना. मस्तपैकी जशी ज्युडीशल ॲकेडमी झाली आहे तसे आय.आय.टी. कॉलेज होऊ दे. किती प्राथमिक शाळांना परवानगी द्यायची ह्या सर्व गोष्टींचा साहेब विचार करा असे व्हायला नको. ठराव बनवायचा आणि कुठल्यातरी टेक्नीकल ग्राऊंडवर अडकला जायचा किंवा विखंडीत करायला पाठवला जायचा. सविस्तर प्रस्ताव घ्या. नविन डी.पी.आर बनतो तो नविन डी.पी.आर बनल्यानंतर तो विषय पुढे घ्या.

**हसमुख गेहलोत :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करण्यासाठी दि.२६/०२/२०१८ रोजीच्या महासभेत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मा.महासभेने ठराव क्र.७९ अन्वये तदर्थ समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेतला. मा. महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.७९ अन्वये गठीत समितीची बैठक महापौर यांच्या दालनात दि.१५/०३/२०१८ रोजी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालील पदाधिकारी / अधिकारी उपस्थित होते.

श्रीम. डिम्पल मेहता                महापौर

| | |
|---|---|
| श्री. चंद्रकांत वैती | उपमहापौर |
| श्री. ध्रुवकिशोर पाटील | सभापती, स्थायी समिती |
| श्री. रोहिदास पाटील | सभागृह नेता |
| श्री. राजु भोईर | विरोधी पक्ष नेता |
| श्री. हसमुख गेहलोत | गटनेता, भाजपा |
| श्री. हरिश्चंद्र आमगांवकर | गटनेता, शिवसेना |
| श्री. जुबेर इनामदार | गटनेता, राष्ट्रीय काँग्रेस |
| श्री. शिवाजी बारकुंड | शहर अभियंता |
| श्री. श्रीकांत देशमुख | सहाय्यक संचालक नगररचना |
| श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| श्री. भास्कर बाबर | शिक्षण अधिकारी |
| श्री. सुरेश देशमुख | प्रशासन अधिकारी |
| श्रीम. सई वडके | विधी अधिकारी |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकास करण्यासाठी उपस्थितासमोर प्रशासनामार्फत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. सदर बैठकीत चर्चा होऊन ठरविलेल्या धोरणाचा मसूदा आयुक्त त्यांच्या अभिप्रायासह गोषवाऱ्यात नमूद करून सादर केलेला आहे.

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून शहराची सन २०११ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या ८.१४ लक्ष एवढी आहे. सद्यस्थितीतील लोकसंख्या सुमारे १२ लक्ष एवढी असून लोकसंख्या वाढीच्या दरानूसार सन २०३६ या वर्षात सुमारे २८.५० लक्ष एवढी लोकसंख्या होण्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीमध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने महानगरपालिकेमार्फत व खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आल्या आहेत. अस्तित्वातील शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने प्राथमिक, माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षणासाठी आहेत. शहराची सध्याची लोकसंख्या व भविष्यातील वाढणाया लोकसंख्येचा विचार करता प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाच्या दर्जेदार व पुरेशा शैक्षणिक सुविधा विकसित होणे शहराचे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जरूरीचे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या सुविधा करणेसाठी सर्वकष असे शैक्षणिक प्रयोजनाचे आरक्षित भूखंड / बांधिव सुविधा वितरीत व विकसनाचे धोरण असणे जरूरीचे झाले आहे. मा. महासभा खालीलप्रमाणे धोरण निश्चित करीत आहे.

**१) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड / बांधिव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरणाची आवश्यकता**

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंड/ बांधीव सुविधा वितरण व विकसनाकरिता सद्यस्थितीत असलेल्या धोरणातील नमुद तरतूदी व्यवहार्य, प्रभावी व परिपूर्ण नसल्याने शहरामध्ये शैक्षणिक सुविधा अपेक्षित प्रमाणात विकसित होऊ शकल्या नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शैक्षणिक संस्थाना शहरामध्ये शैक्षणिक सुविधा विकसित करणेसाठी आकर्षित करणे जरूरीचे आहे. दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित होणेकरिता पुढील मुलभूत बाबी अंतर्भूत असलेले सर्वकश व प्रभावी धोरण असणे जरुरीचे आहे.

१.१ निकोप व वाजवी स्पर्धात्मक भूखंड/सुविधा वितरणाकरीता, व्यापक प्रसिध्दीव्दारे दर्जेदार व अनुभवी शैक्षणिक संस्थाना संधी देणे.

१.२ शैक्षणिक संस्थाना सुविधा विकसित करणे व शाळा/महाविद्यालय चालविणे आर्थिक दृष्ट्या सुसह्य व्हावे म्हणून अधिनियमातील तरतुदीनुसार भुखंड वितरीत करणे.

१.३ मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले भुखंड शैक्षणिक संस्थाना भाडेपट्टीने न देता सदर संस्थासोबत संयुक्त उपक्रम करून (Joint Venture) शाळांची बांधकामे शैक्षणिक संस्थाच्या खर्चाने करुन घेणे व सदर शाळेत महानगरपालिकेमार्फत एकुण विद्यार्थी संख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केलेल्या गरीब विद्यार्थ्यांना देऊन त्यांना निशुल्क शिक्षण देणे, (सदर विद्यार्थ्यांना गणवेश, दफ्तर, बुट, पुस्तके, वह्या, इ. वर शैक्षणिक वर्षांत लागणारा इतर सर्व खर्च हा पालकांनी करावा) व गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे.

१.४ सदर भुखंड १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी शाळा बांधण्यासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय बांधणेसाठी वितरीत करणे.

**२) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड/बांधीव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरण**

**१.१ वितरणाची कार्यपध्द्ती**

नगररचना विभागाकडुन शैक्षणिक प्रयोजनासाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान तसेच माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणातील एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५०% च्या जवळपास ताब्यात आलेल्या भुखंडाची यादी उपलब्ध करुन सदर भुखंडाचा विकास व बांधिव सुविधाबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव तयार करण्यात येईल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शाळा व खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी आरक्षणाच्या एकुण क्षेत्राच्या ५०% पेक्षा जास्तीच्या क्षेत्राचे आरक्षण मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

१.१.१ नगररचना विभागाकडून शैक्षणिक प्रयोजनाच्या आधारित भुखंडाची व बांधीव सुविधांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१.१.२ प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध असलेले व शिक्षण विभाग यांना आवश्यक नसलेले भुखंड/सुविधा तसेच माध्यमिक शाळा, महाविद्यालय व व्यावसायिक शिक्षणांकरिता राखीव भूखंड/सुविधा यांची यादी जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त किमान तीन वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. यापैकी एक वृत्तपत्र स्थानिक व दोन राज्यस्तरिय असेल. इतर भाषिक शाळांकरिता राखीव भूखंड/सुविधा करिताची जाहिरात संबंधीत भाषेतील एका वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त खासगी नोंदणीकृत शैक्षणिक संस्थाकडून अर्ज मागविले जातील. असे अर्ज आयुक्तांनी मंजूर केलेल्या विहित नमुन्यात असतील. सदर कामासाठी संगणक प्रणाली व ऑनलाईन वर प्रसिध्दी देण्यात येईल.

१.१.३ नमुद केलेले पात्रतेचे निकषांची पूर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्था असे अर्ज करण्यास पात्र राहतील.

१.१.४ आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (मु.), शहर अभियंता, सहा.संचालक नगररचना, शिक्षण अधिकारी, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, विधी अधिकारी, मुख्यलेखापरीक्षक, मुख्यलेखाधिकारी असे सभासद असलेली समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करतील. या समितीचे सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे काम पाहतील.

१.१.५ समितीचे सचिव या नात्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे समितीचे निर्णय नमुद करतील, आयुक्तांची मंजूरी घेतील व महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी सादर करण्याचा योग्य प्रस्ताव तयार करतील. सदर प्रस्तावात विशिष्ट शिफारशी असतील.

**२.२ शैक्षणिक संस्थाचे पात्रता निकष**

२.२.१ भुखंड उपलब्ध होणेसाठी अर्ज करणारी संस्था मुंबई सार्वजनिक विश्र्वस्त अधिनियम १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५०) आणि किंवा संस्था नोंदणी अधिनियम (सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६०) खाली नोंदणीकृत असावी.

२.२.२ संस्थेकडे शैक्षणिक उपक्रम चालविण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

२.२.३ आवश्यक फर्निचर, साधने यासह शाळेची इमारत बांधण्याकरीता संस्थेचे आर्थिक स्थिती चांगली असावी. संस्थेने आपली आर्थिक स्थिती दर्शविणेकरीता अगोदरच्या तीन वर्षातील कामगिरीचे परिक्षित आर्थिक ताळेबंद (Audited Financial Results) सादर करावेत.

२.२.४ संस्थेकडे शाळा चालविण्याकरीता होणारा खर्च करण्याची क्षमता असावी.

२.२.५ संस्थेची अगोदरच्या तीन वर्षाची शैक्षणिक कामगिरी समाधानकारक असावी. सदर शैक्षणिक कामगिरी शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, विद्यापिठ परिक्षांच्या निकालानुसार पाहिली जाईल व संबधित निकाल हा मागील तीन वर्षाकरीता किमान ८० टक्के इतका असणे आवश्यक राहील. एका संस्थेला जास्तीत जास्त १ भूखंडाचे वितरण केले जाईल.

**३) अटी व शर्ती**

३.१ महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात येणाया भुखंडाबाबत इच्छुक व पात्र संस्थेसाबत संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने करारनामा करण्यात येईल.

३.२ शैक्षणिक संस्थेला भूखंड स्वखर्चाने विकसित करावा लागेल.

३.३ संस्थेला शैक्षणिक उपक्रम सुरू करण्याकरिता राज्य शासनाची, केंद्र शासनाची मंजूरी मिळवावी लागेल व शिक्षण संचालकांनी अथवा तंत्रशिक्षण संचालक अथवा विद्यापिठाने मंजूर केलेल्या शिक्षण संहितेचे पालन करावे लागेल.

३.४ शैक्षणिक उपक्रमाच्य इमारतीचे बांधकामांकरीताचे नकाशे मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुसंगत असावेत व त्याकरिता नियमावलीत नमूद सर्व परवानग्या घेणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे बांधकाम करणे आवश्यक राहील.

३.५ शैक्षणिक उपक्रमाच्या इमारतीचे बांधकाम आराखडे मंजूर झालेल्या व काम सुरू करण्याचे प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून ३ (तीन) वर्षाच्या आत पूर्ण करणे.

३.६ विशिष्ट तीन वर्षाच्या कालावधीत अथवा आयुक्तांनी मंजूर केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार वाढविलेल्या कालावधीत संस्थेने इमारत बांधली नाही तर संस्थेबरोबरचा करार तीन वर्षानंतर आपोआप रद्द होईल व भूखंडाचा/सुविधेचा ताबा संबधितांना कोणताही खर्च न देता महानगरपालिका घेईल.

३.७ प्रत्येक वर्षी शाळेत द्यावयाचे प्रवेश शासनाच्या नियमानुसार असावेत. राज्य व केंद्र शासनाचे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३.७.१ जात, वर्ण, लिंग, धर्म तसेच ज्या परिसरातून विद्यार्थी येतात हे विचारात न घेता, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश खुला राहील.

३.७.२ स्थानिक अथवा इतर सर्व कर संस्थेने नियमित व विहीत मुदतीत अदा करणे बंधनकारक आहे.

३.७.३ संस्थेला देण्यात आलेला भुखंड /बांधीव सुविधा या करीता आयुक्तांनी विहीत केलेले महानगरपालिकेचे सर्व कर / आकार/ शुल्क संस्थेकरिता लागू होतील. ते वेळेत भरणे भरणा करणे बंधनकारक राहील.

३.७.४ बांधलेल्या शाळेतील शिकविण्याचे माध्यम मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दु अथवा दुसया कोणत्याही मान्यताप्राप्त भाषा असतील. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये मराठी विषय अनिवार्य असेल.

३.७.५ वरील अटी व शर्तीत काहीही अंतर्भूत असले तरीही आयुक्तांना भुखंडावर, इमारतीत पाहणी करणेकरीता प्रवेश व हक्क असेल. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टाकरीता भुखंड वापरण्याचा हक्क राहील. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टांकरीता जागा, भुखंड वापरला गेल्यास संस्थेने महानगरपालिकेला कोणतेही शुल्क/भाडे/किंमत आकारू नये.

३.७.६ ज्या संस्थेस भुखंड देण्यांत आलेला आहे अशा संस्थेस जमिन विकसित करणे शक्य न झाल्यास सदर जमिन दुसया शैक्षणिक संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळणार नाही व मुळ भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात परत करावा लागेल.

३.७.७ ज्या संस्थेला अनुज्ञप्तीधारक म्हणुन भुखंड/इमारत दिली आहे अशा संस्थेला भुखंड/इमारत दुसया कोणत्याही संस्थेस कोणत्याही पध्दतीने अंशतः अथवा पुर्णपणे पोटभाडेपट्टीने देता येणार नाही किंवा हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच त्याच्या वतीने कोणत्याही पध्दतीने शैक्षणिक उपक्रमाची व्यवस्था पाहण्याकरीता दुसया संस्थेला नेमता येणार नाही.

३.७.८ मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वापरासाठी दिलेले भुखंड त्याच संस्थेला त्याच कारणासाठी वापरता येईल. त्या वापरात बदल केल्यास भाडेकरार आपोआप रद्द होऊन जागा आहे त्या स्थितीत मनपाच्या ताब्यात आली आहे, असे समजण्यात येईल व मनपा तातडीने अशी जागा / मालमत्ता ताब्यात घेईल.

३.७.९ करारनाम्याचा कोणत्याही अटीचा भंग झाल्यास, कोणतीही गैरकृती केल्यास महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानुसार संस्थेला दिलेली जमिन रद्द करण्यात येईल व सदर जागेतून संस्था रिक्त करून भुखंडाचा/इमारतीचा अथवा दोन्हींचा ताबा घेण्याचे स्वातंत्र्य आयुक्तांस राहील. तसेच याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

३.७.१० शैक्षणिक संस्थाना भुखंड वितरीत करताना बांधकाम पुर्ण होऊन शाळा सुरु होईपर्यंत कामासाठी घ्यावयाची बँक गॅरंटीची रक्कम ही १ चटईक्षेत्रात सदर शाळा इमारत बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५०% रक्कम घ्यावी. सदर रक्कम काम पुर्ण झाल्यावर टप्प्याटप्प्याने परत करण्यात यावी.

३.७.११ मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेत शाळासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर विकासकास परवानगी देण्यापुर्वी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात यावी व तद्नंतरच बांधकाम परवानगी देण्यात यावी.

३.७.१२ आरक्षणांवर बांधकाम नकाशा मंजुरीनुसार एक चटई क्षेत्रात उपलब्ध होणा-या एकुण पटसंख्येच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे.तथापि नवीन शाळा असल्याने प्रथमत विद्यार्थ्यी उपलब्ध झाले नाहीत तरी मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या एकूण पटसंख्येच्या किमान १० टक्के विद्यार्थ्यांना मनपाच्या शिफारशीवरुन प्रवेश देणे बंधनकारक राहील.

३.७.१३ सदर शाळा, महाविद्यालय बांधकाम पुर्ण होऊन झाल्यावर ५ वर्षानंतर एकुण मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या पटसंख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केल्यानुसार देणे बंधनकारक राहील.

३.७.१४ एखादया संस्थेने काम सुरू केल्यानंतर मध्येच बंद केल्यास अथवा बांधकाम सुरू केलेले नाही, तर महानगरपालिकेकडून प्रवेशासाठी दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदर संस्थेची बॅक गॅरंटी जप्त करून जागा ताब्यात घेण्यात यावी.

३.७.१५ सदर शाळा, महाविद्यालय बांधकामासाठी संस्थेने बँकेतून कर्ज घेतल्यास सदर कर्जासाठी महानगरपालिकेने दिलेला भुखंड, इमारत, फर्निचर तारण म्हणुन ठेवता येणार नाही.

३.७.१६ सदर शाळा, महाविद्यालय संदर्भात सदर संस्थेने इतरांसोबत करारनामे करावयाचे असल्यास आयुक्त, महानगरपालिका यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

**खाजगी संस्था/विकासकामार्फत आरक्षण विकसित करण्याबाबतची कार्य पध्दती**

४.१ मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी आहे. सदर शिक्षणासाठी उपलब्ध असलेली आरक्षणे विकसित करण्याचा पहिला अधिकार महानगरपालिकेचा आहे.

४.२ खाजगी संस्था / विकासक यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५० % पेक्षा जास्त जागा ताब्यात असल्यास व त्यांची आरक्षण विकसित करावयाची इच्छा असल्यास महानगरपालिकेची (महासभा) पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४.३ एखादा जागा मालक / विकासक खाजगी संस्था यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ७०% पर्यंत जागा ताब्यात असल्यास व त्यांनी सदर आरक्षण विकसित करण्याची महासभेची परवानगी घेतली असल्यास सदर आरक्षणाची उर्वरित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असेल तर खालीलप्रमाणे जागा देण्याची कार्यवाही करावी.

४.३.१ आरक्षणाची ७०% पेक्षा जास्त जागा मालकाच्या ताब्यात असेल तर सदर संपुर्ण आरक्षण विकसित करण्यासाठी सदर आरक्षणातील महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत जागा सदर जागा मालकास द्यावयाची असल्यास रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या १२५% नुसार रक्कम घेऊन अथवा ज्या क्षेत्राचा भुखंड द्यावयाचे तेवढ्या रक्कमेचा मनपा क्षेत्रात भुखंड व २५% रक्कम रेडी रेकनर नुसार घेऊन देण्याची कार्यवाही करावी.

४.३.२ सदर बदली जागा ही ज्या क्षेत्रात बांधकामास बंदी आहे, सी.आर.झेड क्षेत्र आहे. त्या ठिकाणी घेण्यात येऊ नये, तसेच जागा मालकास ज्या ठिकाणी उर्वरीत शाळेचा भुखंड देण्यात येणार आहे. त्या ठिकाणी असलेले रेडी रेकनरचे दर व नविन बदली जागेचे रेडी रेकनर दर यांची तुलना करुन त्यानुसार रक्कम जमा करुन घ्यावी.

४.३.३ शाळा, महाविद्यालय आरक्षण विकसित करण्याचा प्रथम अधिकार हा महानगरपालिकेचा राहील.

४.३.४ ७०% पेक्षा कमी क्षेत्राचे शाळा भुखंड असल्यास व जागा मालकास सदर आरक्षण विकसित करावयाचा असल्यास सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

५) किमान अर्हतांची पुर्तता केलेल्या व स्पर्धात्मक वितरण निविदेंमध्ये सहभागी झालेल्या एकापेक्षा अधिक शैक्षणिक संस्थाचे प्रस्ताव सारखेच असल्यास तर खालील निकषानुसार संस्थेची निवड करण्यात येईल.

(अ) ज्या संस्थेच्या नोंदणीचा दिनांक अगोदरचा असेल.

(ब) जी संस्था स्थानिक असेल.

(क) ज्या संस्थेचे वार्षिक आर्थिक ताळेबंद नियमित असतील व मालमत्ता चांगली असेल.

(ड) ज्या संस्थेचे अधिक शैक्षणिक उपक्रम असतील.

**<u>६) भुखंड वितरित करण्यांसाठी प्रशासकीय मंजुरी</u>**

निवड झालेल्या शैक्षणिक संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा देणकरीता मा. महासभेची मंजुरी प्राप्त झाल्यावर संबंधित संस्थेने विभाग प्रमुख (मिळकत व्यवस्थापक विभाग) यांचे समन्वयाने महानगरपालिकेसोबत विहित नमुन्यातील करारनामा करणे बंधनकारक राहील. करारनामा केल्यानंतर सदर संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत करणेत येतील.

७) शैक्षणिक संस्थाना संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने भुखंड वितरीत करताना ३० वर्ष मुदतीसाठी करारनामा करण्यात यावा, पुढील कालावधी हा महानगरपालिकेच्या मान्यतेने वाढविण्याची अट राहील. महानगरपालिकेने मुदतवाढ न दिल्यास इमारतीसह जागा ताब्यात घेण्यात यावी.

८) सदर धोरणानुसार विकसित होऊन सुरु झालेल्या शाळा मधील प्रवेशाबाबत व शिक्षणाच्या दर्जाबाबत महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे नियंत्रण राहील.

९) सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याचे सर्व प्रशासकीय अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत असून त्यांनी धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व आवश्यक पुढील कार्यवाही पार पाडावी.

१०) वरील धोरणानुसार संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने शाळा विकसित केल्यास त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार प्रवेश दिल्याने सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळामध्ये विद्यार्थ्यावर होणाऱ्या खर्चात बचत होणार असून गरीब विद्यर्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळुन त्यांच्या शिक्षणाचा दर्जा हा उंचावणार आहे. सदर शाळेचे भुखंड संस्थांना भाडयाने दिले असते तर त्याचे चालु बाजारभावानुसार मिळणारे भाडे व सदर संस्थामार्फत महानगरपालिकेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांवर केला जाणारा खर्च पहाता (महानगरपालिकेच्यामार्फत सदर विद्यार्थ्यांवर खर्च केला जातो तो पहाता) महानगरपालिकेचा आर्थिक फायदा व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.

वरील धोरणास मंजुरी देण्यात येत आहे.

**रवि व्यास :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आम्हाला भगवतींची आठवण झाली. मागच्या टर्ममध्ये भगवती शर्मा होते. अशीच गाडी चालायची फास्ट विरोधाभास बघा मॅडम उपमहापौर साहेब होली क्रॉस संस्थेला पैसे घेऊन आपण मैदान दिले. ३० लाख रुपये पालिकेने घेतले. बाकी चौकशी करायला आपण १५ वर्षांनी चौकशी करतो. आणि आज हे भुखंड आपण फुकट वाटत आहोत. मिरारोडमध्ये दालमिया स्कुल आहे. त्यांनी फुकटच घेतलं. शैक्षणिक २५ टक्के मुलांना ॲडमिशन दिली. समजा पेणकरपाड्यामधील २५ टक्के मुलं गेली. २५ टक्के मुलांना ॲडमिशन दिल्यानंतर पुढे काय. आज त्या शाळेचा अंदाजे महिन्याचा खर्च एका मुलाचा कमीत कमी ७५०० ते ७००० रुपये आहे. शैक्षणिक फी सोडून इतर क्लासेस मग त्या मुलांनी करायचे काय? पेणकर पाड्यातील २५ टक्के मुल जर त्या ठिकाणी गेली तर त्यांनी करायचे काय? ते त्या संस्थेमध्ये शिक्षण घेऊ शकतात का? समजा आपण प्रवेश जरी दिला तर वैती साहेब सांगा खरोखरच आपली प्रामाणिक इच्छा असेल मुलांसाठी काही करायची. वेगळ्या पध्दतीने करा. ह्या ठरावाचा काही उपयोग होणार नाही. भुखंड फुकटचे श्रीखंड होईल आणि त्यांच्या घशात जातील. प्रकरण क्र. ११ च्या ठरावाचे वाचन करतो. **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये असंख्य तृटी असून या मध्ये शहराच्या हिताच्या दृष्टीने सखोल विचार करण्यात आलेला नाही . या बाबत गठीत करण्यात आलेल्या समितीने दिलेल्या आहवालातील शिफारशीनुसार हे भूखंड वितरीत केल्यास मोठया प्रमाणावर अनियमिता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातील ठळक बाबी खालील प्रमाणे.**

**1)भूखंड शैक्षणिक संस्थांना भाड्याने न देता फक्त 25% मुलांना प्रवेश व त्यांचा खर्च करण्याची अट घालण्यात आलेली आहे 250 मुले प्रत्येक शाळेला प्रत्येक वर्षी मिळतीलच याची शास्वती काय मग पालिकेचे नुकसान होणार.**

**2)गरीब विद्‌यार्थ्यांची व्याख्या काय ? अशी किती कुटुंबे मनपा क्षेत्रात आहेत व दरवर्षी किती मुले या शाळांमध्ये जाणार आहेत याचा उल्लेख अहवालात नाही पालिकेजवळ याची माहिती आहे का?**

**3)महापालिकेची कोणतीही वस्तु/जागा भाड्याने देतेवेळी प्रचीलीत बाजारभाव मूल्याप्रमाणे भाड्याने देता येते परंतु हे भूखंड भाडेतत्वावर न देण्याची शिफारस अहवालात केलेली आहे त्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.**

**4)शहरामध्ये असे किती भूखंड आहेत जे वितरीत करण्यात येतील याची यादी देण्यात आलेली नाही**

**5)मीराभाईंदर महानगरपालिकेचा विकास आराखडा तयार करण्याचे काम चालू असुन त्याबाबत असंख्य तक्रारी आल्यामुळे प्रारूप विकास आराखडा रद्द केल्याची घोषणा नगरविकास राज्यमंत्री डॉ . रणजीत पाटील यांनी विधानसभा अधिवेशनात केली आहे.**

**6)नवीन विकास आराखड्यात शैक्षणिक प्रयोजनासाठी कोणते भूखंड आरक्षित आहेत याची माहिती गुलदस्त्यात आहे. काही लोकांना ती अगोदरच कळली असल्याची दाट शक्यता या प्रस्तावामुळे येते**

**7)मीरा-भाईंदर महानगरपालिकेचा नवीन विकास आराखडा तयार करण्या साठी सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक राज्यशासन करणार आहे.**

**8)मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये किती शाळा आहेत ?,कोणत्या माध्यमाच्या आहेत?, कोणता बोर्ड आहे? याचा काहीच उल्लेख गोषवाऱ्यात नाही.**

**9)मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्या शाळांची गरज आहे ?, हि गरज कुठे आहे ?, उच्च शिक्षणाच्या कोणत्या माध्यमानची गरज आहे?, याचा काहीच उल्लेख गोषवाऱ्यात नाही.**

**10)50% ताब्यात आलेले आरक्षित भूखंड देण्याची तरतूद विकास आराखडा नियमावलीत आहे का?.**

**11)पुढील 10 वर्षात या शहराची लोकसंख्या 25 ते 30 लाखा पर्यंत जाणार आहे . त्यावेळी या शहराला कशीची गरज आहे . प्राथमिक शाळा ,तांत्रिक शाळा ,विध्यालये,इंजिनिअरींग कि मेडिकल विध्यालये याचा विचार कोण करणार? याचा कोणताही उल्लेख अहवालात नाही.**

**12) सदर अहवाल पूर्वीच्या विकास आराखड्याला लागू असणार कि नव्या विकास आराखड्याला लागू होणार याचा उल्लेख अहवालात नाही.**

**13) या पूर्वी 2007 साली या विषयी समिती गठीत करण्यात आली होती त्या समितीने शिफारस केल्याप्रमाणे 4 आरक्षणे भाडे तत्ववावर देण्यात आली होती. त्याचे पुढे काय झाले.? ती समिती अस्तित्वात आहे का . याचा उल्लेख अहवालात नाही . तरी या सर्व गोष्टींचा साकल्या ने विचार करून मीराभाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भूखंड वितरीत व विकसीत करण्यासाठीच्या धोरनाला स्थगिती देण्यात यावी न नवीन विकास आराखडा तयार व मंजूर झाल्यानंतर सदर विषय सविस्तरपणे मा. महासभे समोर आणावा असा मी ठराव मांडत आहे.**

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

माझी ह्या ठरावामध्ये एक सुचना आहे. जो अनुभव सांगितलेला आहे. ते ५० चे का शैक्षणिक संस्थेला आणि ५० टक्के नविन लोकांना पण संधी द्या. कारण कोणी एखादा व्यक्ती जर तो इंटरेस्टेड आहे ह्याच्यासाठी.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहबने जो बोला अभी जो यह नविन सोच लाई है। यह इम्पलीमेंट के लिए १०-१२ साल लगते है। या उससे ज्यादा भी वक्त लगेगा। लेकिन कही से न कई कोई भी शुरुवात करना चाहिए। उसमें उस वक्त आपका भी यह विषय लिया जाएगा।

**स्नेहा पांडे :-**

ठिक है लेकिन कोई अगर नया इंटरेस्ट है तो उसका भी ध्यान में रखना चाहिए। आपकी जो शर्त है। वह उसको मान्य होना चाहिए। लेकिन अनुभव जरुरी है ऐसा नही है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. हसमुख गेहलोत, अनुमोदन श्री. रवि व्यास, दुसरा ठराव आहे सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्रीम निलम ढवण. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. हसमुख गेहलोत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. हसमुख गेहलोत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४८, विरोधात २४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. हसमुख गेहलोत यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करण्यासाठी धोरण निश्चित करणे.**

**ठराव क्र. १२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करण्यासाठी दि.२६/०२/२०१८ रोजीच्या महासभेत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मा.महासभेने ठराव क्र.७९ अन्वये तदर्थ समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेतला. मा. महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.७९ अन्वये गठीत समितीची बैठक महापौर यांच्या दालनात दि.१५/०३/२०१८ रोजी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालील पदाधिकारी / अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्रीम. डिम्पल मेहता | महापौर |
| श्री. चंद्रकांत वैती | उपमहापौर |
| श्री. ध्रुवकिशोर पाटील | सभापती, स्थायी समिती |
| श्री. रोहिदास पाटील | सभागृह नेता |
| श्री. राजु भोईर | विरोधी पक्ष नेता |
| श्री. हसमुख गेहलोत | गटनेता, भाजपा |
| श्री. हरिश्चंद्र आमगांवकर | गटनेता, शिवसेना |
| श्री. जुबेर इनामदार | गटनेता, राष्ट्रीय काँग्रेस |
| श्री. शिवाजी बारकुंड | शहर अभियंता |
| श्री. श्रीकांत देशमुख | सहाय्यक संचालक नगररचना |
| श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| श्री. भास्कर बाबर | शिक्षण अधिकारी |
| श्री. सुरेश देशमुख | प्रशासन अधिकारी |
| श्रीम. सई वडके | विधी अधिकारी |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड वितरीत व विकास करण्यासाठी उपस्थितासमोर प्रशासनामार्फत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. सदर बैठकीत चर्चा होऊन ठरविलेल्या धोरणाचा मसूदा आयुक्त त्यांच्या अभिप्रायासह गोषवाऱ्यात नमूद करून सादर केलेला आहे.

**<u>प्रस्तावना</u> :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून शहराची सन २०११ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या ८.१४ लक्ष एवढी आहे. सद्यस्थितीतील लोकसंख्या सुमारे १२ लक्ष एवढी असून लोकसंख्या वाढीच्या दरानूसार सन २०३६ या वर्षात सुमारे २८.५० लक्ष एवढी लोकसंख्या होण्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीमध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने महानगरपालिकेमार्फत व खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आल्या आहेत. अस्तित्वातील शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने प्राथमिक, माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षणासाठी आहेत. शहराची सध्याची लोकसंख्या व भविष्यातील वाढणाया लोकसंख्येचा विचार करता प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाच्या दर्जेदार व पुरेशा शैक्षणिक सुविधा विकसित होणे शहराचे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जरूरीचे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या सुविधा करणेसाठी सर्वकष असे शैक्षणिक प्रयोजनाचे आरक्षित भूखंड / बांधिव सुविधा वितरीत व विकसनाचे धोरण असणे जरूरीचे झाले आहे. मा. महासभा खालीलप्रमाणे धोरण निश्चित करीत आहे.

**<u>१) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड / बांधिव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरणाची आवश्यकता</u>**

मिरा-भाईंदर महानगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंड/ बांधीव सुविधा वितरण व विकसनाकरिता सद्यस्थितीत असलेल्या धोरणातील नमुद तरतूदी व्यवहार्य, प्रभावी व परिपूर्ण नसल्याने शहरामध्ये शैक्षणिक सुविधा अपेक्षित प्रमाणात विकसित होऊ शकल्या नाहीत. राष्ट्रीय व

आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शैक्षणिक संस्थाना शहरामध्ये शैक्षणिक सुविधा विकसित करणेसाठी आकर्षित करणे जरूरीचे आहे. दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित होणेकरिता पुढील मुलभूत बाबी अंतर्भूत असलेले सर्वकश व प्रभावी धोरण असणे जरुरीचे आहे.

१.५ निकोप व वाजवी स्पर्धात्मक भूखंड/सुविधा वितरणाकरीता, व्यापक प्रसिध्दीव्दारे दर्जेदार व अनुभवी शैक्षणिक संस्थाना संधी देणे.

१.६ शैक्षणिक संस्थाना सुविधा विकसित करणे व शाळा/महाविद्यालय चालविणे आर्थिक दृष्ट्या सुसह्य व्हावे म्हणून अधिनियमातील तरतुदीनुसार भुखंड वितरीत करणे.

१.७ मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले भुखंड शैक्षणिक संस्थाना भाडेपट्टीने न देता सदर संस्थासोबत संयुक्त उपक्रम करून (Joint Venture) शाळांची बांधकामे शैक्षणिक संस्थाच्या खर्चाने करुन घेणे व सदर शाळेत महानगरपालिकेमार्फत एकुण विद्यार्थी संख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केलेल्या गरीब विद्यार्थ्यांना देऊन त्यांना निशुल्क शिक्षण देणे, (सदर विद्यार्थ्यांना गणवेश, दफ्तर, बुट, पुस्तके, वह्या, इ. वर शैक्षणिक वर्षांत लागणारा इतर सर्व खर्च हा पालकांनी करावा) व गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे.

१.८ सदर भुखंड १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी शाळा बांधण्यासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय बांधणेसाठी वितरीत करणे.

**<u>२) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड/बांधीव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरण</u>**

**१.२ <u>वितरणाची कार्यपध्द्ती</u>**

नगररचना विभागाकडुन शैक्षणिक प्रयोजनासाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान तसेच माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणातील एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५०% च्या जवळपास ताब्यात आलेल्या भुखंडाची यादी उपलब्ध करुन सदर भुखंडाचा विकास व बांधिव सुविधाबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव तयार करण्यात येईल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शाळा व खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी आरक्षणाच्या एकुण क्षेत्राच्या ५०% पेक्षा जास्तीच्या क्षेत्राचे आरक्षण मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार मंजूरीबाबत कार्यवाही करावी.

१.२.१ नगररचना विभागाकडून शैक्षणिक प्रयोजनाच्या आधारित भुखंडाची व बांधीव सुविधांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१.२.२ प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध असलेले व शिक्षण विभाग यांना आवश्यक नसलेले भुखंड/सुविधा तसेच माध्यमिक शाळा, महाविद्यालय व व्यावसायिक शिक्षणांकरिता राखीव भूखंड/सुविधा यांची यादी जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त किमान तीन वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. यापैकी एक वृत्तपत्र स्थानिक व दोन राज्यस्तरिय असेल. इतर भाषिक शाळांकरिता राखीव भूखंड/सुविधा करिताची जाहिरात संबंधीत भाषेतील एका वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त खासगी नोंदणीकृत शैक्षणिक संस्थाकडून अर्ज मागविले जातील. असे अर्ज आयुक्तांनी मंजूर केलेल्या विहित नमुन्यात असतील. सदर कामासाठी संगणक प्रणाली व ऑनलाईन वर प्रसिध्दी देण्यात येईल.

१.२.३ नमुद केलेले पात्रतेचे निकषांची पूर्तता करणा-या शैक्षणिक संस्था असे अर्ज करण्यास पात्र राहतील.

१.२.४ आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (मु.), शहर अभियंता, सहा.संचालक नगररचना, शिक्षण अधिकारी, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, विधी अधिकारी, मुख्यलेखापरीक्षक, मुख्यलेखाधिकारी असे सभासद असलेली समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करतील. या समितीचे सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे काम पाहतील.

१.२.५ समितीचे सचिव या नात्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे समितीचे निर्णय नमुद करतील, आयुक्तांची मंजूरी घेतील व महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी सादर करण्याचा योग्य प्रस्ताव तयार करतील. सदर प्रस्तावात विशिष्ट शिफारशी असतील.

**२.२ शैक्षणिक संस्थाचे पात्रता निकष**

२.२.१ भुखंड उपलब्ध होणेसाठी अर्ज करणारी संस्था मुंबई सार्वजनिक विश्र्वस्त अधिनियम १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५०) आणि किंवा संस्था नोंदणी अधिनियम (सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६०) खाली नोंदणीकृत असावी.

२.२.२ संस्थेकडे शैक्षणिक उपक्रम चालविण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

२.२.३ आवश्यक फर्निचर, साधने यासह शाळेची इमारत बांधण्याकरीता संस्थेचे आर्थिक स्थिती चांगली असावी. संस्थेने आपली आर्थिक स्थिती दर्शविणेकरीता अगोदरच्या तीन वर्षातील कामगिरीचे परिक्षित आर्थिक ताळेबंद (Audited Financial Results) सादर करावेत.

२.२.४ संस्थेकडे शाळा चालविण्याकरीता होणारा खर्च करण्याची क्षमता असावी.

२.२.५ संस्थेची अगोदरच्या तीन वर्षाची शैक्षणिक कामगिरी समाधानकारक असावी. सदर शैक्षणिक कामगिरी शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, विद्यापिठ परिक्षांच्या निकालानुसार पाहिली जाईल व संबधित निकाल हा मागील तीन वर्षाकरीता किमान ८० टक्के इतका असणे आवश्यक राहील. एका संस्थेला जास्तीत जास्त १ भूखंडाचे वितरण केले जाईल.

**३) अटी व शर्ती**

३.१ महानगरपालिकेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात येणाया भुखंडाबाबत इच्छुक व पात्र संस्थेसाबत संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने करारनामा करण्यात येईल.

३.२ शैक्षणिक संस्थेला भूखंड स्वखर्चाने विकसित करावा लागेल.

३.३ संस्थेला शैक्षणिक उपक्रम सुरू करण्याकरिता राज्य शासनाची, केंद्र शासनाची मंजूरी मिळवावी लागेल व शिक्षण संचालकांनी अथवा तंत्रशिक्षण संचालक अथवा विद्यापिठाने मंजूर केलेल्या शिक्षण संहितेचे पालन करावे लागेल.

३.४ शैक्षणिक उपक्रमाच्य इमारतीचे बांधकामांकरीताचे नकाशे मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुसंगत असावेत व त्याकरिता नियमावलीत नमूद सर्व परवानग्या घेणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे बांधकाम करणे आवश्यक राहील.

३.५ शैक्षणिक उपक्रमाच्या इमारतीचे बांधकाम आराखडे मंजूर झालेल्या व काम सुरू करण्याचे प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून ३ (तीन) वर्षाच्या आत पूर्ण करणे.

३.६ विशिष्ट तीन वर्षाच्या कालावधीत अथवा आयुक्तांनी मंजूर केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार वाढविलेल्या कालावधीत संस्थेने इमारत बांधली नाही तर संस्थेबरोबरचा करार तीन वर्षानंतर आपोआप रद्द होईल व भूखंडाचा/सुविधेचा ताबा संबधितांना कोणताही खर्च न देता महानगरपालिका घेईल.

३.७ प्रत्येक वर्षी शाळेत द्यावयाचे प्रवेश शासनाच्या नियमानुसार असावेत. राज्य व केंद्र शासनाचे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३.७.१७ जात, वर्ण, लिंग, धर्म तसेच ज्या परिसरातून विद्यार्थी येतात हे विचारात न घेता, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश खुला राहील.

३.७.१८ स्थानिक अथवा इतर सर्व कर संस्थेने नियमित व विहीत मुदतीत अदा करणे बंधनकारक आहे.

३.७.१९ संस्थेला देण्यात आलेला भुखंड /बांधीव सुविधा या करीता आयुक्तांनी विहीत केलेले महानगरपालिकेचे सर्व कर / आकार/ शुल्क संस्थेकरिता लागू होतील. ते वेळेत भरणे भरणा करणे बंधनकारक राहील.

३.७.२० बांधलेल्या शाळेतील शिकविण्याचे माध्यम मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दु अथवा दुसया कोणत्याही मान्यताप्राप्त भाषा असतील. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये मराठी विषय अनिवार्य असेल.

३.७.२१ वरील अटी व शर्तीत काहीही अंतर्भूत असले तरीही आयुक्तांना भुखंडावर, इमारतीत पाहणी करणेकरीता प्रवेश व हक्क असेल. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टाकरीता भुखंड वापरण्याचा हक्क राहील. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्दीष्टांकरीता जागा, भुखंड वापरला गेल्यास संस्थेने महानगरपालिकेला कोणतेही शुल्क/भाडे/किंमत आकारू नये.

३.७.२२ ज्या संस्थेस भुखंड देण्यांत आलेला आहे अशा संस्थेस जमिन विकसित करणे शक्य न झाल्यास सदर जमिन दुसया शैक्षणिक संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळणार नाही व मुळ भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात परत करावा लागेल.

३.७.२३ ज्या संस्थेला अनुज्ञप्तीधारक म्हणुन भुखंड/इमारत दिली आहे अशा संस्थेला भुखंड/इमारत दुसया कोणत्याही संस्थेस कोणत्याही पध्दतीने अंशतः अथवा पुर्णपणे पोटभाडेपट्टीने देता येणार नाही

किंवा हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच त्याच्या वतीने कोणत्याही पध्दतीने शैक्षणिक उपक्रमाची व्यवस्था पाहण्याकरीता दुसया संस्थेला नेमता येणार नाही.

३.७.२४ मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वापरासाठी दिलेले भुखंड त्याच संस्थेला त्याच कारणासाठी वापरता येईल. त्या वापरात बदल केल्यास भाडेकरार आपोआप रद्द होऊन जागा आहे त्या स्थितीत मनपाच्या ताब्यात आली आहे, असे समजण्यात येईल व मनपा तातडीने अशी जागा / मालमत्ता ताब्यात घेईल.

३.७.२५ करारनाम्याचा कोणत्याही अटीचा भंग झाल्यास, कोणतीही गैरकृती केल्यास महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानुसार संस्थेला दिलेली जमिन रद्द करण्यात येईल व सदर जागेतून संस्था रिक्त करून भुखंडाचा/इमारतीचा अथवा दोन्हींचा ताबा घेण्याचे स्वातंत्र्य आयुक्तांस राहील. तसेच याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

३.७.२६ शैक्षणिक संस्थाना भुखंड वितरीत करताना बांधकाम पुर्ण होऊन शाळा सुरु होईपर्यंत कामासाठी घ्यावयाची बँक गॅरंटीची रक्कम ही १ चटईक्षेत्रात सदर शाळा इमारत बांधकामासाठी येणा-या खर्चाच्या ५०% रक्कम घ्यावी. सदर रक्कम काम पुर्ण झाल्यावर टप्प्याटप्प्याने परत करण्यात यावी.

३.७.२७ मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेत शाळासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर विकासकास परवानगी देण्यापुर्वी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात यावी व तद्नंतरच बांधकाम परवानगी देण्यात यावी.

३.७.२८ आरक्षणांवर बांधकाम नकाशा मंजुरीनुसार एक चटई क्षेत्रात उपलब्ध होणा-या एकुण पटसंख्येच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे.तथापि नवीन शाळा असल्याने प्रथमत विद्यार्थ्यी उपलब्ध झाले नाहीत तरी मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या एकूण पटसंख्येच्या किमान १० टक्के विद्यार्थ्यांना मनपाच्या शिफारशीवरुन प्रवेश देणे बंधनकारक राहील.

३.७.२९ सदर शाळा, महाविद्यालय बांधकाम पुर्ण होऊन झाल्यावर ५ वर्षानंतर एकुण मंजुर नकाशानुसार उपलब्ध होणा-या पटसंख्येच्या २५% प्रवेश महानगरपालिकेने शिफारस केल्यानुसार देणे बंधनकारक राहील.

३.७.३० एखादया संस्थेने काम सुरू केल्यानंतर मध्येच बंद केल्यास अथवा बांधकाम सुरू केलेले नाही, तर महानगरपालिकेकडून प्रवेशासाठी दिल्या जाणा-या विद्यर्थ्याचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सदर संस्थेची बॅक गॅरंटी जप्त करून जागा ताब्यात घेण्यात यावी.

३.७.३१ सदर शाळा, महाविद्यालय बांधकामासाठी संस्थेने बँकेतून कर्ज घेतल्यास सदर कर्जासाठी महानगरपालिकेने दिलेला भुखंड, इमारत, फर्निचर तारण म्हणुन ठेवता येणार नाही.

३.७.३२ सदर शाळा, महाविद्यालय संदर्भात सदर संस्थेने इतरांसोबत करारनामे करावयाचे असल्यास आयुक्त, महानगरपालिका यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

**खाजगी संस्था/विकासकामार्फत आरक्षण विकसित करण्याबाबतची कार्य पध्दती**

४.१ मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी आहे. सदर शिक्षणासाठी उपलब्ध असलेली आरक्षणे विकसित करण्याचा पहिला अधिकार महानगरपालिकेचा आहे.

४.२ खाजगी संस्था / विकासक यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ५० % पेक्षा जास्त जागा ताब्यात असल्यास व त्यांची आरक्षण विकसित करावयाची इच्छा असल्यास महानगरपालिकेची (महासभा) पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

४.३ एखादा जागा मालक / विकासक खाजगी संस्था यांच्याकडे एकुण आरक्षण क्षेत्राच्या ७०% पर्यंत जागा ताब्यात असल्यास व त्यांनी सदर आरक्षण विकसित करण्याची महासभेची परवानगी घेतली असल्यास सदर आरक्षणाची उर्वरित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असेल तर खालीलप्रमाणे जागा देण्याची कार्यवाही करावी.

४.३.५ आरक्षणाची ७०% पेक्षा जास्त जागा मालकाच्या ताब्यात असेल तर सदर संपुर्ण आरक्षण विकसित करण्यासाठी सदर आरक्षणातील महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत जागा सदर जागा मालकास द्यावयाची असल्यास रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या १२५% नुसार रक्कम घेऊन अथवा ज्या क्षेत्राचा भुखंड द्यावयाचे तेवढ्या रक्कमेचा मनपा क्षेत्रात भुखंड व २५% रक्कम रेडी रेकनर नुसार घेऊन देण्याची कार्यवाही करावी.

४.३.६ सदर बदली जागा ही ज्या क्षेत्रात बांधकामास बंदी आहे, सी.आर.झेड क्षेत्र आहे. त्या ठिकाणी घेण्यात येऊ नये, तसेच जागा मालकास ज्या ठिकाणी उर्वरीत शाळेचा भुखंड देण्यात येणार आहे. त्या ठिकाणी असलेले रेडी रेकनरचे दर व नविन बदली जागेचे रेडी रेकनर दर यांची तुलना करुन त्यानुसार रक्कम जमा करुन घ्यावी.

४.३.७ शाळा, महाविद्यालय आरक्षण विकसित करण्याचा प्रथम अधिकार हा महानगरपालिकेचा राहील.

४.३.८ ७०% पेक्षा कमी क्षेत्राचे शाळा भुखंड असल्यास व जागा मालकास सदर आरक्षण विकसित करावयाचा असल्यास सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

५) किमान अर्हतांची पुर्तता केलेल्या व स्पर्धात्मक वितरण निविदेंमध्ये सहभागी झालेल्या एकापेक्षा अधिक शैक्षणिक संस्थाचे प्रस्ताव सारखेच असल्यास तर खालील निकषानुसार संस्थेची निवड करण्यात येईल.

(अ) ज्या संस्थेच्या नोंदणीचा दिनांक अगोदरचा असेल.

(ब) जी संस्था स्थानिक असेल.

(क) ज्या संस्थेचे वार्षिक आर्थिक ताळेबंद नियमित असतील व मालमत्ता चांगली असेल.

(ड) ज्या संस्थेचे अधिक शैक्षणिक उपक्रम असतील.

**<u>६) भुखंड वितरित करण्यांसाठी प्रशासकीय मंजुरी</u>**

निवड झालेल्या शैक्षणिक संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा देणकरीता मा. महासभेची मंजुरी प्राप्त झाल्यावर संबंधित संस्थेने विभाग प्रमुख (मिळकत व्यवस्थापक विभाग) यांचे समन्वयाने महानगरपालिकेसोबत विहित नमुन्यातील करारनामा करणे बंधनकारक राहील. करारनामा केल्यानंतर सदर संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत करणेत येतील.

७) शैक्षणिक संस्थाना संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने भुखंड वितरीत करताना ३० वर्ष मुदतीसाठी करारनामा करण्यात यावा, पुढील कालावधी हा महानगरपालिकेच्या मान्यतेने वाढविण्याची अट राहील. महानगरपालिकेने मुदतवाढ न दिल्यास इमारतीसह जागा ताब्यात घेण्यात यावी.

८) सदर धोरणानुसार विकसित होऊन सुरु झालेल्या शाळा मधील प्रवेशाबाबत व शिक्षणाच्या दर्जाबाबत महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे नियंत्रण राहील.

९) सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याचे सर्व प्रशासकीय अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत असून त्यांनी धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व आवश्यक पुढील कार्यवाही पार पाडावी.

१०) वरील धोरणानुसार संयुक्त उपक्रम (Joint Venture) पध्दतीने शाळा विकसित केल्यास त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार प्रवेश दिल्याने सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळामध्ये विद्यार्थ्यावर होणा-या खर्चात बचत होणार असून गरीब विद्यर्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळुन त्यांच्या शिक्षणाचा दर्जा हा उंचावणार आहे. सदर शाळेचे भुखंड संस्थांना भाडयाने दिले असते तर त्याचे चालु बाजारभावानुसार मिळणारे भाडे व सदर संस्थामार्फत महानगरपालिकेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांवर केला जाणारा खर्च पहाता (महानगरपालिकेच्यामार्फत सदर विद्यार्थ्यांवर खर्च केला जातो तो पहाता) महानगरपालिकेचा आर्थिक फायदा व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.

वरील धोरणास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत** **अनुमोदक :- ॲड रवि व्यास**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | सावंत अनिल दिवाकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | अरोरा दीपिका पंकज | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | पाटील नरेश तुकाराम | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | भोईर कमलेश यशवंत | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | अहमद साराह अकरम | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २७ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २८ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३० | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३१ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३२ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३३ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३४ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३५ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३७ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३९ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४० | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४२ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४३ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४४ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४५ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | |
| ४६ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४७ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४८ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कींग नो पार्कींग बाबतचे धोरण निश्चित करणे.**

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम प्रत्येक नगरसेवकाने तुम्हाला आपल्या माध्यमातून सुचित केले होते की, अशाप्रकारे आमच्या प्रभागामध्ये पार्किंग नो पार्किंग.

**मा. महापौर :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने कुठल्या तरी एका व्यक्तीला नेमुन काम करुन घेतलेले आहे. साहेब ज्या सुचना राहिलेल्या आहेत त्याचे काय? एजन्सीने तुम्हाला सुचित केलेल्या प्रमाणे तुम्ही तो गोषवारा दिलेला आहे.

**दिपक खांबित :-**

महापौर मॅडमने सर्व नगरसेवकांना पत्र दिले होते आणि ज्या सगळ्यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यासुध्दा आपण गोषवाऱ्यामध्ये टाकलेल्या आहेत.

**जुबेर इनामदार :-**

माझीच राहिली असली तर.

**दिपक खांबित :-**

तुम्ही सुचना द्या.

**जुबेर इनामदार :-**

याच्यानंतर दिली तर तुम्ही ते स्विकारणार ना.

**दिपक खांबित :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

वनवेचा ही आम्ही सुचना दिली होती त्याच्यामध्ये तुम्ही त्याचा समावेश केलेला नाही.

**दिपक खांबित :-**

करायला पाहिजे होतं आम्ही ज्या सुचना महापौर मॅडमकडून त्या सर्व सुचना त्याच्यामध्ये टाकल्या.

**जुबेर इनामदार :-**

माझ्या पत्रामध्ये आम्ही तशा केलेल्या आहेत. त्या त्याच्यामध्ये आलेल्या नाही.

**दिपक खांबित :-**

तुम्ही सुचना द्या.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यामध्ये तसे तुम्ही नमुद करा.

**मा. महापौर :-**

सर्वांची सुचना देऊन टाका. ज्या राहिलेल्या असतील त्या घेतल्या जातील.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम सुभाषचंद्र मैदानाजवळ एवढ्या मोठ्या प्रमाणात तिकडे बस लागतात. त्या ठिकाणचा कचऱ्यावाल्यांना काढता येत नाही. एवढ्या तिकडे गाड्या लागतात. त्या तिकडे लावू नये.

**मा. महापौर :-**

तुम्ही पत्रावर लिहून द्या.

**नयना म्हात्रे :-**

मी आयुक्तांना लेखी पत्र दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. कारवाई करा.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम २८ मार्चला असाच एक ठराव झाला होता. गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्व्हिस सेंटर, वाहन शोरुम, स्पेअर पार्ट विक्रेता याच्यावर अजुन काही अंमलबजावणी झालेली नाही.

**मा. महापौर :-**

आता आपण नविन सगळ केलेलं आहे.

**अनिल सावंत :-**

तो वेगळा आहे.

**मा. महापौर :-**

पार्किंगचा विषय आहे ना.

**अनिल सावंत :-**

२८ मार्चला ठराव झालेला आहे. दोन महिने झाली अजुन त्याच्यावर कारवाई झालेली नाही. कधी करणार कारवाई? आपण फक्त महासभेमध्ये ठराव करायचे. पुढे रिझल्ट काय?

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने मिरा भाईंदर रोडवरुन मिरारोड येण्यासाठी जो मुख्य रस्ता आहे. एस.के स्टोन, पोलिस चौकी ते गिता आर्कीड तिथे सगळे मोठे मोठे बसेस पार्किंग केले जातात. काही शाळांच्या बसेस काही प्रायव्हेट बसेस असे किती तरी मोकळ्या रस्त्यावर असतात.

**मा. महापौर :-**

तुम्ही रायटींगवर पत्र लिहून द्या. अटिशर्तीमध्ये होणार.

**हसमुख गेहलोत :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पार्कींग धोरण ठरविणेसाठी मा. महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.४८ अन्वये तदर्थ समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक दि.२१/०२/२०१८ रोजी महापौर यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्रीम. डिम्पल मेहता | महापौर |
| श्री. चंद्रकांत वैती | उपमहापौर |
| श्री. ध्रुवकिशोर पाटील | सभापती, स्थायी समिती |
| श्री. रोहिदास पाटील | सभागृह नेता |
| श्री. राजु भोईर | विरोधी पक्ष नेता |
| श्री. हसमुख गेहलोत | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| श्री. हरिश्चंद्र आमगांवकर | गटनेता, शिवसेना |
| श्री. जुबेर इनामदार | गटनेता, राष्ट्रीय कॉंग्रेस |
| श्री. शिवाजी बारकुंड | शहर अभियंता |
| श्री. दिपक पूजारी | उप आयुक्त |
| श्रीम. स्वाती देशपांडे | सहाय्यक आयुक्त |
| श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |

उपस्थितांचे स्वागत करुन समितीच्या कामास सुरुवात करण्यात आली.

**प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ही वेगाने वाढत असून शहरातील वाढती वाहने, वाहनांच्या पार्कींगसाठी जागेची उपलब्धता पाहता मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर वाहने उभी राहतात. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पार्कींग धोरण ठरविणे आवश्यक झाल्याने सदर कामासाठी मे. सी.आय.आर.टी. या संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. सदर संस्थेने अहवाल सादर केला असून सदर अहवालात नमूद केल्यानूसार व सर्व सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या सुचनेनूसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कींग धोरण तयार करण्यात आलेले आहे.

**धोरणाची आवश्यकता**

- पार्कींग व नो पार्कींग ठिकाणे ठरविणे, नो पार्कींग क्षेत्रातील वाहनांवर प्रभावी कारवाई करणे.
- ऑटो रिक्षासाठी स्टॅंडची जागा निश्चित करणे.

- शहरातील पार्कींगची आवश्यकता पाहता नविन विकास योजनेत पार्कींगसाठी व रस्त्यावरील पार्कींगसाठी जागा निश्चित करणे, असलेल्या पार्कींगची क्षमता वाढविणे.
- रहीवास व वाणीज्य संकुलाच्या ठिकाणी पार्कींगचे नियमन करणे.
- एकेरी मार्ग निश्चित करणे, जड वाहनांना वेळेची मर्यादा ठेवणे.
- रस्त्यावर सम विषम दिवशी पार्कींग निश्चित करणे.
- वाहतूकीचा जास्त ताण असलेल्या रस्त्यावरील वाहतूकीचे नियमन करणे.

मे. सी.आय.आर.टी. या संस्थेमार्फत अहवाल तयार करुन सादर केला आहे. सदर अहवालानूसार तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पार्कींगच्या मागणीनूसार खालीलप्रमाणे शॉर्ट टर्म उपाय सुचविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | रस्ता | विद्यमान पार्कींग सुविधा | पार्कींग मागणी | | शॉर्ट टर्म उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | | सद्यस्थिती | भविष्यातील (पुढील पाच वर्षे) | |
| 1 | कनकिया रोड | 100 दुचाकी वाहने क्षमतेची सशुल्क बहुस्तरीय कार पार्कींग सुविधा | 197 दुचाकी वाहने (3542 चौ.मी.) | अतिरीक्त 192 दुचाकी वाहने (3456 चौ.मी.) | दुचाकी आणि कार दोन्हीसाठी आणखी 100 दुचाकी वाहने पार्कींगची जागा भरण्यासाठी बहुस्तरीय कार पार्कींग इमारतीत सुधारणा करणे. |
| | | | | | ऑफ-स्ट्रीट पार्कींग आकर्षित करण्यासाठी विभेदक पार्कींग फी प्रणाली अंमलबजावणीव्दारे पार्कींग फीमध्ये (तासाचा आधार) लवचिकता दिली जाईल. |
| | | | | | • हा रस्ता अरुंद आणि रस्त्यांवर पार्कींगची तरतूद आहे, त्यामुळे गर्दी होऊ शकते.<br>• म्हणूनच हा रस्ता रस्त्यावर पार्कींगसाठी नॉन पार्कींग झोन म्हणून घोषित करणे. |
| | | | | | रस्त्यावरील पार्कींग मधील वाहने प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे. |
| | | | | | 2 जास्तीत जास्त 10 ऑटो रिक्षाची क्षमता असलेले ऑटो रिक्षा स्टँन्ड खालील ठिकाणी प्रस्तावित करणे.<br>• सिनेमॅक्सजवळ<br>• लक्ष्मी पार्कजवळील |
| 2 | पूनम गार्डन रोड | 10 च्या बहुस्तरीय कार पार्कींग दुचाकी वाहने क्षमता | 102 दुचाकी वाहने (1530 चौ.मी.) | अतिरीक्त 31 दुचाकी वाहने (558 चौ.मी.) | सध्याचे बहुस्तरीय कार पार्कींग पुढील 10 वर्षासाठी टिकेल तथापी अतिरीक्त 150 दुचाकी वाहने जागा (2399 चौ.मीटर) दुचाकी आणि कारसाठी भरण्याची श्रेणी सुधारणे भविष्यातील गरजा पूर्ण करण्यास 10 वर्षापर्यंत मदत करेल |
| | | | | | • सुविधेचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी, पार्कींग फीमध्ये लवचिकता (तासाचे आधारे) देणे आवश्यक आहे. |
| | | | | | • पूनम गार्डन रोड रस्त्यावर पार्कींग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रतिबंधित करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे. |
| 3 | रामदेव पार्क रोड | | 263 दुचाकी वाहने (4737 चौ.मी.) | अतिरीक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.) | • या रस्त्यासह व्यावसायिक संकुले असल्याने ग्राहकांसाठी पार्कींगची जागा तरतूद करावी लागेल.<br>• या संकुलांच्या पुढे नो पार्कींगची स्थापना करणे आवश्यक आहे. |
| | | | | | प्रत्येक चौकापूर्वी आणि नंतर 50 मीटर पर्यंत नो पार्कींग क्षेत्र:<br>• मिरा भाईंदरशी जोडणारा रामदेव पार्क रोड आरंभ<br>• क्वीन्स रोडला जोडणारा चौक<br>• रामदेव पार्क चौक<br>• साई अंगणला जोडणारा चौक<br>• जी.एल. पटेल रोडला जोडणारा चौक<br>• नर्मदा हेरिटेज जवळ चौक<br>• रामभाऊ म्हाळगी उद्यान जवळील चौक<br>• राम नगर बस स्टॉप जवळील चौक |
| | | | | | खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर पर्यंत नो पार्कींग झोन<br>• क्वीन्स पार्कच्या बस स्टॉप<br>• रामदेव पार्क चौक<br>• ओम संगम प्लाझा<br>• रामदेव पार्क<br>• रामनगर<br>2 ऑटो रिक्षा स्टॅन्ड या रस्त्यावर प्रस्तावित केल्या आहेत . ( प्रत्येक दिशा आणि 500 मीटरने विभक्त केलेले स्थान ) जास्तीत जास्त क्षमता असलेल्या 7 ऑटो रिक्षांसह |
| | | | | | निवासी सोसायट्यांना पार्कीं गची तरतूद करण्यास कळविणे. |
| | | | | | • दोन्ही बाजंना रस्त्यावर पार्कींगचे (कारसाठी एक बाजू आणि दुचाकीसाठी एक बाजू) योग्य सीमांकनेसह पार्कींग क्षेत्र रामदेव पार्क जवळील कार आणि दुचाकी प्रस्तावित करणे आवश्यक आहे.<br>• कारला केवल समांतर पार्कींगची परवानगी आहे. |
| 4 | संत तुकाराम रोड | पार्कींग सुविधा नाही | 188 दुचाकी वाहने (3378 चौ.मी.) | अतिरीक्त 58 दुचाकी वाहने (1044 चौ.मी.) | 100 मीटरसाठी नो पार्कींग क्षेत्र:<br>• संत तुकाराम मार्गासह गोल्डन नेस्ट सर्कल जवळ<br>• स्पोर्ट्स कॉम्पलेक्स जवळ |
| | | | | | खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग झोन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • नवीन गोल्डन नेस्ट बस स्टॉप<br>• सुखरंजनी बस थांबा<br>• 3 इंद्रलोक टप्पा 2 बस स्टॉप्स |
| | | | | | • या रस्त्यासह व्यावसायिक वापर असलेल्या क्षेत्राजवळ पर्यायी दिवशी ऑन स्ट्रीट पार्कींग पुरविले जाऊ शकते.<br>• समांतर पार्कींगची परवानगी पाहिजे आणि पार्कींग क्षेत्र रस्त्यावरील चिन्हे आणि खुणासह मर्यादा असणे आवश्यक आहे. |
| | | | | | • ऑटोमोबाईल शोरुम आणि गॅरेज पदपथावर/ कॅरेजवेवर जागा लक्षणीय वापरात आहेत. त्यामुळे वाहतूक अडथळा आणि पादचारी पादचार्यांना हलणे अवघड होते. म्हणूनच अतिक्रमण टाळण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. |
| 5 | सृष्टी रोड | पार्कींग सुविधा नाही | 243 दुचाकी वाहने (4365 चौ.मी.) | अतिरीक्त 75 दुचाकी वाहने (1350 चौ.मी.) | निवासी इमारती मध्ये परीसरातील रहिवाशांसाठी पार्कींगची जागा सुनिश्चित करण्यासाठी धोरण गरजेचे पर्यायी दिवस (पी 1-पी 2) ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (समांतर फक्त ) या रस्त्या च्या दोन्ही बाजूंनी प्रस्तावित केले जाऊ शकते कारण रस्ता पुरेसा रुंद आहे. |
| | | | | | वाहने लोडिंग आणि अनलोडिंगसाठी फक्त दिवसाच्या ठराविक तासांमध्ये जागेची सीमारेषेवर व्यवस्था करणे आवश्यक आहे. |
| | | | | | 50 मीटर पर्यंत नॉन-पार्कींग क्षेत्र:<br>• सृष्टी शॉपिंग सेंटर बस स्टॉप<br>• ओम शांती चौक<br>• जांगीड सर्कल<br>• मिरा भाईंदर रोडला जोडणारा चौक |
| 6 | लोढा रोड | पार्कींग सुविधा नाही | 310 दुचाकी वाहने (5579 चौ.मी.) | अतिरीक्त 96 दुचाकी वाहने (1728 चौ.मी.) | ऑन-स्ट्रीट पार्कींग कार आणि दुचाकीसह व्यवसायिक वापर असल्याने पुरविणे. |
| | | | | | केवळ कारसाठी समां तर पार्कींग करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे आणि पार्कींग क्षेत्र, रस्त्यावर पट्टे मारणे. |
| 7 | भक्ती वेदान्त रोड | पार्कींग सुविधा नाही | 294 दुचाकी वाहने (5297 चौ.मी.) | अतिरीक्त 92 दुचाकी वाहने (1656 चौ.मी.) | • या रस्त्यावरील मुख्य केंद्र हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था आणि निवासी सोसायटीज आहेत.<br>• म्हणूनच या केंद्रांना त्यांच्या संबंधित आवारत ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा देण्याचा निर्देश देणे आवश्यक आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • दुचाकी आणि कारसाठी ऑन-स्ट्रीट सशुल्क वाहनतळ सुविधा या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पुरवली जावी.<br>• कारला समांतर पार्कींग परवानगी द्यावी आणि पार्कींग क्षेत्र चिन्ह आणि खुणा सह निर्धारीत करणे आवश्यक आहे. |
| | | | | | भक्ती वेदांत बस स्टॉप आणि रॉयल कॉलेज बस स्टॉप जवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र |
| 8. | मिरा रेल्वे स्टेशन रस्ता | मोकळी जागा ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा | 194 दुचाकी वाहने जागा (3495 चौ.मी.) | अतिरिक्त 61 दुचाकी वाहने (1098 चौ.मी.) | • मिरा स्टेशनजवळ उपलब्ध असलेली ओपन स्पेस सशुल्क वाहनतळसुविधा दुचाकी आणि कार दोन्हीसाठी मल्टीस्तरीय पार्कींग सुविधा अद्यावत केली पाहिजे.<br>• या रस्त्याजवळ ज्यात पार्कींगची जागा नाही अश्या सोसायटीच्या रहिवाश्यांसाठी या सुविधेचा विस्तार केला जाऊ शकतो.<br>• अशा रहिवाशांसाठी मासिक पास प्रणाली प्रदान केली जाऊ शकते. |
| | | स्काय वॉक खाली रेल्वे स्टेशन जवळ पार्कींग | | | |
| | | | | | • मिरा रेल्वे स्टेशनपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक.<br>• रसाझ सर्कलच्या जवळ 50 मीटर पर्यंत नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे.<br>• रसाझ सर्कल ते होली क्रॉस कॉन्वेंट स्कुल बस स्टॉप नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे.<br>• बस स्टॉपच्या 50 मीटर पर्यंत पार्कींगची परवानगी देऊ नये.<br>• मिरा स्टेशन जवळील ऑटो रिक्शा स्टेशनाशिवाय रसाझ सर्कलजवळ 50 मीटरवर जास्तीत जास्त 7 ऑटो रिक्षासाठी एक अजून रिक्षा स्टॅन्ड प्रस्तावित आहे.<br>• मिरा स्टेशन जवळ 10 टॅक्सीची क्षमता असलेला स्टँड करणे. |
| | | | | | • डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड ते रसाझ सर्कल पर्यंत मिरा स्टेशन येथे पार्कींग क्षेत्र (दुचाकी आणि कारसाठी दोन्ही बाजूंनी) उपलब्ध करावे.<br>• तथापि, 50 मीटर चौकमध्ये सर्व बाजूंनी नो-पार्कींग झोन कार्यान्वित करणे आवश्यक आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | पुनम सागर रस्ता | पर्यायी ऑन -स्ट्रीट पार्कींग प्रदान केले आहे | 264 दुचाकी वाहने जागा (4752 चौ.मी.) | अतिरिक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.) | पार्कींग क्षेत्र नाही.<br>• स्टेशनपासून ते सेक्टर 10 पर्यंत शांती नगर बस थांबा.<br>• जवळजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र<br>• पुनम सागर बस स्टँड<br>• कॅसेडेला बस स्टँड<br>• शांती नगर सेक्तर 10 बस स्टॉप<br>• मिरारोड मार्केट<br>• इंदीरा गांधी हॉस्पीटल<br>• पर्यायी पार्कींग व्यवस्थेच्या बरोबरीने अंमलबजावणी कार्यान्वित करणे. |
| 10. | गोल्डन नेस्ट ते सृष्टी छत्रपती शिवाजी महाराज मार्ग | पार्कींग सुविधा नाही. | 222 दुचाकी वाहने जागा (3996 चौ.मी.) | अतिरिक्त 79 दुचाकी वाहने (1422 चौ.मी.) | बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही.<br>• सावरकर बस स्टॉप<br>• श्रीनाथ कॉम्पलेक्स बस स्टॉप<br>• टाटा इंडिकॉम बस स्टॉप<br>• शिवार गार्डन बस स्टॉप<br>• कनाकिया जंक्शन<br>• एस. के. स्टोन बस स्टॉप<br>चौकपासून 50 मीटर पर्यंत कोणतेही पार्कींग क्षेत्र नाहीत.<br>• गोल्डन नेस्ट सर्कलच्या सर्व दिशांना जाणारे रस्ते.<br>• नयानगर चेकपोस्ट जंक्शन.<br>• सिल्व्हर पार्क सृष्टी रोडला जोडणारा चौक.<br>• या रस्त्यावर व्यावसायिक उपक्रम दृष्टीने दोन्ही बाजूंनी ठराविक ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित करणे.<br>• ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा रस्त्यावर स्पष्ट मार्कींग करून करू शकतात.<br>ऑन-स्ट्रीट पार्कींग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 11. | सिल्व्हर पार्क ते राष्ट्रीय महामार्गावर (छत्रपती शिवाजी महाराज मार्ग) | पार्कींग सुविधा नाही. | 194 दुचाकी वाहने जागा (3492 चौ.मी.) | अतिरिक्त 60 दुचाकी वाहने (1080 चौ.मी.) | बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही.<br>• सिल्व्हर पार्क बस स्टॉप.<br>• हिट्को कंपनी बस स्टॉप.<br>• हटकेश बस स्टॉप.<br>• ग्रीन अकादमी, जेत इन्फोसिस बस स्टॉप.<br>• प्लेझंट पार्क बस स्टॉप. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • पंजाब फाऊँड्री.<br>काशिमिरा जंक्शनपासून पंजाब फाऊंड्री बस स्टॉपपर्यंत कोणतेही पार्किंग सुविधा देऊ नये.<br>• मार्गाच्या उर्वरित भागांमध्ये व्यावसायिक उपक्रमांचा विचार करुन ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित केली जाऊ शकते.<br>• या रोडवर भरपूर औद्योगिक उपक्रम असल्याने, गाड्या चढवणे आणि उतरवणे नियमन आवश्यक आहे.<br>• व्यावसायिक वाहने चढवणे आणि उतरवणे यासाठी कारखान्यांच्या जवळ आणि त्यांच्या आवारामध्ये ठराविक भाग ठेवणे आवश्यक आहे. |
| 12 | गोल्डन नेस्ट ते फाटक रोड | पर्यायी ऑनस्ट्रिट पार्कींग | 326 दुचाकी वाहने (5862 चौ.मी.) | अतिरिक्त 101 दुचाकी वाहने (1818 चौ.मी.) | ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 13 | बाळाराम पाटील रोड | रस्त्यांवर (विषम सम) पार्कींग योग्यरितीने होत नाही | 144 दुचाकी वाहने (2594 चौ.मी.) | अतिरिक्त 45 दुचाकी वाहने 810 चौ.मी) | • स्टेशन रोड पासून प्रवेश प्रतिबंधित करुन बी.पी. रोड एकेरी रस्त्यावर रुपांतरीत केला जावा.<br>• जरी प्रणाली योग्यरित्या अंमलात आणली जात नाही, तरी पर्यायी दिवसांची (सम-विषम) पार्कींगची तरतूद आहे.<br>• तुलनेने कमी व्यावसायिक उपक्रममध्ये पार्कींग क्षेत्राची मर्यादा स्पष्ट असली पाहिजे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही.<br>• अंमलबजावणी कडक केली पाहिजे.<br>• किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे.<br>• रस्ता अरुंद असल्याने रस्त्यावर शक्यतो ऑटो - रिक्षा चालवण्याचे नियमन करणे अत्यावश्यक आहे.<br>• शक्यतो हया रस्त्यावर रिक्षा स्टँड अनुज्ञेय करु नये.<br>या रस्त्यावर बसेसची देखील वाहतूक सुरु आहे, म्हणून व्यावसायिक वाहनांचे चढवणे आणि उतरवणे यांचे काटेकोरपणे नियमन करणे अत्यावश्यक आहे. |
| 14 | केबिन रोड | पार्कींग सुविधा | 113 | अतिरिक्त 35 | रस्ता अरुंद असल्यामुळे , हा रस्ता केबिन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नाही | दुचाकी वाहने जागा (2031 चौ.मी.) | दुचाकी वाहने (630 चौ.मी.) | रोड पोलीस चौकीपासून एकेरी वाहतुकीमध्ये रुपांतरीत केला जाऊ शकतो.<br>रेल्वे रुळाच्या बाजुने दुचाकी आणि कार साठी सशुल्क वाहनतळ दयावा<br>ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 15 | गोडदेव फाटक रोड | पार्कींग सुविधा नाही | 209 दुचाकी वाहने जागा (3759 चौ.मी.) | अतिरिक्त 65 दुचाकी वाहने (1170 चौ.मी.) | • रस्ता अरुंद आहे आणि म्हणून रस्ता नो- पार्किंग झोन म्हणून घोषित करणे आवश्यक आहे.<br>• ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे. जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतुक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे.<br>• किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे. |
| 16 | मॅक्सेस मॉल शेजारील रस्ता. | मॉल गोव्हर्ससाठी मॅकसेस मॉल रोड येथे खासगी पार्कींगसाठी सुविधा आहे. | 198 दुचाकी वाहने (3572 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 62 (1116 चौ.मी.) | मेक्सस मॉल रस्त्यावर नो -पार्किंग लागू करण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे , कारण सुविधा मॉल गोव्हर्ससाठी उपलब्ध आहे आणि ऑफ - स्ट्रीट पार्कींग सुविधा कल्याण ज्वेलरी सर्व्हिस सेंटरमागे आहे. |
| 17 | पंडीत भिमसेन हॉस्पीटल रस्ता | | | | • या ररस्त्यावर नो-पार्कींगची कठोर अंमलबजावणी.<br>• वाहतूक सदर रस्त्यावर एकेरी मार्ग (मांडली तलाव ते भिमसेन जोशी हॉस्पीटल) करावा. |
| 18 | मिरा भाईंदर मुख्य कार्यालय समोरील रस्ता (स्टेशन रोड) | 100 दुचाकी आणि 35 कार क्षमता असलेले ऑफ स्ट्रीट पार्कींग महानगरपालिका मुख्य कार्यालय मध्ये दिले गेले आहे. | 179 दुचाकी वाहने (3213 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 55 (990 चौ.मी.) | - पोलिस स्टेशन ते महानगरपालिका कार्यालयासमोर नो-पार्कींग क्षेत्र म्हणून अंमलबजावणी करावी.<br>- बस स्टॉप जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग मंजूर करु नये.<br>• क्रॉस गार्डन बस स्टॉप<br>• जैन मंदिर बस स्टॉप<br>• बॉम्बे मार्केट<br>• बालाजी नगर बस स्टॉप<br>• उर्वरित रोड पर्यायी दिवशी पार्किंग (पी1 - पी 2) उपयोगात आणला जाऊ शकतो<br>• या रस्त्यावरील रहदारीचा प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी अतिक्रमणे हटवावे लागतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • खेतेश्वर चौकाजवळ 100 मीटर 7 ऑटो-रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे.<br>• महानगरपालिका समोरील बस स्टॉप जवळ 100 मीटरवर 7 ऑटो - रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे. |
| | | | | | • महापालिका कार्यालया समोरील रघुनाथ म्हात्रे मार्ग ते नगरभवन इमारतीपर्यंत एकेरी वाहतूक रस्ता म्हणून अमलात आणावा. |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (60 फुट व 90 फुट रस्ता) | पार्कींग सुविधा नाही | 174 दुचाकी वाहने जागा (3132 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 54 (972 चौ.मी.) | • पर्यायी दिवशी (पी 1 - पी 2) दुचाकी आणि कार साठी ऑन-स्ट्रीट पार्कींग. |
| | | | | | • जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 50 मीटरवर नो-पार्कींग क्षेत्र कार्यान्वित केले जावे. |
| | | | | | • जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 100 मीटरवर ऑटो रिक्षा स्टॅन्ड केले जावे |
| | | | | | • शक्यतो या रोडवरील सोसायटी आणि व्यावसायिक संकुल याना ग्राहकांसाठी पार्कींग सुविधा देण्याची सुचना देणे आवश्यक आहे.<br>• फेरीवाल्यानी महत्त्वाचा 60 फुट रस्त्याचा भाग व्यापला आहे, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.<br>• या रस्त्यावर पार्कींग करण्यास अनुमती दिली गेल्यामुळे वाहतूक समस्या होऊ शकते, म्हणुनच खेतेश्वर चौकापर्यंत 60 फुट रस्त्यावर नो पार्कींग झोन असणे आवश्यक आहे.<br>• 60 फीट रोड ते उड्डाणपूल चौकापर्यंत वैकल्पिक दिवशी पार्किंग प्रदान केले जावे. |

सन्माननीय सदस्य यांनी खालीलप्रमाणे पार्कींग व नो पार्कींगची ठिकाणे सुचविलेली आहेत.

| प्रभाग क्रमांक | पार्किंग | नो-पार्किंग |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) स्टेशन स्कायवॉक खाली | बालाजी नगर<br>विनायक नगर<br>मोदी पटेल रोड |
| | | रेल्वे समांतर रस्ता<br>बसडेपोवर बसशिवाय पार्कींग होऊ नये. |
| | | गणेशनगर<br>आनंदनगर क्षेत्र |

| | | |
|---|---|---|
| 2 | 1) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) ते पाण्याची टाकीपर्यंतचा रस्ता वन वे पी-1 व पी-2 करणे<br>2) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) च्या समोरुन ते कपूर टॉवर पर्यंत वन वे पी-1 व पी-2 करणे | जय अंबेनगर राजश्रीपार्क ते गणेश आनंद नगर. |
| | | 1) बंदरवाडी रेल्वे समांतर रस्ता आशिर्वाद हॉस्पीटल अंबे माता मंदीर पासून जैन मंदीर पासून सब वे पर्यंत<br>2) सागर बिल्डींग 1 जेसलपार्क से अक्षिता (आरएनपी पार्क) पर्यंत<br>3) मयुरपंख (नवघर रोड) तलाव रोड तुलसी महल पर्यंत<br>4) संम्पुर्ण जेसलपार्क<br>जैन मंदीर राहुल पार्क आर एनपी पार्क पासून काशि विश्वनाथ मंदीर पर्यंत |
| | | तलावरोड,बी.पी.रोड, नवघर रोड, एक बाजु स्टेशन रोड समांतर |
| 3 | | 1) एसव्ही रोड ते आर एन पी पार्क मार्ग<br>2) कस्तुरी पार्क प्रवेशदवार फादर जोसेफ शाळा ते टिनी टॉइज शाळेकडील मार्ग<br>3) आरएनपी पार्क येथील अरविंद पार्क इमारत ते पवन पॅलेस<br>4) सरस्वती नगर ते भारतरत्न श्री सचिन तेंडुलकर मैदान<br>5) सुदर्शन बिल्डींग ते साई पार्क बिल्डींग नवघर रोड मार्ग |
| | 1) सचिन तेंडुलकर मैदानाच्या बाजुला (आरक्षण क्र.110 तात्पुरते पे ॲन्ड पार्क)<br>2) आनंद दिघे मैदान, पाण्याच्या टाकी जवळ नवघर<br>3) आरएनपी पार्क अरविंद इमारतीच्या समोरील मोकळी जागा | |
| 4 | हिरापन्ना ते गोडदेव नाका पार्कींग समोरची जागा.<br>गोडदेव नाका ते हनुमान मंदीर पी/1,पी/2 | प्रभाग क्र.04 मधील नवघर रोड, तलाव रोड, बी.पी.रोड गोडदेव नाका,येथील क्षेत्राचे नो पार्कींग. |
| | खारीगांव नाका ते गोडदेव नाका | नवघर पोलीस स्टेशनची गल्ली.<br>प्रभात पाटील गल्ली वन वे करणे. |
| | गोडदेव नाका ते हनुमान मंदीर | भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर |
| | | भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर |
| 5 | | नर्मदा स्मृती इमारत ते साईरत्नम इमारत पर्यंत तसेच संपुर्ण केबीन रोड पासून ते स्टेशन रोड पर्यंत |
| | | केबीन रोड<br>बी.पी.रोड<br>विजय पंजाब |
| | | जिथे गाडी पार्क करु शकतो तिथे पट्टे मारणे. |
| 6 | | 60 फुटी पार्कींग पट्टा, कमला पार्क समोरील एन्ट्रीमधील दोन्हीबाजूस नो पार्कींग झोन करणे.<br>भाईंदर (प) 60 फुटी रोड गणेश मंदीर समोरील क्रॉस रोड, डॉ.दिंगबर केशव कुलकर्णी रस्त्यावरील उमा निवास ते शैलेश निवास इमारती लगत नो पार्कींग झोन तसेच साई |

| | | |
|---|---|---|
| | | छाया ते पार्श्व पुजा इमारती लगत व पर्ल सोसायटी लगत नो पार्कींग झोन. |
| 7 | | राजेश हॉटेल गल्ली. |
| | | शिवसेना गल्ली ते स्टेशन रोड<br>जे.एच.पोद्दार स्कूल क्रॉस रोड<br>कोबडीगल्ली नगरभवन वन वे<br>अमरपॅलेस ते हनुमान मंदीर |
| 8 | 1) अमृतवाणी सत्संग मार्ग<br>2) जे पी ठाकूर मार्ग मोटार सायकली रस्त्यावर उभ्या केल्या जातात<br>3) फाटक मार्गावर ठाकूर गल्ली ते गीता नगर पर्यंत अवजड वाहने उभी केली जातात<br>4) मॅक्सस मॉल ते मांडली तलाव मार्ग जड वाहनांना व खाजगी/सरकारी बसेसना नो एन्ट्री असून देखील तेथून ये जा करतात | राव तलाव वन वे<br>नो पार्कींगचे पट्टे मारले<br>बेकरी गल्ली / ठाकुर गल्ली एक बाजु |
| | पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल रस्ता एक बाजु<br>क्रोमा रोड एक बाजु<br>150 रोड<br>क्रोमाची लेन - नो पार्कींग | प्रभागातील हॉस्पिटल व शाळा परिसर नो पार्कींग असावेत.<br>1. टेंबारोड एक बाजू पी1/पी2<br>2. क्रोमाची गल्ली पी1/पी2<br>3. अमृतवाणी रोड पी1/पी2<br>4. गीतानगर पी1/पी2. |
| | 1. क्रोमा शोरुम ते बँक ऑफ बडोदा पर्यंत (पी-1/पी-2)<br>2. ठाकुरगल्ली (पी-1/पी-2)<br>3. बेकरी गल्ली (पी-1/पी-2)<br>4. स्वामी सत्यानंन्द महाराज मार्ग, (पी-1/पी-2) | 1. डॉन बॉस्को स्कूल रोड<br>2. वालचंन्द कॉम्पलेक्स ते टीना टॉवर. |
| 9 | | 1. सोनाली हॉटेल कडे जाणा-या रस्त्यावर ते आला हजरत मैदानासमोर<br>2. हिना अवेन्यु इमारत पासून ते व्हिनस बिल्डींग पासून ते हैदरी चौक (मुख्य रस्ता)<br>3. बानेगर शाळेपर्यंत रस्त्यावर डाव्या बाजूस<br>4. लोधा कॉम्पलेक्स ते राम रहिम बगीचा समोर<br>5. गीता नगर फेज 7 उडाण पुलाखाली मायरा मेंन्डोसा बगीचा दोन्ही बाजूस<br>6. आझाद नगर सिग्नल रहिमिया मस्जिद पासून भाईंदर फाटक पोलीस चौकी पर्यंत सम-विषय रस्त्यावर दोन्ही बाजूस<br>7. गिता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर पासुन ते गिता सरोवर इमारती पर्यंत दोन्ही बाजुस<br>8. गोल्ड्न नेस्ट सर्कल नयानगर कडे जाणारा रस्त्याच्या सर्कल्वर दोन्ही बाजूस |
| | 1. एन एच शाळा मुख्य रस्ता सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस | 1. सोनाली हॉटेल जाणा-या रस्त्यावर हजरत मैदानासमोर.<br>2. हिना ॲवेन्यु इमारतीपासून ते व्हिनस इमारतीपासून |

| | | |
|---|---|---|
| | | ते हैदरी चौक (मुख्य रस्ता)<br>3. बानेगर शाळेकडे जाणा-या रस्त्यावर डाव्या बाजूस<br>4. लोधा कॉम्पलेक्स येथे राम-रहिम बगीच्यासमोर<br>5. गीता नगर फेज 7 उड्डाणपुलाच्या खाली मायरा मेंन्डोसा बगीच्या दोन्ही बाजुस<br>6. आझाद नगर सिग्नल, त रेहमानिय मस्जिद पासून ते भाईंदर रेल्वे फाटक (पोलीस चौकी) पर्यंत सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस<br>7. गीता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर ते गीता सरोवर इमारती पर्यंत |
| 10 | 1) गोल्डन नेस्ट सिग्नल ते इंद्रलोक (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) सम विषम पार्किंग करणे<br>2) हनुमान मंदीर (न्यु गोल्डन नेस्ट) ते सेवन इलेवन चौक सम विषम पार्किंग करणे<br>3) विमल डेरी ते इंद्रलोक नाका (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) पर्यंत नो पार्किंग करणे अथवा सम विषम पार्किंग करणे<br>4) गुरुजी चौक ते सेवन इलेवन चौक पर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>5) इंद्रलोक नाका ते ओमशांती चौक सम विषम पार्किंग करणे<br>6) फाटक ते विमल डेरीपर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>7) फाटक ते गोल्डन नेस्ट सिग्नल पर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>8) अभिनव नाका ते मनपा शाळा क्र.8 पर्यंत नो पार्किंग करणे<br>9) स्व. विनायक घरत मार्ग् (गोडदेव नाका ते शिवहरी फरसाण मार्ट पर्यंत) नो पार्किंग करणे | विमलडेरी इंद्र्लोककडे येणार रस्ता<br>गोल्डन नेस्ट ते सरळ गावात जाणारा रस्ता. |
| 11 | | 1. न्यु गोल्डन नेस्ट पुर्ण रस्ता<br>2. रामदेव पार्क<br>3. बाळासाहेब ठाकरे उद्यान क्षेत्र<br>4. ऑरेंज हॉस्पिटल परिसर |
| 14 | | 1) गावदेवी जरीमरी मंदीर मार्ग<br>2) जनता नगर (धारावी मंदीर मार्ग) नीलकमल प्रवेशद्वार ते लिबर्टी तबेला पर्यंत<br>3) मनाली विलेज ते ग्रीन विलेज येथील रस्ता |
| | | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 |
| 15 | | 1) नताशा पार्क ते भक्तीवेदांत<br>2) अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर<br>3) भक्तीवेदांत हॉस्पीटल ते डेल्टा |

| | | |
|---|---|---|
| | | 4) अमर पॅलेस हॉटेल ते अभित पटेल अपार्टमेंट<br>5) प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळेसमोर<br>6) अजित पॅलेस ते काशिमिरा नाका सर्विस रोड |
| | डेल्टा गार्डन पासून पांडुरंगवाडी ते लोढा नो पार्कींग<br>डेल्टागार्डन पासून ते हरिकृष्णमंदीर - नो पार्कींग | 1. हरेकृष्ण मंदिर ते डेल्टा गार्डन संकुलपर्यंत<br>2. हरिओम सोसा ते पांडुरंग वाडी पर्यंत<br>3. पांडुरंग वाडी ते लोढा हायवे पर्यंत<br>4. अजित पॅलेस ते काशीमिरा शिवाजी पुतळायापर्यंत हायवे (सर्व्हिस रोड)<br>5. शिवाजी पुतळा ते सिल्वर पार्क भाईंदर रोड पर्यंत फुटपाथ वरील पार्कींग<br>6. मिरागांव हनुमान मंदिरा समोरील पार्कींग.<br>7. मिरागांव ते मुंन्शी कम्पाऊण्ड रोड वरील पार्कींग<br>8. मिरागांव अमर पॅलेस हॉटेल ते अबिद पटेल<br>9. प्लेझंट पार्क (डॉन बॉस्को स्कुल) ते काशीमिरा रोड अग्रवाल कम्पाऊण्ड डायमंड टॉवरच्या नाक्यापर्यंत<br>10. अंबरप्लाझा हॉल समोर व संघवी नगर ते अंबल प्लाझा हॉलपर्यंत<br>11. श्रीश्वाश्वत कॉमपलेक्स ते मानस सरोवर ते खोडीयार कुंज बिल्डींग समोरील रस्ता. |
| | | 1) मिरागाव हनुमान मंदीर समोर<br>2) अमर पॅलेस बाजुचा रोड<br>3) अजित पॅलेस ते चेकनाका रोड<br>4) चेकनाका ते शिवाजी पुतळा पर्यंत<br>5) काशिमिरा नाका ते संघवी नगर हायवे फुटपाथ रोड<br>6) प्लेजंट पार्क डॉन बॉस्को रोड ते डायमंड टॉवर<br>7) अंबर प्लाझा हॉल समोर ते संघवी गार्डन रोड<br>8) श्री शाश्वत कॉम्प्लेक्स आतील रोड जुना प्लेजेंट पार्क रोड |
| 16 | | 1. अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर स्टॉप पेणकरपाडा नो पार्कींग झोन<br>2. सृष्टी से - 1 व 2 रॉयल कॉलेज भक्तीवेन्दांत हॉस्पिटल व डालमिया कॉलेज<br>3. शांतीधाम, शांतीपार्क, ते न्यु म्हाडा व सुर्या शॉपिंग सेंटर पर्यंत परिसर<br>नित्यानंद नगर सेंट पॉल स्कूल पर्यंतचा परिसर. |
| | | 1) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत<br>2) म्हाडा प्रेम नगर शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत<br>3) सुर्या शॉपिंग सेंटर समोरील पुनम क्लस्टर 3 ते सृष्टी सेक्टर 2 पर्यंत<br>4) म्हाडा राजमुद्रा ते शिवसेना शाखेपर्यंत |
| | | 1) म्हाडा शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत<br>2) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत<br>3) एमआयडीसी रॉयल पार्क ते इस्कॉन, रॉयल कॉलेज पर्यंत<br>4) गुरुदेव बिल्डींग ते हेतल पार्क |

| | | |
|---|---|---|
| 17 | | 1. सेंट झेवियर स्कूल जवळ शांतीपार्क.<br>2. संघवीनगर ते अंबरप्लाझा पर्यंत (हायवे) |
| 18 | | सिनेमॅक्स समोरील ईडन रोझ कॉम्पलेक्स. पुनम गार्डन ते सालासर गार्डन. |
| | | पुनम गार्डन युनिक हाईटस ते साई सरस्वती धाम हरिया ड्रीम पार्क अशोका हॉटेल्ते रुतू पॅराडाईस पर्यंत.<br>अशोका हॉटेल हरिया पार्क ते वेदांत हायस्कुल |
| | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग<br>6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस<br>2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |
| 19 | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग<br>6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस<br>2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |
| | एस.के.स्टोन ते मिरारोड स्टेशन शांतीनगर व नयानगर रस्ता एक बाजू पार्कींग | |
| | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस |

| | | |
|---|---|---|
| | 2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग<br>6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |
| 20 | | ईशा वाईन ते सेक्टर 10 च्या कोप-या पर्यंत. |
| 21 | 1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे<br>2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे | 1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे.<br>2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे<br>3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे<br>4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड भिंतीची साईडला नो पार्किंग झोन करणे<br>5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे<br>7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>8) शांती शॉपिंग सेंटर व शांती इनकेव्ह रोड वरील दोन्ही बाजू पार्कींग करणे. |
| | 1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे<br>2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे | 1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे.<br>2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे<br>3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे<br>4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड |

| | | |
|---|---|---|
| | | भिंतीची साईडला नो पार्किंग झोन करणे<br>5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे<br>7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे |
| | 1. मिरारोड स्टेशन स्काय वॉकच्या खालील जागेत मिरारोड पोलीस चौकी बाजुच्या रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्कीग झोन.<br>2. टी.एम.टी बस स्टॅण्ड बाजुला मोकळ्या जागेवर पार्कीग झोन<br>3. से 1 गणेश चौक ते झुलेलाल चौकपर्यंत पी1/पी/2 | 1. शांती नगर से - 1 बि.क्र.ए/64 ते शरयू माता चौक पर्यंत आणि शांती शॉपिंग सेंटर पासून ते शांती विहार ए/8 पर्यंत सम विषम दिवस .<br>2. न्यु इंडिया बँक सेक्टर क्र 1 ते टी.एम.टी. बस थांबा पर्यंत<br>3. शांती शॉपिंग सेंटर रिक्षा सॅण्डा रस्त्याच्या दोन्ही बाजुस व स्टेशन मुख्य गेट समोर<br>4. मिरारोड रेल्वे टिकिट काऊटर रिक्षा स्टॅण्ड (दहिसर साईड) ते साई कॉम्पलेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊड भिंतीची साईडला नो पार्कीग<br>5. मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयू माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस<br>6. शरयु माता चौक ते गेणेश चौ परंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम-विषम दिवस<br>7. सुष्टी से - 3 व सुर्या शॉपिंग सेंटर समोर बाजुस नो-पार्कीग झोन |
| 22 | 1. मिरारोड नयानगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत (रस्त्याची उजवी बाजू)<br>2. मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नयानगर पोलीस ठाणे ते लोढा एफ ओ.बी पर्यंत..<br>3. मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाकापर्यंत (शम विषम दिवस)<br>4. मिरारोड निहाल हॉटेल ते हैदरी चौक पर्यंत (शम विषम दिवस)<br>5. हैदरी चौक ते एन.एच शाळा पर्यंत (सम विषम दिवस) | मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत (दोन्ही बाजू) |
| | | मिरारोड रेल्वे स्थानक शेजारी अझीजीया मस्जीद जवळ नोपार्किंग |
| | 1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू<br>2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम<br>3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम<br>4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम विषम | 1) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत<br>2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत<br>3) एनएचचौक ते रसाज चौक पर्यंत |
| | 1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते | 1) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | **रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू**<br>**2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम**<br>**3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम**<br>**4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम विषम** | **2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत**<br>**3) एन.एच. चौक ते रसाज चौक पर्यंत** |
| **23** | | **भाईंदर (प.) डी मार्ट माहेश्वरी भवन रोड एस व्ही रोड आणि सुभाषचंद्र बोस मैदान रोड.** |

**ठराव क्र. :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मे. सी.आय.आर.टी. च्या अहवालाची अंमलबजावणी करणे व प्रस्तावित केल्यानूसार धोरण निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. नो पार्कींग क्षेत्रात तातडीने फलक लावण्यात यावे. पार्कींग क्षेत्राच्या अंमलबजावणीसाठी निविदा मागवून कंत्राटदार नेमण्यात यावा. तसेच प्रशासकीय कार्यवाहीचे सर्व अधिकार व धोरणात बदल करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कींग नो पार्कींग बाबतचे धोरण निश्चित करणे.**

**ठराव क्र. १३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पार्कींग धोरण ठरविणेसाठी मा. महासभा दि.२६/०२/२०१८ ठराव क्र.४८ अन्वये तदर्थ समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक दि.२१/०२/२०१८ रोजी महापौर यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्रीम. डिम्पल मेहता | महापौर |
| श्री. चंद्रकांत वैती | उपमहापौर |
| श्री. ध्रुवकिशोर पाटील | सभापती, स्थायी समिती |
| श्री. रोहिदास पाटील | सभागृह नेता |
| श्री. राजु भोईर | विरोधी पक्ष नेता |
| श्री. हसमुख गेहलोत | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| श्री. हरिश्चंद्र आमगांवकर | गटनेता, शिवसेना |
| श्री. जुबेर इनामदार | गटनेता, राष्ट्रीय काँग्रेस |
| श्री. शिवाजी बारकुंड | शहर अभियंता |
| श्री. दिपक पूजारी | उप आयुक्त |
| श्रीम. स्वाती देशपांडे | सहाय्यक आयुक्त |
| श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |

उपस्थितांचे स्वागत करुन समितीच्या कामास सुरुवात करण्यात आली.

**<u>प्रस्तावना</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ही वेगाने वाढत असून शहरातील वाढती वाहने, वाहनांच्या पार्कींगसाठी जागेची उपलब्धता पाहता मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर वाहने उभी राहतात. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पार्कींग धोरण ठरविणे आवश्यक झाल्याने सदर कामासाठी मे. सी.आय.आर.टी. या संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. सदर संस्थेने अहवाल सादर केला असून सदर अहवालात नमूद

केल्यानूसार व सर्व सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या सुचनेनूसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पार्कीग धोरण तयार करण्यात आलेले आहे.

**<u>धोरणाची आवश्यकता</u>**

- पार्कीग व नो पार्कीग ठिकाणे ठरविणे, नो पार्कीग क्षेत्रातील वाहनांवर प्रभावी कारवाई करणे.
- ऑटो रिक्षासाठी स्टँडची जागा निश्चित करणे.
- शहरातील पार्कींगची आवश्यकता पाहता नविन विकास योजनेत पार्कींगसाठी व रस्त्यावरील पार्कींगसाठी जागा निश्चित करणे, असलेल्या पार्कींगची क्षमता वाढविणे.
- रहीवास व वाणीज्य संकुलाच्या ठिकाणी पार्कींगचे नियमन करणे.
- एकेरी मार्ग निश्चित करणे, जड वाहनांना वेळेची मर्यादा ठेवणे.
- रस्त्यावर सम विषम दिवशी पार्कींग निश्चित करणे.
- वाहतूकीचा जास्त ताण असलेल्या रस्त्यावरील वाहतूकीचे नियमन करणे.

मे. सी.आय.आर.टी. या संस्थेमार्फत अहवाल तयार करून सादर केला आहे. सदर अहवालानूसार तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पार्कींगच्या मागणीनूसार खालीलप्रमाणे शॉर्ट टर्म उपाय सुचविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | रस्ता | विद्यमान पार्कींग सुविधा | पार्कींग मागणी | | शॉर्ट टर्म उपाय |
|---|---|---|---|---|---|
| | | | सद्यस्थिती | भविष्यातील (पुढील पाच वर्षे) | |
| 1 | कनकिया रोड | 100 दुचाकी वाहने क्षमतेची सशुल्क बहुस्तरीय कार पार्कींग सुविधा | 197 दुचाकी वाहने (3542 चौ.मी.) | अतिरीक्त 192 दुचाकी वाहने (3456 चौ.मी.) | दुचाकी आणि कार दोन्हीसाठी आणखी 100 दुचाकी वाहने पार्कींगची जागा भरण्यासाठी बहुस्तरीय कार पार्कींग इमारतीत सुधारणा करणे. |
| | | | | | ऑफ-स्ट्रीट पार्कींग आकर्षित करण्यासाठी विभेदक पार्कींग फी प्रणाली अंमलबजावणीव्दारे पार्कींग फीमध्ये (तासाचा आधार) लवचिकता दिली जाईल. |
| | | | | | • हा रस्ता अरुंद आणि रस्त्यांवर पार्कींगची तरतूद आहे, त्यामुळे गर्दी होऊ शकते.<br>• म्हणूनच हा रस्ता रस्त्यावर पार्कींगसाठी नॉन पार्कींग झोन म्हणून घोषित करणे. |
| | | | | | रस्त्यावरील पार्कींग मधील वाहने प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे. |
| | | | | | 2 जास्तीत जास्त 10 ऑटो रिक्षाची क्षमता असलेले ऑटो रिक्षा स्टँन्ड खालील ठिकाणी प्रस्तावित करणे.<br>• सिनेमॅक्सजवळ<br>• लक्ष्मी पार्कजवळील |
| 2 | पूनम गार्डन रोड | 10 च्या बहुस्तरीय कार पार्कींग दुचाकी वाहने क्षमता | 102 दुचाकी वाहने (1530 चौ.मी.) | अतिरीक्त 31 दुचाकी वाहने (558 चौ.मी.) | सध्याचे बहुस्तरीय कार पार्कींग पुढील 10 वर्षासाठी टिकेल तथापी अतिरीक्त 150 दुचाकी वाहने जागा (2399 चौ.मीटर) दुचाकी आणि कारसाठी भरण्याची श्रेणी सुधारणे भविष्यातील गरजा पूर्ण करण्यास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 10 वर्षापर्यंत मदत करेल |
| | | | | | • सुविधेचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी, पार्कींग फीमध्ये लवचिकता (तासाचे आधारे) देणे आवश्यक आहे. |
| | | | | | • पूनम गार्डन रोड रस्त्यावर पार्कींग प्रतिबंधित करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करणे. |
| 3 | रामदेव पार्क रोड | | 263 दुचाकी वाहने (4737 चौ.मी.) | अतिरीक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.) | • या रस्त्यासह व्यावसायिक संकुले असल्याने ग्राहकांसाठी पार्कींगची जागा तरतूद करावी लागेल.<br>• या संकुलांच्या पुढे नो पार्कींगची स्थापना करणे आवश्यक आहे. |
| | | | | | प्रत्येक चौकापूर्वी आणि नंतर 50 मीटर पर्यंत नो पार्कींग क्षेत्र:<br>• मिरा भाईंदरशी जोडणारा रामदेव पार्क रोड आरंभ<br>• क्वीन्स रोडला जोडणारा चौक<br>• रामदेव पार्क चौक<br>• साई अंगणला जोडणारा चौक<br>• जी.एल. पटेल रोडला जोडणारा चौक<br>• नर्मदा हेरिटेज जवळ चौक<br>• रामभाऊ म्हाळगी उद्यान जवळील चौक<br>• राम नगर बस स्टॉप जवळील चौक |
| | | | | | खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर पर्यंत नो पार्कींग झोन<br>• क्वीन्स पार्कच्या बस स्टॉप<br>• रामदेव पार्क चौक<br>• ओम संगम प्लाझा<br>• रामदेव पार्क<br>• रामनगर<br>2 ऑटो रिक्षा स्टँन्ड या रस्त्यावर प्रस्तावित केल्या आहेत . ( प्रत्येक दिशा आणि 500 मीटरने विभक्त केलेले स्थान ) जास्तीत जास्त क्षमता असलेल्या 7 ऑटो रिक्षांसह |
| | | | | | निवासी सोसायट्यांना पार्की गची तरतूद करण्यास कळविणे. |
| | | | | | • दोन्ही बाजंना रस्त्यावर पार्कींगचे (कारसाठी एक बाजू आणि दुचाकीसाठी एक बाजू) योग्य सीमांकनेसह पार्कींग क्षेत्र रामदेव पार्क जवळील कार आणि दुचाकी प्रस्तावित करणे आवश्यक आहे.<br>• कारला केवल समांतर पार्कींगची परवानगी आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | संत तुकाराम रोड | पार्कींग सुविधा नाही | 188 दुचाकी वाहने (3378 चौ.मी.) | अतिरीक्त 58 दुचाकी वाहने (1044 चौ.मी.) | 100 मीटरसाठी नो पार्कींग क्षेत्र:<br>• संत तुकाराम मार्गासह गोल्डन नेस्ट सर्कल जवळ<br>• स्पोर्ट्स कॉम्पलेक्स जवळ |
| | | | | | खालील बस स्थानकांजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग झोन<br>• नवीन गोल्डन नेस्ट बस स्टॉप<br>• सुखरंजनी बस थांबा<br>• 3 इंद्रलोक टप्पा 2 बस स्टॉप्स |
| | | | | | • या रस्त्यासह व्यावसायिक वापर असलेल्या क्षेत्राजवळ पर्यायी दिवशी ऑन स्ट्रीट पार्कींग पुरविले जाऊ शकते.<br>• समांतर पार्कींगची परवानगी पाहिजे आणि पार्कींग क्षेत्र रस्त्यावरील चिन्हे आणि खुणासह मर्यादा असणे आवश्यक आहे. |
| | | | | | • ऑटोमोबाईल शोरुम आणि गॅरेज पदपथावर/ कॅरेजवेवर जागा लक्षणीय वापरात आहेत. त्यामुळे वाहतूक अडथळा आणि पादचारी पादचार्यांना हलणे अवघड होते. म्हणूनच अतिक्रमण टाळण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. |
| 5 | सृष्टी रोड | पार्कींग सुविधा नाही | 243 दुचाकी वाहने (4365 चौ.मी.) | अतिरीक्त 75 दुचाकी वाहने (1350 चौ.मी.) | निवासी इमारती मध्ये परीसरातील रहिवाशांसाठी पार्कींगची जागा सुनिश्चित करण्यासाठी धोरण गरजेचे पर्यायी दिवस (पी 1-पी 2) ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (समांतर फक्त ) या रस्त्या च्या दोन्ही बाजूंनी प्रस्तावित केले जाऊ शकते कारण रस्ता पुरेसा रुंद आहे. |
| | | | | | वाहने लोडिंग आणि अनलोडिंगसाठी फक्त दिवसाच्या ठराविक तासांमध्ये जागेची सीमारेषेवर व्यवस्था करणे आवश्यक आहे. |
| | | | | | 50 मीटर पर्यंत नॉन-पार्कींग क्षेत्र:<br>• सृष्टी शॉपिंग सेंटर बस स्टॉप<br>• ओम शांती चौक<br>• जांगीड सर्कल<br>• मिरा भाईंदर रोडला जोडणारा चौक |
| 6 | लोढा रोड | पार्कींग सुविधा नाही | 310 दुचाकी वाहने (5579 चौ.मी.) | अतिरीक्त 96 दुचाकी वाहने (1728 चौ.मी.) | ऑन-स्ट्रीट पार्कींग कार आणि दुचाकीसह व्यवसायिक वापर असल्याने पुरविणे. |
| | | | | | केवळ कारसाठी समां तर पार्कींग करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे आणि पार्कींग क्षेत्र, रस्त्यावर पट्टे मारणे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | भक्ती वेदान्त रोड | पार्कींग सुविधा नाही | 294 दुचाकी वाहने (5297 चौ.मी.) | अतिरीक्त 92 दुचाकी वाहने (1656 चौ.मी.) | • या रस्त्यावरील मुख्य केंद्र हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था आणि निवासी सोसायटीज आहेत.<br>• म्हणूनच या केंद्रांना त्यांच्या संबंधित आवारत ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा देण्याचा निर्देश देणे आवश्यक आहे. |
| | | | | | • दुचाकी आणि कारसाठी ऑन-स्ट्रीट सशुल्क वाहनतळ सुविधा या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पुरवली जावी.<br>• कारला समांतर पार्कींग परवानगी द्यावी आणि पार्कींग क्षेत्र चिन्ह आणि खुणा सह निर्धारीत करणे आवश्यक आहे. |
| | | | | | भक्ती वेदांत बस स्टॉप आणि रॉयल कॉलेज बस स्टॉप जवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र |
| 8. | मिरा रेल्वे स्टेशन रस्ता | मोकळी जागा ऑफ-स्ट्रीट पार्कींग सुविधा | 194 दुचाकी वाहने जागा (3495 चौ.मी.) | अतिरिक्त 61 दुचाकी वाहने (1098 चौ.मी.) | • मिरा स्टेशनजवळ उपलब्ध असलेली ओपन स्पेस सशुल्क वाहनतळसुविधा दुचाकी आणि कार दोन्हीसाठी मल्टीस्तरीय पार्कींग सुविधा अद्यावत केली पाहिजे.<br>• या रस्त्याजवळ ज्यात पार्कींगची जागा नाही अश्या सोसायटीच्या रहिवाश्यांसाठी या सुविधेचा विस्तार केला जाऊ शकतो.<br>• अशा रहिवाशांसाठी मासिक पास प्रणाली प्रदान केली जाऊ शकते. |
| | | स्काय वॉक खाली रेल्वे स्टेशन जवळ पार्कींग | | | |
| | | | | | • मिरा रेल्वे स्टेशनपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक.<br>• रसाझ सर्कलच्या जवळ 50 मीटर पर्यंत नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे.<br>• रसाझ सर्कल ते होली क्रॉस कॉन्वेंट स्कुल बस स्टॉप नो-पार्कींग झोन म्हणून घोषित करणे.<br>• बस स्टॉपच्या 50 मीटर पर्यंत पार्कींगची परवानगी देऊ नये.<br>• मिरा स्टेशन जवळील ऑटो रिक्शा स्टेशनाशिवाय रसाझ सर्कलजवळ 50 मीटरवर जास्तीत जास्त 7 ऑटो रिक्षासाठी एक अजून रिक्षा स्टॅन्ड प्रस्तावित आहे.<br>• मिरा स्टेशन जवळ 10 टॅक्सीची क्षमता असलेला स्टँड करणे. |
| | | | | | • डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड ते रसाझ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सर्कल पर्यंत मिरा स्टेशन येथे पार्कीग क्षेत्र (दुचाकी आणि कारसाठी दोन्ही बाजूंनी) उपलब्ध करावे.<br>• तथापि, 50 मीटर चौकमध्ये सर्व बाजूंनी नो-पार्कीग झोन कार्यान्वित करणे आवश्यक आहे. |
| 9. | पुनम सागर रस्ता | पर्यायी ऑन -स्ट्रीट पार्कींग प्रदान केले आहे | 264 दुचाकी वाहने जागा (4752 चौ.मी.) | अतिरिक्त 82 दुचाकी वाहने (1476 चौ.मी.) | पार्कींग क्षेत्र नाही.<br>• स्टेशनपासून ते सेक्टर 10 पर्यंत शांती नगर बस थांबा.<br>• जवळजवळ 50 मीटर नॉन-पार्कींग क्षेत्र<br>• पुनम सागर बस स्टँड<br>• कॅसेडेला बस स्टँड<br>• शांती नगर सेक्तर 10 बस स्टॉप<br>• मिरारोड मार्केट<br>• इंदीरा गांधी हॉस्पीटल<br>• पर्यायी पार्कींग व्यवस्थेच्या बरोबरीने अंमलबजावणी कार्यान्वित करणे. |
| 10. | गोल्डन नेस्ट ते सृष्टी छत्रपती शिवाजी महाराज मार्ग | पार्कींग सुविधा नाही. | 222 दुचाकी वाहने जागा (3996 चौ.मी.) | अतिरिक्त 79 दुचाकी वाहने (1422 चौ.मी.) | बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही.<br>• सावरकर बस स्टॉप<br>• श्रीनाथ कॉम्पलेक्स बस स्टॉप<br>• टाटा इंडिकॉम बस स्टॉप<br>• शिवार गार्डन बस स्टॉप<br>• कनाकिया जंक्शन<br>• एस. के. स्टोन बस स्टॉप<br>चौकपासून 50 मीटर पर्यंत कोणतेही पार्कींग क्षेत्र नाहीत.<br>• गोल्डन नेस्ट सर्कलच्या सर्व दिशांना जाणारे रस्ते.<br>• नयानगर चेकपोस्ट जंक्शन.<br>• सिल्व्हर पार्क सृष्टी रोडला जोडणारा चौक.<br>• या रस्त्यावर व्यावसायिक उपक्रम दृष्टीने दोन्ही बाजूंनी ठराविक ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित करणे.<br>• ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा रस्त्यावर स्पष्ट मार्कींग करून करू शकतात.<br>ऑन-स्ट्रीट पार्कींग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 11. | सिल्व्हर पार्क ते | पार्कींग सुविधा नाही. | 194 दुचाकी | अतिरिक्त 60 दुचाकी वाहने | बस स्टॉपच्या जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्गावर (छत्रपती शिवाजी महाराज मार्ग) | | वाहने जागा (3492 चौ.मी.) | (1080 चौ.मी.) | • सिल्व्हर पार्क बस स्टॉप.<br>• हिट्को कंपनी बस स्टॉप.<br>• हटकेश बस स्टॉप.<br>• ग्रीन अकादमी, जेत इन्फोसिस बस स्टॉप.<br>• प्लेझंट पार्क बस स्टॉप.<br>• पंजाब फाऊँड्री.<br>काशिमिरा जंक्शनपासून पंजाब फाऊंड्री बस स्टॉपपर्यंत कोणतेही पार्किंग सुविधा देऊ नये.<br>• मार्गाच्या उर्वरित भागांमध्ये व्यावसायिक उपक्रमांचा विचार करुन ऑन-स्ट्रीट पार्कींग सुविधा (केवळ समांतर) प्रस्तावित केली जाऊ शकते.<br>• या रोडवर भरपूर औद्योगिक उपक्रम असल्याने, गाड्या चढवणे आणि उतरवणे नियमन आवश्यक आहे.<br>• व्यावसायिक वाहने चढवणे आणि उतरवणे यासाठी कारखान्यांच्या जवळ आणि त्यांच्या आवारामध्ये ठराविक भाग ठेवणे आवश्यक आहे. |
| 12 | गोल्डन नेस्ट ते फाटक रोड | पर्यायी ऑनस्ट्रिट पार्कींग | 326 दुचाकी वाहने (5862 चौ.मी.) | अतिरिक्त 101 दुचाकी वाहने (1818 चौ.मी.) | ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 13 | बाळाराम पाटील रोड | रस्त्यांवर (विषम सम) पार्कींग योग्यरितीने होत नाही | 144 दुचाकी वाहने (2594 चौ.मी.) | अतिरिक्त 45 दुचाकी वाहने 810 चौ.मी) | • स्टेशन रोड पासून प्रवेश प्रतिबंधित करुन बी.पी. रोड एकेरी रस्त्यावर रुपांतरीत केला जावा.<br>• जरी प्रणाली योग्यरित्या अंमलात आणली जात नाही, तरी पर्यायी दिवसांची (सम-विषम) पार्कींगची तरतूद आहे.<br>• तुलनेने कमी व्यावसायिक उपक्रममध्ये पार्कींग क्षेत्राची मर्यादा स्पष्ट असली पाहिजे जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही.<br>• अंमलबजावणी कडक केली पाहिजे.<br>• किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे.<br>• रस्ता अरुंद असल्याने रस्त्यावर शक्यतो ऑटो - रिक्षा चालवण्याचे नियमन करणे अत्यावश्यक आहे.<br>• शक्यतो हया रस्त्यावर रिक्षा स्टँड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनुज्ञेय करु नये. |
| | | | | | या रस्त्यावर बसेसची देखील वाहतूक सुरु आहे, म्हणून व्यावसायिक वाहनांचे चढवणे आणि उतरवणे यांचे काटेकोरपणे नियमन करणे अत्यावश्यक आहे. |
| 14 | केबिन रोड | पार्कींग सुविधा नाही | 113 दुचाकी वाहने जागा (2031 चौ.मी.) | अतिरिक्त 35 दुचाकी वाहने (630 चौ.मी.) | रस्ता अरुंद असल्यामुळे , हा रस्ता केबिन रोड पोलीस चौकीपासून एकेरी वाहतुकीमध्ये रुपांतरीत केला जाऊ शकतो.<br>रेल्वे रुळाच्या बाजुने दुचाकी आणि कार साठी सशुल्क वाहनतळ दयावा<br>ऑन-स्ट्रीट पार्किग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे जेणकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. |
| 15 | गोडदेव फाटक रोड | पार्कींग सुविधा नाही | 209 दुचाकी वाहने जागा (3759 चौ.मी.) | अतिरिक्त 65 दुचाकी वाहने (1170 चौ.मी.) | • रस्ता अरुंद आहे आणि म्हणून रस्ता नो- पार्किंग झोन म्हणून घोषित करणे आवश्यक आहे.<br>• ऑन-स्ट्रीट पार्किंग नियमांचे पालन लोकांकडून होत आहे. जेणेकरुन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची वाहतुक पोलिसांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे.<br>• किमान गर्दीच्या वेळी व्यावसायिक वाहनांची हालचाल नियंत्रित करणे आवश्यक आहे. |
| 16 | मॅक्सेस मॉल शेजारील रस्ता. | मॉल गोव्हर्ससाठी मॅकसेस मॉल रोड येथे खासगी पार्कींगसाठी सुविधा आहे. | 198 दुचाकी वाहने (3572 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 62 (1116 चौ.मी.) | मेक्सस मॉल रस्त्यावर नो -पार्किंग लागू करण्यासाठी कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे , कारण सुविधा मॉल गोव्हर्ससाठी उपल ब्ध आहे आणि ऑफ - स्ट्रीट पार्कींग सुविधा कल्याण ज्वेलरी सर्व्हिस सेंटरमागे आहे. |
| 17 | पंडीत भिमसेन हॉस्पीटल रस्ता | | | | • या ररस्त्यावर नो-पार्कींगची कठोर अंमलबजावणी.<br>• वाहतूक सदर रस्त्यावर एकेरी मार्ग (मांडली तलाव ते भिमसेन जोशी हॉस्पीटल) करावा. |
| 18 | मिरा भाईंदर मुख्य कार्यालय समोरील रस्ता (स्टेशन रोड) | 100 दुचाकी आणि 35 कार क्षमता असलेले ऑफ स्ट्रीट पार्कींग महानगरपालिका मुख्य कार्यालय मध्ये दिले गेले आहे. | 179 दुचाकी वाहने (3213 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 55 (990 चौ.मी.) | - पोलिस स्टेशन ते महानगरपालिका कार्यालयासमोर नो-पार्कींग क्षेत्र म्हणून अंमलबजावणी करावी.<br>- बस स्टॉप जवळ 50 मीटर पर्यंत पार्कींग मंजूर करु नये.<br>• क्रॉस गार्डन बस स्टॉप<br>• जैन मंदिर बस स्टॉप<br>• बॉम्बे मार्केट |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • बालाजी नगर बस स्टॉप |
| | | | | | • उर्वरित रोड पर्यायी दिवशी पार्किंग (पी1 - पी 2) उपयोगात आणला जाऊ शकतो<br>• या रस्त्यावरील रहदारीचा प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी अतिक्रमणे हटवावे लागतील. |
| | | | | | • खेतेश्वर चौकाजवळ 100 मीटर 7 ऑटो-रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे.<br>• महानगरपालिका समोरील बस स्टॉप जवळ 100 मीटरवर 7 ऑटो - रिक्षा क्षमता असलेले रिक्षा स्टॅन्ड देणे आवश्यक आहे. |
| | | | | | • महापालिका कार्यालया समोरील रघुनाथ म्हात्रे मार्ग ते नगरभवन इमारतीपर्यंत एकेरी वाहतूक रस्ता म्हणून अमलात आणावा. |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (60 फुट व 90 फुट रस्ता) | पार्कींग सुविधा नाही | 174 दुचाकी वाहने जागा (3132 चौ.मी.) | अतिरिक्त दुचाकी वाहने 54 (972 चौ.मी.) | • पर्यायी दिवशी (पी 1 - पी 2) दुचाकी आणि कार साठी ऑन-स्ट्रीट पार्कींग. |
| | | | | | • जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 50 मीटरवर नो-पार्कींग क्षेत्र कार्यान्वित केले जावे. |
| | | | | | • जानकी रेसिडेन्सी बस स्टॉपच्या जवळ 100 मीटरवर ऑटो रिक्षा स्टॅन्ड केले जावे |
| | | | | | • शक्यतो या रोडवरील सोसायटी आणि व्यावसायिक संकुल याना ग्राहकांसाठी पार्कींग सुविधा देण्याची सुचना देणे आवश्यक आहे.<br>• फेरीवाल्यानी महत्त्वाचा 60 फुट रस्त्याचा भाग व्यापला आहे, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.<br>• या रस्त्यावर पार्कींग करण्यास अनुमती दिली गेल्यामुळे वाहतूक समस्या होऊ शकते, म्हणुनच खेतेश्वर चौकापर्यंत 60 फुट रस्त्यावर नो पार्कींग झोन असणे आवश्यक आहे.<br>• 60 फीट रोड ते उड्डाणपूल चौकापर्यंत वैकल्पिक दिवशी पार्किंग प्रदान केले जावे. |

सन्माननीय सदस्य यांनी खालीलप्रमाणे पार्कींग व नो पार्कींगची ठिकाणे सुचविलेली आहेत.

| प्रभाग क्रमांक | पार्किंग | नो-पार्किंग |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) स्टेशन स्कायवॉक खाली | बालाजी नगर<br>विनायक नगर<br>मोदी पटेल रोड |
| | | रेल्वे समांतर रस्ता<br>बसडेपोवर बसशिवाय पार्कींग होऊ नये. |
| | | गणेशनगर<br>आनंदनगर क्षेत्र |
| 2 | 1) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) ते पाण्याची टाकीपर्यंतचा रस्ता वन वे पी-1 व पी-2 करणे<br>2) अंबे माता मंदीर पासून (जेसलपार्क) च्या समोरुन ते कपूर टॉवर पर्यंत वन वे पी-1 व पी-2 करणे | जय अंबेनगर राजश्रीपार्क ते गणेश आनंद नगर. |
| | | 1) बंदरवाडी रेल्वे समांतर रस्ता आशिर्वाद हॉस्पीटल अंबे माता मंदीर पासून जैन मंदीर पासून सब वे पर्यंत<br>2) सागर बिल्डींग 1 जेसलपार्क से अक्षिता (आरएनपी पार्क) पर्यंत<br>3) मयुरपंख (नवघर रोड) तलाव रोड तुलसी महल पर्यंत<br>4) संम्पुर्ण जेसलपार्क<br>जैन मंदीर राहुल पार्क आर एनपी पार्क पासून काशि विश्वनाथ मंदीर पर्यंत |
| | | तलावरोड,बी.पी.रोड, नवघर रोड, एक बाजु स्टेशन रोड समांतर |
| 3 | | 1) एसव्ही रोड ते आर एन पी पार्क मार्ग<br>2) कस्तुरी पार्क प्रवेशदवार फादर जोसेफ शाळा ते टिनी टॉइज शाळेकडील मार्ग<br>3) आरएनपी पार्क येथील अरविंद पार्क इमारत ते पवन पॅलेस<br>4) सरस्वती नगर ते भारतरत्न श्री सचिन तेंडुलकर मैदान<br>5) सुदर्शन बिल्डींग ते साई पार्क बिल्डींग नवघर रोड मार्ग |
| | 1) सचिन तेंडुलकर मैदानाच्या बाजुला (आरक्षण क्र.110 तात्पुरते पे ॲन्ड पार्क)<br>2) आनंद दिघे मैदान, पाण्याच्या टाकी जवळ नवघर<br>3) आरएनपी पार्क अरविंद इमारतीच्या समोरील मोकळी जागा | |
| 4 | हिरापन्ना ते गोडदेव नाका पार्कींग समोरची जागा.<br>गोडदेव नाका ते हनुमान मंदीर पी/1,पी/2 | प्रभाग क्र.04 मधील नवघर रोड, तलाव रोड, बी.पी.रोड गोडदेव नाका,येथील क्षेत्राचे नो पार्कींग. |
| | खारीगांव नाका ते गोडदेव नाका | नवघर पोलीस स्टेशनची गल्ली.<br>प्रभात पाटील गल्ली वन वे करणे. |
| | गोडदेव नाका ते हनुमान मंदीर | भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर |
| | | भाईंदर (पूर्व) तलाव रोड परिसर |
| 5 | | नर्मदा स्मृती इमारत ते साईरत्नम इमारत पर्यंत तसेच संपुर्ण केबीन रोड पासून ते स्टेशन रोड पर्यंत |
| | | केबीन रोड |

| | | |
|---|---|---|
| | | बी.पी.रोड<br>विजय पंजाब |
| | | जिथे गाडी पार्क करु शकतो तिथे पट्टे मारणे. |
| 6 | | 60 फुटी पार्कींग पट्टा, कमला पार्क समोरील एन्ट्रीमधील दोन्हीबाजूस नो पार्कींग झोन करणे.<br>भाईंदर (प) 60 फुटी रोड गणेश मंदीर समोरील क्रॉस रोड, डॉ.दिंगबर केशव कुलकर्णी रस्त्यावरील उमा निवास ते शैलेश निवास इमारती लगत नो पार्कींग झोन तसेच साई छाया ते पार्श्व पुजा इमारती लगत व पर्ल सोसायटी लगत नो पार्कींग झोन. |
| 7 | | राजेश हॉटेल गल्ली. |
| | | शिवसेना गल्ली ते स्टेशन रोड<br>जे.एच.पोद्दार स्कूल क्रॉस रोड<br>कोबडीगल्ली नगरभवन वन वे<br>अमरपॅलेस ते हनुमान मंदीर |
| 8 | 1) अमृतवाणी सत्संग मार्ग<br>2) जे पी ठाकूर मार्ग मोटार सायकली रस्त्यावर उभ्या केल्या जातात<br>3) फाटक मार्गावर ठाकूर गल्ली ते गीता नगर पर्यंत अवजड वाहने उभी केली जातात<br>4) मॅक्सस मॉल ते मांडली तलाव मार्ग जड वाहनांना व खाजगी/सरकारी बसेसना नो एन्ट्री असून देखील तेथून ये जा करतात | राव तलाव वन वे<br>नो पार्कींगचे पट्टे मारले<br>बेकरी गल्ली / ठाकुर गल्ली एक बाजु |
| | पंडीत भिमसेन जोशी हॉस्पीटल रस्ता एक बाजु<br>क्रोमा रोड एक बाजु<br>150 रोड<br>क्रोमाची लेन - नो पार्कींग | प्रभागातील हॉस्पिटल व शाळा परिसर नो पार्कींग असावेत.<br>1. टेंबारोड एक बाजू पी1/पी2<br>2. क्रोमाची गल्ली पी1/पी2<br>3. अमृतवाणी रोड पी1/पी2<br>4. गीतानगर पी1/पी2. |
| | 1. क्रोमा शोरुम ते बँक ऑफ बडोदा पर्यंत (पी-1/पी-2)<br>2. ठाकुरगल्ली (पी-1/पी-2)<br>3. बेकरी गल्ली (पी-1/पी-2)<br>4. स्वामी सत्यानंन्द महाराज मार्ग, (पी-1/पी-2) | 1. डॉन बॉस्को स्कूल रोड<br>2. वालचंन्द कॉम्पलेक्स ते टीना टॉवर. |

| | | |
|---|---|---|
| 9 | | 1. सोनाली हॉटेल कडे जाणा-या रस्त्यावर ते आला हजरत मैदानासमोर<br>2. हिना अवेन्यु इमारत पासून ते व्हिनस बिल्डींग पासून ते हैदरी चौक (मुख्य रस्ता)<br>3. बानेगर शाळेपर्यंत रस्त्यावर डाव्या बाजूस<br>4. लोधा कॉम्पलेक्स ते राम रहिम बगीचा समोर<br>5. गीता नगर फेज 7 उडाण पुलाखाली मायरा मेंन्डोसा बगीचा दोन्ही बाजूस<br>6. आझाद नगर सिग्नल रहिमिया मस्जिद पासून भाईंदर फाटक पोलीस चौकी पर्यंत सम-विषय रस्त्यावर दोन्ही बाजूस<br>7. गिता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर पासुन ते गिता सरोवर इमारती पर्यंत दोन्ही बाजुस<br>8. गोल्ड्न नेस्ट सर्कल नयानगर कडे जाणारा रस्त्याच्या सर्कल्वर दोन्ही बाजूस |
| | 1. एन एच शाळा मुख्य रस्ता सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस | 1. सोनाली हॉटेल जाणा-या रस्त्यावर हजरत मैदानासमोर.<br>2. हिना ॲवेन्यु इमारतीपासून ते व्हिनस इमारतीपासून ते हैदरी चौक (मुख्य रस्ता)<br>3. बानेगर शाळेकडे जाणा-या रस्त्यावर डाव्या बाजूस<br>4. लोधा कॉम्पलेक्स येथे राम-रहिम बगीच्यासमोर<br>5. गीता नगर फेज 7 उड्डाणपुलाच्या खाली मायरा मेंन्डोसा बगीच्या दोन्ही बाजुस<br>6. आझाद नगर सिग्नल, त रेहमानिय मस्जिद पासून ते भाईंदर रेल्वे फाटक (पोलीस चौकी) पर्यंत सम विषम रस्त्याच्या दोन्ही बाजुस<br>7. गीता नगर फेस 7 नर्मदा पॅराडाईस समोर ते गीता सरोवर इमारती पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| 10 | 1) गोल्डन नेस्ट सिग्नल ते इंद्रलोक (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) सम विषम पार्किंग करणे<br>2) हनुमान मंदीर (न्यु गोल्डन नेस्ट) ते सेवन इलेवन चौक सम विषम पार्किंग करणे<br>3) विमल डेरी ते इंद्रलोक नाका (स्व. प्रफुल्ल पाटील चौक) पर्यंत नो पार्किंग करणे अथवा सम विषम पार्किंग करणे<br>4) गुरुजी चौक ते सेवन इलेवन चौक पर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>5) इंद्रलोक नाका ते ओमशांती चौक सम विषम पार्किंग करणे<br>6) फाटक ते विमल डेरीपर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>7) फाटक ते गोल्डन नेस्ट सिग्नल पर्यंत सम विषम पार्किंग करणे<br>8) अभिनव नाका ते मनपा शाळा क्र.8 पर्यंत नो पार्किंग करणे<br>9) स्व. विनायक घरत मार्ग् (गोडदेव नाका ते शिवहरी फरसाण मार्ट पर्यंत) नो पार्किंग करणे | विमलडेरी इंद्रलोककडे येणार रस्ता<br>गोल्डन नेस्ट ते सरळ गावात जाणारा रस्ता. |
| 11 | | 1. न्यु गोल्डन नेस्ट पुर्ण रस्ता<br>2. रामदेव पार्क<br>3. बाळासाहेब ठाकरे उद्यान क्षेत्र<br>4. ऑरेंज हॉस्पिटल परिसर |
| 14 | | 1) गावदेवी जरीमरी मंदीर मार्ग<br>2) जनता नगर (धारावी मंदीर मार्ग) नीलकमल प्रवेशद्वार ते लिबर्टी तबेला पर्यंत<br>3) मनाली विलेज ते ग्रीन विलेज येथील रस्ता |
| | | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 |
| 15 | | 1) नताशा पार्क ते भक्तीवेदांत<br>2) अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर<br>3) भक्तीवेदांत हॉस्पीटल ते डेल्टा<br>4) अमर पॅलेस हॉटेल ते अभित पटेल अपार्टमेंट<br>5) प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळेसमोर<br>6) अजित पॅलेस ते काशिमिरा नाका सर्विस रोड |
| | डेल्टा गार्डन पासून पांडुरंगवाडी ते लोढा नो पार्कींग<br>डेल्टागार्डन पासून ते हरिकृष्णमंदीर - नो पार्कींग | 1. हरेकृष्ण मंदिर ते डेल्टा गार्डन संकुलपर्यंत<br>2. हरिओम सोसा ते पांडुरंग वाडी पर्यंत<br>3. पांडुरंग वाडी ते लोढा हायवे पर्यंत<br>4. अजित पॅलेस ते काशीमिरा शिवाजी पुतळायापर्यंत हायवे (सर्व्हिस रोड)<br>5. शिवाजी पुतळा ते सिल्वर पार्क भाईंदर रोड पर्यंत फुटपाथ वरील पार्कींग |

| | | |
|---|---|---|
| | | 6. मिरागांव हनुमान मंदिरा समोरील पार्कींग.<br>7. मिरागांव ते मुंन्शी कम्पाऊण्ड रोड वरील पार्कींग<br>8. मिरागांव अमर पॅलेस हॉटेल ते अबिद पटेल<br>9. प्लेझंट पार्क (डॉन बॉस्को स्कुल) ते काशीमिरा रोड अग्रवाल कम्पाऊण्ड डायमंड टॉवरच्या नाक्यापर्यंत<br>10. अंबरप्लाझा हॉल समोर व संघवी नगर ते अंबल प्लाझा हॉलपर्यंत<br>11. श्रीश्वाश्वत कॉमपलेक्स ते मानस सरोवर ते खोडीयार कुंज बिल्डींग समोरील रस्ता. |
| | | 1) मिरागाव हनुमान मंदीर समोर<br>2) अमर पॅलेस बाजुचा रोड<br>3) अजित पॅलेस ते चेकनाका रोड<br>4) चेकनाका ते शिवाजी पुतळा पर्यंत<br>5) काशिमिरा नाका ते संघवी नगर हायवे फुटपाथ रोड<br>6) प्लेजंट पार्क डॉन बॉस्को रोड ते डायमंड टॉवर<br>7) अंबर प्लाझा हॉल समोर ते संघवी गार्डन रोड<br>8) श्री शाश्वत कॉम्प्लेक्स आतील रोड जुना प्लेजेंट पार्क रोड |
| 16 | | 1. अजित पॅलेस हॉटेल ते गणेश मंदीर स्टॉप पेणकरपाडा नो पार्कींग झोन<br>2. सृष्टी से - 1 व 2 रॉयल कॉलेज भक्तीवेन्दांत हॉस्पिटल व डालमिया कॉलेज<br>3. शांतीधाम, शांतीपार्क, ते न्यु म्हाडा व सुर्या शॉपिंग सेंटर पर्यंत परिसर<br>नित्यानंद नगर सेंट पॉल स्कूल पर्यंतचा परिसर. |
| | | 1) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत<br>2) म्हाडा प्रेम नगर शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत<br>3) सुर्या शॉपिंग सेंटर समोरील पुनम क्लस्टर 3 ते सृष्टी सेक्टर 2 पर्यंत<br>4) म्हाडा राजमुद्रा ते शिवसेना शाखेपर्यंत |
| | | 1) म्हाडा शांती गार्डन ते शांती धाम पर्यंत<br>2) पुनम क्लस्टर 1 ते हायनेस पार्क पर्यंत<br>3) एमआयडीसी रॉयल पार्क ते इस्कॉन, रॉयल कॉलेज पर्यंत<br>4) गुरुदेव बिल्डींग ते हेतल पार्क |
| 17 | | 1. सेंट झेवियर स्कूल जवळ शांतीपार्क.<br>2. संघवीनगर ते अंबरप्लाझा पर्यंत (हायवे) |
| 18 | | सिनेमॅक्स समोरील ईडन रोझ कॉम्पलेक्स. पुनम गार्डन ते सालासर गार्डन. |
| | | पुनम गार्डन युनिक हाईटस ते साई सरस्वती धाम हरिया ड्रीम पार्क अशोका हॉटेल्ते रुतू पॅराडाईस पर्यंत.<br>अशोका हॉटेल हरिया पार्क ते वेदांत हायस्कुल |
| 19 | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस |

| | | |
|---|---|---|
| | 2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग<br>6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |
| | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग<br>6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस<br>2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |
| | एस.के.स्टोन ते मिरारोड स्टेशन शांतीनगर व नयानगर रस्ता एक बाजू पार्कींग | |
| | 1) अस्मिता कॉलेज, गोविंद नगर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>2) शितल नगर एमटीएनएल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>3) एस के स्टोन ते शितल नगर नाका रस्त्याच्या दोन्ही बाजूस सम विषम<br>4) शितल नगर भारती पार्क नुपूर गोविंद नगर परिसराचा अंतर्गत रस्ता फक्त तेथील रहिवाश्यांच्या दुचाकी व चारचाकी हलकी वाहने पार्किंग<br>5) एव्हरशाईन नगर ते भारती पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | 1) रसाज सिनेमा चौक ते शितल नगर नाका चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूस<br>2) रसाज चौक ते हैदरी चौक रस्त्याच्या एका बाजूस नो पार्किंग |

| | | |
|---|---|---|
| | 6) एनजी हेरीटेज ते ओस्तवाल पॅराडाईज रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम पार्किंग | |
| 20 | | ईशा वाईन ते सेक्टर 10 च्या कोप-या पर्यंत. |
| 21 | 1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे<br>2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे | 1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे.<br>2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे<br>3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे<br>4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड भिंतीची साईडला नो पार्किंग झोन करणे<br>5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे<br>7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>8) शांती शॉपिंग सेंटर व शांती इनकेव्ह रोड वरील दोन्ही बाजू पार्कीग करणे. |
| | 1) मिरारोड स्टेशन स्काय वॉल्क च्या खालील जागेत मिरारोड पोलिस चौकीच्या बाजुस रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्किंग झोन करणे<br>2) टीएमटी बस स्टँडच्या बाजुला मोकळ्या जागेवरील पार्किंग झोन करणे | 1) शांतीनगर सेक्टर क्र.1 बि.क्र.ए-64 ते शरयु माता चौक पर्यंत आणि शांती एन्क्लेव्ह बिल्डींग पासुन ते शांती विहार ए-8 पर्यंत सम विषय दिवस पार्किंग करणे.<br>2) न्यु इंडीया बँक सेक्टर क्र.1 ते टीएमटी बस थांबा पर्यंत नो-पार्किंग झोन करणे<br>3) शांती शॉपिंग सेंटर रिक्षा स्टँड रस्त्याच्या दोन्ही बाजूस व स्टेशन मुख्य गेट समोर नो-पार्किंग झोन करणे<br>4) मिरारोड रेल्वे टीकीट काऊंटर रिक्षा स्टँड (दहिसर साईड) ते साई कॉम्प्लेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊंड भिंतीची साईडला नो पार्किंग झोन करणे<br>5) मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयु माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस नो पार्किंग झोन करणे<br>6) शरयु माता चौक ते गणेश चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम विषम दिवस पार्किंग झोन करणे<br>7) सृष्टी सेक्टर क्र.3 व सुर्या शॉपिंग सेंटरच्या समोरच्या बाजुस नो पार्किंग झोन करणे |

| | | |
|---|---|---|
| | 1. मिरारोड स्टेशन स्काय वॉकच्या खालील जागेत मिरारोड पोलीस चौकी बाजुच्या रस्त्याच्या स्टेशन बाजुस पार्कींग झोन.<br>2. टी.एम.टी बस स्टॅण्ड बाजुला मोकळ्या जागेवर पार्कींग झोन<br>3. से 1 गणेश चौक ते झुलेलाल चौकपर्यंत पी1/पी/2 | 1. शांती नगर से - 1 बि.क्र.ए/64 ते शरयू माता चौक पर्यंत आणि शांती शॉपिंग सेंटर पासून ते शांती विहार ए/8 पर्यंत सम विषम दिवस .<br>2. न्यु इंडिया बँक सेक्टर क्र 1 ते टी.एम.टी. बस थांबा पर्यंत<br>3. शांती शॉपिंग सेंटर रिक्षा सॅण्डा रस्त्याच्या दोन्ही बाजुस व स्टेशन मुख्य गेट समोर<br>4. मिरारोड रेल्वे टिकिट काऊटर रिक्षा स्टॅण्ड (दहिसर साईड) ते साई कॉम्पलेक्स पर्यंत रेल्वे कम्पाऊड भिंतीची साईडला नो पार्कींग<br>5. मिरारोड पोस्ट ऑफीस पासून शरयू माता चौक पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस<br>6. शरयु माता चौक ते गेणेश चौ परंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सम-विषम दिवस<br>7. सुष्टी से - 3 व सुर्या शॉपिंग सेंटर समोर बाजुस नो-पार्कींग झोन |
| 22 | 1. मिरारोड नयानगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत (रस्त्याची उजवी बाजू)<br>2. मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नयानगर पोलीस ठाणे ते लोढा एफ ओ.बी पर्यंत..<br>3. मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाकापर्यंत (शम विषम दिवस)<br>4. मिरारोड निहाल हॉटेल ते हैदरी चौक पर्यंत (शम विषम दिवस)<br>5. हैदरी चौक ते एन.एच शाळा पर्यंत (सम विषम दिवस) | मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत (दोन्ही बाजू) |
| | | मिरारोड रेल्वे स्थानक शेजारी अझीजीया मस्जीद जवळ नोपार्किंग |
| | 1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू<br>2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम<br>3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम<br>4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम विषम | 1) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत<br>2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत<br>3) एनएचचौक ते रसाज चौक पर्यंत |
| | 1) मिरारोड नया नगर कॉर्पोरेशन बँक ते रसाज चौक पर्यंत रस्तयाची उजवी बाजू<br>2) मिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग नया नगर पोलिस ठाणे ते लोढा एफ ओ बी पर्यंत सम विषम<br>3) मिरारोड लोढा ते नरेंद्र पार्क नाका पर्यंत सम विषम<br>4) हयद्री चौक ते एनएच शाळा पर्यंत सम | 1) èमिरारोड श्रीकांत धाडवे मार्ग शम्स मजीद पर्यंत<br>2) मिरारोड निहाल हॉटेल ते हयद्री चौक पर्यंत<br>3) एन.एच. चौक ते रसाज चौक पर्यंत |

| | विषम | |
|---|---|---|
| 23 | | **भाईंदर (प.) डी मार्ट माहेश्वरी भवन रोड एस व्ही रोड आणि सुभाषचंद्र बोस मैदान रोड.** |

ठराव क्र. :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मे. सी.आय.आर.टी. च्या अहवालाची अंमलबजावणी करणे व प्रस्तावित केल्यानूसार धोरण निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. नो पार्कींग क्षेत्रात तातडीने फलक लावण्यात यावे. पार्कींग क्षेत्राच्या अंमलबजावणीसाठी निविदा मागवून कंत्राटदार नेमण्यात यावा. तसेच प्रशासकीय कार्यवाहीचे सर्व अधिकार व धोरणात बदल करण्याचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

**From SK Stone Police chaoki to Geeta Arcade CHS. (For Private Buses & Vahicle) All internal roads of residential complexes.**

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३, **घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवा ल (**DPR) **मंजूर करणे व** DPR **नुसार मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी असलेल्या घनकचऱ्यावर Bio-Mining करुन विल्हेवाट लावणेबाबत.**

विविता नाईक :-

**विषयांकित प्रकरणी दि. 05/02/2018 रोजी सादर केलेल्या गोषवाऱ्यामध्ये सुधारणा करून खालीलप्रमाणे सुधारीत गोषवारा सादर करण्यात येत आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथे मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून 31.46 हेक्टर जागा घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता प्राप्त झालेली आहे. सद्यस्थितीत मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी मागील काही वर्षापा सून मोठ्याप्रमाणावर घनकचरा जमा झालेला आहे . सदर घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 तरतुदीनुसार शास्त्रौक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे संदर्भात मा .हरित न्यायाधिकरण, पुणे व मा . सर्वोच्च न्यायालयाकडील दाखल प्रकरणामध्ये घनकचरा प्रकल्प ठिकाणी असलेल्या पूर्वीच्या कचऱ्यावर शास्त्रौक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र महानगरपालिकेमार्फत दाखल करण्यात आले आहे . त्यानुसार सदर घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 तरतूदीनुसार विल्हेवाट लावणेकरीता महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार आय .आय.टी. मुंबई यांनी Bio-Mining करणेबाबत तांत्रिक सल्ला दिलेला आहे. सदर ठिकाणी अंदाजे 10 लाख मेट्रीक टन इतका घनकचरा अस्तित्वात असून त्यावर Bio-Mining पध्दतीने विल्हेवाट लावल्यास सदरची जागा पुन्हा वापरासाठी रिकामी होऊ शकेल.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी शासनाने त्यांचे पॅनलवरील ICUC Consultants Pvt Ltd या संस्थेचे नाव मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी सुचित केले होते . तसेच मा. महासभा ठराव क्र.12, दि.19/05/2017 नुसार DPR तयार करण्यासाठी मान्यता देण्यात आली होती . त्यानुसार ICUC consultants Pvt. Ltd. संस्थेस DPR तयार करणेसाठी आदेश देण्यात आले होते. ICUC Consultants Pvt. Ltd. या संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थाप न करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर केलेला आहे . सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.महासभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.**

**तसेच सदर प्रकल्प अहवालामध्ये घनकचरा व्यवस्थापन कामाच्या विविध बाबी मिळून 83.83 कोटी रक्कमेचा DPR तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये उत्तन घनकचरा प्रकल्प ठिकाणी अस्तित्वात असलेल्या कचऱ्यावर शास्त्रौक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे कामाचा देखील समावेश आहे . DPR नुसार मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या घनकचऱ्यावर Bio-Mining पध्दतीने विल्हेवाट लावणेसाठी एकुण अंदाजे रक्कम रु . 56.20 कोटी खर्च अपेक्षित असून सदरचा DPR मंजुर करून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. DPR मंजुर झाल्यानंतर शासनाकडून Bio-Mining करीता अनुदान मिळू शकते.**

**घनकचरा व्यवस्थापन करणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मान्यता देणेस, DPR नुसार आवश्यक कार्यवाही करणेस तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यतेसाठी होणारी फी अदा करणेस व DPR नुसार Bio-Mining पध्दतीने उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस तसेच सदरचा DPR शासनास मान्यतेसाठी पाठविणेस शिफारस असे.**

**<u>ठराव</u>**

**प्रस्तावनेत नमुद केलेल्या सर्व कामांना ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे . असा मी ठराव मांडत आहे.**

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**हेलन गोविंद :-**

महापौर मॅडम डी.पी.आर मंजुर करणे या विषयानुसार मौजे उत्तन घनकचरा प्रकल्प असलेला डी.पीआर मंजुर करणे व डी.पी.आर नुसार मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाच्या ठिकाणी असलेल्या घनकचऱ्यावर बायोमायनिंग करुन विल्हेवाट लावणे असा आपण विषय घेतला आहे. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार त्या ठिकाणी १० लाख मॅट्रीक टन इतका घनकचरा आहे. त्यावर बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी ५६ कोटी २० लाख खर्च अपेक्षित आहे व प्रकल्पाचा इतर बाबी मिळून एकूण ८३ कोटी ८३ लाख इतका खर्च येणार आहे. मात्र त्यासाठी ह्या वर्षीच्या बजेटमध्ये फक्त ८ कोटी रुपयाची तरतुद केली आहे. डी.पी.आर. मंजुर झाल्यानंतर शासनाकडून अनुदान मिळणार ते अनुदान कधी येणार. दर वर्षानुसार पालिकेला प्रकल्प तयार करण्याची बुध्दी सुचली आहे. ह्या घनकचरा प्रकल्पामुळे शेतीत पाणी दुषित होऊन जमिन नापिक झाली आहे. आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. विशिष्ठ प्रकारची दुर्गंधी विविध वास येतो. म्हणून २००७ साली उत्तन वासियांनी तीव्र आंदोलन केले होते. नागरिक हक्क समितीने हरित लवादाकडे प्रकल्प विरोधात दाद मागितली असुन वेळोवेळी राष्ट्रीय हरित लवादाने पालिकेला फटकारले आहे. पालिकेने वेळोवेळी प्रकल्प विक्रेता आणुन नव्याने सुरु करण्याचे प्रतिज्ञापत्र देऊन ही मागणी घेतली होती. शासनाने घनकचरा प्रकल्पासाठी वसई तालुक्यातील सकवार येथे जागा दिलेली आहे. तिथे त्यांनी प्रकल्प हलवावा. सन्मा. महापौर मॅडम पालिकेत आपली सत्ता आहे. राज्यात आपली सत्ता आहे. सत्ताधाऱ्यांनी ठरवले तर हा प्रकल्प आपण तिथे नेऊ शकतो. म्हणून मला ह्या सभागृहाला एकच विनंती करायची आहे की हा प्रकल्प तेथुन हलवावा. ही मी तुम्हाला विनंती करते.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम आपल्या परवागनीने बोलते सदर घनकचरा प्रकल्पाचे एच.ओ.डी. पानपट्टे साहेब इथे उपस्थित आहेत. बायोमायनिंगचे एक इंग्लिशमध्ये मोठे पुस्तक तुम्ही आम्हाला दिलेले आहे. याचे वाचन किती जणांनी केलं मला काही याची कल्पना नाही किंवा मी पण केलेले नाही. कारण आम्ही इंग्लिशचे प्रोफेसर नाहीत. तर याच्यामध्ये बायोमायनिंग किंवा हे डी.पी.आर चे पुस्तक तुम्ही दिलेले आहे तर त्याची संक्षिप्त थोडीशी रुपरेषा आम्हाला द्या. मग नंतर पुढच्या याच्याबद्दल चर्चा करु. महापौर मॅडम आपण परवानगी द्यावी की पहिला डी.पी.आर बद्दल आपल्याला डी.पी.आर काय आहे किंवा हा जो गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये आम्हाला समजत नाही आम्ही सदस्य नविन आहोत किंवा याचे आम्ही टेक्नीकल पर्सन नाहीत. तर आपण परवानगी द्यावी पानपट्टे साहेबांनी डी.पी.आर बद्दल थोडीशी माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

पानपट्टे साहेब थोडी माहिती द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदर महापालिकेचे आय.आय.टी चे सजेशन आणि आय.सी.यू चे कन्सलटन्ट राज्य शासनाने नेमलेले होते. त्यानुसार संपूर्ण शहराचा घनकचरा व्यवस्थापन कलेक्शन ट्रान्सर्पोटेशन आणि प्रोसेसिंग ह्या संदर्भात सविस्तर डी.पी.आर ८३ कोटी ८३ लाखाचा तयार केलेला आहे. त्याच्यामध्ये बायोमायनिंग एक प्रकार आहे. त्यामध्ये आपण जवळपास १० लाख मेट्रीक टन कचरा आपला पडून आहे. जवळपास २०१३ पासुन पडलेला आहे. प्रोसेसिंग न केलेला कचरा त्याच्यावर सायंटिफिकल प्रोसेस करुन लॅन्ड रिक्लेम करणार आहोत. पूर्ण जागा ती आपण खाली करणार आहोत. आपल्याला माहितीच आहे आपल्याकडे जागा कमी आहे. त्या कमी जागेमध्ये बऱ्याच दिवसापासून हा कचरा पडलेला आहे. तो पूर्ण कचरा बायोमायनिंग करुन पूर्ण कचरा त्याचे सायंटिफिकल प्रोसेस करुन त्याच्यामधून जे काही खत बनते त्याला लॅन्डमध्ये पण युज करु शकतो. दुसरं त्याच्यामधून आर.डी.एफ. निघते ते वेगवेगळ्या फार्ममध्ये वापरले जाते. ते रिसायकल प्लास्टीक मेटल्स ते रिसायकल केले जाते असे करुन जेवढे मॅक्झीमम एक्स्ट्रॅक्ट करुन उरलेले जे काही कम्पोस्ट पडलेले असते ते लॅन्ड फिलींग म्हणून आपण वापर करणार आहोत. जेणेकरुन पुढच्या भविष्यासाठी आपण १० लाख मेट्रीन टन कचरा प्रोसेसिंग करणार आहोत. कुठे आगीचा प्रश्न येणार नाही. लिचर जनरेशन होणार नाही आणि भविष्यात ती सदरची जागा प्राप्त होणार यासाठी आपण जवळपास ५६ कोटीचा डी.पी.आर तयार केलेला आहे. तो डी.पी.आर आपल्याला राज्यशासनाकडून, केंद्रशासनाकडून आणि महापालिका यांच्याकडून आपल्याला ते पैसे मिळणार आहेत.

**शर्मिला बगाजी :-**

२००७ पासून हा पहिल्यांदा प्रकल्प तिथे चालु झाला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२००८ ला.

**शर्मिला बगाजी :-**

२००८ ला त्याच्यानंतर २०१० हा प्रकल्प बंद झाला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पुन्हा २०११ ला चालु झाला.

**शर्मिला बगाजी :-**

२००८ ते २०१० याच्यामध्ये आपण किती मेट्रीक टनवर आपण प्रोसेस केलेली होती. जो आपण पहिला कॉन्ट्रॅक्टरला हेन्जर कंपनीला ते दिलेले होते. तर २ वर्षामध्ये किती शास्त्रीय पध्दतीने आपण त्याच्यावर प्रक्रिया केलेली होती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ट्रान्सपोर्ट कलेक्शन जो कचरा करतो तो जवळपास २५० ते ३०० टन त्यावेळी कचरा होत होता. त्यावेळी त्या कचऱ्यावर तो प्रक्रिया करत होता.

**शर्मिला बगाजी :-**

३०० टन कचऱ्यावर आपण प्रक्रिया करत होतो हे आपण सांगत आहात. मग समजा २ वर्षांचा डेलीचा ३०० टन कचरा आपण त्याच्यावर शास्त्रोक्तर पध्दतीने प्रक्रिया करत होतो. आता हा आपला १० लाख मेट्रीक टन कचरा आहे. तो आता २०१३ पासून............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी ६-६ महिने २-३ महिने बंद होता.

**शर्मिला बगाजी :-**

२-३ महिने नाही. पानपट्टे साहेब आम्ही स्थानिक आहोत. आम्हाला माहित आहे तिथे तुमचे काय चाललेले आहे. तर त्याच्याबद्दल तुम्ही आम्हाला २-३ महिने असे सांगु नका. आय.आय.टी. ची नेमणुक कधी झाली. आय.आय.टी. ची नेमणुक होऊन दिड वर्ष झाली. दिड वर्षापूर्वी मा. मुजफ्फर साहेबांबरोबर आम्ही डेलिगेशन घेऊन आलेलो. कॉंग्रेसमध्ये असताना तेव्हा तुम्ही आम्हाला स्लाईड शो आणि पावर पॉईंट दाखवून आम्हाला दुबईला घेऊन गेले आणि त्यावेळेला १८ महिन्यात तुम्ही हा सगळ्या कचऱ्याची विल्हेवाट लावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण चुकीचे बोलत आहात. मी बायोमायनिंग बद्दल विषय मी बोललो नव्हतो. तो विषय चुकीचा आहे. हा विषय प्रोसेसिंगला होता. बायोमायनिंगचा आता हा नविन इश्यु आहे. घनकचऱ्याचा प्रोसेसिंगबद्दल मी बोलत होतो.

**शर्मिला बगाजी :-**

आय.आय.टीची..............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आय.आय.टी. ने नेमली होती नव्याने जो कचरा निर्माण झाला होता त्याच्यावर प्रोसेसिंगवरती आपण त्याची निविदा काढली.

**शर्मिला बगाजी :-**

आपण किती केला किती कचऱ्यावर आपण शास्त्रोक्तर पध्दतीने प्रक्रिया केली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नविन जेवढा कचरा निर्माण होणार तेवढ्या कचऱ्यावर साईंटिफिकली कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे.

**शर्मिला बगाजी :-**

हे तुम्ही बायोमायनिंगचे सांगत आहात ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हे बायोमायनिंग रिसेन्टली रिस्टोअर केलेले आहे.

**शर्मिला बगाजी :-**

साहेब हे सुरु केलेले नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुरु केलं म्हणजे महासभेत विषय आणला. याच्यापुढे एन.जी.टी. मध्ये सुध्दा आम्ही सांगितलेले होते. एन.जी.टी. मध्ये नव्याने जो कचरा होता त्याला............

**धृवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब तुम्ही प्रश्न उत्तर देऊ नका. तुम्ही आरामात बसा........

**शर्मिला बगाजी :-**

धृवकिशोर साहेब आम्ही स्थानिक आहोत.

**धृवकिशोर पाटील :-**

हे कोर्ट नाही. तुम्ही प्रश्नोत्तर देत बसाल.

**शर्मिला बगाजी :-**

कोर्टमध्ये पण खोट बोलतात. पाटील साहेब आम्हाला आमच्या प्रशासनाकडून उत्तर पाहिजे. तुम्ही प्रत्येक वेळेला प्रशासन आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

यात प्रत्येक गोष्टीचा खुलासा करणे योग्य नाही. ज्यांचे त्यांचे मत आहे द्या आणि सविस्तरपणे मांडा. प्रत्येक प्रश्नावर प्रशासन उत्तर देईल परंतु तुम्ही असे क्रॉस क्वेशन करु नका. सर्व एकुण घ्या नंतर सगळा खुलासा एकत्र करा.

**शर्मिला बगाजी :-**

पाटील साहेब तुम्ही आदेश देणारे महापौर आहात का?

**मा. महापौर :-**

आपण विषयावर बोला.

(सभागृहात गोंधळ)

**शर्मिला बगाजी :-**

आता सप्टेंबरमध्ये पोल्युशन कंट्रोल बोर्डची परवानगी होती ती मुदत संपलेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

परवानगी आहे म्हणून सांगतो.

**शर्मिला बगाजी :-**

आयुक्त साहेब पानपट्टे साहेबांची पाठधरणी करण्यासाठी तुम्ही त्याला कारणीभुत आहात............

**मा. आयुक्त :-**

मॅडम माझे एक निवेदन आहे गेले दोन, अडीच महिने मी इथे काम करत आहे. मी स्वतः त्या प्रकल्पाला भेट दिली. त्याच्यामध्ये अत्यंत चांगल्या गोष्टी होत आहेत. चांगल प्रकरण होणार आहे आणि तेवढ्यासाठीच मी बसलेलो आहे. मी पानपट्टेची पाठराखण करत नाही. जेव्हा तिथे बायोमायनिंग होईल तेव्हा ३ वर्षात काहीही कचरा राहणार नाही. क्लिन लॅन्ड ३० हेक्टरची जागा तुमची मोकळी होईल. आज

१० हेक्टर जागेवरती कचरा आहे. बायोमायनिंग प्रोजेक्ट नंतर ती १० हेक्टर जागा मिळेल. आणि आज जो प्रकल्प आपला सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट मधला सुक्या कचऱ्याचा तो आपण ट्रायल बेसवर रन करतोय. दोन महिन्यामध्ये तिथे ट्रायल स्पिल झाल्यानंतर ओला कचरा पण तिथे जाईल. त्याचे खत होईल आणि कुठलाही कचरा राहणार नाही असा एक सुंदर प्रोजेक्ट आहे. एन.जी.टी. ला आपण लावलेले आहे. आपण कृपया त्याला मान्यता द्यावी. सगळ्या भाईंदर शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. माझे इथे काही मतदान नाही मी राहणार नाही. मी कुठलेही राजकारण करत नाही. मी शहराच्या भल्यासाठी आयुक्त म्हणून माझे मत मांडलेले आहे. आता याच्यानंतर तुमच्या वरती आहे काय करायचे आहे ते तुम्ही करा.

**शर्मिला बगाजी :-**

मी एक मिनिटासाठी बोलते तुम्ही जे आता वक्तव्य केलं तिथे बायोमायनिंग होईल सगळ चांगल होईल. पण जोपर्यंत आपली शास्त्रोक्त पध्दतीने चालु होत नाही तोपर्यंत हा कचरा थांबवावा त्याची पर्यायी व्यवस्था करावी. आम्हाला तशी शाश्वती द्या. नाहीतर स्थानिक तयार आहेत. तुम्ही जी एन.जी.टी. ला फसवाफसवी केलेली आहे. स्थानिकांना फसवा फसवी केलेली आहे. त्याच्याबद्दल उत्तर आणि जाब विचारायला तुम्हाला त्याच्यानंतर जे काही परिणाम होतील त्याला पूर्ण प्रशासन आणि आता ह्या लोकांनी ज्या टाळ्या वाजुन केलं. ह्याला सगळे सभासद जबाबदार असतील असे मी याच्याद्वारे सांगु इच्छीते.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, उत्तन येथील घनकचरा प्रकल्प फार सेन्सीटिव्ह विषय आहे. यापूर्वी ह्या शहरामध्ये साहेब आंदोलने झालेली आहेत. फायरींग झालेली आहे. आरोग्य विभागाचा सत्कार केला पाहिजे साहेब.

**मा. आयुक्त :-**

आपली माहिती अपडेट करतो सगळ्या महापालिकांमध्ये हा ज्वलंत आणि संवेदनशील प्रश्न आहे. तेवढ्या सहकार्याने तो हाताळला जावा एवढी माझी विनंती आहे. यावर सभागृहाने काय निर्णय तो करावा.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद साहेब आमचे आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी द्यायला अजिबात विरोध नाही. ते आम्ही देणार ह्या आरोग्य विभागाचा सत्कार अशासाठी केला पाहिजे साहेब २०१३ पासुन आज जवळ-जवळ १० ते १२ लाख मेट्रीक टन कचरा त्याठिकाणी विदाऊट सेग्रिगेशन विदाऊट एनी प्रोसेसिंग विदाऊट एनी टेक्नीक त्याठिकाणी पडलेले आहे. आणि कचऱ्याचे डोंगर झालेले आहेत. त्याठिकाणी मी २-३ वेळा व्हिजीट केली. आज उत्तन ह्या शहराची त्या गावातली लोकांची परिस्थिती इतकी वाईट आहे साहेब. तुम्ही मे २०१७ ला आय.आय.टी. ची तुम्हाला परवानगी नेमणुक करायला दिली. आज वर्षानंतर त्यांचा रिपोर्ट येत आहे. डी.पी.आर आणि आज ५६ करोड रुपये बायोमायनिंगसाठी खर्च होणार आहेत. बजेटमध्ये प्रोव्हिजन आहे. तुम्ही १२ करोड केली होती. स्टॅन्डिंगने ८ करोड वर आणली. महासभेने ती ८ करोड केली. व्हॉलेटी बजेट तिथे कमी करतो. हा आर्थिक प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर डी.पी.आर तुम्ही पाठवणार. राज्य शासनाला १५ दिवसावर साहेब पाऊस आला आहे. उद्या पासुन पडल्यानंतर उत्तन वासियांची एवढी परिस्थिती गंभीर होणार आहे. तर आता जो नविन कचरा टाकला जात आहे. ओला कचरा त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे प्रोसेसिंग होत नाही. एवढी वाईट परिस्थिती असते वेळी करोडो रुपये पालिका ह्या कचरा कलेक्शनसाठी खर्च करतो आणि पुढे ७ वर्षांसाठी त्याला दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरला प्रोसेसिंग करायला नेमलेला आहे. अगोदरच्या प्रोसेसरने काय केले आहे. याचा अनुभव लोकांना आहे. आज लोकांची ही मागणी आहे हे डि-सेंट्रलायझेनशन करा. नविन डी.पी.आर बनतो त्याठिकाणी डि-सेंट्रलाईज करुन इतर ठिकाणी बघा आज शेजारी आपला कचरा मागे दारामध्ये टाकु द्या मी देणार नाही टाकायला आणि संपूर्ण चेणा पासून जवळ-जवळ मिरा भाईंदरचा किती प्रकारचा कचरा नुसता नेऊन आपण त्याठिकाणी डम्प करतो. लोकांचे दुःख तिथे गेल्याशिवाय कळणार नाही. कित्येक प्रकारचे रोग त्याठिकाणी झालेले आहेत. आज जरासा जरी कोणाला ताप आला. घरामध्ये तर डॉक्टर डायरेक्ट सांगतो की त्यांचा पेशी कमी झालेल्या आहेत. काही हॉस्पीटलमध्ये तर उत्तनचे पेशंट असतील तर त्यांना ॲडमीट करत नाही कारण त्यांचे संसर्गजन्य रोग दुसऱ्यांना होतील ही त्या ठिकाणी परिस्थिती आहे. लोक अतिशय कंटाळलेली आहेत. आपण आहोतच ते बायोमायनिंग काय आहे ते मी म्हणतो साहेब राज्य शासनाच्या पैशांची वाट बघु नका. इतर ठिकाणी आहे पालिकेजवळ पैसे आहेत. इतर विभागामध्ये असतील ते वर्ग करा आणि ते काम त्वरीत चालु करा. बांधकाम विभागाचे कुठचेही पैसे घ्या. सर्व नगरसेवकांचा नगरसेवक निधी घ्या आणि ते बायोमायनिंग चालु करा आणि त्या त्रासातुन ह्या लोकांची सुटका करा साहेब. आमची नगरसेविका उगाच बोलत नाही. काही विषयावर त्या बोलत नाहीत ही तळमळ आहे तिथल्या लोकांची.

आज शहरातील कच-याच्या गाड्या थांबल्या तर प्रशासन काय करणार आहे? त्याची कुठची व्यवस्था आहे ह्या गोषवा-यामध्ये साहेब द्यायला पाहिजे. माझ्या जवळ २०१६ चे एक लेटर आहे. २०१३ साली ७३ लाख रु. राज्य शासनाकडे जमा केले. सकवारची जागा हॅन्ड ओव्हर करा म्हणून त्याचे पुढे काय झाले? आज इथे बी.जे.पी. आहे, राज्यामध्ये बी.जे.पी आहे, सेंट्रलमध्ये बी.जे.पी. आहे ती जागा आपल्याला मिळत होती. ७३ लाख रुपये आपण तिथे भरलेले आहेत. त्याचे काही तरी करा. नविन डी.पी.आर बनतोय इतर ठिकाणी जागा लोकेट करा. ट्रान्सपोटेशन वाचेल.

**मा. आयुक्त :-**

ह्या बाबीचा डी.पी.आर शी काही संबंध नाही. ह्या सगळ्या गोष्टी आपल्या हातातल्या आपण कधीही करु शकतो. आज, उद्या, परवा केव्हाही करु शकतो. एकदा हा डी.पी.आर मंजुर करुन घ्या याच्यानंतर त्याला डिव्हाईड करायचे का एकाच ठिकाणी ठेवायचे ते आपण ठरवू शकतो. ते आपल्या हातातले आहे. महापालिका तेवढी सक्षम नाही. सभागृह तेवढे सक्षम आहे. त्याच्यावरती चर्चा करायची आवश्यकता नाही. डी.पी.आरमध्ये काही राहिलेले असेल. त्रूटी असतील तेवढ्या सजेस्ट करा शासनाकडून निधी मिळणार आहे. काम मार्गी लागेल. एक चांगले काम होईल. म्हणून मी आपल्याला विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब तुम्ही आता आहात की नाही ते आम्हाला नीट समजत नाही. तीन महिने आम्ही तुमची वाट पाहत होतो. आम्हाला जे बोलायचे होते त्याला मुहुर्त शोधत होतो. पण आता मुहुर्त आहे की नाही हे नक्की मला समजत नाही. पानपट्टे साहेब हा ज्यांच्याकडे प्रकल्प आहे ज्या दिवसापासून ही जबाबदारी त्यांच्याकडे आहे त्यापासून ते मार्केटिंग करतात. जे होईल ते चांगले होईल ते केल ते त्यांनी काय चांगल केल. साहेब ही साधी गोष्ट नाही. तुम्ही पूर्ण शहराला कोणताही प्रोजेक्ट बंद करुन खर्च केला तर कोणीही तुम्हाला आडवे येणार नाही. लोक तुम्हाला आशिर्वाद देतील साहेब. हा राजकारणाचा विषय नाही समाजकारणाचा विषय नाही. जमीन गेली, शेती गेली, विहिरी गेल्या, जागा गेल्या सगळ गेले. त्यांचे उत्तर काय प्रोसेस चालु आहे. फक्त प्रोसेस चालू आणि त्यांच्यावर परिणाम होत नाही. त्याच्या शरीरयष्टीकडे बघितल्यानंतर विकार जसेच्या तसेच आहे. त्या पहिल्या दिवसापासून आजच्या दिवसाला ते जाडे पण झाले नाही. बारीक पण झाले नाहीत. तुम्ही जे केलं आम्ही त्याची कदर करतो तुमची इच्छा शक्तीचे आम्ही जयजयकारच करु. तुम्ही असला तरी जयजयकार नसलात तरी जयजयकार. साहेब जे तीन महिने तुम्ही द्यायचा प्रयत्न केला त्याचेही आम्ही तुम्हाला सत्कार म्हणूनच बोलतो तर परिस्थिती काय ज्या अधिका-यांनी त्याच्यावर जीव तोडून मेहनत करायला पाहिजे त्यांनी कोणते ही काम केले नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. ह्या शहराच्या सगळ्यांचा भवितव्याचा विषय त्यांच्या हातात आहे. कोणी यांना पैशाची अडचण केली होती मी प्रत्येक वेळी सांगतो तुम्ही कितीही पैसे मागा तेवढे पैसे आम्ही द्यायला तयार आहोत. जे मागेल ते सभागृह देईल आणि यांची इच्छा शक्ती नव्हती साहेब. डी.पी.आर ला मंजुरी द्यायलाच लागेल. जे कोणी नाही म्हटले तरी द्यायला लागेल. हे खर आहे पण त्याठिकाणी अधिकारी सक्षम ठेवावे लागतील. पानपट्टे साहेबांचे ते कामच नाही. साहेब त्यांची ती इच्छा नाहीच आहे. आम्ही त्यांना जीव तोडून सांगितलं होतं हे करा हे करा. एकही पत्राची दखल घेतलेली नाही. ओला कचरा म्हणजे काय माझे किती पत्र आहेत. त्यांना विचारा टनामध्ये तुम्ही दिलं की इतके-इतके टन मासळीचा निघते. १० टन मासळीचा कचरा निघतो. याची विल्हेवाट लावायची कुठे साहेब एक दिवशी हे लोक पेमेन्ट करत नाही. सतत महापालिकेकडे पैसे नाहीत असे कधीच झालेले नाही. ज्यांच्या कृतीने लोकांना पेमेन्ट झाले नाही त्यावेळी किती वेळेस साहेब झाले. किती लोक रस्त्यावर आली त्यामुळे आज जर कचरा उचलला नाही साहेब. मासळीचा कचरा आहे, मटणाचा कचरा आहे रात्री पडतो सकळी उचलला नाही. तर दुपारी, संध्याकाळी, परवा माणूस तिथे उभाच राहू शकत नाही. कर्मचारी उचलु शकत नाही जे.सी.बी. बंद केली यांचा कार्यक्रम काय पैसे वाचवायचे आहेत. महापालिका डबघाईत आहे. जे.सी.बी. बंद साहेब तुमच्याकडे मला विनंती करायची आहे की एक जे.सी.बी. मागायला मी सभागृह नेता एक जे.सी.बी. मागायला तुमच्याकडे यायला लागले तेव्हा त्यांनी जे.सी.बी. दिली. काय कामाची पध्दत आहे साहेब यांच्याकडून आम्ही काय अपेक्षा करणार शाळेच्या हितासाठी डी.पी.आर मंजूर करणे जसं आहे तसं पानपट्टेजी त्या कामामधुन मुकलेत हे जरा मोकळे करा साहेब मी सभागृहनेता म्हणून माझे असे मत आहे. त्यांची क्षमता नाही काम करायची आम्ही त्यांना सांगितलं ह्या ठिकाणचा कचरा चेणा ते उत्तन एवढा लाँग डिस्टन्स आहे. एक गाडी गेली की परत येत नाही. ह्या सगळ्या गाड्या एका लाईनीत उभ्या करायच्या एक सकाळी गाडी गेली तर दुपारी मोकळी होते. कस नियोजन आहे. नियोजन कसलं मी माझी कंपनी चालवतो ना साहेब. मी तुमच्याकडे येऊन बसलो आणि माझी १० कंपनीत फोन चालु आहेत. काय चालल काय नाही चालल त्यांचे काय सकाळी आले संध्याकाळी गेले. त्यांचा सगळ्यांचा पगार चालु असेल. मी

पगारावर जात नाही पण कर्तव्य म्हणून कम्पलसरी ज्या ड्यूटीज आहेत ती त्यांनी मान्य करायला पाहिजे साहेब. काम करायला पाहिजे लोक अपेक्षा करतात आणि लोक अपेक्षा कधी करतात जेव्हा शहरामध्येो एकदम सेन्सेटीव्ह जगणे मुश्कील आहे असे झाल्यानंतर यांच्याकडून अपेक्षा करतात तरी त्यांना दया येत नाही साहेब. त्यांचा चेहरा असा होत नाही की मी अपसेट झालो आहे. मला काम करायचे आहे तुम्हीही मदत करा अस काही त्यांचे अपील नाही. गाव तेवढे विश्वासात घेऊन हे करुया हेच ते अधिकारी तुम्ही नव्हते तेव्हा आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब होते. पूर्ण शहराची गटारे आम्ही उघडी केली होती. पूर्ण शहरभर कचरा सर्व ट्रक त्याच्यावरुन चालत जात होते. काही ठिकाणी यांना आगी लावाव्या लागल्या हे नियोजन थोडे आहे. ही शाश्वती आहे. कोणी विचारत नाही साहेब यांना शाश्वती आहे की यांना इथे आपल्या सभागृहातला कोणताही नगरसेवक यांना काही करु शकत नाही. हे ही त्यांना हमी आहे. त्याचा परिणाम आहे साहेब मी तुम्हाला पोटतिडकीने विनंती केलेली आहे. जर तुम्ही उद्या असाल तर परत उद्या येऊन तुमच्याकडे एक तास नाही दोन तास येऊन बसेल नसाल तर ते आमचे दुर्देव असेल पण आम्ही अपेक्षा करतो ह्या शहरातला हा जो कचरा आहे ह्या कचऱ्याचा विषय अत्यंत सेन्सीटिव्ह विषय आहे साहेब आम्ही जरी मिरा भाईंदरमध्ये असलो दुधाने धुतले ना ती लोक आम्हाला क्षमा नाही करणार साहेब ती लोक गाजते साहेब औरंगाबाद गाजते की नाही शासनावर नाही आहे साहेब राज्य कोणाचेही असु द्या अधिकारी कोणी असु दे पण परिस्थिती काय झाली सगळे हाताबाहेर गेलं अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून बोलायचा प्रयत्न केला.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम तुमच्या पवानगीने बोलते आयुक्त साहेब तुम्ही मिरा भाईंदरमध्ये किती दिवस आणि किती महिने तेच मला माहिती नाही. पण उत्तनमध्ये जो आपला संबंधीत अधिकारी आहे आरोग्याचा त्या घनकचरा प्रकल्पाचा बाजुला मस्तपैकी छोटासा बंगला बांधुन द्या. जेणेकरुन सगळ्यांना वास येईल त्यांना पण येईल. त्यांना वास आला नाही तर अख्या मिरा भाईंदरला वास येणार नाही. गेली ८-१० वर्षापासून मी हेच बोलत आहे की तिकडे छोटसं घर बांधुन द्या त्यांना वास आला नाही म्हणजे कोणाला वास येणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो सभागृहाला सविस्तर माहिती सांगु इच्छितो मिरा भाईंदर महापालिकेने सकवार येथे जागा घेतली. जागा ७३ कोटीला पडली त्याठिकाणी आपण वर्सोवाला पहिला ठरलं. वर्सोवाला ६ परवानगी वर्षभर आणायला लागले. नंतर वर्सोवाला आणण्यासाठी आम्ही १० वेळा मिटींग घेतल्या. मंत्रालयात सुध्दा मिटींग झाल्या. तिथे वर्सोवाला प्रकल्प होऊ शकला नाही. आपला ठराव विखंडीत करण्यात आला नंतर आम्ही पुन्हा महासभेमध्ये विषय आणला. आम्हाला सकवारला लँड द्या म्हणून सकवारला सुध्दा पैसे भरले. सकवारला ५-६ वेगवेगळ्या परवानग्या होतात. वर्षभर सर्व परवानग्या आम्ही आणल्या. मग तिथल्या ग्रामसंवकाने ठराव केला तुमचा कचरा आम्ही इथे प्रोसेस करणार मग त्याठिकाणी वाहतुक चार्ज झाल. मग पुन्हा ही सगळी परिस्थिती एन.जी.टी. ला सांगितली. तुम्ही ठराव इथे करुन ठेवा. इथेही कचरा नको, वर्सोवाला पण नको, सकवारला ही नको, उत्तनला तर नकोच नको. आता पुन्हा एन.जी.टी. ला प्रकरण गेले. एन.जी.टी. मध्ये सुध्दा सांगितले आम्हाला आता हा प्रकल्प करायचा असेल तर उत्तनच्याच ठिकाणी आम्हाला दुसरी पर्यायी जागा नाही. मग उत्तन ठिकाणी त्या एन.जी.टी. ने आणि सुप्रिम कोर्टानो परवानगी दिली की ह्या ठिकाणी प्रकल्प करा. मग त्याठिकाणी आय.आय.टीने सांगितलं मग स्वतः एन.जी.टी. ने सांगितल की आय.आय.टी. ला तुम्ही नेमा. आय.आय.टी. जस सांगेल सुप्रिम कोर्ट जसं सांगेल एन.जी.टी. च्या डायरेक्शनप्रमाणे आम्ही कारवाई केलेली आहे. कुठेही माझ्या मनाने कारवाई केलेली नाही आणि यांची दोघींची मॉनेटरी एन.जी.टी. करते, सुप्रिम कोर्ट करते. त्यांच्या गाईड लाईनचा तंतोतंत पालन आम्ही करतो त्याच्यामुळे कुठल्याही प्रकारचे आम्ही हे करत नाही आणि कुठलाही विलंब इथे झालेला नाही. आपण ह्या सभागृहाने निर्णय घ्यावा म्हणून हा विषय झालेला आहे. जर नसता झाला तर तिथे प्रकल्प चांगला झाला असता. कुठलाही प्रॉब्लेम झाला नसता आणि प्रत्येक गोष्टीचे एन.जी.टी. मॉनिटरींग करते. सुप्रिम कोर्ट मॉनिटरींग करते आणि सर्व वस्तुस्थिती सांगितलेली आहे. प्रत्येक १५ दिवसाला आमची मिटींग होते. आयुक्त महोदय असतात प्रत्येक मिटींगला गिते साहेब असतात. एच.ओ.डी. असतात सिटी इंजिनिअर असतात. प्रत्येक १५-२० दिवसाला मिटींग होत असते. प्रत्येक गोष्ट करुन आज उत्तन येथे ड्राय वेस्टला ९ महिन्यात प्रकल्प सुरु झाला आहे. इतिहासामध्ये कुठे भारतामध्ये हा प्रकल्प झाला नाही. तुमच्या माहितीसाठी सांगतो अजुन ६ महिन्यात

बाकी उरलेले होणार आहे. असा जलद प्रकल्प पूर्ण महाराष्ट्रात झाला नाही असे सभागृहाला मी विनंती घेऊन सांगतो.

**एलायस बांड्या :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलतो मी सन्मा. सर्व नगरसेवकांना हात जोडून विनंती करतो की ज्या आपण टाळ्या वाजवल्या पण तुम्हाला वस्तुस्थिती खरी माहिती नाही. आम्ही ज्या ठिकाणी राहतो त्याठिकाणी आम्ही जीवन कसे जगत आहोत. तुम्ही एक दोन दिवस आमच्याकडे या आणि बघा मॅडम आम्ही त्या ठिकाणी जेवण खाऊ शकत नाही. एवढी दुर्गंधी असते. आता पावसाळ्यात जो पाणी निचरा होईल त्याठिकाणी जवळ-जवळ ३००-४०० एकर जागा उध्वस्त झालेली आहे. शेतकरी लोकांचे तिथे जीवन उध्वस्त झालेले आहे. आता तुम्ही म्हणता की बायोमायनिंग करायची आहे तुम्हाला जर करायची असेल १० लाख मेट्रीक टन जो कचरा आहे त्याच्यावर आपण करावी. त्याच्या व्यतिरिक्त दुसरा कचरा तिथे आणु नये ही माझी आपल्याला प्रामाणिकपणे विनंती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ही कारवाई करतो ती एन.जी.टी. च्या नियमाने कारवाई करतो. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे कारवाई होत आहे कोणी त्याला अडवू शकत नाही. काय आहे ती कायद्याप्रमाणे कारवाई करतो. त्यामुळे प्रोसेसिंग ड्रायवेस्टवर आणि याच्यावरही करु शकतो.

**शर्मिला बगाजी :-**

पानपट्टे साहेब कायदा हातात घेऊ नका. तुम्ही किती वेळा हातात घेतलेला आहे हे सभागृहाला सांगु का? मग त्या प्रवचन द्यायला पूर्ण दिवस जाईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एन.जी.टी. ला माहित आहे. सुप्रिम कोर्टाला माहित आहे ती सक्षम एन.सी.पी. ला माहित आहे ते सक्षम ऑथिरीटी कायदा काय करणे संदर्भात.

**शर्मिला बगाजी :-**

ठाणे कोर्टाने तुमच्यावर जे गुन्हे दाखल केलेले आहेत. त्याचा असा खुलासा द्या. ठाणे कोर्टाने तुमच्यावर २०१६ ला का तुमच्या इथे शास्त्रोक्त पध्दतीने जेव्हा बंद झालेला कचऱ्याचे तेव्हा तुमच्यावर एफ.आय.आर. दाखल केलेली नाही आहे का ठाणे कोर्टाने.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फस्ट इन्फॉमेशन रिपोर्ट आहे. त्यांना सर्व माहिती आम्ही दिलेली आहे.

**शर्मिला बगाजी :-**

तुमची माहिती दिली खरी आणि किती खोटी ते कोर्ट ठरवेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माझी माहिती एन.जी.टी. ला माहित आहे. कोर्टाला माहित आहे. शहरामध्ये सदरची जागा प्रकल्पासाठी दिलेली आहे. दुसरीकडे जागा नाही. अखेर दुसरा कुठला पर्याय नाही. आणि जे काही करतो ते एन.जी.टी. च्या सुप्रिम कोर्टाच्या गाईड लाईननुसार करतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम आता पुढचा विषय घ्या. एवढ्या सर्वांनी खुलासा केलेला आहे. इतकी वर्ष झाली आपण तिथे राजकारण केलं. तिकडच्या लोकांच्या याच्यामध्ये आता एवढे चांगले काम होत आहे. आपला तिथे ठराव करायचा असेल तर ठराव करा. संपला विषय.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम डी.पी.आर ला आम्ही मंजुरी देणार. आता हा डी.पी.आर आहे त्याच्यामध्ये आपण आणि सन्मा. पदाधिकाऱ्यांनी इंदौरचा दौरा केला. दौरा केल्यानंतर एक पालिकेला रिपोर्ट दिला. त्या धरतीवर मिरा भाईंदर शहरामध्ये कचऱ्याचा प्रश्न सोडवा आणि त्यानुसार कारवाई होईल तस जर होणार असेल तर ह्या डी.पी.आर ला काही अर्थ राहणार नाही. हा डी.पी.आर कम्पलीटली वेगळा आहे. मग आम्ही काय करायचे? इंदौर प्रमाणे करायचे की डी.पी.आर प्रमाणे करायचे.

**मा. महापौर :-**

इंदौरचा उल्लेख इकडे नाही केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

इंदौरप्रमाणे नाही करायचा आहे ना. मग ठिक आहे.

**मा. महापौर :-**

इंदौरचा उल्लेख गोषवाऱ्यामध्ये केलेला नाही.

**अनिल सावंत :-**

गोषवा-यामध्ये नाही हा डी.पी.आर मंजुर करायचा आहे आणि तुम्ही पालिकेला रिपोर्ट दिलेला आहे. इंदौर दौ-याचा इंदौर दौ-याप्रमाणे मिरा भाईंदरचा प्रश्न सोडवावा त्वरीत सुटला जाईल. आम्हाला पण बर वाटल. पेपरला वगैरे न्युज आल्या तुही लेटर वगैरे दिलेले आहेत. रिपोर्ट दिलेले आहेत आता ते जर खर असेल.

**मा. महापौर :-**

प्रयत्न तर करु.

**अनिल सावंत :-**

ते खर असेल तर डी.पी.आर ला अर्थ राहणार नाही. दोघांपैकी एक काहीतरी होईल.

**मा. महापौर :-**

आपण प्रयत्न करु.

**अनिल सावंत :-**

म्हणजे हा डी.पी.आर मान्य करायचा म्हणजे इंदौरप्रमाणे आपण नाही करणार.

**मा. आयुक्त :-**

ह्या डी.पी.आर प्रमाणे हा मुख्य आपला प्रकरण आहे डी.पी.आर ला मंजुरी द्यावी आणि इंदौरचा दौरा आपण ज्या काही चांगल्या गोष्टी केल्या तेवढ्या याच्यात टाकणे शक्य त्या निश्चित करु. मी आयुक्त म्हणून राहिलो तर हा माझा प्रायोरिटीवरचा पहिला प्रकरण असेल. हे माझ वैयक्तिक अटेन्शन असेल एवढी मी ग्वाही आपल्याला देतो.

**अनिल सावंत :-**

मी सुध्दा आपल्याला रिक्वेस्ट केलेली आहे.

**शर्मिला बगाजी :-**

मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी असलेल्या घनकच-यावर **Bio-Mining** करुन विल्हेवाट लावण्याचा व घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करण्याचा प्रस्ताव मा. महासभेसमोर प्रशासनाने आणलेला आहे. आज १० लाख मेट्रीक टन कच-याचे डोंगर या ठिकाणी कोणतीही प्रक्रिया न करता, विभागणी न करता पडून आहेत. एक वर्षापूर्वी मान्यता (१९.०५.२०१७) देऊन सुध्दा आज सविस्तर प्रकल्प अहवाल (**DPR**) तयार झालेला आहे. रु. ८३.८३ कोटी रक्कमेचा **DPR** असून रु. ५६.२० कोटी पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी खर्च येणार आहे. **DPR** मा. महासभेने मंजूर केल्यानंतर राज्यशासनाकडे मंजरीसाठी पाठविण्यात येणार, त्यांची मंजूरी मिळाल्यानंतर अनुदान मिळण्याची शक्यता आहे, तो पर्यंत पाऊस येईल व सर्व घाणेरडे पाणी उत्तन गावामध्ये शिरेल. अगोदरच या कच-यातून निर्माण होणारे वेगवेगळ्या प्रकारचे विषारी वायु, वाढलेले प्रदुषण, चहुबाजुला झालेली दुर्गंधी, श्वानदंशाची वाढलेली प्रकरणे, या परिसरात खरुज व त्वाचा रोगाचे वाढत प्रमाण, वयस्कांना झालेले फुफुस्साचे रोग यामुळे उत्तन परिसरात नागरीकांचे जिवन मेतकुठीला आलेले आहे. तरी राज्य शासनाच्या अनुदानाची वाट न बघता इतर विभागातील रक्कम आरोग्य विभागात वर्ग करावी व पावसाळ्यापूर्वी या कच-याची विल्हेवाट लावावी. तसेच उत्तन येथील घनकचरा प्रकल्प सकवार येथे स्थलांतरीत करण्याविषयी त्वरीत कार्यवाही करावी. शहरातील मोठमोठ्या रहिवासी संकुलांना त्यांच्या कच-याची त्यांनीच विल्हेवाट लावण्यासाठी प्रवृत्त करावे. नवीन (सुधारीत) बनविण्यात येणा-या विकास आराखड्यामध्ये शहरातील ६ प्रभागांमध्ये घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालु करण्यासाठी जागा आरक्षीत करण्यात याव्यात तसेच शहरातील यापुढील कचरा उत्तन येथे न टाकता त्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**हेलन गोविंद :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. विविता नाईक, अनुमोदन श्रीम. हेतल परमार, दुसरा ठराव आहे सुचक श्रीम. शर्मिला बगाजी, अनुमोदन श्रीम. हेलन गोविंद. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात

असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. विविता नाईक ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. विविता नाईक यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६, विरोधात २४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम विविता नाईक यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

**घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर करणे व DPR नुसार मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी असलेल्या घनकचऱ्यावर Bio-Mining करुन विल्हेवाट लावणेबाबत.**

ठराव क्र. १४ :-

**विषयांकित प्रकरणी दि. 05/02/2018 रोजी सादर केलेल्या गोषवाऱ्यामध्ये सुधारणा करून खालीलप्रमाणे सुधारीत गोषवारा सादर करण्यात येत आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथे मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून 31.46 हेक्टर जागा घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता प्राप्त झालेली आहे. सद्यस्थितीत मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी मागील काही वर्षापासून मोठ्याप्रमाणावर घनकचरा जमा झालेला आहे . सदर घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 तरतुदीनुसार शास्त्रौक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे संदर्भात मा .हरित न्यायाधिकरण, पुणे व मा . सर्वोच्च न्यायालयाकडील दाखल प्रकरणामध्ये घनकचरा प्रकल्प ठिकाणी असलेल्या पूर्वीच्या कचऱ्यावर शास्त्रौक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र महानगरपालिकेमार्फत दाखल करण्यात आले आहे . त्यानुसार सदर घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 तरतूदीनुसार विल्हेवाट लावणेकरीता महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार आय .आय.टी. मुंबई यांनी Bio-Mining करणेबाबत तांत्रिक सल्ला दिलेला आहे. सदर ठिकाणी अंदाजे 10 लाख मेट्रीक टन इतका घनकचरा अस्तित्वात असून त्यावर Bio-Mining पध्दतीने विल्हेवाट लावल्यास सदरची जागा पुन्हा वापरासाठी रिकामी होऊ शकेल.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन घनकचरा व्य वस्थापन करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी शासनाने त्यांचे पॅनलवरील ICUC Consultants Pvt Ltd या संस्थेचे नाव मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी सुचित केले होते . तसेच मा. महासभा ठराव क्र.12, दि.19/05/2017 नुसार DPR तयार करण्यासाठी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ICUC consultants Pvt. Ltd. संस्थेस DPR तयार करणेसाठी आदेश देण्यात आले होते . ICUC Consultants Pvt. Ltd. या संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर केलेला आहे . सदरचा सविस्तर प्रक ल्प अहवाल (DPR) तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.महासभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.**

**तसेच सदर प्रकल्प अहवालामध्ये घनकचरा व्यवस्थापन कामाच्या विविध बाबी मिळून 83.83 कोटी रक्कमेचा DPR तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये उत्तन घनकचरा प्रकल्प ठिकाणी अस्तित्वात असलेल्या कचऱ्यावर शास्त्रौक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे कामाचा देखील समावेश आहे . DPR नुसार मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या घनकचऱ्यावर Bio-Mining पध्दतीने विल्हेवाट लावणेसाठी एकुण अंदाजे रक्कम रु. 56.20 कोटी खर्च अपेक्षित असून सदरचा DPR मंजुर करून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. DPR मंजुर झाल्यानंतर शासनाकडून Bio-Mining करीता अनुदान मिळू शकते.**

**घनकचरा व्यवस्थापन करणे कामाचा सवि स्तर प्रकल्प अहवालास (DPR) मान्यता देणेस, DPR नुसार आवश्यक कार्यवाही करणेस तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यतेसाठी होणारी फी अदा करणेस व DPR नुसार Bio-Mining पध्दतीने उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी पूर्वीच्या अस्तित्वात असले ल्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस तसेच सदरचा DPR शासनास मान्यतेसाठी पाठविणेस शिफारस असे.**

**<u>ठराव</u>**

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सर्व कामांना ही महासभा आर्थिक व प्रशासकी य मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. विविता नाईक अनुमोदक :- श्रीम. हेतल परमार

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | गोहिल शानू जोरावर सिंह | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | सोंस नीला बर्नाड | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | नाईक विविता विवेक | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | भावसार वंदना संजय | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | बेलानी हेमा राजेश | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | भोईर विणा सुर्यकांत | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | सोनार सुरेखा प्रकाश | २० | पाटील नरेश तुकाराम | |
| २१ | मुखर्जी अनिता बबलू | २१ | भोईर कमलेश यशवंत | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | अहमद साराह अकरम | |
| २३ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २४ | शाह राकेश रतिशचंद्र | २४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २५ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २६ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३० | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३३ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३६ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४१ | दुबे मनोज रामनारायण | | | | |
| ४२ | व्यास रवि वासुदेव | | | | |
| ४३ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | | |
| ४४ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | | |
| ४५ | भोईर गणेश गजानन | | | | |
| ४६ | पारधी सुजाता यशवंत | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, **महानगरपालिका परिवहन सेवेचे धोरण निश्चित करणे.**

**हेतल परमार :-**

**मिरा भाईंदर महापालिकेची परिवहन सेवा जी .सी.सी तत्वावर चालु करण्याचा निर्णय केला होता. तथापि सदरचा विषय फेरसादर मा .महासभेत सादर केला आहे . परिवहन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे मा.आयुक्त सो., यांनी मनपा पदाधिकारी यांचेसोब त त्वरीत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सुनिता भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा गोषवारा कुठे आहे? उपायुक्त साहेब प्रशासनाचा गोषवारा नाही. काय करायचं परिवहन व्यवस्थापकाने गोषवारा दिलेला नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ह्या संदर्भातला गोषवारा वेगळा होता.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही गोषवारा दिला नाही. याच्यामध्ये कसं बोलणार याच्यामध्ये तसा काही उल्लेख नाही सभागृहासमोर आज तुम्ही वस्तु कशी बोलणार.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

याच्यामध्ये जी.सी.सी. बेसीसवरती आपण मागच्या वेळी धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. त्याच्यानंतर त्याच्यावर ती आपल्याला रिस्पॉन्स मिळत नव्हतं. नंतर जे काही आपण मध्यंतरी ठराव केला लेट ड्रॉप अवॉर्ड दिला. लेट ड्रॉप अवॉर्ड मागे घेतला आणि नंतरच्या काळामध्ये पुन्हा कोणत्या बेसिसवरती जी.सी.सी. ला जर पुन्हा आपण निविदा काढली तर प्रतिसाद येणार नाही. तर आपल्याला वेगळ्या इंडियामध्ये दुसऱ्या कुठल्या मॉडेल वरती चांगल्या पध्दतीने परिवहन सेवा सुरु आहे. का ह्या संदर्भामध्ये पाहणी करावी. त्या संदर्भात हे करावे अशा सुचना झाल्या होत्या. त्या अनुषंगाने आम्ही आयुक्त साहेब भोपाळला जाऊन आलो. नंतरमध्ये वर्ल्ड बँकेच्या सोबत लखनऊ आणि दिल्ली येथे काही बैठका झाल्या होत्या. आणि त्यानुसार आपल्याकडे जयपुर आणि भोपाळ याठिकाणी एन.सी.सी. बेसीसवरती चालु आहे. काही ठिकाणी हॅब्रीट मॉडेल सुरु आहे. तर त्याचा साधारणतः ही माहिती घेतल्यानंतर आम्ही जी.सी.सी. मध्ये म्हणजे आपल्या इथे वेगवेगळे जे ऑपरेटर्स आहेत त्यांची एक स्टेट होल्डरशी आम्ही एक मिटीग घेतलेली होती आणि त्यांच्या सुचना आम्ही कुठकुठल्या प्रतीने घेता येईल त्याची आम्ही एक आयुक्त साहेबांशी मिटींग घेतली आणि त्याची आम्ही नोट्स तयार केलेली आहे. दरम्यानच्या काळामध्ये मागचा आपल्या इथे एक ठराव केलेला होता तो ठराव विखंडन करण्यासाठी नगरविकास विभागाला पाठवलेला होता. विखंडीत न करण्यासाठी असे ते झालेले आहे. त्यामुळे सेक्रेटरी मॅडम बरोबर यावर्षी चर्चा होणे अपेक्षित आहे. त्या मॅडम आता सध्या अभ्यास दौऱ्यासाठी अमेरिकेला गेलेल्या आहेत. त्या ८ तारखेला येतील. त्याच्यानंतर चर्चा होईल आणि त्याच्यानंतर मी प्रस्ताव दाखल करेल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हे चाऊन चाऊन तुम्ही बोलत आहेत. तुम्ही कागदावर का दिले नाही?

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब हा ठराव आधी केलेला आहे. परंतु आपण त्यावेळेला काय बोललो जी.सी.सी. तत्वावर.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही एन.सी.सी. जी.सी.सी. काय करायचे ते आम्ही ठरवले होते.

**मा. उपमहापौर :-**

आता जो ठराव झाला ना महासभेसमोर जी चर्चा केलेली आहे ठरावात त्यांनी काय सांगितले की आपला ऑलरेडी ठराव झालेला आहे आणि जी.सी.सी. तत्वावरती आपण ते करणार होतो. परंतु यासंदर्भात आयुक्त साहेबांनी पदाधिका-यांना विश्वासात घेऊन अधिका-यांना विश्वासात घेऊन जी चांगली प्रोसिजर आहे पध्दती त्याची ही आवश्यक बाब आहे. म्हणून लवकरात लवकर ती शहरात लागु करावी.

**जुबेर इनामदार :-**

साहेब जी.सी.सी. तत्वावर प्रशासनाने गोषवारा दिला नाही. तुम्ही कुणाला अखत्याराखाली हे सगळ बोलत आहात हे सर्व शहराला माहिती आहे. खरोखर असे आहे की जी.सी.सी. तत्वावर तुमची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ती नविदा प्रक्रिया रद्द झाली का शासनाने ती निविदा प्रक्रिया तुमची रद्द केली आहे का? तो न्यायप्रविष्ठ झालेला विषय आहे. ठेकेदार नेमण्यात आला सगळे काही झालं. एवढ मोठ त्याच्यावरती इतिहास रचला गेला. आज तुम्ही काय भुमिका घेणार त्याची त्या विषयाचे काय झाले. ते बोलण्यावरती तुम्ही तुमची बाजु मांडत आहात. गोषवारा कागदावर द्यायची तुमची ताकद नाही म्हणून तुम्ही असं करत आहात. रितसर गोषवारा द्या की, अशाप्रकारे झालं हे घडलं तर त्याच्यानंतर आता ही आमची प्रशासनाची ही भुमिका आहे की आम्हाला जी.सी.सी. एन.सी.सी. किंवा जे काही करायचे असेल ते करु द्या ना. उपायुक्त आहेत तुम्हाला तुमच्या..............

**गिता जैन :-**

साहेब तुमची नेमकी भुमिका काय आहे म्हणजे जी.सी.सी. पध्दतच आपल्याला नको आहे. नविन पध्दत पाहिजे, नविन ठेकेदार पाहिजे काय आहे तुमच्या मनात.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

जी.सी.सी. यात मॉडेलवरती आपण ज्या काही ५-७ वेळेस ज्या काही निविदा काढलेल्या होत्या. त्या निविदांना प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी आपल्याला........

**गिता जैन :-**

निविदेला प्रतिसाद मिळाला नाही मिळाला मला माहित नाही. पण कदाचित आम्ही दोन महिन्याची ट्रेनिंगसाठी देशमुख साहेब आणि पिंपळे मॅडम गेले त्यानंतर दोन अडीच महिन्यात त्यांनी मेहनत घेतली की आम्हाला पटवून द्यायला का नाही जी.सी.सी. इज द बेस्ट. मग आता अस काय झालं की आता तुम्हाला जी.सी.सी. नको आहे. रिझन तरी द्या.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

रिस्पॉन्स येत नाही.

**गिता जैन :-**

साहेब निविदा काढल्या. त्या मंजुर झाल्या. आता काय रिस्पॉन्स पाहिजे तुम्हाला.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब निविदा मंजुर होऊन स्टॅन्डिंगची पण मंजुर झाली.

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समीने मंजुरी दिली हे फेल झाल्यावर पैसे पोहोचले कमी पडले म्हणून आला का विषय? अशाप्रकारे हे बरोबर नाही. तुम्ही हे योग्य काम करत नाही. म्हणून अशाप्रकारे तुमच्यावरती तक्रारी होतील.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही आमची भुमिका स्पष्ट केली. आयुक्तांनी पदाधिकारी यांच्यासोबत त्वरीत बैठक घेऊन ह्या निर्णयाप्रमाणे पुढील कारवाई करावी असा ठराव ऑलरेडी केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

हा ठराव सभागृहामध्ये मी केलेला आहे. तेव्हा तो जी.सी.सी. तत्वावर तुम्ही केला. सत्ताधा-यांनी केला जी.सी.सी. तत्वावर त्याच्याप्रमाणे निविदा प्रक्रिया झाली. स्थायी समितीने मंजुरी दिली त्याचे काय झाले ते सांगा. अशाप्रकारे तुम्ही कुठून काढू शकता?

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम इव्हन मागच्या वेळी गटनेत्यांच्या मिटींगमध्ये पण त्यावेळी सतत एन.सी.सी., एन.सी.सी. डिमांड केली होती. सर्वपक्षिय गटनेते त्याच्यात सहमत होते. त्यावेळी सन्मा. शरद पाटीलजी होते. आणि आम्ही देखील होतो. मी देखील होत. त्यावेळी वेळोवेळी एन.सी.सी. चा डेमो दाखवून देखील एन.सी.सी. नाकारली गेली आणि जी.सी.सी. केलं गेलं महापौर मॅडम त्या होत्या माजी महापौर त्या-त्या वेळी ह्या लोकांनी महापौर मॅडम तुम्ही पण होता. जी.सी.सी. तेव्हा पिंपळ वडे मॅडम होत्या. त्यांनी एवढा वेळ केला हेच जी.सी.सी. बरोबर आहे. जी.सी.सी. करुन शेवटी त्यांनी आपले म्हणणे मान्य करुन घेतले आणि त्यावेळी सन्मा. आमदार आपले आमदार.

**गिता जैन :-**

नाही वर त्यांचा पण तोच रिपोर्ट होता. तुम्हाला जी.सी.सी. मध्ये जायचे आहे. कारण एन.सी.सी. कुठे सक्सेस होत नाही. एक दिड, दोन वर्षानंतर एन.सी.सी. कॉलेप्स होते.

**निलम ढवण :-**

इव्हन एन.सी.सी. चा आपल्याच बाजुला वसलेले वसई विरार महापालिकेचे जे चालवतात. त्यांनी देखील इथे येऊन डेमो दिलेला होता. सगळ चांगल्याप्रकारे होत असताना देखील कुणाचा ना गटनेत्यांच्या मतांना मान्यता दिली गेली. त्यावेळी गिता मॅडम आणि आपले सन्मा. आमदार मेहता साहेब पण होते आणि त्यावेळी ह्या सगळ्यांनी मिळून जी.सी.सी. लाच जास्त मान्यता दिली. गिता मॅडम मेहता साहेबांच्या पाठीशी उभ्या होत्या. आणि आम्ही सगळे जण एन.सी.सी. सर्व पक्षिय गटनेते......

**गिता जैन :-**

ते माझं आणि तुमच क्वेशन नाही आहे.

**निलम ढवण :-**

ज्यावेळी एन.सी.सी. बरोबर म्हणून सगळे सर्वपक्षिय गटनेत्यांची मागणी असताना देखील तेव्हा शेवटच्या क्षणी जी.सी.सी. ला मान्यता दिली गेली. एवढ्या सर्व गोष्टी घडल्या. आता एवढ्या बसेस येऊन तिथे भंगारात पडलेल्या आहेत. तो पालिकेचा पैसा वाया जात आहे. हे असं असताना झालेली प्रोसेस जर कॅन्सल करुन परत एन.सी.सी. करणेमागे कारण काय?

**जुबेर इनामदार :-**

आमचा प्रस्ताव कसा आहे साहेब आता जो तुम्ही ठराव केलेला आहे की आयुक्तांनी निर्णय घ्यावा. तो निर्णय झाला आहे त्या निर्णयाचे काय झाले ते आम्हाला आधी सांगा?

**मा. उपमहापौर :-**

नाही कारवाई करण्यांत यावी. ठराव असा आहे ठराव पहिला समजून घ्या की, मिरा भाईंदर महापालिकेची परिवहन सेवा जी.सी.सी. तत्वावर चालु करण्याचा निर्णय केला होता. तथापि सदरचा विषय फेरसादर मा. महासभेत सादर केला आहे. परिवहन सेवा ही अत्यंत अतिआवश्यक सेवा असल्यामुळे मा. आयुक्त साहेब यांनी महापालिकेचे पदाधिकारी यांचे सोबत त्वरीत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कारवाई करण्यांत यावी. बससेवा सुरु करायची आहे हे नक्की आहे. तुमचेही आहे आमचेही आहे. याच्यामध्ये तुम्ही तुमचे..........

**निलम ढवण :-**

बस सुस्थितीत आहेत का उपमहापौर साहेब.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला जी.सी.सी. मान्य आहे का?

**जुबेर इनामदार :-**

निर्णय झाला निविदा प्रक्रिया संपूर्ण झाली. ती निविदा प्रक्रिया तुम्हाला रद्द करायला पाहिजे. त्याला तुम्हाला शासनाची मंजुरी लागणार आहे. तुम्ही केलेले आहे का? प्रशासनाने ते उत्तर द्यावे. एका विषयावर त्यांनी गोषवारा दिलेला नाही. सध्याची खरी परिस्थिती काय आहे. गोषवाऱ्यामध्ये त्यांनी का सांगितल नाही. त्याच्यात प्रशासनाचे काय म्हणणे आहे तेच स्पष्ट नाही. आम्ही तुम्हाला कसा निर्णय देणार की तुम्ही आयुक्तांनी समिती गठीत करावी. त्याचा निर्णय घ्यावा. निर्णय घेतलेला आहे. सभागृहाने घेतला होता. निविदा प्रक्रिया पूर्ण केली कार्यपध्दत पूर्ण झाल्यानंतर................

**मा. उपमहापौर :-**

त्यात समिती नाही नेमायची बैठक घ्यायची.

**निलम ढवण :-**

साहेब करोडोच्या बसेस तिथे भंगारात देण्याचा लायकीच्या झाल्या आहेत. करोडोच्या बसेस एवढ्या फुकट चाललेल्या आहेत. त्याला जबाबदार कोण?

**गिता जैन :-**

एन.सी.सी. आणायचे असेल तर परत ती निविदा कॅन्सल करा. तिथुन शासनाकडून मंजुरी आणा की आम्ही एन.सी.सी. करतो आणि एन.सी.सी. करा ना........

**मा. उपमहापौर :-**

आपण एन.सी.सी. मागितलच नाही.

**गिता जैन :-**

ठिक आहे मग जी.सी.सी. ची निविदा झालेली आहे मग ती तुम्ही निविदा कॅन्सल करत आहात का?

**मा. उपमहापौर :-**

निविदा कॅन्सल करायची आहे म्हणून प्रस्ताव नाही ठेवला.

**गिता जैन :-**

मग मला एक सांगा की जेव्हा निविदा आपण कॅन्सल करत नाही मग आपल्याला फक्त ते ऑर्डर करायचे आहे का निविदेप्रमाणे तुम्ही काम चालु करा. तेवढच राहते निविदा मंजुर झाल्यानंतर तेव्हा ते द्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम आपने अभी ठराव पढा। ठराव में स्पष्ट अभी म्हसाळ साहबने क्लिअर कट बोला की ठराव हुआ था। टेंडर हुआ था। ठराव विखंडीत के लिए भेजा था। विखंडीत कॅन्सल होके आ गया। उसके बाद में आगे की कारवाई करने के लिए यहाँ पे सिर्फ यह हमने ठराव किया है की, आगे जो भी अधिकारीयों के साथ कमिश्नर साहब मिटींग करके जो भी निर्णय लेना है उसके उपर आगे कारवाई करें। सिर्फ इतनीसी बात है उसके लिए आगे उन्होंने क्लिअर कट दिया है। बात खत्म हो गई अभी उसमें कमिशनर साहब अपने अधिकारीयो के साथ बैठक लेके विषय न्यायप्रविष्ठ है की विखंडीत होके क्या आया है, क्या नही आया है। फैसला वह लेंगे। अब लो भी हो गया है उसके बाद में हमने सिर्फ आयुक्त साहब को अधिकार दिया है। बात खतम हो गई।

**जुबेर इनामदार :-**

लेकिन आयुक्त ने कुछ बोला ही नही। आपने अधिकार देने के लिए आयुक्त मांग नही रहा है अधिकार। तुम ही जबरदस्ती दे रहे हो उनको।

**सुरेश खंडेलवाल :-**

हम उनको जागरुक कर रहे है। हम उनको बोल रहे है आप जल्दी जल्दी कारवाई करो। परिवहन सेवा अतिआवश्यक सेवा है। इसके लिए हम उनको बोल रहे है की आप जल्दी जल्दी कारवाई करो। बात हो गई।

**निलम ढवण :-**

खंडेलवाल साहेब परिवहन सेवा अतिआवश्यक आहे. हे आम्हाला ही पटत आहे. करोडोच्या बसेस घेऊन का सडत आहेत. त्या सुस्थितीत आहेत का त्याला कोण जबाबदार? त्या जी.सी.सी., एन.सीसी. मुळे आपले पालिकेचे करोडो रुपये खर्च झालेले आहेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

आता तुम्ही जे बोलत आहात ते अगदी बरोबर आहे. तेव्हा तुम्ही होते तेव्हा ते बस वगैरे तुम्हाला सर्व माहित आहे. ती बात करुन फायदा नाही. आता आपल्याला पुढे सेवा चालु करायची आहे. म्हणून याच्यासाठी आम्ही आयुक्तांना बोललो. लवकरात लवकर ॲक्शन घ्या आणि पुढे कारवाई करा.

**निलम ढवण :-**

आता बसेस सुस्थितीत नाहीत. त्याला जबाबदार कोण? तुम्ही कुठच्या बसेस चालवणार आहोत? ही परिस्थिती आहे तुम्ही मान्य करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

पास्टमध्ये जाऊन तुम्ही विचार करा. पास्टमध्ये एवढी मोठी परिस्थिती होती. एवढी पेंडींग कशासाठी आहे आता आम्ही काम करत आहोत. तर तुम्ही आम्हाला..........

**निलम ढवण :-**

जी.सी.सी. झाल्यानंतर किती वेळ गेला?

**सुरेश खंडेलवाल :-**

आता आम्ही आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. काय करायचे आहे ते आयुक्त बैठक घेऊन ठरवतील.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासन गोषवारा द्यायला असक्षम आहे का? अस सांगा उपायुक्त साहेब.

**निलम ढवण :-**

मागे असं ठरलेले होतं की ज्याचा गोषवारा नसेल तो विषय घेतला जाणार नाही. तो विषय पुढच्या वेळी घेतला जाणार असे महासभेने ठरवलेले होते.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

ठराव आमचा आहे.

**मा. महापौर :-**

ठराव करा.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला प्रशासन उत्तर देत नाही त्यांचे काय मत आहे.

**मा. महापौर :-**

आपको उत्तर दिया।

**जुबेर इनामदार :-**

आमची भुमिका काय आहे गोषवाराच नाही. भुमिका लिहीणार कुठून. भुमिका मांडायला भुमिका बनवायला भुमिका तयार करायला प्रशासनाचे काय म्हणणे आहे हे तरी स्पष्ट पाहिजे की नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम म्हसाळ साहेबांनी व्यवस्थित मसाला लावून सांगितलं. त्यांनी व्यवस्थित सांगितलं म्हणजे स्टॅन्डिंगपासून हिस्ट्री दिलेली आहे. आणि ठराव केलेला आहे. जर त्यांना ठराव मांडायचा नसेल तर आम्ही मांडलेला ठराव मंजुर करा.

**जुबेर इनामदार :-**

म्हसाळ साहेबांनी हा कागदावर का दिला नाही त्यांचा मसाला. दिला पाहिजे होतं.

**मा. महापौर :-**

ठराव करायचा असेल तर करा नाहीतर मी मंजुर करते.

**सारा अकरम :-**

महानगरपालिका परिवहन सेवेचे धोरण निश्चित करण्याबाबतचा विषय मा. महासभेकडे निर्णयासाठी प्रस्तावित केलेला आहे. परंतु, प्रशासनाने सदर विषयाबाबत गोषवारा दिलेला नाही. त्यामुळे त्याबाबत प्रशासनाची भुमिका स्पष्ट होत नाही. तरी प्रशासनाने सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन सदर विषय गोषवाऱ्यासह फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. हेतल परमार, अनुमोदन श्रीम. सुनिता भोईर, दुसरा ठराव आहे सुचक श्रीम. सारा अकरम, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्रीम. सारा अकरम ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. हेतल परमार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. हेतल परमार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६, विरोधात २२, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम हेतल परमार यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

**महानगरपालिका परिवहन सेवेचे धोरण निश्चित करणे.**

ठराव क्र. १५ :-

**मिरा भाईंदर महापालिकेची परिवहन सेवा जी .सी.सी तत्वावर चालु करण्याचा निर्णय केला होता. तथापि सदरचा विषय फेरसादर मा.महासभेत सादर केला आहे . परिवहन सेवा ही अत्या वश्यक सेवा असल्यामुळे मा.आयुक्त सो., यांनी मनपा पदाधिकारी यांचेसोबत त्वरीत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्रीम. हेतल परमार अनुमोदक :- सौ. सुनिता भोईर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | कदम अर्चना अरुण | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | भट दीप्ती शेखर | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | भोईर भावना राजू | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | सपार उमा विश्वनाथ | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | परदेशी गिता हरीश | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | पाटील नरेश तुकाराम | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | अहमद साराह अकरम | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २२ | मुखर्जी अनिता बबलू | २२ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २५ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २६ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २७ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २८ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३० | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३१ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३२ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३३ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३६ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४२ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४३ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | |
| ४४ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४५ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४६ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, **दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजनेचे धोरण निश्चित करणेबाबत.**

**गणेश भोईर :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगासाठी कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणे व दिव्यांग मतिमंद विदयार्थ्यांकरीता शाळा सुरू करणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत दि.०८/११/२०१७ रोजी मा. महासभा प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ नुसार दिव्यांग कल्याणकारी समिती गठीत करणेबाबत निर्णय घेण्यात आला होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार दि.२७/११/२०१७ व दि.२१/०३/२०१८ रोजी दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे मा. महापौर, मा. उप-महापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता तसेच उप-आयुक्त व विभागप्रमुख यांच्या समवेत मा. महापौर यांचे दालन, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिव्यांग व्यक्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनामध्ये खालीलप्रमाणे धोरण ठरविणेत आले.

१) **दिव्यांग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १५ वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसिलदाराकडुन)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत. |

५) बँक पासबुकची छायांकित प्रत

**योजनेच्या अटीशर्ती**

१) स्टॉल परवाना हे फक्त दिव्यांग धारकांसाठी असेल.

२) दिव्यांग व्यक्तींने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे समंतीपत्र घेणे बंधनकारक आहे.

३) १८ वर्षावरील सज्ञान दिव्यांगाला स्टॉल परवाना दिला जाईल.

४) मा. महासभा ठराव क्र. ३४ दि.०३/०८/२००४ मधील अटीशर्ती नुसार ४X६ चौ. फुटावरच दिव्यांगाना स्टॉल परवाना देण्यात येईल. ४X६ चौ.फुटापैक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून दिव्यांगाचा स्टॉल परवाना रद्द करुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

५) ज्या व्यक्तीला ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्याप्रमाणे वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकाचा स्टॉल जप्त करुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल.

६) महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वतःच्या मालकीची जागा असल्यास तसेच इमारतीच्या समोरील खुल्या क्षेत्रात सर गृहनिर्माण संस्थेने नाहरकत पत्र दिल्यास परवाना देण्यात येईल. सार्वजनिक रस्ते, फुटपाथ, रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या जागेवर स्टॉल देण्यांत येऊ नये. महानगरपालिकेमार्फत बांधकाम करण्यात येणाऱ्या मार्केटमध्ये ५ % गाळे हे दिव्यांगासाठी देण्यात येतील.

७) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना प्राधान्यांने स्टॉल परवाना दिला जाईल व उर्वरीत दिव्यांग अर्जधारकांना स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनुसार अर्जाचा विचार केला जाईल.

८) दिव्यांग स्टॉलधारकाचे परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पध्दतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.

९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा त्या ठिकाणी योग्य जागा नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.

१०) दिव्यांगाना दिलेले स्टॉल भाडयाने देता अथवा घेता येणार नाहीत. तसेच या स्टॉलव्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, असे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील. परवाना दाखल्यावर स्टॉलधारकांचा फोटो लावून तो परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना रद्द करण्यास माझी हरकत नाही, असे शपथ देणे बंधनकारक राहील.

११) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सुचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना केली जाईल

१२) सद्यस्थितीत दिव्यागांना परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा हा व्यवसाय कालबाहय झाला असल्याने टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणाऱ्या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणाऱ्या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. दिव्यांग कल्याण समितीने सुचविलेले व्यवसाय इ. स्टॉल धारकास स्टॉल मध्ये ठेवता येतील.

१३) तंबाखुजन्य पदार्थ व ज्वलनशील वायुवर (गॅस किंवा स्टोव्ह) निर्माण करण्यात येणाऱ्या पदार्थाची विक्री करता येणार नाही.

१४) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल बाबत वादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास समितीचा निर्णय अंतीम राहील.

१५) दिव्यांग व्यक्तींना स्टॉलची तोडफोड अथवा हानी झाल्यास व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांचेकडुन नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

१६) शासन/मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बदल करण्यात येतील.

**इतर अटीशर्ती :-**

१) बी.पी.रोड, नवघर स्टेशन ते नवघर रोड, फाटक ते केबिन रोड, ६० फुट रोड भाईंदर (प.), भाईंदर (प.) स्टेशन रोड ते सेंकडरी शाळा, भाजी मार्केट ते कमला पार्क पोलिस स्टेशन, सब वे रोड ते पोलिस स्टेशन, मिरा रोड रेल्व स्टेशन ते रसाज, वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हॉटेल इतर ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.

३) धार्मिक स्थळ, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन,इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नये.

४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या दिव्यांग व्यक्तींना स्टॉल दिलेला आहे. अशा दिव्यांग व्यक्तींना ६० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

५) एका जागेसाठी दोन दिव्यांग व्यक्तींनी अर्ज केलेला असल्यास त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी व त्याचे शहरातील वास्तव्य किती वर्षाचे आहे, यावर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६) स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वतःची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमीपत्र दयावे.

७) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन विशेष बाब म्हणुन स्टॉल परवानगी देण्यात येईल.

८) दिव्यांगाना स्टॉलसाठी परवाना दिला गेला असल्यास त्यांना रु. २५,०००/- आर्थिक मदत केली जाईल.

९) पुर्वी दिलेले सर्व बुथ परवाने रद्द करण्यात येतील व बांधकामे केलेली असल्यास तोडण्यात येतील.

**२) योजनेचे नांव :-** शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणा-या दिव्यांग कर्मचा-यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये दिव्यांग व्यक्ती कार्यरत असावी.

२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)

३) महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.

४) आधार कार्डची छायांकित प्रत.

**३) दिव्यांग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती** १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला. लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत व इतर कागदपत्रे

२) ४०% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकाची सत्यपत्र
५) आधार कार्डची छायांकित प्रत.

## ४) दिव्यांग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे –

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधने पुरवून त्यांना स्वावलंबी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिका-याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
३) आधार कार्डची छायांकित प्रत

## ५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक फी देणे.

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| नर्सरी ते ४ | २५०० | ५,०००/- |
| ५ ते ७ | ४००० | ६,०००/- |
| ८ ते १० | ६००० | ८,०००/- |
| ११ ते १२ | ८००० | १०,०००/- |
| १२ ते पदवी (कला, वाणिज्य, विज्ञान) | १०,००० | १२,०००/- |
| १२ ते पदवी (तांत्रिक,विज्ञान, इतर IT व्यावसायिक) | - | २०,०००/- |

<u>**योजनेच्या अटीशर्ती**</u> :-

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटल) सक्षम प्राधिका-याचा दाखला.
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकेची सत्यप्रत.
५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.
६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे कडून शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
९) बॅक पासबुकची छायांकित प्रत.

१०) आधार कार्डची छायांकित प्रत.

**६) दिव्यांग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येईल. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला) दाखला<br>२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.<br>३) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>४) आधार कार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत.<br>५) २ लाखाच्या मंजुर रक्कमेवर ५० टक्के अनुदान राहील व अनुदानाची जास्तीत जास्त रक्कम रु.१ लाख पर्यंतची असेल.<br>६) नियमित ६ महिनेचे कर्जाचे हफ्ते भरण्यात आलेले असल्याबाबतचे बँकेकडुन पत्र प्राप्त झाल्यानंतर अनुदानाची रक्कम त्यांच्या खाती बँकेत वर्ग करण्यात येईल. |

**७) दिव्यांग व्यक्तींना उदरनिवार्ह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेल्या साहित्या साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे) |
| **साहित्य :-** | शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/ जे.जे. हॉस्पिटलचा दाखला) दाखला<br>२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन पॅनकार्ड, रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) शिधापत्रिकेची छायांकित प्रत<br>५) सदर योजना एक वर्षापर्यंत राहील व मुदतवाढीचा निर्णय समिती घेईल. |

**८) दिव्यांग व्यक्तीसाठी क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

**९) दिव्यांगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे :-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.२५,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |

**योजनेच्या अटीशर्ती**

१) वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र असावे. (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
२) दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी या दोन्ही बाबतीत प्रतिज्ञापत्र दयावे.
४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.
५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
६) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.
आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत.

**१०) दिव्यांग मुलांसाठी शाळा:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग मुलांसाठी शाळा

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या दिव्यांग मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.

१) मुख्याध्यापक - ०१
२) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार
३) शिक्षक - आवश्यकतेनुसार
४) लिपिक - आवश्यकतेनुसार
५) दिव्यांग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार
६) शिपाई - आवश्यकतेनुसार

**११) दिव्यांग व्यक्तींचे सर्व्हेक्षण करणे:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत.

तरी सदर धोरण मा. महासभा दि.०८/११/२०१७ प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ यानुसार ठरविण्यांत आलेल्या समितीमार्फत दिव्यांगासाठी योजनांचे धोरण निश्चित करण्यात आलेले असुन सदरचे धोरण मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव क्र :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**पंकज पांडेय :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पूढचा विषय घ्या.

**मर्लिन डिसा :-**

माझी एक सुचना आहे. दिव्यांग व्यक्तींना स्टॉल हे ६० टक्के दिलेले आहेत. ५० टक्के करु शकत नाही का?

**मा. महापौर :-**

नाही.

**मर्लिन डिसा :-**

५० टक्के केल्यावर जास्त लोकांना बेनिफीट भेटेल.

**प्रकरण क्र. १५ :-**

**दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजनेचे धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगासाठी कल्याणकारी योजनांचे धोरण निश्चित करणे व दिव्यांग मतिमंद विदयार्थ्यांकरीता शाळा सुरू करणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत दि.०८/११/२०१७ रोजी मा. महासभा प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ नुसार दिव्यांग कल्याणकारी समिती गठीत करणेबाबत निर्णय घेण्यात आला होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार दि.२७/११/२०१७ व दि.२१/०३/२०१८ रोजी दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे मा. महापौर, मा. उप-महापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता तसेच उप-आयुक्त व विभागप्रमुख यांच्या समवेत मा. महापौर यांचे दालन, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिव्यांग व्यक्तीसाठी राबविण्यात येणा-या योजनामध्ये खालीलप्रमाणे धोरण ठरविणेत आले.

**१) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १५ वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसिलदाराकडुन)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त दिव्यांग धारकांसाठी असेल.<br>२) दिव्यांग व्यक्तींने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे समंतीपत्र घेणे बंधनकारक आहे.<br>३) १८ वर्षावरील सज्ञान दिव्यांगाला स्टॉल परवाना दिला जाईल.<br>४) मा. महासभा ठराव क्र. ३४ दि.०३/०८/२००४ मधील अटीशर्ती नुसार ४X६ चौ. फुटावरच दिव्यांगाना स्टॉल परवाना देण्यात येईल. ४X६ चौ.फुटापैक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून दिव्यांगाचा स्टॉल परवाना रद्द करुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.<br>५) ज्या व्यक्तीला ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्याप्रमाणे वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकाचा स्टॉल जप्त करुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल.<br>६) महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वतःच्या मालकीची जागा असल्यास तसेच इमारतीच्या समोरील खुल्या क्षेत्रात सर गृहनिर्माण संस्थेने नाहरकत पत्र दिल्यास परवाना देण्यात येईल. सार्वजनिक रस्ते, फुटपाथ, रहदारीस अडथळा निर्माण करणा-या जागेवर स्टॉल देण्यांत येऊ नये. महानगरपालिकेमार्फत बांधकाम करण्यात येणा-या मार्केटमध्ये ५ % गाळे हे दिव्यांगासाठी देण्यात येतील. |

७) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना प्राधान्यांने स्टॉल परवाना दिला जाईल व उर्वरीत दिव्यांग अर्जधारकांना स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनुसार अर्जाचा विचार केला जाईल.

८) दिव्यांग स्टॉलधारकाचे परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पध्दतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.

९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा त्या ठिकाणी योग्य जागा नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.

१०) दिव्यांगाना दिलेले स्टॉल भाडयाने देता अथवा घेता येणार नाहीत. तसेच या स्टॉलव्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, असे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील. परवाना दाखल्यावर स्टॉलधारकांचा फोटो लावून तो परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना रद्द करण्यास माझी हरकत नाही, असे शपथ देणे बंधनकारक राहील.

११) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सुचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना केली जाईल

१२) सद्यस्थितीत दिव्यागांना परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा हा व्यवसाय कालबाहय झाला असल्याने टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणाऱ्या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणाऱ्या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. दिव्यांग कल्याण समितीने सुचविलेले व्यवसाय इ. स्टॉल धारकास स्टॉल मध्ये ठेवता येतील.

१३) तंबाखुजन्य पदार्थ व ज्वलनशील वायुवर (गॅस किंवा स्टोव्ह) निर्माण करण्यात येणाऱ्या पदार्थाची विक्री करता येणार नाही.

१४) दिव्यांग व्यक्तींना स्टॉल बाबत वादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास समितीचा निर्णय अंतीम राहील.

१५) दिव्यांग व्यक्तींना स्टॉलची तोडफोड अथवा हानी झाल्यास व्यक्तीशः जबाबदार धरुन त्यांचेकडुन नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

१६) शासन/मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बदल करण्यात येतील.

**इतर अटीशर्ती :-**

१) बी.पी.रोड, नवघर स्टेशन ते नवघर रोड, फाटक ते केबिन रोड, ६० फुट रोड भाईंदर (प.), भाईंदर (प.) स्टेशन रोड ते सेंकडरी शाळा, भाजी मार्केट ते कमला पार्क पोलिस स्टेशन, सब वे रोड ते पोलिस स्टेशन, मिरा रोड रेल्व स्टेशन ते रसाज, वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हॉटेल इतर ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.

३) धार्मिक स्थळ, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन,इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नये.

४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या दिव्यांग व्यक्तींना स्टॉल दिलेला आहे. अशा दिव्यांग व्यक्तींना ६० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

५) एका जागेसाठी दोन दिव्यांग व्यक्तींनी अर्ज केलेला असल्यास त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी व त्याचे शहरातील वास्तव्य किती वर्षाचे आहे,

यावर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६) स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वतःची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमीपत्र दयावे.

७) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन विशेष बाब म्हणुन स्टॉल परवानगी देण्यात येईल.

८) दिव्यांगाना स्टॉलसाठी परवाना दिला गेला असल्यास त्यांना रु. २५,०००/- आर्थिक मदत केली जाईल.

९) पुर्वी दिलेले सर्व बुथ परवाने रद्द करण्यात येतील व बांधकामे केलेली असल्यास तोडण्यात येतील.

**२) योजनेचे नांव :-** शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये दिव्यांग व्यक्ती कार्यरत असावी.
२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
३) महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.
४) आधार कार्डची छायांकित प्रत.

**३) दिव्यांग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**
३) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला. लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत व इतर कागदपत्रे
४) ४०% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकाची सत्यपत्र
५) आधार कार्डची छायांकित प्रत.

**४) दिव्यांग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे –**

**योजनेचा उद्देश -** दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधने पुरवून त्यांना स्वावलंबी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**
१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)
३) आधार कार्डची छायांकित प्रत

**५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक फी देणे.**

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| नर्सरी ते ४ | २५०० | ५,०००/- |
| ५ ते ७ | ४००० | ६,०००/- |
| ८ ते १० | ६००० | ८,०००/- |
| ११ ते १२ | ८००० | १०,०००/- |
| १२ ते पदवी (कला, वाणिज्य, विज्ञान) | १०,००० | १२,०००/- |
| १२ ते पदवी (तांत्रिक,विज्ञान, इतर IT व्यावसायिक) | - | २०,०००/- |

**<u>योजनेच्या अटीशर्ती</u> :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटल) सक्षम प्राधिका-याचा दाखला.
३) जन्म दाखला.
४) शिधापत्रकेची सत्यप्रत.
५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.
६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे कडून शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
९) बॅक पासबुकची छायांकित प्रत.
१०) आधार कार्डची छायांकित प्रत.

**६) दिव्यांग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला) दाखला
२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.
३) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.
४) आधार कार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत.
५) २ लाखाच्या मंजुर रक्कमेवर ५० टक्के अनुदान राहील व अनुदानाची जास्तीत जास्त रक्कम रु.१ लाख पर्यंतची असेल.
६) नियमित ६ महिनेचे कर्जाचे हफ्ते भरण्यात आलेले असल्याबाबतचे बँकेकडुन पत्र प्राप्त झाल्यानंतर अनुदानाची रक्कम त्यांच्या खाती बँकेत वर्ग करण्यात येईल.

**७) दिव्यांग व्यक्तींना उदरनिवार्ह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेल्या साहित्या साठी अनुदान

| | |
|---|---|
| | उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे) |
| **साहित्य :-** | शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/ जे.जे. हॉस्पिटलचा दाखला) दाखला<br>२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन पॅनकार्ड, रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) शिधापत्रिकेची छायांकित प्रत<br>५) सदर योजना एक वर्षापर्यंत राहील व मुदतवाढीचा निर्णय समिती घेईल. |

८) **दिव्यांग व्यक्तीसाठी क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

९) **दिव्यांगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे** :-

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.२५,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे. (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)<br>२) दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी या दोन्ही बाबतीत प्रतिज्ञापत्र दयावे.<br>४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.<br>५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>६) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.<br>आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत. |

**१०) दिव्यांग मुलांसाठी शाळा:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग मुलांसाठी शाळा |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | |
|---|---|
| **योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** | सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या दिव्यांग मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.<br>१) मुख्याध्यापक - ०१<br>२) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार<br>३) शिक्षक - आवश्यकतेनुसार<br>४) लिपिक - आवश्यकतेनुसार<br>५) दिव्यांग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार<br>६) शिपाई - आवश्यकतेनुसार |

**११) दिव्यांग व्यक्तींचे सर्व्हेक्षण करणे:-**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत. |

तरी सदर धोरण मा. महासभा दि.०८/११/२०१७ प्रकरण क्रं.२७, ठराव क्रं.२४ यानुसार ठरविण्यांत आलेल्या समितीमार्फत दिव्यांगासाठी योजनांचे धोरण निश्चित करण्यात आलेले असुन सदरचे धोरण मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव क्र :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. गणेश भोईर अनुमोदक :- श्री. पंकज पांडेय**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, **गटई कामगारांना स्टॉल देणेबाबत धोरण ठरविणे.**

**हसमुख गेहलोत :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिका क्षेत्रात रस्ते/गटारावर गटई स्टॉलला परवाने देण्यात आले आहेत. त्यापैंकी काही परवाना धारकांनी नुतनीकरण केलेले नाही, काही स्टॉलचे स्थलांतर झाले, काही परवानाधारकांचे निधन झाले. तसेच गटई स्टॉलबाबत अनुज्ञेय परवानगी व्यतिरिक्त वेगळा वापर चालु आहे, स्टॉल स्थलांतर केलेले आहेत, काही परवाने २५० मी. चे आत असल्याने ते आताच्या अटीशर्तीनुसार विसंगत आहेत. काही भागात अनेक गटई स्टॉल परवाने आहेत तर काही ठिकाणी नगण्य आहेत.

काही गटई स्टॉलधारकांनी कर आकारणी केलेली आहे, काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडले गेले आहेत. काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडल्यामुळे प्रशासना बरोबर वाद चालु आहेत. त्यामुळे स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक होते. तसेच यापुर्वीच्या अटी-शर्ती कायम ठेऊन रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन, निर्णय घेणे उचीत वाटते व त्यानुसार खालील सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

**गटई स्टॉल परवाना देणेबाबत**

| | | |
|---|---|---|
| **कार्यक्षेत्र** | - | मिरा भाईंदर महानगरपालिका |
| **गटई स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक** | - | १) जातीचा दाखल्याची छायांकित सत्यप्रत.<br>२) शिधापत्रिका छायांकित सत्यप्रत. |

कागदपत्रे

३) मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कमीत-कमी १५ वर्षाचा स्थानिक वास्तव्याचा रहिवास पुरावा.
४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.
५) स्थळदर्शक नकाशा
६) बॅक पासबुक छायांकीत सत्यप्रत.

१) **योजनेच्या सुधारीत अटी -शर्ती**

१)कुटूंबातील एकाच व्यक्तीला गटई परवाना देण्यातयेईल व एकपेक्षा जास्त परवाना मंजुर करता येणार नाही. तसेच दोन स्वतंत्र रेशनिंग कार्ड असल्यास दुसऱ्या स्टॉलचा विचार करता येईल.
२) गटई स्टॉल धारकाने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे.
३) १८ वर्षावरील सज्ञान नागरीकाला स्टॉल परवाना दिला जाईल.
४) मा. महासभा ठराव क्र. ३४,दि.०३/०८/२००४ मधील अटिशर्तींनुसार ४X५ चौ. फुट क्षेत्रफळास गटई परवाना देण्यात येईल. ४X५चौ. फुट क्षेत्रफळापेक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तींचा भंग केल्याचे कारण दाखवून गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
५) प्रभागनिहाय जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभाग, परवाना विभाग व प्रभाग अधिकारी यांचेकडून झालेनंतर दर ३ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.
६) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात
आला आहे, त्यांनाच प्राधान्याने परवाना देणे व उर्वरित गटई परवान्यांसाठी उपलब्ध जागेनूसार नविन अर्ज स्विकारण्यात येतील.
७) एकदा जागा निश्चित झालेनंतर त्याच जागेवर गटई परवाना देण्यात येईल.
८) गटई परवानाकरीता जास्त प्रमाणात अर्ज आले तर लॉटरी पद्धतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत गटई स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.
९) दोन स्टॉलमध्ये कमीत-कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा स्टॉल योग्य ठिकाणी नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.
१०) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करण्यात येईल.
११) अनुज्ञेय व्यवसाया व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखलकरण्यात येईल. ज्या व्यक्ती व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे.

त्यानुसार वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉल धारकांवर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल.

१२) गटई परवान्याचा वापर योग्य रितीने व नियम व अटीशर्तींप्रमाणे होत असल्याची तपासणी झालेवर दर ३ वर्षानंतर नुतनीकरण होईल. गटई स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ३ वर्षात त्याने नियम/अटीचा भंग केला नाही, हे तपासले जाईल.

१३) गटई स्टॉल भाड्याने देता अथवा घेता येणार नाही.तसेच स्टॉल व्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, स्टॉलबाबत तक्रार प्राप्त झाल्यास रद्द करणेस माझी हरकत नाही, असे प्रतिज्ञापत्रात नमूद राहील व परवान्यावरती स्टॉलधारकाचा फोटो लावून परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

१४) गटई स्टॉल धार्मिक स्थळापासून १५० मि. अंतरावर असणे आवश्यक आहे.

१५) अपवादात्मक परिस्थितीत गटई स्टॉल बाबत समितीचा निर्णय अंतिम राहील.

१६) सदर परवाना देताना सार्वजनिक ठिकाणी व रहदारीच्या रस्त्यावर जेथे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याकरिता सदर ठिकाणी गटई कामगारांना स्टॉल वितरीत करण्यांत येऊ नये.

१७) खाजगी जागेवर अथवा खाजगी सोसायटीच्या आवारात स्टॉल वितरीत करावयाच्या असल्यास सदर जागेच्या मालकाची व सोसायटीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**इतर अटीशर्ती :-**

१) १. नवघर रोड, बंदरवाडी नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळ,
   २. प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका पर्यंत,
   ३. भाईंदर फाटक ते केबीन रोड, जागृतीपर्यंत,
   ४. ६० फुटी रोड, भाईंदर (प.),
   ५. भाईंदर (प.) स्टेशन ते भाईंदर सेंकडरी स्कूल,
   ६. एम.टी.एन.एल. (कमलापार्क)) ते भाईंदर (प.) पोलिस स्टेशनपर्यंत,
   ७. मिरा रोड रेल्वे स्टेशन ते रसाज टॉकी,
   ८. वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हायवे,
   ९. भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल परीसर,
   वरील ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये.
   उपरोक्त जागेत यापूर्वी स्टॉल दिले असल्यास समिती निर्णय घेईल.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.

३) धार्मिक स्थळ, शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन, इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नयेत.

४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या गटई स्टॉल धारकाला परवाना दिलेला आहे. अशा गटई स्टॉल धारकांची सुधारीत अटीशर्तीमध्ये नमूद केलेली कागदपत्र तपासून प्रथम त्यांना परवाना दिला जाईल.

५) गटई स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वतःची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमी पत्र म्हणुन घेणे बंधनकारक राहील.

६) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन स्टॉल परवानगी देण्यात यावी.

७) नविन गटई स्टॉल धारकांना स्टॉल वितरण महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

८) समाज कल्याण विभागाने दिलेल्या स्टॉल व्यतिरिक्त महानगरपालिकेने पुर्वी दिलेले सर्व बुथ परवाने रद्द करण्यात यावेत व बांधकामे केलेली असल्यास तोडण्यात यावीत. तसेच मनपा निश्चित करेल त्या जागेवर पुर्वीचे परवाना प्राप्त स्टॉल स्थलांतरीत करण्यात येतील.

९) कोर्टाचे व शासनाचे वेळोवेळी पारित झालेल्या आदेशाचे मनपा कळविल त्याप्रमाणे तंतोतंत पालन करणे, स्टॉलधारकास बंधन राहील.

१०) नोकरी व इतर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला स्टॉल परवाना दिला जाणार नाही.

तरी गटई स्टॉल धारकांच्या बाबत परवाना देणेसाठी सुधारीत अटीशर्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून विभागाने कार्यवाही करण्यात यावी. सर्व परवाना धारकांचा संगणकीकृत (Database) तयार करण्यात यावा व वेळोवेळी अद्यावत करावा.

**ठराव क्र :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सिमा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १६ :-**

**गटई कामगारांना स्टॉल देणेबाबत धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. १७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिका क्षेत्रात रस्ते/गटारावर गटई स्टॉलला परवाने देण्यात आले आहेत. त्यापैकी काही परवाना धारकांनी नुतनीकरण केलेले नाही, काही स्टॉलचे स्थलांतर झाले, काही परवानाधारकांचे निधन झाले. तसेच गटई स्टॉलबाबत अनुज्ञेय परवानगी व्यतिरिक्त वेगळा वापर चालु आहे, स्टॉल स्थलांतर केलेले आहेत, काही परवाने २५० मी. चे

आत असल्याने ते आताच्या अटीशर्तीनुसार विसंगत आहेत. काही भागात अनेक गटई स्टॉल परवाने आहेत तर काही ठिकाणी नगण्य आहेत.

काही गटई स्टॉलधारकांनी कर आकारणी केलेली आहे, काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडले गेले आहेत. काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडल्यामुळे प्रशासना बरोबर वाद चालु आहेत. त्यामुळे स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक होते. तसेच यापुर्वीच्या अटी-शर्ती कायम ठेऊन रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन, निर्णय घेणे उचीत वाटते व त्यानुसार खालील सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

**गटई स्टॉल परवाना देणेबाबत**

**कार्यक्षेत्र** - मिरा भाईंदर महानगरपालिका

**गटई स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** -
१) जातीचा दाखल्याची छायांकित सत्यप्रत.
२) शिधापत्रिका छायांकित सत्यप्रत.
३) मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कमीत-कमी १५ वर्षाचा स्थानिक वास्तव्याचा रहिवास पुरावा.
४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.
५) स्थळदर्शक नकाशा
६) बॅंक पासबुक छायांकीत सत्यप्रत.

२) **योजनेच्या सुधारीत अटी -शर्ती**
१)कुटूंबातील एकाच व्यक्तीला गटई परवाना देण्यातयेईल व एकपेक्षा जास्त परवाना मंजुर करता येणार नाही. तसेच दोन स्वतंत्र रेशनिंग कार्ड असल्यास दुसऱ्या स्टॉलचा विचार करता येईल.
२) गटई स्टॉल धारकाने स्टॉल परवाना मिळणेकरीता अर्ज करताना कुटुंबातील एका व्यक्तीचे संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे.
३) १८ वर्षावरील सज्ञान नागरीकाला स्टॉल परवाना दिला जाईल.
४) मा. महासभा ठराव क्र. ३४,दि.०३/०८/२००४ मधील अटिशर्तीनुसार ४X५ चौ. फुट क्षेत्रफळास गटई परवाना देण्यात येईल. ४X५चौ. फुट क्षेत्रफळापेक्षा जास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
५) प्रभागनिहाय जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभाग, परवाना विभाग व प्रभाग अधिकारी यांचेकडून झालेनंतर दर ३ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.
६) जागा निश्चिती झालेनंतर सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांनाच प्राधान्याने परवाना देणे व उर्वरित गटई परवान्यांसाठी उपलब्ध जागेनूसार नविन अर्ज स्विकारण्यात येतील.
७) एकदा जागा निश्चित झालेनंतर त्याच जागेवर गटई परवाना देण्यात येईल.

८) गटई परवानाकरीता जास्त प्रमाणात अर्ज आले तर लॉटरी पद्धतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत गटई स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.

९) दोन स्टॉलमध्ये कमीत-कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे अथवा स्टॉल योग्य ठिकाणी नसल्यास त्यावर समिती निर्णय घेईल.

१०) रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करण्यात येईल.

११) अनुज्ञेय व्यवसाया व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखलकरण्यात येईल. ज्या व्यक्ती व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्यानुसार वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉल धारकांवर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल.

१२) गटई परवान्याचा वापर योग्य रितीने व नियम व अटीशर्तीप्रमाणे होत असल्याची तपासणी झालेवर दर ३ वर्षानंतर नुतनीकरण होईल. गटई स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ३ वर्षात त्याने नियम/अटीचा भंग केला नाही, हे तपासले जाईल.

१३) गटई स्टॉल भाड्याने देता अथवा घेता येणार नाही.तसेच स्टॉल व्यतिरिक्त अन्य ठिकाणी माझा स्टॉल नाही, स्टॉलबाबत तक्रार प्राप्त झाल्यास रद्द करणेस माझी हरकत नाही, असे प्रतिज्ञापत्रात नमूद राहील व परवान्यावरती स्टॉलधारकाचा फोटो लावून परवाना स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

१४) गटई स्टॉल धार्मिक स्थळापासून १५० मि. अंतरावर असणे आवश्यक आहे.

१५) अपवादात्मक परिस्थितीत गटई स्टॉल बाबत समितीचा निर्णय अंतिम राहील.

१६) सदर परवाना देताना सार्वजनिक ठिकाणी व रहदारीच्या रस्त्यावर जेथे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याकरिता सदर ठिकाणी गटई कामगारांना स्टॉल वितरीत करण्यांत येऊ नये.

१७) खाजगी जागेवर अथवा खाजगी सोसायटीच्या आवारात स्टॉल वितरीत करावयाच्या असल्यास सदर जागेच्या मालकाची व सोसायटीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**इतर अटीशर्ती :-**

१) १. नवघर रोड, बंदरवाडी नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळ,
२. प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका पर्यंत,
३. भाईंदर फाटक ते केबीन रोड, जागृतीपर्यंत,
४. ६० फुटी रोड, भाईंदर (प.),

५. भाईंदर (प.) स्टेशन ते भाईंदर सेंकडरी स्कूल,
६. एम.टी.एन.एल. (कमलापार्क)) ते भाईंदर (प.) पोलिस स्टेशनपर्यंत,
७. मिरा रोड रेल्वे स्टेशन ते रसाज टॉकी,
८. वर्सोवा ब्रिज ते वेस्टर्न हायवे,
९. भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल परीसर,

वरील ठिकाणी स्टॉल परवानगी देण्यात येऊ नये. उपरोक्त जागेत यापूर्वी स्टॉल दिले असल्यास समिती निर्णय घेईल.

२) ११ मी. पेक्षा कमी असलेल्या रस्त्यावर बुथ परवानगी देण्यात येऊ नये.
३) धार्मिक स्थळ, शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणे, पोलिस स्टेशन, इस्पितळे या ठिकाणाहुन १५० मी अतंरापर्यंत स्टॉल परवाने देण्यात येऊ नयेत.
४) महानगरपालिकेने हया अगोदर ज्या गटई स्टॉल धारकाला परवाना दिलेला आहे. अशा गटई स्टॉल धारकांची सुधारीत अटीशर्तीमध्ये नमूद केलेली कागदपत्र तपासून प्रथम त्यांना परवाना दिला जाईल.
५) गटई स्टॉलधारकाने स्टॉल परवाना घेताना शहरातील स्वतःची स्थावर मालमत्ता असलेल्या व्यक्तीचे हमी पत्र म्हणुन घेणे बंधनकारक राहील.
६) ना फेरीवाला क्षेत्राच्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या ठिकाणी स्टॉल परवानगी देताना समितीची मान्यता घेवुन स्टॉल परवानगी देण्यात यावी.
७) नविन गटई स्टॉल धारकांना स्टॉल वितरण महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.
८) समाज कल्याण विभागाने दिलेल्या स्टॉल व्यतिरिक्त महानगरपालिकेने पुर्वी दिलेले सर्व बुथ परवाने रद्द करण्यात यावेत व बांधकामे केलेली असल्यास तोडण्यात यावीत. तसेच मनपा निश्चित करेल त्या जागेवर पुर्वीचे परवाना प्राप्त स्टॉल स्थलांतरीत करण्यात येतील.
९) कोर्टाचे व शासनाचे वेळोवेळी पारित झालेल्या आदेशाचे मनपा कळविल त्याप्रमाणे तंतोतंत पालन करणे, स्टॉलधारकास बंधन राहील.
१०) नोकरी व इतर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला स्टॉल परवाना दिला जाणार नाही.

तरी गटई स्टॉल धारकांच्या बाबत परवाना देणेसाठी सुधारीत अटीशर्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून विभागाने कार्यवाही करण्यात यावी. सर्व परवाना धारकांचा संगणकीकृत (Database) तयार करण्यात यावा व वेळोवेळी अद्यावत करावा.

**ठराव क्र :-**

उपरोक्त प्रस्तावित केलेल्या धोरणास मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनामार्फत सदर धोरणाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, **महानगरपालिका हद्दीतील आर.एम.सी. प्लँटबाबत धोरण निश्चित करणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजुर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना हि दि.२५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम क्र.५५() नूसार औद्योगिक विभागात आर.एम.सी. प्लॅन्टचा व्यवसाय अनुज्ञेय आहे. तसेच कोणत्याही भूवापर विभागात तात्पूरत्या स्वरुपाच्या वापरासाठी ठराविक कालावधीसाठी मंजूरी देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपामध्ये व्यवस्था करणेसाठी व विकासकाच्या सुरु असलेल्या गृहप्रकल्पासाठी त्याच्या मालकीच्या जागेमध्ये खालील अटीशर्तींवर आर.एम.सी. प्लँट टाकण्यास परवानगी देण्यात यावी.

१) रहिवास क्षेत्रापासून ५०० मीटर अंतराच्या आत आर.एम.सी प्लांटला परवानगी देण्यांत येऊ नये.
२) विकासकाच्या गृहप्रकल्पासाठी सुरु असल्यास आजूबाजुच्या वस्तीचा विचार करुन त्या लोकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर किंवा आर.एम.सी. प्लँट करीता त्यांच्यातुन निघणाऱ्या धुळीकण, पावडर हे आजुबाजुच्या रहिवाश्यांना त्रासदायक होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर देण्यात यावे.
३) आर.एम.सी. प्लँट करीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून परवानगी घेण्याच्या अटीवर देण्यात यावा.
४) महापालिका क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या गृहप्रकल्पासाठी विकासकानी मागणी केल्यास त्यांच्या प्रकल्पासाठी प्रकल्प पुर्ण होईपर्यंत अटीशर्तीसह परवानगी देण्यात यावी.
५) सदर आर.एम.सी. प्लँटमुळे आजुबाजुच्या झाडेझुडुपांना (पर्यावरणास) बाधा पोहोचत असेल तर सदरच्या आर.एम.सी. प्लँटच्या परवानगीबाबत नियमानूसार कार्यवाही करण्यात यावी.
६) आर.एम.सी. प्लँट करीता प्रतिमाह रु.१००००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) भाडे आकारण्यात यावे
७) आर.एम.सी. प्लँटचा नाहरकत दाखला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता देण्यात येवू नये तसेच अधिक कालावधीसाठी मागणी केल्यास आजुबाजुच्या परिसराची तपासणी केल्यावर (पर्यावरणाचा ऱ्हास झालेला नसेल व रहिवाश्यांना त्रास होत नसल्याची खात्री झाल्यावरच) देण्यात यावा.

वरील अटीशर्तींना अधीन राहून आर.एम.सी. प्लँटला नाहरकत दाखला देणेस ही मा. महासभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**दौलत गजरे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १७ :-**

**महानगरपालिका हद्दीतील आर.एम.सी. प्लँटबाबत धोरण निश्चित करणे.**

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजुर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना हि

दि.२५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम क्र.५५() नूसार औद्योगिक विभागात आर.एम.सी. प्लॅन्टचा व्यवसाय अनुज्ञेय आहे. तसेच कोणत्याही भूवापर विभागात तात्पूरत्या स्वरुपाच्या वापरासाठी ठराविक कालावधीसाठी मंजूरी देण्याचे अधिकार मा. आयुक्त साो. यांना आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपामध्ये व्यवस्था करणेसाठी व विकासकाच्या सुरु असलेल्या गृहप्रकल्पासाठी त्याच्या मालकीच्या जागेमध्ये खालील अटीशर्तीवर आर.एम.सी. प्लँट टाकण्यास परवानगी देण्यात यावी.

१) रहिवास क्षेत्रापासून ५०० मीटर अंतराच्या आत आर.एम.सी प्लांटला परवानगी देण्यांत येऊ नये.

२) विकासकाच्या गृहप्रकल्पासाठी सुरु असल्यास आजूबाजुच्या वस्तीचा विचार करुन त्या लोकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर किंवा आर.एम.सी. प्लँट करीता त्यांच्यातुन निघणाऱ्या धुळीकण, पावडर हे आजुबाजुच्या रहिवाश्यांना त्रासदायक होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर देण्यात यावे.

३) आर.एम.सी. प्लँट करीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून परवानगी घेण्याच्या अटीवर देण्यात यावा.

४) महापालिका क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या गृहप्रकल्पासाठी विकासकानी मागणी केल्यास त्यांच्या प्रकल्पासाठी प्रकल्प पुर्ण होईपर्यंत अटीशर्तीसह परवानगी देण्यात यावी.

५) सदर आर.एम.सी. प्लँटमुळे आजुबाजुच्या झाडेझुडुपांना (पर्यावरणास) बाधा पोहोचत असेल तर सदरच्या आर.एम.सी. प्लँटच्या परवानगीबाबत नियमानूसार कार्यवाही करण्यात यावी.

६) आर.एम.सी. प्लँट करीता प्रतिमाह रु.१००००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) भाडे आकारण्यात यावे

७) आर.एम.सी. प्लँटचा नाहरकत दाखला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता देण्यात येवू नये तसेच अधिक कालावधीसाठी मागणी केल्यास आजुबाजुच्या परिसराची तपासणी केल्यावर (पर्यावरणाचा ऱ्हास झालेला नसेल व रहिवाश्यांना त्रास होत नसल्याची खात्री झाल्यावरच) देण्यात यावा.

वरील अटीशर्तीना अधीन राहून आर.एम.सी. प्लँटला नाहरकत दाखला देणेस ही मा. महासभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील     अनुमोदक :- श्री. दौलत गजरे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, **सन्मा. सदस्या श्रीम. गिता भरत जैन यांचा दिनांक 11/04/2018 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने , मैदाने, रोड डिवायडर यांची देखभाल दुरुस्ती मनपा हद्दीतील महिला स्वयंसेवी संस्था व महिला बचत गट यांचे मार्फत करणेबाबत.** प्रकरण क्र. १९, **सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक 11/04/2018 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महिला बालकल्याण व समाज विकास विभाग अंतर्गत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण काम आणि मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने , मैदाने, चौक, दुभाजक देखभाल दुरुस्ती करण्यासाठी महिला स्वयंसेवी संस्था व महिला बचत गटांना देऊन महिला सबलीकरण आणि सक्षमीकरण करणेबाबत .** प्रकरण क्र. २०, **सन्मा. सदस्या श्रीम. निलम ढवण यांचा दिनांक 11/04/2018 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभाग यांची देखभाल दुरुस्ती व महिला बालकल्याण समाज विकास विभागा अंतर्गत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कामे महिला स्वयंसेवी संस्था व महिला बचत गटांना देणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

सदरचे विषय फेटाळण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

सर्वच ठिकाणी महिला सक्षमीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांना प्रोत्साहन व प्राधान्य देण्यात येते. मिरा भाईंदर मनपा वृक्षप्राधिकरण विभागा अंतर्गत उद्याने, मैदाने, दुभाजक, चौक यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे ज्याप्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे महिला स्वयंसेवा संस्था व महिला बचत गट यांना देण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर मनपाने देखील महिला सक्षमीकरणासाठी हि कामे महिला बालकल्याण व समाजविकास विभागा अंतर्गत विविध कौशल्य प्रशिक्षणे महिला स्वयंसेवी संस्था व महिला बचत गटांना जाचक अटी न टाकता देणे व या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**स्नेहा पांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

मला सांगा की, आतापासून ज चा प्रस्तावावर ठराव घेणार का? म्हणजे कोणीही उठायचे चर्चा करायची त्या आधी आपण सांगायचं ठराव आम्ही फेटाळत आहोत. ठराव तरी मांडू द्या. आणि ठराव मांडायचा म्हणजे ज वर मांडायचा की नाही ते तर नक्की होऊ द्या.

**निलम ढवण :-**

सभापती महोदय महिला संदर्भात एवढे आहे एखाद्या गोष्टी महिलांना सक्षमिकरण करायचे महिलांना संरक्षण देण्याच्या बाबतीत...........

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महिला दिन आला की मोठमोठे प्रोग्राम करता. मोठमोठ्या गोष्टी करता, भाषण करता आणि महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी जर आम्ही विषय मांडला तर तुम्ही फेटाळण्याच्या गोष्टी करता.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम मी विचारलेल्या जवाब अजुन भेटला नाही. आपण ज च्या विषयावर ठराव घेणार का? म्हणजे ठराव आपण मंजुर होणार का?

**मा. महापौर :-**

आता मी घेतलेला आहे.

**गिता जैन :-**

म्हणजे आपण पुढे ज वर ठराव करु शकतो.

**मा. महापौर :-**

हो.

**गिता जैन :-**

सचिव साहेब ज वर ठराव करु शकतो की नाही मला फक्त एक जवाब द्या म्हणजे झाले.

**नगरसचिव :-**

यापुढे केलेले आहेत.

**गिता जैन :-**

करु शकतो की नाही ते सांगा.

**नगरसचिव :-**

करु शकतो.

**गिता जैन :-**

ठिक आहे मग आतापासून ज वर ठराव होणार.

**नगरसचिव :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, १९, २० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. हसमुख गेहलोत, दुसरा ठराव आहे सुचक श्रीम. निलम ढवण, अनुमोदन श्रीम.

स्नेहा पांडे. प्रथम मी दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्रीम. निलम ढवण ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांची हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४४, विरोधात १९, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १८, १९ व २० :-**

**"ज" अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने , मैदाने, रोड डिवायडर यांची देखभाल दुरुस्ती मनपा हद्दीतील महिला स्वयंसेवी संस्था व महिला बचत गट यांचे मार्फत करणेबाबत.**

**ठराव क्र. १९ :-**

**सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | जैन गिता भरत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | भोईर राजू यशवंत | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | ढवण निलम हरीश्चंद्र | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | गोहिल शानू जोरावर सिंह | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | कदम अर्चना अरुण | |
| १२ | सोंस नीला बर्नाड | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | भोईर भावना राजू | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | नाईक विविता विवेक | १६ | सपार उमा विश्वनाथ | |
| १७ | भावसार वंदना संजय | १७ | परदेशी गिता हरीश | |
| १८ | बेलानी हेमा राजेश | १८ | पाटील नरेश तुकाराम | |
| १९ | भोईर विणा सुर्यकांत | १९ | अहमद साराह अकरम | |
| २० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २१ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २३ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २६ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३० | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३८ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३९ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४० | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४१ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४३ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४४ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

शोक प्रस्ताव काँग्रेस पक्षाचे नगरसेवक श्री. अशरफ शेख यांच्या मातोश्री श्रीम. हलीमा मोहम्मद इग्राहीम शेख ८० वर्ष यांचे वृध्दापकाळाने ५ मार्च २०१८ रोजी निधन झाले यांच्या आत्म्यास चिरंशांती मिळावी त्यांच्या कुटुबाला दुःखातून सावरण्याची शक्ती मिळावी असा मी सभागृहाच्या वतीने ठराव मांडत आहे. दुसरा ठराव आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार विधान परिषद सभापती श्री. वसंत डावखरे साहेब यांचे दुःखद निधन झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व पक्षांना एकत्र घेऊन जिल्ह्याचा सर्वांगिण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अतुलनीय तुलना त्यांना ह्या सभागृहातर्फे भावपूर्ण आदरांजली. काँग्रेस पक्षाचे माजी आमदार शिर्डी संस्थानाचे माजी अध्यक्ष श्री. जयंत ससाणे यांचे दुःखद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे भावपूर्ण आदरांजली. श्री. हिंदु चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम नायीका श्रीदेवी यांचे अतोनात दुःखद निधन झाले त्यांचे चौथ्या वर्षापासून तामिळ, मल्याळम, हिंदी चित्रपट सुष्टीत अलौकीक अभिनयाच्या जोरावर सर्वांना मंत्रमुग्ध केले त्यांना ह्या सभागृहातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली असा मी ठराव मांडत आहे.

**मर्लिन डिसा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

आसिफा ह्या ८ वर्षाच्या बकरवाल ह्या मेंढपाळ भटक्या समाजातील मुलीचा जन्म कश्मीर मधल्या कठुआ रसना गावाजवळ अघोर अत्याचार करुन हत्या करण्यात आली. असीफा मेली नाही, मेला आहे पूर्ण देश आणि मेली आहे मानवता. आसिफाचा समाज हा असा समाज डोंगरावर राहणारा नेहमीच शत्रुपासून भारताचे संरक्षण करणारा. या कुटुंबाने समाजाचे किती भारतीयांचे प्राण वाचविले असतील. जम्मु कश्मीर

मधल्या कठुआ जिल्ह्यात रसना गावाजवळ त्यांची वस्ती गुरे चरताना तिचा घोडा हरवतो म्हणून ती शहरात येते. त्यानंतर मंजिरा मंदिराचा विश्वस्त आपले चार साथीदारांसह चार दिवस तिच्यावर अमानुष असा अत्याचार करतात जो इथे नमुद सुध्दा करु शकत नाही. ज्या नराधमांनी हे कृत्य केले ते माणूस नाहीच. परंतु त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करणारे माणूसकीला काळीमा फासणारे आहेत. त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी. असिफाच्या आत्म्याला चिरशांती लाभावी आणि तिच्या कुटुंबियांना या दुःखातून बाहेर पडण्याची शक्ती मिळावी असा मी ठराव मांडत आहे.

**रोहिदास पाटील :-**

याच्यामध्ये खासदार श्री. चिंतामणजी वनगा यांचे ही नाव घ्या आणि डॉ. कवळी.

**संजय थेराडे :-**

नगरसेविका श्रीम. विविता नाईक यांचे वडील श्री. सुधाकर पावसकर यांचे दुःखद निधन झाले असा मी ठराव मांडत आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. हेमंत म्हात्रे यांचे वडील श्री. सदानंद म्हात्रे यांचे याच्यामध्ये नाव समाविष्ठ करावे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी मृतात्म्यास शांती देण्यासाठी आपल्या जागेवर शांत उभे रहायचे आहे.

**दुःखवठा ठराव क्र. २० :-**

काँग्रेस पक्षाचे नगरसेवक श्री. अशरफ शेख यांच्या मातोश्री श्रीम. हलीमा मोहम्मद इब्राहीम शेख ८० वर्ष यांचे वृध्दापकाळाने ५ मार्च २०१८ रोजी निधन झाले आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार विधान परिषद सभापती श्री. वसंत डावखरे साहेब यांचे दुःखद निधन झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व पक्षांना एकत्र घेऊन जिल्ह्याचा सर्वांगिण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अतुलनीय तुलना त्यांना ह्या सभागृहातर्फे भावपूर्ण आदरांजली. काँग्रेस पक्षाचे माजी आमदार शिर्डी संस्थानाचे माजी अध्यक्ष श्री. जयंत ससाणे यांचे दुःखद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे भावपूर्ण आदरांजली. श्री. हिंदु चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम नायीका श्रीदेवी यांचे अतोनात दुःखद निधन झाले त्यांचे चौथ्या वर्षापासून तामिळ, मळ्याळम, हिंदी चित्रपट सुष्टीत अलौकीक अभिनयाच्या जोरावर सर्वांना मंत्रमुग्ध केले त्यांना ह्या सभागृहातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली असा मी ठराव मांडत आहे. तसेच काश्मिर येथील आठ वर्षाची आसिफा यांना ह्या सभागृहातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली. तसेच खासदार श्री. चिंतामणजी वनगा आणि डॉ. कवळी यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच नगरसेविका श्रीम. विविता नाईक यांचे वडील श्री. सुधाकर पावसकर यांचे दुःखद निधन झाले आहे तसेच श्री. हेमंत म्हात्रे यांचे वडील श्री. सदानंद म्हात्रे यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. रोहिदास पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा सपंली असे मी जाहिर करते.

(सभा संपल्याची वेळ सायं. ६.०५ वाजता)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका